**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ.सतीश पाटील )**

**पृ.शी. :** राज्यातील बंद असलेले विद्युत प्रकल्प सुरु करुन आवश्यक वीज निर्मिती करणे, वीज कंपन्यांतील सुरु असलेला गैरव्यवहार, भ्रष्टाचार रोखणे, तसेच केंद्राने बंद केलेला निधी परत मिळवून व राज्य शासनाने स्वत:चा निधी देऊन राज्यातील बंद योजना पूर्ण करणे.

**मु.शी. :** राज्यातील बंद असलेले विद्युत प्रकल्प सुरु करुन आवश्यक वीज निर्मिती करणे, वीज कंपन्यांतील सुरु असलेला गैरव्यवहार, भ्रष्टाचार रोखणे, तसेच केंद्राने बंद केलेला निधी परत मिळवून व राज्य शासनाने स्वत:चा निधी देऊन राज्यातील बंद योजना पूर्ण करणे या विषयाबाबत सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, गणपतराव देशमुख, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री मकरंद पाटील, सुनील केदार, संदीप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री जयकुमार गोरे, नसीम खान, राणाजगजितसिंह पाटील, अमित देशमुख, दिलीप सोपल, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री बबनराव शिंदे, डी.एस.अहिरे, राहुल मोटे, डी.पी.सावंत, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, कालिदास कोळंबकर, दत्तात्रय भरणे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम जगताप, अमीन पटेल, राजेश टोपे, ॲड. के. सी. पाडवी, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशिराम पावरा, अवधूत तटकरे, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. आसिफ शेख, श्रीमती निर्मला गावित, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

( चर्चा पुढे सुरु......

...2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, नियम 293 के अन्तर्गत जो प्रस्ताव सम्माननीय श्री राधाकृष्ण विखे-पाटील, श्री अजित पवार और अन्य सम्माननीय सदस्यों ने दिया है, उस प्रस्ताव पर अपने विचार व्यक्त करने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मुंबई और आयलैंड सिटी में तकरीबन 10 लाख बीईएसटी के ग्राहक है. इन दस लाख लोगों को मुंबई महानगरपालिका, बीईएसटी खून चुसने का काम, लूटने का काम सन 2012 से कर रही है, बीईएसटी 10 लाख लोगों को सिटी के अंदर पावर सप्लाय करती है, सन 2002 से ट्रान्सपोर्ट डिवीजन में लॉस हो रहा है. सन 2012 में ट्रान्सपोर्ट का जो लॉस है, उसकी रिकवरी के लिए 2012 में एमईआरसी में अप्लिकेशन किया कि हमको लॉस कवर करना है. ऐसा कहा गया कि 2400 करोड़ रुपये का लॉस कवर करने के लिए हमें परमिशन दी जाए. इस बात को एमईआरसी ने नकार दिया, मना कर दिया. बेस्ट ने अपिलेट ट्रिब्युनल दिल्ली में जाकर अपिल किया कि हमें 2400 करोड़ रुपये का लॉस कवर करने की परमिशन दी जाए. उन्होंने भी मना कर दिया. जब बेस्ट को एमईआरसी ने मना कर दिया, अपिलेट ट्रिब्युनल ने मना कर दिया, उसके बाद मुंबई महानगरपालिका ने मुंबई के लोगों को लूटने के लिए सुप्रीम कोर्ट में याचिका दायर की. कहा गया कि ट्रान्सपोर्ट का जो लॉस है वह कवर करने के लिए हमें परमिशन दी जाए. सुप्रीम कोर्ट को सच्चाई न बताते हुए, सुप्रीम कोर्ट ने यह आदेश दिया कि आप ट्रान्सपोर्ट को सब्सिडाईज कर सकते हो. सुप्रीम कोर्ट में सही बात नहीं बताने के बाद, कोर्ट को गलत दिशा दिखाने के बाद, सुप्रीम कोर्ट से धोखे से मुंबई महानगरपालिका ने आदेश लिया और उसके बाद 2012 से 2016 तक का ट्रान्सपोर्ट डेफिसेट, लॉस रिकवर करने की इन्होंने परमिशन ली. 2400 करोड़ रुपये का लॉस था. 2012 से 2016 तक बेस्ट ने तकरीबन 2300 करोड़ रुपये का लॉस वसूल कर लिया. एक भी रुपया महानगरपालिका ने ॲडजस्ट नहीं किया. आज बेस्ट को तकरीबन 5 हजार करोड़ रुपये का लॉस है. उसका पूरा बोजा आयलैंड सिटी में रहने वाले लोग, जो 10 लाख ग्राहक है, वे उठा रहे है. आप बेस्ट में सफर कीजिए या न कीजिए. आप बेस्ट की इलेक्ट्रिसिटी इस्तेमाल करते हों, तो आपको उसका पैसा देना पड़ेगा. किसी को एक हजार रुपये का बिल आता है तो 25 प्रतिशत उसके ऊपर ट्रान्सपोर्ट का लॉस जा रहा है. उस पर सरकार 15 प्रतिशत टैक्स ले रही है. लॉस के ऊपर टैक्स लिया जा रहा है. यह

....3.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल.......

कहां का इन्साफ है ? मुंबई महानगरपालिका कितना लूटने का काम कर रही है, इसका हिसाब नहीं है. दिनांक 31 मार्च, 2016 को ट्रान्सपोर्ट का जो लॉस है उसको खत्म करने की बात है. लेकिन फिर से एक बार बेस्ट एमईआरसी के पास जा रही है और कह रही हे कि हमको पांच हजार करोड़ रुपये का लॉस हो गया है, उसको कवर करने के लिए सन 2020 तक परमिशन दीजिए. आज बिजली ग्राहक की हालत ऐसी हो गई है कि, एक आदमी टैक्सी चलाता है, उसकी पांच-सात हजार रुपये इन्कम है, उसको बिजली का बिल चार हजार रुपये आता है. हमने मुंबई में एक अभियान किया. 7 लाख लोगों ने अपना बिल जमा कराया. हमने माननीय राज्यपाल को अप्लीकेशन भी दी है. बिजली का बिल भरते भरते लोग परेशान हो गए है. घर में खाना खाने के लिए पैसा नहीं है लेकिन लोगों को बिजली का बिल भरना पड़ता है. यह लॉस ट्रान्सपोर्ट डिविजन को हो रहा है. आज महानगरपालिका का बेस्ट ट्रान्सपोर्ट विभाग जो लॉस दिखा रहा है, बेस्ट में बहुत भ्रष्टाचार चल रहा है. उसका भुगतान इलेक्ट्रीसिटी से कन्ज्यूम करते है. यह कहां का इन्साफ है ? बेस्ट को लॉस इस तरह से हो रहा है कि जेएनएनयुआरएम के तहत बस खरीदी की गई. प्रति वर्ष 40 करोड़ रुपये मेन्टेनन्स कॉस्ट जा रही है. 10 करोड़ रुपये प्रति माह ॲडमिनिस्ट्रेटिव कॉस्ट जा रही है. 160 करोड़ रुपये का लॉस ए.सी. बस चलाने के लिए जा रहा है. आज बेस्ट 5000 करोड़ रुपये का लॉस दिखा रही है. मुंबई महानगरपालिका ने उसको, ट्रान्सपोर्ट को सबसिडी देनी चाहिए. आज मिरा-भाईंडर में ट्रान्सपोर्ट को सबसिडी है. नई मुंबई में ट्रान्सपोर्ट को सबसिडी है. पिंपरी-चिंचवड में ट्रान्सपोर्ट को सबसिडी है. लेकिन मुंबई महानगरपालिका अपने 10 लाख ग्राहक का खून चूस रही है. मुंबई की बेस्ट में रोजाना 45 लाख लोग सफर किया करते थे, वे घटकर 24 लाख पर आ गए है. दो किलोमीटर तक का किराया 8 रुपये कर दिया गया है. इस कारण बेस्ट के ग्राहक कम हो रहे है. लोग शेअर टैक्सी में सफर कर रहे है. 10 लाख ग्राहकों पर बोजा डाला जा रहा है. आज बेस्ट की बस उपनगर में चलती है, थाना, नई मुंबई में बस जाती है, डोंबिवली में बस जाती है. लेकिन उन सब का पैसा इन 10 लाख ग्राहकों से लिया जा रहा है.

....4.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अमिन पटेल........

अध्यक्ष महोदय, अब दूसरा प्रपोजल एमईआरसी ने लाया है. प्राईव्हेट पॉवर डिस्ट्रिब्युशन कंपनी है. सिटी में टाटा कंपनी की बिजली है. उपनगर में रिलायन्स कंपनी की बिजली है. एमईसीबी की बिजली है. अब उनका कहना यह है कि प्राईव्हेट कंपनी भी लोगों पर टैक्स लादे, लोगों से टैक्स वसूल करे. 10 लाख ग्राहकों के बजाय 55 लाख ग्राहकों को बेस्ट का नुकसान भरपाई देना पड़ेगा. मंत्री महोदय से मेरा निवेदन है कि किसी भी कीमत में बेस्ट का ट्रान्सपोर्ट का लॉस 10 लाख ग्राहकों से, सिटी में रहने वाले लोगों से न ले. कुलाबा से सायन तक के ग्राहकों को इस टैक्स से हटाना चाहिए. इन लोगों का बिजली का बिल किस तरह से कम किया जा सकता है वह देखना चाहिए.

अध्यक्ष महोदय, पिछले एक साल में बेस्ट के जनरल मॅनेजर से फोन करके मैंने ऑथॅन्टिक फिगर्स लिए है. बेस्ट ने एक साल में 34 प्रतिशत बिजली का बिल बढ़ाया है. बिजली का रेट किस तरह से कम किया जा सकता है, दस लाख ग्राहकों को किस तरह से फायदा हों, इस बारे में मंत्री महोदय ने जवाब देना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

----------

.....5.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील ( अलिबाग ) : अध्यक्ष महाराज, विरोधी पक्षाने म.वि.स.नियम 293 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सर्वप्रथम मी सन्माननीय वीजमंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना धन्यवाद देत आहे. त्यांनी आमच्या रायगड जिल्हयातील मुरुड येथे एक सब स्टेशन मंजूर केलेले आहे. त्यामुळे पर्यटकांना दिलासा मिळणार आहे. त्यांनी या कामाचा नारळ फोडण्याकरिता मला बोलाविले होते. आज उरण तालुक्यामध्येही सब स्टेशन मंजूर केलेले आहे. अलिबागला जे सब स्टेशन मंजूर करण्यात आले होते, त्यावेळी जी घोषणा केली गेली होती, त्याची अद्याप पुर्तता झालेली नाही. आज मुंबईमध्ये विजेचा जसा लॉस होत आहे, त्याप्रमाणे अलिबाग येथेही विजेचा लॉस होत आहे. माझ्या मतदारसंघामध्ये पर्यटन व्यवसाय मोठया प्रमाणात करण्यात येतो. पर्यटन हॉटेलवाले घरगुती लाईट वापरत आहेत, त्याचा भार नियमित घरगुती ग्राहकांना सोसावा लागतो. तेथे वीज चोरी देखील भरपूर प्रमाणात होते. मला स्वत:ला एक लाख रुपयाचे विजेचे बिल आले होते. हे विजेचे लॉसेस रेग्यूलर ग्राहकांकडून वसूल केले जातात. विशेषत: कोकणातील रायगड जिल्हयामध्ये जे आदिवासी आहेत. ते गरीब आहेत. या गरीब आदिवासींकडून विजेचा जो दर आकारला जातो, तोच हॉटेलमालकांकडूनही आकारला जातो. या दरांमध्ये नियंत्रण करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, आमदाराचे काम काय असते, जो वीज चोरतो त्याला पाठिंबा द्यायचे.... (अडथळा )... ही वस्तुस्थिती आहे. तरीही मी माझे शब्द मागे घेत आहे. माझ्या मतदारसंघामध्ये 93 टक्के वीज बिलाची वसूली होते. यामधील लॉसेस कमी करण्याकरिता मी प्रयत्न करीत आहे. आमच्या भागामध्ये सब स्टेशन असले पाहिजे, ही माझी मागणी आहे. एकही सौरपंप अद्यापपर्यंत मिळालेला नाही. याबाबत कलेक्टर साहेबांकडे प्रस्ताव पाठविण्याची जाचक अट लादण्यात आलेली आहे. तहसीलदार पातळीवर सौरपंप प्रस्ताव मंजूर होणे आवश्यक आहे. लाभार्थी शेतक-यांना कलेक्टर साहेबांपर्यंतचा प्रवास करणे गैरसोयीचे होते. सौरपंप योजनेचा फायदा लाभार्थी शेतक-यांना द्यायचा असेल तर खरोखर प्रांत अधिकारी किंवा तहसीलदार पातळीवर संबंधित प्रस्तावांना मान्यता देणे आवश्यक आहे.

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील......

अध्यक्ष महोदय, पंतप्रधान सडक योजनेसंबंधी मला बोलावयाचे आहे. परंतु सभागृहामध्ये संबंधित खात्याचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत. पाणीपुरवठयाबाबतही मला बोलावयाचे आहे. प्रश्न मांडला होता. भारत निर्माण योजनेला पैसे न दिल्यामुळे नवीन योजनेला नवीन योजनांच्या कामांना शासनाने पैसे दिलेले आहेत. परंतु ज्या जुन्या योजनेतील अपूर्ण कामांना पूर्ण करण्याकरिता शासनाने निधी दिलेला नाही. पंतप्रधान ग्राम सडक योजनेला अद्यापपर्यंत एकही रुपयाचा निधी न मिळाल्यामुळे राज्यामध्ये या दोन्ही योजना फेल्युअर झालेल्या आहेत. याचाही विचार करावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

------

....... बी-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप ( धामणगाव रेल्वे ) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 अन्वये विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी ऊभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी भाषण करणार नाही. मी फक्त मुद्दे उपस्थित करणार आहेत. सदर मुद्दे माननीय ऊर्जा मंत्र्यांनी समजून घेऊन त्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणातून आम्हाला माहिती द्यावी. माननीय ऊर्जा मंत्री कार्यक्षम आहेत, असा सर्व सन्माननीय सदस्यांचा समज आहे. तो भविष्यात कसा दूर होईल या दृष्टीकोनातून त्यांनी काळजी घेण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार हे पूर्वी ऊर्जा विभागाचे मंत्री होते. त्यावेळी इन्फ्रा-2 च्या संदर्भातील 900 कोटी रुपयांचा कार्यक्रम निश्चित झाला होता. या माध्यमातून प्रती तालुका 50 ते 60 ओव्हरलोड ट्रान्सफॉर्मर बदलावयाचे होते. आजतागायत ट्रान्सफॉर्मर बदलले नाहीत. त्यामुळे असे ट्रान्सफॉर्मर पहिल्या प्रथम तातडीने बलदण्यासाठी माननीय ऊर्जा मंत्र्यांनी योग्य ती कार्यवाही करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे. सद्य:स्थितीमध्ये नवीन विजेच्या कनेक्शनमध्ये प्रचंड मागणी वाढलेली आहे. जुने ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होत आहेत. परंतु, नवीन ट्रान्सफॉर्मर न लागल्यामुळे शेतकऱ्यांची वीज 5 ते 10 मिनिटांनी सातत्याने जात आहे.

अध्यक्ष महोदय, पूलगाव, देवगाव, तळेगाव, दशासर ते चांदूर रेल्वे अशी 90 कि.मी. विद्युत लाईन जुनी असल्यामुळे ती खराब झालेली आहे. परिणामी सातत्याने वीजपुरवठा खडीत होत असतो. मी या पूर्वीच्या बैठकीमध्ये जुनी विद्युत लाईन तातडीने बदलण्याची मागणी केलेली होती. सदर जुनी विद्युत लाईन अद्यापपर्यंत बदलण्यात आलेली नाही. सदर बैठकीत धामणगांव ते देवगांव अशी अडिशलन सप्लीमेंटरी विद्युत लाईन टाकण्याबाबत संबंधितांना निर्देश दिले होते. हे काम देखील अद्यापपर्यंत सुरु झालेले नाही.

अध्यक्ष महोदय, एमईसीबीच्या कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्यामुळे ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणावर ओरड होत होती. काही लोक तर नागपूरवरुन ये-जा करीत होते. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कार्यालयात



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप.......

वेळेवर उपस्थित राहण्याबाबत सक्त आदेश देण्याची गरज आहे. एमईसीबीमधील अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसतील तर त्यांच्या विरोधात नियमानुसार कारवाई करण्याची गरज आहे. एमईसीबीमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर जोपर्यंत कारवाई होत नाही, तोपर्यंत त्यांच्यात शिस्त लागणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांशी संबंधित असलेली लक्षवेधी सूचना मंगळावार दिनांक, 22 मार्च, 2016 रोजी सभागृहात उपस्थित करण्यात आली होती. चोरी केलेल्या विद्युत तारांचे 3 ते 4 वर्षात रिप्लेसमेंट होत नव्हते. परिणामी शेतकऱ्यांचे बिल सुरु रहायचे. चोरी केलेल्या विद्युत तारा या तातडीने जोडून देण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन शेती पिकांचे नुकसार होणार नाही.

अध्यक्ष महोदय, राज्यात अनेक ठिकाणी खाजगी कंत्राटदारांची मनमानी सुरु आहे. विभागाकडून अमरावती जिल्ह्यामध्ये नवीन ट्रान्सफॉर्मर, सबस्टेशन्सची कामे अतिशय निकृष्ट दर्जाची केलेली आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना या संदर्भात वारंवार सूचना देऊनसुध्दा ती कामे चांगल्या दर्जाची केलेली नाहीत. रस्त्याच्या दुतर्फा 11 के.व्ही.ची विद्युत लाईन टाकली जात आहे. अशी लाईन टाकली जात असताना सिमेंट आणि गिट्टीचा कमी प्रमाणात वापर केल्यामुळे भविष्यात त्या निकृष्ट दर्जाच्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंदर्भात माननीय ऊर्जा मंत्र्यांनी संबंधितांना योग्य त्या सूचना देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात राजूरा आणि आम्ला असे दोन सबस्टेशन्स 31 मार्चपर्यंत सुरु होतील असे आश्वासन आम्हाला यापूर्वी दिले होते. सद्य:स्थितीत राजूरा येथील सबस्टेशनचे काम सुरु झालेले आहे. परंतु, आम्ला येथील सबस्टेशनचे काम अद्यापी सुरु झालेले नाही.

अध्यक्ष महोदय, दीन दयाळ योजनेंतर्गत वाडवणा रामनाथ, धानोरा फसी, चिंचोली, शिवणी रसुला पुल अशी नवीन 33 के.व्ही. सबस्टेशन्स उभारण्याबाबत आदेश देण्यात आले होते. परंतु, यासंदर्भात आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय महसूल राज्यमंत्री आणि माझ्या मतदारसंघातील नेर आणि नांदगांव खंडेश्वर येथील वटफळीला 220 के.व्ही. सबस्टेशन्स उभारण्याबाबत मान्यता दिली होती.

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप......

या कामाचे 15 फेब्रुवारीला भूमिपूजन केले जाईल असे आम्हाला आश्वासन दिले होते. या कामाचे भूमिपूजन झाले नाही. परंतु, त्या कामाचे स्थळ तरी निश्चित झालेले आहे किंवा कसे याबाबत आमच्या मनात शंका येऊ लागली आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी वटफळी येथील 220 के.व्ही. सबस्टेशन्स केव्हापर्यंत सुरु केले जाणार आहे, त्याचे उत्तर भाषणातून देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री. गिरीष बापट यांच्याकडे संसदीय कार्य विभाग आहे. ते ऊर्जा विभागाचे मंत्री नाहीत. पंतप्रधान ग्राम सडक योजनेतील कामे गेल्या दोन ते तीन वर्षापासून सुरु आहेत. निधी अभावी ही सर्व कामे प्रलंबित आहेत. ही सर्व कामे नवीन ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून मार्गी लावली जातील काय ? मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील कामे मागिल वर्षापासून एकही काम जिल्ह्यात सुरु झालेली नाहीत. पंतप्रधान ग्राम सडक योजनेतील कामे रखडलेली आहेत. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी या सर्व कामांची माहिती उत्तराच्या भाषणातून आम्हाला द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद.

----

.....4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुनील देशमुख ( अमरावती ) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 अन्वये विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी ऊभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय ऊर्जामंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे हे कार्यक्षम मंत्री आहेत आणि त्याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार आणि सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्या काळात त्यांनी ऊर्जा विभागाची जबाबदारी समर्थपणे सांभाळलेली होती. ऊर्जा विभागाचे काम 1999 पासून विंध्वसक स्वरुपाचे होते. सन 2004 मध्ये ऊर्जा विभागातील कॅबिनेट पद हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे तर कॉंग्रेसकडे ऊर्जा विभागाचे राज्यमंत्री पद होते. कॉंग्रेसमधील एकही सन्माननीय सदस्य ऊर्जा विभाग घेण्यास तयार नसायचा. त्यावेळी ऊर्जा विभागातील अधिकारी आणि कर्मचाही हे दहशती खाली काम करीत होते. त्यावेळी महाराष्ट्रात वीज लोडशेडींगचा मोठा आणि गंभीर प्रश्न होता. त्यावेळी 10 ते 18 तास वीज लोडशेडींग होत होती. त्यामुळे लोकांच्या भावना अतिशय तीव्र होत होत्या. परिणामी क्वचित प्रसंगी लोकांकडून ऊर्जा विभागातील अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना काळे फासण्याचा प्रसंग होत होता. अशा बिकट परिस्थितीमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, अजित पवार यांनी ऊर्जा विभागाची धुरा समर्थपणे सांभाळली होती. आज विजेच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य सरप्लस झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, मी फक्त दोन मुद्यांकडे सर्वांचे लक्ष वेधणार आहे. हे मुद्दे त्यावेळी वारंवार चर्चेसाठी येत होते. याचा उल्लेख देखील मागिल चर्चेच्या वेळी केलेला होता. त्यावेळी माननीय ऊर्जा मंत्र्यांनी येणाऱ्या काळात पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात व्हिजन वाईज महामंडळे तयार केली जातील असे आश्वासन दिले होते. महामंडळे का केली पाहिजेत याबाबत त्यांनी कारण देखील सांगितले होते. सर्वात जास्त थर्मल पॉवर, कारखाने विदर्भात आहेत. विदर्भातील पाणी, जमीन आणि पर्यावरणाचा ऱ्हास होत होता. विदर्भात निर्माण होणारी वीज महाराष्ट्रातील प्रगत भागांमध्ये दिली जात होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ट्रान्समिशनचा लॉस होत होता. हा लॉस महाराष्ट्रातील सर्व ग्राहकांना सोसावा लागत होता. ज्या ठिकाणी थर्मल पॉवर

......5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुनील देशमुख.......

स्टेशन्स आहेत, अशा ठिकाणच्या लोकांना, कारखान्यांना आणि शेतकऱ्यांना मात्र कोणताही फायदा होत नव्हता. यासंदर्भात मी 3 महिन्याच्या आत पॉझिटिव्ह निर्णय घेतो असे मानीय ऊर्जा मंत्र्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते. माननी ऊर्जा मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाचे काय झाले असा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, मी दुसऱ्या मुद्याकडे सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे लक्ष वेधणार आहे. विजेच्या संदर्भात चर्चा होत असताना ॲडिशनल डीजी लेव्हलच्या पोलीस अधिकाऱ्यामार्फत महामंडळातील भ्रष्टाचार शोधून काढण्याचे काम केले जात होते. मधल्या काळात महामंडळाने व्हिजीलन्स स्क्वॉड तयार केला होता. आपल्या भारत देशामधील इतर कोणत्या राज्यामध्ये अशा प्रकारचे काम झाले नव्हते. ॲडिशनल डीजी लेव्हलच्या पोलीस अधिकाऱ्यामार्फत महामंडळातील भ्रष्टाचार शोधून काढण्याचे काम केले जात होते.

C-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुनील देशमुख....

आपली चोरी लपविण्यासाठी, यांच्या बेकायदेशीर विजेच्या जोडण्या, बिलांमधील तूट यावर कारवाई करण्यासाठी व्हिजीलन्स स्कॉडची नियुक्ती करण्यात आली होती. यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीचे काम व्हिजीलन्स अधिकारी करीन, अशी ती संकल्पना होती. मला आठवते की, तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना मी पत्र लिहिले होते की, हे सर्व चुकीचे आहे, हे दुरुस्त केले पाहिजे. विभागाला जर कार्यक्षम बनवायचे असेल तर व्हिजीलन्स स्कॉडची आवश्यकता आहे. केंद्र सरकारच्या कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, अतिरिक्त पोलीस महासंचालकाच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराची चौकशी केली पाहिजे. त्यावेळी मला असे सांगण्यात आले होते की, आम्ही याचा विचार करीत आहोत. मराठी भाषेत एक म्हण आहे. जो क्रांतीकारक असतो, तो क्रांती झाल्याबरोबर तो क्रांतीकारी होतो, म्हणजे Every revolutionary becomes anti-revolutionary after revolution. आपले तसे काही झाले आहे काय, कालपर्यंत आपण क्रांतीकारक होते, परंतु आज मंत्री झाल्याबरोबर उलटी उडी मारली आणि तसे क्रांतीकारी झाले. हे दोन्ही मुद्दे अत्यंत महत्वाचे मूलभूत होते, जे विभागाला चांगल्या दिशेने नेणारे होते. या दोन्ही मुद्यांवर आपण गेल्या सहा महिन्यात कोठेही कधीही बोलला नाहीत आणि तसा धोरणात्मक निर्णयही घेतला नाही. माझी माननीय ऊर्जा मंत्री महोदयांना विनंती आहे की, या दोन्ही मुद्यांना सकारात्मक उत्तर द्यावे. अध्यक्ष महाराज, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील केदार (सावनेर): अध्यक्ष महाराज, मी नियम 293 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी या ठिकाणी उभा आहे. मी दोन दिवस अगोदर "सकाळ" वर्तमानपत्रात आलेल्या एका बातमीकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. त्या वर्तमानपत्रामध्ये मीटरसंबंधी एक मोठी बातमी छापून आली. राज्याच्या माननीय ऊर्जा मंत्र्यांनी ती बातमी वाचली असेल आणि त्यांनी माहिती घेण्याची कार्यवाही सुरु केली असेल, असा विश्वास मी प्रगट करतो. एमएसईबीमधील तत्कालीन अधिकारी श्री.अजोय मेहता यांच्याबद्दल बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळे विषय सांगितले आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.सुनील देशमुख यांनी सांगितले की, क्रांतीकारक बदल झाला आहे काय, याबद्दल आमच्या मनामध्ये शंकेचे वातावरण निर्माण झाले आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. त्या मीटरसंबंधी मंत्री महोदय चौकशी करणार आहेत का? विदर्भामध्ये श्री.अजोय मेहता यांनी अडानी पॉवरला एका वेगळ्या पध्दतीने फायदा देण्याचा प्रयत्न केला, याबद्दल कोठेही वाच्छता नाही, अशा पध्दतीने सिस्टमॅटिक काम त्यांनी केले आहे. त्यांनी तिरोडा ते तिळंगी आणि तिळंगी ते अकोला ही ट्रॉन्समिशन लाईन एमएसईबी आणि अडानी पॉवर यांच्या जॉईंट व्हेंचरने तयार होणार होती. मध्यंतरीच्या काळात इलेक्ट्रिसिटी बोर्ड त्यातून विड्रॉ झाली आणि त्यांनी सांगितले की, तुम्ही ती लाईन पूर्ण करा. त्या लाईनमधून किती वीज वाहते, त्या लाईनचा कोण उपयोग करते, याची काहीही माहिती नाही. एक ठरलेली रक्कम इलेक्ट्रिसिटी बोर्ड त्या अडानी कंपनीला देत आहे, यासंबंधी मंत्री महोदयांनी माहित जाणून घ्यावी. दिल्ली सरकाने इलेक्ट्रिकसिटी बोर्डाचे रिऑडिट केले. या लाईनसाठी किती रक्कम दिली जावी, यासाठीचे सूत्र एमईआरसीने मंजूर केलेले आहे. असे असताना त्या लाईनसाठी किती खर्च लागला, याचे ऑडिट होणे आवश्यक आहे. त्यांनी दिलेल्या खर्चाचे ऑडिट झाले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, केंद्रामध्ये भारतीय जनता पक्षाचे नवीन सरकार आले, त्याचप्रमाणे राज्यात सुध्दा त्याच पक्षाचे सरकार आले. शासन शेतकऱ्यांसाठी नेटसेड तयार करते त्याप्रमाणे माझ्या मतदारसंघात इलेक्ट्रिसिटी बोर्डाच्या टॉवरला एक कापड टाकले तर एक पूर्ण नेटसेड तयार होईल, इतक्या ट्रॉन्समिशनच्या लाईन तेथे टाकलेल्या आहेत. केंद्र सरकारने दिनांक 15 ऑक्टोबर, 2015 रोजी शेतकऱ्यांच्या संदर्भात एक निर्णय घेतलेला आहे. ज्या ज्या शेतकऱ्यांच्या शेतामधून टॉवर जाईल, त्या शेतकऱ्याला त्यांचे पैसे मिळाले पाहिजेत, याची मार्गदर्शक तत्वे केंद्र



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील केदार....

सरकारने घालून दिलेली आहेत. परंतु दिनांक 15 ऑक्टोबर, 2015 पासून या शासनाने एकही निर्णय घेतलेला नाही. या शेतकऱ्यांच्या शेतामधून जे टॉवर जातात त्या शेतकऱ्यांना आपण कवडीमोलाने पैसे देतात. एकीकडे आपण शेतकऱ्यासंबधी या सभागृहात चर्चा करतो, परंतु दुसरीकडे केंद्र सरकारने घेतलेला निर्णय होऊन आठ, दहा महिने झालेले आहेत, परंतु त्यासंदर्भात माननीय ऊर्जा मंत्र्यांनी अंमलबजावणी केलेली नाही. कोणाच्या दबावामुळे, कोण आपल्याला थांबवित आहे, कोण आपल्याला त्या शेतकऱ्यांच्या शेतातून जाणाऱ्या लाईनचे पैसे देऊ देत नाहीत, याबाबत माननीय ऊर्जा मंत्र्यांनी आपल्या भाषणात खुलासा करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महाराज, ग्रामीण भागातील टिल्लू आपण केव्हा बंद करणार आहात? ग्रामीण भागातील लाईनमन हा स्वत: तेथे आपला खाजगी सहायक नेमतो, त्याला आपण टिल्लू म्हणतो. या टिल्लूंचे अपघात मोठ्या प्रमाणावर होत आहेत. माझ्या मतदारसंघात एका टिल्लूचा अपघात झाला. त्याला 100 टक्के पॅरालिसिस झाला, परंतु ही बाब कार्यकारी अभियंता, अधिक्षक अभियंता तसेच मुख्य अभियंता यांना माहित नाही का, या सर्वांना माहिती आहे. हे टिल्लूचे प्रकार आपण थांबविले पाहिजेत अन्यथा असे अनुचित प्रकार यापुढेही घडत राहतील.

माझ्या मतदारसंघातील रोहणा येथे 132 के.व्ही. चे सबस्टेशन उभारण्यासाठी माननीय ऊर्जा मंत्र्यांनी ऑर्डर दिली. त्यानंतर प्रस्ताव गेला, परंतु अजून त्या ठिकाणी मंजुरी आली नाही. 132 के.व्ही. चे सबस्टेशन रोहना येथे मंजूर करावे. माझ्या मतदारसंघात खापरखेडा थर्मल पॉवर स्टेशन आहे. खापरखेडा थर्मर पॉवरचा स्टेशनचा सीएसआर महादुला, कोऱ्हाडीला मिळाला, परंतु खापरखेड्याला मात्र मिळाला नाही.

अध्यक्ष महाराज, मी श्री.अजोय मेहताबद्दल ज्या काही बाबींचा उल्लेख केला, त्यासंदर्भात त्यांची चौकशी माननीय ऊर्जा मंत्री करणार आहात काय? सन्माननीय सदस्य डॉ.सुनील देशमुख यांनी आपले मत व्यक्त केले आहे. सन्माननीय सदस्य हे विदर्भातील असून अतिशय खमके आहेत. आपण कोणाच्याही दबावाला घाबरत नाहीत म्हणून आपण श्री.अजोय मेहता यांची बदली केली, हे आपण आपल्या कृतीतून दाखविले आहे. या निमित्ताने माझी ऊर्जा मंत्री महोदयांना मागणी आहे की, श्री.अजोय मेहता यांची आपण चौकशी करणार का, याबद्दल आमच्या मनात शंका आहे. ही शंका दूर करावी. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण): अध्यक्ष महाराज, नियम 293 अन्वये विजेच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी काही शंका व्यक्त केल्या असल्या तरी गेल्या सोळा, सतरा महिन्यात ऊर्जा मंत्री महोदयांनी जे काम केलेले आहे, ते खरोखरच अभिनंदनीय आहे, यात काही शंका नाही. गेल्या वर्षभरात माननीय ऊर्जा मंत्र्यांच्या कठोर मेहनतीमुळे आणि उत्तम कार्यक्षमतेमुळे जनता जनार्धनाला आपल्या समोर लक्ष ठेवून माननीय ऊर्जा मंत्र्यांनी केलेले काम अतिशय चांगले आहे. सन 2014-2015 मध्ये माननीय ऊर्जा मंत्र्यांच्या कठोर क्षमतेमुळे 4.8 टक्क्यांनी वीज स्थापित क्षमतेमध्ये वाढ झालेली आहे. कोळशाचे नियोजन, चांगल्या प्रतीचा कोळसा, थर्ड पार्टी इन्स्पेक्शन, चांगल्या खाणी मिळविणे या सर्वांचा परिणाम वीजनिर्मिती क्षेत्रामध्ये होतो. यातून आपल्याला चांगले निकाल बघायला मिळतात. माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी कोळशाच्या वाहतुकीचा खर्च वाढविला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या सर्व बाबी पाहता त्यामुळे विजेच्या स्थापित क्षमतेमध्ये वाढ झालेली आहे.

अध्यक्ष महाराज, मी माननीय ऊर्जा मंत्र्यांच्या निदर्शनास एक गोष्ट आणू इच्छितो की, आपण पीपीएच्या माध्यमातून जे विजेचे प्रकल्प चालवितो, त्यासाठी एक निश्चित रक्कम द्यावी लागते. साधारणत: वीजनिर्मिती आणि वीज वितरण यांचे गणित बिघडत असते, याचा आपण निश्चित विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, ऊर्जा विभागाने खर्चामध्ये कपात केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. महावितरणच्या मुख्य कार्यालयात जवळपास 950 कर्मचारी असून जनरल भागात 550 कर्मचारी काम करतात. खरोखर इतक्या कर्मचाऱ्यांची गरज आहे काय, ही बाब माननीय वित्त मंत्र्यांनी तपासून पाहिली पाहिजे. मला शहराच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे. गेल्या सरकारने आमच्या नागपूर शहरावर एसएनडीएल स्पॅनकोचे पाप आमच्या माथी मारलेले आहे. शहराच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची बाब आहे. या एसएनडीएल स्पॅनकोच्या माध्यमातून बळजबरीने वीज बिलाची वसुली करणे, त्या ठिकाणची वेळ न पाहता लोकांच्या घरात जाऊन माता भगिनींना धमकाविणे अशा प्रकारचे काम जोरात सुरु आहे.

यानंतर D-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधाकर कोहळे ...

अध्यक्ष महोदय, मी ऊर्जा मंत्री महोदयांना नम्र विनंती करतो की, विविध कार्पोरेशनच्या वेस्ट वॉटरचा उपयोग वीज निर्मितीसाठी करण्यासाठी पॉलिसी तयार करण्याबाबत देखील विचार करावा. तसेच, ते फिडर मॅनेजमेंटच्या दृष्टीने योग्य निर्णय घेतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..........

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय भांबळे ( जिंतूर ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या चर्चेवर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा मंत्री महोदयांनी 6 महिन्यांपूर्वी परभणी जिल्ह्यात एक बैठक घेतली होती. त्या बैठकीस त्यांनी परभणी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, खासदार व आमदारांनाही बोलावले होते. त्या बैठकीत आम्ही आपणास काही सूचना केल्या होत्या. त्यावेळेस सर्व आमदारांनी सांगितले होते की, परभणी जिल्ह्यात इन्फ्रा-2 चे काम 2 वर्षांपासून मंजूर असतानाही त्यात गत 2 वर्षांपासून कोणत्याही पध्दतीचे काम झालेले नाही. त्यावेळेस आपण असे सांगितले होते की, इन्फ्रा-2 चे काम तत्काळ रद्द करुन ते नवीन कॉंट्रॅक्टरला देऊन सुरु करु. परंतु, अद्यापही त्यावर कोणत्याही प्रकारची ॲक्शन झालेली नाही. याकरिता मंत्री महोदय आपणांस विनंती आहे की, आपण परभणी जिल्ह्यातील इन्फ्रा-2 चे काम तत्काळ रद्द करावे आणि ते नवीन कॉंट्रॅक्टरला देऊन सुरु करावे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील सेलू तालुक्यात 132 के.व्ही. चे केंद्र सन 2007 मध्ये मंजूर झाले होते. परंतु, अद्यापही तेथील काम सुरु झालेले नाही. हे 132 के.व्ही. च्या केंद्राचे काम देखील तत्काळ सुरु करावे, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...........



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ( ऊर्जा मंत्री ) : अध्यक्ष महोदय, राज्यातील वीज निर्मिती, वीज वितरण, वीज पारेषण आणि महाऊर्जा या महत्त्वाच्या विषयावर आणि जनतेला शाश्वत वीज देणे, जनतेला स्वस्त वीज देणे आणि पुढच्या काळात आपले राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करणे, विजेच्या बाबतीत राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आणणे यावर राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची चर्चा काही राजकीय मुद्दे सोडले तर झाली.

अध्यक्ष महोदय, राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करणे, ते देशात पहिल्या क्रमांकावर असले पाहिजे याकरिता विरोधी पक्षाकडून म.वि.स. नियम 293 अन्वये ही चर्चा सभागृहात उपस्थित केल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, सन्माननीय सदस्य सर्वश्री अजित पवार, दिलीप वळसे-पाटील यांच्यासह जवळपास 45 सन्माननीय सदस्यांनी ही प्रस्तावाची सूचना दिलेली होती. या चर्चेत बोलताना सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील जे या राज्याचे माजी ऊर्जा मंत्री होते त्यांनी अत्यंत चांगल्या व राज्याला पुढे नेणाऱ्या सूचना केलेल्या आहेत. ऊर्जा मंत्री असतानाच्या काळात त्यांनी उत्कृष्ट कार्य केले होते. त्यांच्या अनुभवातून त्यांनी पुढच्या काळात राज्य कसे असले पाहिजे, राज्यातील महावितरण, महानिर्मिती, महापारेषण कसे असले पाहिजे, याबाबत चांगल्या सूचना केलेल्या आहेत. मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

सन्माननीय सदस्य सर्वश्री. विजय वडेट्टीवार, मल्लिकार्जुन रेड्डी, शंभुराज देसाई, अबु आजमी, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. जयदत्त क्षीरसागर, अमीन पटेल, सुभाष पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, डॉ. सुनील देशमुख, सन्माननीय सदस्य सर्वश्री. सुनील केदार, सुधाकर कोहळे, विजय भांबळे या सर्वांनी या खात्याकरिता महत्त्वपूर्ण सूचना केलेल्या आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपल्या सूचनांचे पालन करण्याच्यादृष्टीने आणि आपल्या सूचनांनुसार या तिन्ही कंपन्यांमध्ये चांगले बदल करणे, जनतेला शाश्वत व कमी खर्चातील स्वस्त वीज देणे ही राज्याचा ऊर्जा मंत्री म्हणून माझी जबाबदारी आहे ती मी निश्चितपणे पार पाडण्याचा प्रयत्न करणार आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात साडेअकरा कोटी जनता असून जवळपास अडीच कोटी इतकी वीज कनेक्शन्स राज्यात आहेत. आपण अभ्यास केला तर हे लक्षात येईल की, आशिया खंडातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आपल्या राज्याची आहे. एवढ्या मोठ्या राज्यातील साडेअकरा कोटी जनतेला वीज पुरवताना अनेक अडचणी आहेत, परंतु, त्या सर्व अडचणी दूर करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

अध्यक्ष महोदय, लाँग टर्म प्लानिंग केले पाहिजे आणि कंपन्यांनी व्यावसायिक दृष्टीने कंपन्या चालविल्या पाहिजेत या अत्यंत महत्त्वाच्या अशा दोन सूचना या चर्चेमध्ये करण्यात आल्या. माजी मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी अत्यंत चांगल्या सूचना केल्या आहेत. ही गोष्ट खरी आहे की, राज्यात कंपन्यांनी व्यावसायिक असले पाहिजे. राज्यामध्ये विजेचा तुटवडा होणार नाही, राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल याकरिता प्लानिंग केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज राज्यामध्ये 11897 मेगावॅट इतकी महाजेनकोची स्थापित क्षमता आहे. आपण त्यांच्याकडून साडेचार ते साडेपाच हजार मेगावॅट इतकी वीज घेतो. सेंट्रल पूलमधून 4505 मेगावॅट पैकी आपण 3600 ते 3800 मेगावॅट इतकी वीज घेतो. खाजगी मधून 5585 मेगावॅट पैकी साडेतीन ते पाच हजार मेगावॅट इतकी वीज घेतो. इतर सोर्स मधून 491 मेगावॅट इतकी वीज घेतो. अशाप्रकारे 15 हजार ते 17 हजार मेगावॅट इतकी वीज आज आपल्याकडे उपलब्ध आहे. आपण 14500 ते 16500 मेगावॅट विजेचे वितरण करतो. आज राज्यात वीज उपलब्ध आहे. राज्यात वीज उपलब्ध नसल्याने लोडशेडिंग होत नाही, तर लोडशेडिंग होण्याची कारणे वेगळी आहेत, मी त्याबाबत पुढे सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात मागच्या काळात काही काम झाले. आज जवळपास 2 हजार मेगावॅट क्षमतेचा कोराडी प्रकल्प, चंद्रपूरचा हजार मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प येत आहे. आपण परळीला एक प्रकल्प सुरु केला आहे. हे चांगले काम मागच्या काळात झाल्याने आज आपण विजेच्या बाबतीत सरप्लस होत आहोत. आताही आपण बरोबरीत आहोत परंतु, पुढच्या काळाकरिता आपण चांगली योजना तयार केली आहे. सन्माननीय सदस्यांनी लाँग टर्म प्लानिंगच्या बाबतीत केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने मी आपल्याला आश्वस्त करतो. राज्यात सन 2019 ते सन 2025 या काळाकरिता महानिर्मितीने जवळपास साडेपाच हजार मेगावॅट क्षमतेची लाँग टर्म प्लानिंगची योजना तयार केलेली आहे. मागच्या काळातही आपण पॉवर पर्चेस ॲग्रिमेंट केले होते, परंतु, त्यातील काही पॉवर पर्चेस ॲग्रिमेंट हे काही गरज नसताना झाले किंवा त्या काळात मोठ्या प्रमाणावर जास्तीत जास्त पॉवर पर्चेस ॲग्रिमेंट झाले. आज ते पीपीए करुनही त्या ठिकाणी त्या

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

कंपन्या वीज प्रकल्प सुरु करण्यास तयारच नाहीत. त्यामुळे याचे रिऑडिट करुन ज्यांनी वीज प्रकल्प सुरु केले नाहीत व जे सुरु करणारच नाहीत त्यांचे पीपीए रद्द करावे लागतील. तसेच, जे प्रकल्प सुरु करणार आहेत, जे राज्याला, राज्यातील जनतेला धोका देणार नाहीत असे पीपीए ठेवून आपण बाकी पीपीए रद्द करण्याचा विचार करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, सूचनेनुसार सन 2019 ते सन 2025 पर्यंतचे प्लानिंग मी करणार आहे. त्यानुसार आता खाजगी प्रकल्प धारकांकडून 11796 मेगावॅट क्षमतेचे पीपीए झाले आहेत. महाजेनको त्या पीपीएंचा अभ्यास करणार आहे. राज्यातील पारेषण व्यवस्था ज्या ज्या बाजूने मजबूत आहे कारण शेवटी एकाच बाजूला प्रकल्प राबवून अर्थ नाही. सन्माननीय सदस्यांनी सूचना दिली आहे. त्याप्रमाणे राज्याच्या पारेषण व्यवस्थेचे संपूर्ण आकलन करुन काही मेगावॅट वीज क्षमता वाढवायची असेल तर, आपण रिजनल अभ्यास करुन ती वाढवणार आहोत. सन 2025 पर्यंत हे राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावे याकरिता शासनाने लॉंग टर्म प्लान केला आहे.

अध्यक्ष महोदय, आरजीपीपीएल संदर्भात एक चांगला मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी मागच्या वेळेस सभागृहात तो उपस्थित केला होता. आपण आता आरजीपीपीएलच्या इतिहासात जायचे नाही. त्यांनी सांगितले होते की, काही करा परंतु, आरजीपीपीएल सुरु करा. मी खास करुन देशाचे केंद्रीय मंत्री माननीय श्री. पियुषजी गोयल व राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून अभिनंदन करतो. एवढे मोठे 2 हजार मेगावॅटचे ॲसेट बंद करणे हा काही त्यातील मार्ग नाही. इतके मोठे ॲसेट निर्माण झाले आहे. एक मेगावॅटचा प्रकल्प सुरु करण्याकरिता जवळपास 7 ते 8 कोटी रुपये इतका खर्च येतो. असे असताना 2 हजार मेगावॅटचा इतका मोठा प्रकल्प बंद करणे बरोबर नाही. त्यामुळे आरजीपीपीएल सुरु करण्याच्या हालचाली सुरु केल्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....*

*हा प्रकल्प एमपीएमध्ये जाऊ नये, याकरिता महाराष्ट्र शासनाने मोठी भूमिका घेतली आहे. अन्यथा हा प्रकल्प एमपीएमध्ये गेला असता. असे झाले असते तर तो कधीच सुरु झाला नसता. त्यामुळे मागील काळामध्ये नवीन सरकार आल्यानंतर त्यास एमपीएमधून वाचविण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. आमच्याकडे रेल्वे मोठा ग्राहक होता. त्यातून आम्हाला चांगले उत्पन्न मिळत होते. हा ग्राहक आम्ही सोडला आहे. आता रेल्वेला आरजीपीपीएलला जोडून पहिल्या टप्प्यामध्ये ५०० मेगावॅट विजेची निर्मिती सुरु केलेली आहे. आता जवळपास १४०० मेगावॅट वीज सुरु करावयाची आहे, परंतु ती वीज स्वस्त असली पाहिजे. ती वीज एमइआरसीने दिलेल्या सूचनेप्रमाणे असली पाहिजे. केंद्र सरकार व राज्य सरकारचे यातून तशी निर्मिती करण्याचे प्रयत्न सुरु आहेत किंवा रेल्वेसारखा दुसरा ग्राहक त्यांना मिळतो काय, हे पाहून ते ॲसेट सुरु केले पाहिजे, यादृष्टीने आमची भूमिका आहे. त्याला एमओडीमध्ये कसे आणता येईल किंवा एमओडीत आले नाही, तर त्याला चांगला ग्राहक कसा मिळवून देता येईल, असा आमचा प्रयत्न आहे. आपण १३०० मेगावॅटसाठी नियोजन करणार आहोत...(अडथळा)...मी आता इतिहासामध्ये जाऊन आपला वेळ घेणार नाही.*

*अध्यक्ष महोदय, वसुलीसंदर्भातील आपले म्हणणे बरोबर आहे. २०१३-२०१४ मध्ये १ लाख २ हजार ९८९ युनिट, २०१४-२०१५ मध्ये १ लाख १४ हजार ४९९ युनिट आणि २०१५-२०१६ मध्ये १ लाख १७ हजार युनिट पर्यंत आहे. अजून ३१ मार्चची आकडेवारी यायची आहे. परंतु मी जबाबदारीने सांगतो की, २०१३-२०१४ मध्ये एमइआरसीने ट्रान्समिशन खर्च जोडून विजेचा दर ३ रुपये ९५ पैसे, २०१४-२०१५ मध्ये ४ रुपये ३६ पैसे, २०१५-२०१६ मध्ये ट्रान्समिशन लाईनसह ४ रुपये ०२ पैसे विजेचा दर ठेवण्यामध्ये आम्ही यशस्वी झालो आहे. एमइआरसीमध्ये २०१५-२०१६ या वर्षी ३ रुपये ७० पैसे रेट ॲप्रुव्ह केला होता. परंतु आपण २०१५-२०१६ मध्ये ३ रुपये ६८ पैशाच्या वर गेलो नाही. त्यामुळे एमओडीमध्ये दिलेल्या दरापेक्षा एकही पैसा जास्त दराने वीज घेतलेली नाही. त्यामुळे विजेची मागणी वाढली, विजेचे वितरण वाढले. १० हजार कोटी कशाचे आले, असे आपण म्हटले होते, तर विजेची मागणी वाढली, परंतु आपण एमओडीच्या बाहेर गेलो नाही. ओपन टेंडरमध्ये आहोत, या ठिकाणी कुठेही भ्रष्टाचार होऊ शकत नाही, शॉर्ट टर्म लागली तर ऑन लाईन पॉवर पडते. त्यामुळे एमइआरसीने दिलेल्या नॉर्म्सच्या पुढे गेलो नाही.*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...2/-

*श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....*

*अध्यक्ष महोदय, ४ हजार ५०० कोटी रुपयांची वसुली कमी झाल्याची बाब खरी आहे. परंतु यामध्ये चार, पाच मुद्दे सांगावे लागणार आहेत. शेतकऱ्यांची थकबाकी १३ हजार ५०० कोटी रुपये आहे. शेतकऱ्यांकडून विजेची वसुली सुरु केल्यास सभागृहात आपणच यासंदर्भात आवाज उठवू शकाल. परंतु कंपन्यांना व्यावसायिक करायच्या असतील, तर वीज बीलाची वसुली सुरु करावी लागेल. १३ हजार ५०० कोटी रुपयांचे बीज बील थकीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात मी सांगू इच्छितो. इंडस्ट्रीज्च्या विजेची मागणी कमी झाली व सबसीडीची वीज म्हणजेच स्तस्त दरात दिल्या जाणाऱ्या ठिकाणच्या विजेची मागणी वाढली. जमा खर्च क्लिअर करण्याकरिता, लेव्हल करण्याकरिता जास्त दराने वीज दिली जाते. त्यामुळे विजेच्या वसुलीवर व विजेच्या महसुलावर घट झाली. त्यामुळे आपण आता काही प्लॅनिंग केले आहेत. एमइआरसीने शेतकऱ्यांच्या कॅटेगिरी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. म्हणजेच बागायतदार शेतकऱ्यांची वेगळी कॅटेगिरी, एक्सपोर्टची वेगळी कॅटेगिरी, अल्पभुधारक शेतकऱ्यांची वेगळी कॅटेगिरी असे करुन विजेचे दर वेगवेगळे लावल्यास कंपनी व्यवहारिक होईल. परंतु हे कितपत योग्य आहे, याचा विचार करावा लागणार आहे. तसेच शेतकऱ्यांकरिता अशा कॅटेगिरीज् करायच्या किंवा कसे, याचा काय परिणाम होईल, बागायतदार शेतकरी व एक्सपोर्ट करणाऱ्या शेतकऱ्यांकडून जास्त दर घ्यायचे काय, याकरिता समिती नेमावी लागेल. ही बाब देखील एमइआरसीने सांगितलेली आहे. यामध्ये निश्चितपणे तोटा आहे.*

*अध्यक्ष महोदय, मागील ४ वर्षांपासून २० लाखाच्या वर मीटर पीडी आहेत. त्यांचे आरसीए कनेक्शन पीडी असेल तर यामध्ये देखील मोठ्या प्रमाणात महसुलाचा तोटा आहे. यासंदर्भात आपल्याला विचार करावा लागणार आहे. त्यामुळे निश्चितपणे ४ हजार ५०० कोटीचा तोटा चार, पाच कारणांमुळे झालेला आहे. ओपन ॲक्सेसमुळे ग्राहक गेल्यामुळे तसेच रेल्वेसारखा मोठा ग्राहक गेल्यामुळे नुकसान झाले. इंडस्ट्रीचा ग्राहक गेल्यामुळे व स्वत वीज असलेल्या ठिकाणी जास्त वीज वापरण्यात आल्यामुळे नुकसान झाले आहे. महसुलामध्ये असलेली घट भरुन काढण्याकरिता महावितरणने चांगले प्लॅनिंग केलेले आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांना जबाबदारीने सांगतो की, पुढील तीन वर्षात ही तूट भरुन काढण्यासाठी योग्य ते प्रयत्न केले*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....*

*जाईल. तसेच त्यांनी सांगितल्यानुसार या कंपन्या व्यवहारिक होतील, याची देखील काळजी घेणार आहोत.*

*अध्यक्ष महोदय, महाजनकोला किती पैसे देणे आहे, हा प्रश्न विचारण्यात आला होता. महावितरणकडून महाजनकोला ६ हजार ४६२ कोटी रुपये द्यायचे आहे. आपण त्याचे प्लॅनिंग केले आहे. महावितरण, महाजनको या दोनही कंपन्यांचा ताळमेळ बसवून ६ हजार ४६२ कोटी रुपये महावितरणकडून महाविरणला देण्याची योजना आपण तयार करीत आहोत.*

*अध्यक्ष महोदय, किती संच बंद करण्यात आले, हा देखील प्रश्न विचारण्यात आला होता. एमइआरसीने दिलेल्या एमओडीनुसार महाजनकोचे ०६ संच बंद करावे लागले आणि इंडिया बुल्सचे ०३ सेट बंद करावे लागले. मी अगोदरच सांगितले आहे की, यामध्ये व्यवहारिकता आणायची आहे. व्यवहारिक व्हायचे असेल तर आपले संच बंद करावे लागतील, तसेच प्रायव्हेट संच देखील बंद करावे लागेल. इंडिया बुल्सचे ०३ संच बंद केलेले आहेत. एमइआरसीने दिलेल्या एमओडीच्या वर जाणार नाही. केवळ भुसावळ आणि नाशिक येथील ०२ संच एमओडीच्या बाहेर असले तरी चालवावेच लागतात. विदर्भातून ट्रान्समिशनचा लोड आला आणि उत्तर महाराष्ट्रातून काहीच लोड दिला नाही, तर ट्रान्समिशन लाईन बसणार आहे. त्यामुळे एमओडीच्या बाहेर जावून टेक्निकल कारणांनी भुसावळ आणि नाशिक येथील संच चालवावे लागतात. नाशिक आणि भुसावळ जास्त रेटने चालवूनही आपण एमइआरसीचे रेट पाळले आहेत. काही ठिकाणी स्वस्त घेतली तर काही ठिकाणी महाजनकोचे जास्त रेटने चालविले आहे. परंतु नाशिक आणि भुसावळ येथील संच चालविल्याशिवाय मार्ग नाही. सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार या ठिकाणी बसलेले असून त्यांनी हे खाते चालविल्यामुळे त्यांनाही याबाबतची कल्पना आहे. आपण एमओडीच्या सूचनेनुसार काम करीत आहोत.*

*अध्यक्ष महोदय, १० हजार कोटी रुपयांची जास्त वीज घेतली आहे. युनिटमध्ये वाढ झाल्याचे मी अगोदरच सांगितले. मी मंत्रीपदाचा पदभार डिसेंबर २०१४ मध्ये स्वीकारला. मार्च ते डिसेंबर आणि डिसेंबर ते मार्च १ लाख १४ हजार युनिट ४ रुपये ३६ पैसे या दराने घेतले. या वर्षीचा रेट ४ रुपये २ पैसे आहे. परंतु २०१४-२०१५ चा रेट ४ रुपये ३६ पैसे असूनही महावितरणने*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....*

*१,१६२ कोटी रुपयांच्या वर जास्त वीज शॉर्ट टेंडरने घेतलेली नाही. श्री. अजय मेहता यांनी काही काम चांगलेही केले. त्यांनी सर्व वाईट काम केले अशी बाब नाही. त्यांनी दोन, तीन बाबी फार चांगल्या केल्या. ऑन लाईन विजेची खरेदी करणे, शॉर्ट टेंडर करताना सूचना पाळणे इत्यादी चांगल्या बाबी चांगल्याच म्हणाव्या लागेल. त्यांच्याकडून झालेल्या चुका संदर्भात मी पुढे बोलणार आहे. परंतु विजेच्या खरेदीमध्ये पारदर्शकता आणणे आणि त्यांनी एबीसीडी सारखे चांगले प्लॅनिंग करुन राज्यामध्ये कसे भारनियमन मेन्टेन करता येईल, याकरिता काही बाबी चांगल्या केल्या. त्यामुळे ते ही पहावे लागणार आहे. परंतु विजेची खरेदी ऑनलाईन आहे, ओपन टेंडर आहे, त्यामुळे निश्चितपणे कोणीही गडबड करु शकत नाही. तसेच एमओडीच्या बाहेर कोणीही जात नाही.*

*अध्यक्ष महोदय, राज्याबाहेर उद्योग गेले या आरोपात काही तथ्य नाही. २०१४-२०१५ मध्ये ३ लाख २ हजार ३८८ कनेक्शन होते. १७ हजार ८४५ कनेक्शन वाढले आहे. ९ हजार ९५० कनेक्शन डिस्कनेक्ट झाले. माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतल्यामुळे "मेक इन महाराष्ट्र", "मेक इन इंडिया" चांगल्या पद्धतीने होत आहेत. तसेच उद्योग मंत्री श्री. सुभाष देसाई यांनी घेतलेला पुढाकार व केलेले विविध दौरे यामुळे मी त्यांचेही अभिनंदन करतो. माननीय मुख्यमंत्री व माननीय उद्योग मंत्री यांनी जनतेला दिलेल्या शब्दामुळे २०१५-२०१६ मध्ये ३ लाख १० हजार ४५५ कनेक्शन होते. परंतु त्यात १२ हजार ५०७ कनेक्शन वाढले आहे. मागच्या काळामध्ये कनेक्शन पीडी होण्याचा ९ हजार ९५० चा रेश्यो या वेळी थांबला आणि केवळ २ हजार ४४३ कनेक्शन पीडी झाले. त्यामुळे ३ लाख १८ हजार २४० इतक्या मोठ्या प्रमाणावर कनेक्शन आहेत. म्हणून राज्यातील उद्योग बाहेर गेले काय, तर मी म्हणेल की, या कारणाने गेले नाहीत. उद्योग बंद करण्याच्या त्यांच्या अनेक अडचणी असतील.*

*...F/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

परंतु रेश्यो थांबला आहे. 12 हजार पेक्षा जास्त उद्योगांनी कनेक्शन घेतले आहेत. पुढील काळात राबवावयाच्या धोरणाकरिता माननीय मुख्यमंत्री व वित्त मंत्री महोदयांनी केलेल्या सपोर्टमुळे मोठ्या प्रमाणावर कनेक्शन होणार आहेत.

अध्यक्ष महोदय, ओपन ॲक्सेस मध्ये सन 2013-14 मध्ये 374, सन 2014-15 मध्ये 320 व सन 2015-16 मध्ये 420 ग्राहक गेले आहेत. एमईआरसीने सांगितले आहे की, ओपन ॲक्सेस मध्ये जाण्यासाठी ग्राहकांना परवानगी आहे, त्यामुळे त्यांना आपण थांबवू शकत नाही. ओपन ॲक्सेसमध्ये उद्योग जातात त्यामुळे महावितरणचे नुकसान होऊन वीज खरेदी बंद होते. ओपन ॲक्सेसमध्ये ग्राहक कोणतीही वीज घेऊ शकतात व तो पर्याय त्यांनी स्वीकारल्यामुळे 1583 मे.वॅट लॉस झाला आहे. हा लॉस एमईआरसीमुळे झाला आहे. जवळपास 1114 उद्योग ओपन ॲक्सेसमध्ये गेल्याने नुकसान झाले आहे.

अध्यक्ष महोदय, 2280 मे.वॅटचे पीपीए केले असून ते होऊ शकत नाही व त्यांचे काम सुरु करण्यात आले नाही. त्यामध्ये रिलायंसचे तलैया व विष्णू पट्टम येथील दोन प्रकल्प, लॅन्कोचे तीस्ता व वर्धा येथील दोन प्रकल्प अशा या 4 प्रकल्पांचे काम सुरु होऊच शकत नाही व त्यांनी काम सुरु केले नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाला वेगळा विचार करावा लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अजित दादा पवार यांना सांगू इच्छितो की, चाई, सर्जूला, केईउर येथील केंद्र सरकारचे 3100 मे.वॅटचे अलॉकेशन राज्याला आहे व ते बंद पडणार आहे. या प्रकल्पांचे काम सुरु करण्यात आले नाही. तसेच, राज्य सरकारने केलेले 2280 मे.वॅट पीपीए बंद पडणार आहे. सन 2019 ते 2025 या कालावधी संदर्भात ही माहिती मी देत असून जवळपास 5500 मे.वॅटची कॅपिसीटी आपल्याला निर्माण करावी लागणार आहे व ती करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, वीज हानी 14.37 टक्के कागदोपत्री दाखविण्यात आली आहे, यावर माझाही विश्वास नाही व विरोधी पक्षाचाही विश्वास नाही. याप्रकरणी रिऑडिट करण्यात येणार आहे. जी बाब खोटी आहे त्यासंदर्भात आपण अभ्यास केला पाहिजे, या मताचा मी आहे. वीज हानी

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

संदर्भात सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगली सूचना केली असून सदरहू प्रकरणी रिऑडिट करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारची उदय योजना अतिशय चांगली आहे. कंपन्यांचे कर्ज शासनाने टेक ओव्हर करुन प्रायव्हेट बाऊण्ड काढावयाचे व त्यातून आलेले पैसे महावितरण कंपनीला परत करुन सक्षम करावयाचे, अशी ही योजना आहे. उदय योजना राज्याने स्वीकारली आहे. दिनांक 23 डिसेंबर, 2015 रोजी कंपनीने कन्सेन्ट दिले आहे व राज्य सरकारने दिनांक 4 जानेवारी, 2016 रोजी केंद्र शासनाला पत्र पाठविले आहे. ही योजना पूर्ण स्वीकारावयाची की नाही, ठरविण्यात येणार आहे. यासंदर्भात गुजरात राज्याने एक चांगली पॉलिसी तयार केली असून त्यांनी तयार केलेली पॉलिसी महावितरण कंपनीला फायदेशीर ठरणार आहे. गुजरातच्या धर्तीवर स्वीकारावयाचा पॅटर्न मी तुम्हाला सभागृहाची बैठक स्थगित झाल्यावर दाखविणार आहे. केंद्र सरकारची उदय योजना पूर्णतः न स्वीकारता ती गुजरात राज्याच्या पॅटर्ननुसार स्वीकारुन राज्याला कोणता फायदा होणार आहे, राज्य सरकारने कंपनीचे कर्ज पूर्णतः का टेक ओव्हर करावयाचे याबाबीवर विचार करण्यात येत आहे. याप्रकरणी लवकरच मार्ग निघेल, अशी आशा आहे. उदय योजना स्वीकारल्याने महावितरण कंपनीला निश्चितपणे फायदा होईल, अशी काळजी राज्य सरकार घेणार आहे.

अध्यक्ष महोदय, महापारेषण कंपनीचे व्यवस्थापक श्री.राजीव मित्तल आहेत व त्यांचे मी अभिनंदन करतो. कारण त्यांनी सन 2013-14 चा 4.0 टक्के लॉस सन 2014-15 व सन 2015-16 मध्ये 3.9 वर आणला आहे. एमईआरसीने 4.85 टक्के लॉसेस अलाऊड आहेत, असे म्हटले आहे. महापारेषण कंपनीचा लॉस 3.9 टक्के आहे. तसेच, जुन्या प्लॅनला काही ठिकाणी स्टॅबिलिटी आहे व काही ठिकाणी नसल्याने पुढील काळामध्ये 8 हजार कोटी रुपयांचा नवा एस.टी.ओ.प्लॅन राबविण्यात येणार असून तो मी तुम्हाला दाखवणार आहे. महापारेषण व महावितरण या दोन्ही कंपन्यांच्या मुख्य अभियंत्यांनी तीन महिन्यात सन 2025 पर्यंत राज्याला कशा प्रकारचा प्लॅन दिला पाहिजे, कोणत्याही परिस्थितीत इमर्जनसी लोड शेडींग करावी लागणार नाही, याबाबतचा प्लॅन तयार केला आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी वीज दरवाढीचा मुद्दा उपस्थित केला होता. मी सदनाला सांगू इच्छितो की, या सरकारच्या काळामध्ये वीज दरवाढ झालेली नाही. सन 1992 पासून आपण एमईआरसीची टेरिफ ऑर्डर पहावी. सन 2014 मध्ये 20 टक्के वीज दरवाढ झाली होती. मागील सरकारने बजेट मधून 700 कोटी रुपये दरमहा महावितरणला देऊन दरवाढ लपविण्याच्या प्रयत्न केला. माहे सप्टेंबर, 2014 मध्ये निवडणुका होत्या व याकाळात 20 टक्के दरवाढ केली तर आपण निवडणुका जिंकू शकणार नाही, असे तत्कालीन सरकारला वाटले होते. त्यामुळे त्यांनी राज्याच्या तिजोरीतून प्रतीमहिना 700 कोटी रुपये वीज दरवाढीपोटी महावितरणला दिले. दरमहा 700 कोटी रुपये याप्रमाणे एका वर्षाचे 8400 कोटी रुपये लोकांना द्यावयाच्या सवलतीसाठी राज्याच्या तिजोरीतून भरले परंतु कंपन्यांची इफिशिअन्सी वाढविण्यचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे .......

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**अध्यक्ष :** माननीय ऊर्जा मंत्री यांचे उत्तर झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देण्यात येईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, राज्यात माहे सप्टेंबर, 2014 मध्ये नवीन सरकार आल्यानंतर राज्य शासनाच्या बजेट मधून देण्यात येणारे 700 कोटी रुपये दरमहा अनुदान बंद केले, ही गोष्ट खरी आहे. परंतु त्याकाळात झालेली 20 टक्के वीज दरवाढ तत्कालीन सरकारने लपविली होती. नवीन सरकारने 5.72 टक्के वीज दरवाढ कमी केली. वीज दरवाढी संदर्भात देण्यात येणारे अनुदान बंद करुन या सरकारने 8,500 कोटी रुपयांचा फायदा राज्याला करुन दिला आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2013-14 च्या कालावधीमध्ये महाजेन्को व महाट्रान्स्को या दोन्ही कंपन्यांना एमईआरसीने डिसअलाऊ केले होते त्यामुळे त्या ॲपटेलमध्ये गेल्या. सन 2013-14 चे डिसअलाऊन्सेस ॲपटेलने मंजूर केले व 5000 कोटी रुपयांची नवीन वसूली सूचविली. सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांना मी नम्रपणे सांगतो की, सन 2013-14 च्या कालावधीतील 5,000 कोटी रुपये सन 2014-15 व 2015-2016 मध्ये वसूल करण्याचे सूचविल्याने 1 रुपयाने एफएसी

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

वाढली. वीजेचे दर सरकारने 5.72 टक्के कमी केले होते, वीज दरवाढीसाठी देण्यात येणारे अनुदान सरकारने बंद केले होते. परंतु वीज बिलात 1 रुपया किंवा 1.20 रुपयाप्रमाणे सन 2013-14 च्या डिसअलाऊची वसुली सन 2014-15 व 2015-2016 मध्ये करण्याच्या सूचनेमुळे वीजदर वाढले. आपणा सर्वांसाठी आनंदाची गोष्ट आहे की, माहे फेब्रुवारी नंतर सर्व अलाऊन्सेस बंद होणार असून 1.80 ते 1.90 पैसे वाढलेली एफएसी कमी होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपणास विश्वासाने व जबाबदारीने सांगतो की, सन 2015-16 व सन 2016-17 या कालावधीमध्ये 25 पैशांच्या वरती एफएसी अलाऊ करण्यात येणार नाही. काहीही झाले तरी कोणत्याही परिस्थितीत एफएसी 25 पैशांच्या वर वाढू नये, याची काळजी घेण्यात येईल. 25 पैशांच्या वर एफएसी वाढली तर त्यासंदर्भात वेगळा विचार करण्यात येईल. परंतु त्याचा बोजा ग्राहकांवर पडू देण्यात येणार नाही.

अध्यक्ष महोदय, सन 2006 मध्ये फायनान्शिअल रिस्ट्रक्चरचे प्लॅनिंग करावयाचे होते. कंपन्या वेगळ्या करण्याचा कायदा सदनामध्ये आला होता. सन 2006 ते सन 2014 या कालावधीत एफआरपी केले नाही व कंपन्यांचे बॅलन्सशीट 11 हजार कोटी रुपयांचे दाखविण्यात आले होते. मी माननीय मुख्य सचिव श्री.स्वाधीन क्षत्रिय, श्री.मुकेश खुल्लर, सुधीर श्रीवास्तव, व्यवस्थापकीय संचालक श्री.संजीव कुमार, श्री.बिपीन श्रीमाळी, श्री.मित्तल व नवीन नियुक्त करण्यात आलेल्या सह संचालक श्रीमती अनुराधा भाटिया यांनी वर्षभर फार मेहनत करुन अंतिम एफआरपी बॅलन्सशीट तयार केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आता जवळपास एफआरपीचे 74 हजार कोटींचे नवीन बॅलन्सशीट तयार होत आहे. सदरहू बॅलन्सशीट सन 2006 पासून तयार करता येणे शक्य होते. परंतु सन 2006 ते 2014 या कालावधीमध्ये एफआरपी बॅलन्सशीट तयार केले नाही ते करावयास पाहिजे होते. आज आपले 74 हजार कोटी रुयांचे ॲसेटस् आहेत ते 11 हजार कोटी रुपये दाखविण्यात आले होते. त्यामुळे कंपन्यांचे ग्रेडेशन कमी झाले. या नवीन बॅलन्ससीटमुळे महावितरण कंपनीला ए प्लस मिळत आहे.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

अध्यक्ष महोदय, रिजन रिस्ट्रक्चरींगचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील व श्री.सुनिल देशमुख यांनी मांडला होता. ही गोष्ट खरी आहे की, साडे अकरा कोटी जनतेला देण्यात आलेल्या अडीच लाख कनेक्शनसाठी एक व्यवस्थापकीय संचालक व मुंबईचे स्ट्रक्चर न्याय देऊ शकत नाही. गुजरात मध्ये व उत्तर प्रदेशमध्ये 5-5 वीज वितरण कंपन्या आहेत.

यानंतर G-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

आम्ही राज्याचा दौरा वर्षभरात केला आणि आता ठरविले आहे की, आणखी कंपन्या करावयाच्या नाही. कारण कंपन्या करुन खूप काही फायदा होत नाही. कंपन्या केल्या तर वेगवेगळे टेरीफ येईल. त्यामुळे एखाद्याला जास्त आणि एखाद्याला कमी टेरीफ लागेल. त्यामुळे राज्यामध्ये लोकांना न्याय मिळणार नाही. म्हणून प्रत्येक रिजनला आपण एक जॉईन्ट एम.डी. नेमणार आहोत आणि पूर्ण स्ट्रक्चर खालपर्यंत नेणार आहोत. संपूर्ण अधिकार देणारे स्ट्रक्चर आपण खालच्या स्तरावर नेमणार आहोत. विदर्भासाठी एक जॉईन्ट एम.डी., मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासाठी एक जॉईन्ट एम.डी., पश्चिम महाराष्ट्रासाठी एक जॉईन्ट एम.डी. आणि मुंबई कोकणसाठी एक जॉईन्ट एम.डी. नेमणार आहोत. मी या ठिकाणी जबाबदारीने सांगतो की, हे सर्व रिजनल रिस्ट्रक्चरींग आपण येत्या 15 ऑगस्ट 2016 पूर्वी करणार आहोत. त्यानुसार प्रत्येक विभागामध्ये सर्व जॉईन्ट एम.डी. त्यांचा कारभार सुरू करतील. रिजनल रिस्ट्रक्चरींग केल्यानंतर वर्षभरामध्ये किती इफिशिएन्शी वाढली याचा आपण विचार करणार आहोत. कंपन्यांबद्दल सध्या विचार नाही. पण रिजनल रिस्ट्रक्चरींग करुन चांगला प्रभाव झाला तर रेट कमी होतील. त्यामुळे आपण चिंता करु नका. आपण इफिशिएन्शी वाढवून मराठवाडा, विदर्भ आणि सर्व लोकांना आपण वेगवेगळे इन्सेंटिव्ह देऊ, आपण त्याची चिंता करु नका. औरंगाबाद, पुणे, मुंबई आणि विदर्भात एक असे जॉईन्ट एम.डी. असतील.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये तीन कंपन्यांचे वीज दर सारखे ठेवावे अशी मागणी आहे. मी सन्माननीय सदस्य श्री अमिन पटेल यांचे अभिनंदन करेल की, त्यांनी हा मुद्दा अतिशय चांगला मांडला आहे. मी बेस्टच्या संदर्भात वेगळी बैठक घेणार आहे. मुंबई महानगरपालिकेची बैठक घेईल आणि कोणत्याही परिस्थितीत ट्रान्फोर्टेशनचे चार्जेस वीज ग्राहकांवर येणार नाहीत याची काळजी सरकारतर्फे घेण्यात येईल. निश्चितपणे यासंबंधी आपण एक बैठक घेऊ. मुंबईला वीज पुरवठा करणाऱ्या तीन वीज कंपन्यांचे दर एकसारखे असावेत ही सभागृहाची भावना आहे. यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पुढाकार घेतला आहे. पण ही गोष्ट खरी आहे आणि त्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील साहेबांनी सांगितले आहे की, वीजेचे टेरीफ निश्चित करणारी एमईआरसी हे अंतिम कोर्ट आहे. त्यामुळे हे आपल्या हाती नाही. माननीय मुख्यमंत्री किंवा माझ्या हस्ते या तिन्ही कंपन्यांचे रेट एकसारखे करुन देण्यासारखी परिस्थिती नाही. पण

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

आपण त्यासाठी प्रयत्न सुरू केलेला आहे. आपण डिलाईट कन्सल्टंट इंडिया या नावाची एक कंपनी असून त्यांना आपण काम देऊन त्यांच्या तीन बैठका झाल्या आहेत. मुंबईतील तिन्ही वीज कंपन्यांचे दर कसे एकसारखे ठेवता येतील आणि त्यामध्ये इन्सेंटिव्ह कसे द्यायचे व पहिल्या किमान 500 युनिट्ससाठी यात 100 युनिट्सचा पहिला स्लॅब, 200 युनिट्सचा दुसरा स्लॅब आणि तिसरा 500 युनिट्सपर्यंत स्लॅब निश्चित करुन जे ॲटोरिक्षा चालक किंवा मध्यमवर्गीय लोक आहेत त्यांच्यासाठी एकसारखे टेरीफ निश्चित करण्यासाठी ही कंपनी काम करीत आहे. त्यांचा रिपोर्ट येणार आहे. हा रिपोर्ट आल्यानंतर एमईआरसीला आपण निश्चितपणे विनंती करु. मला याची जाणीव आहे की, एमईआरसी आपले ऐकणार नाही, कारण ते स्वतंत्र नियामक मंडळ आहे. त्यामुळे शासन यामध्ये काय करणार यासंबंधीचा अहवाल आल्यानंतर पुढील प्रयत्न करण्यात येईल.

अध्यक्ष महाराज, एमईआरसीने जानेवारी 2016 ला सर्वांसाठी नेट मिटरींगची पॉलिसी निर्माण केली आहे. 1 मेगावॅटपेक्षा कमी असलेल्या भागामध्ये नेट मिटरींगवर जाता येते. यासंबंधी आता 110 अर्ज शासनाकडे आलेले असून त्यापैकी 9 अर्जांना आपण नेट मिटरींगचे कनेक्शन दिलेली आहे. इतरांना लवकरच कनेक्शन्स देण्यात येत आहेत. त्यामुळे एमईआरसीने 1 मेगावॅटसाठी नेट मिटरींगसाठी अलाऊ केलेले आहे आणि त्याची कार्यवाही सुरू आहे. सोलर पंपाच्या बाबतीत अनेक अडचणी आहेत. सोलर पंपासाठी देशपातळीवर आणि ग्लोबल लेव्हलला निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यामध्ये इंटरनॅशनल लेव्हलचे 7 बिडर्स आले आहेत. त्या संदर्भात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे यांच्या मनात काही संभ्रम तयार झाले होते. देशातील जी 6 राज्ये आहेत त्यांच्यापैकी आपले दर कमी आहेत. गुजरात राज्यापेक्षा आपले दर जास्त आहेत. अध्यक्ष महाराज, या संदर्भातील सादरीकरण आपणास दाखविण्याचे मी ठरविले आहे. सोलर पंपाच्या संदर्भात मी ठरविले आहे की, यासंबंधी आपण गुजरातपेक्षा थोडे जास्त का आहोत तर आपल्या टेंडरमध्ये 4 गोष्टी जास्त आहेत. ऑनलाईन मॉनिटेरींग आहे. 5 वर्षाचे त्या ठिकाणी ऑनलाईन मॉनिटेरींग करणार आहोत आणि त्याला आपण पाच वर्षात 30 टक्के पैसे दीड दीड टक्क्याने देणार आहोत. व्याजाचा विचार केला तर 80 हजार येते. त्यामुळे मी जास्त वेळ न घेता या संदर्भात मी दोन्ही सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सभापती आणि उपसभापती, विधानसभेचे अध्यक्ष, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार आणि सन्माननीय सदस्य

3......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.....

श्री. दिलीप वळसे-पाटील अशा आपल्या सर्वांना 6 राज्यांच्या सद्य:स्थितीचे आणि आपल्या राज्याच्या सद्य:स्थितीचे सादरीकरण देतो. त्यानंतर आपण साडेसात हजार पंपांचा पायलट प्रकल्प सुरु करु.

अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांसाठी काय दिले अशी विचारणा करण्यात येते. मागील 10 वर्षामध्ये आपण पाहिले तर विदर्भ, मराठवाड्यामध्ये सन 2009 पासून जे पेड पेंडींग होते त्यासाठी निधी नव्हता. या राज्यातील हे पहिले सरकार आहे की यासाठी मागच्या वर्षी 819 कोटी रुपये दिले आहेत. इतर ठिकाणी थोडा थोडा निधी दिला. पण विदर्भाला आपण 62983, मराठवाड्याला 52 हजार, उत्तर महाराष्ट्रात 17164, कोकणासाठी 4656 आणि पश्चिम महाराष्ट्रासाठी 42867 असे मिळून 1 लाख 79 हजार कनेक्शन्स या सरकारने दिले आहेत. पश्चिम महाराष्ट्रात आणि उत्तर महाराष्ट्रामध्ये पेड पेंडींग मोठ्या प्रमाणात शिल्लक आहेत. त्यासाठी आपण नियोजन केले असून ते पेड पेंडींग क्लीअर करण्यासाठी आपण योजना करीत आहोत. सन 2016-17 मध्ये काय केले, या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्री आणि वित्तमंत्री यांचे अभिनंदन करीन की, या वीज कनेक्शन्सकरिता या वर्षी 708 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. मागच्या वर्षी 819 आणि या वर्षी 708 कोटी रुपये दिले आहेत. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग म्हणजे सातारा, सांगली यामधील 15960 खेडी जी दुष्काळग्रस्त आहेत त्यांच्याकरिता माननीय मुख्यमंत्री आणि वित्तमंत्र्यांनी शेतकऱ्यांना पायाभूत सुविधा नव्याने उपलब्ध करुन देण्यासाठी 1000 कोटी रुपये आता वेगळे दिले आहेत. म्हणजे नुसते मराठवाड्याला यामधून 550 कोटी रुपये गेले आहेत. शेतकऱ्यांना आपण 708 कोटी तर वेगळेच देत आहोत आणि 1000 कोटी रुपये वेगळे देत आहोत. आता मी सन्माननीय सदस्य डॉ. सुनिल देशमुख साहेब आपले उत्तर देतो. माननीय मुख्यमंत्री आणि वित्तमंत्र्यांनी यांनी ठरविले होते की, विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील डी प्लस झोनमध्ये वीजेचे दर जास्त असल्यामुळे तेथील कंपन्या सर्व्हाईव्ह करु शकत नाही. त्यामुळे परवाच्या अर्थसंकल्पीय भाषणात आपण पाहिले असेल की, 1000 कोटी रुपयांचे इन्सेंटिव्ह या कंपन्यांना देऊन त्या ठिकाणचे वीजेचे दर कमी करणे, नवीन कंपन्यांना जास्त ठेवणे, त्यामध्ये प्रोत्साहन देऊन जुन्या कंपन्यांचे वीजेचे दर कमी करणे. यामध्ये आपण मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्राचा भाग घेतला आहे आणि काही डी प्लस झोनही त्यामध्ये घेतला आहे. त्यामुळे 1000 कोटी रुपयांचे इन्सेंटिव्ह आपण देत आहोत.

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. डी. मल्लिकार्जून रेड्डी आपण खाली बसावे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महाराज, ही गोष्ट खरी आहे की, 17572 फिडरवर 4072 चे फिडर सेपरेशन आपण केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील साहेब ऊर्जामंत्री असताना 3104 फिडरचे सिंगल फेसिंग त्यांनी केले होते. त्यामुळे आता 359 फिडर असे आहेत की, ज्याचे सिंगल फेसिंग नाही आणि फिडर सेपरेशन नाही. 359 फिडरवर 4 हजार अशी गावे आहेत की, ज्या ठिकाणी लोडशेडिंग आहे. अजूनही लोडशेडिंग आहे हे मी सुरूवातीलाच सांगितले. पण हे लोडशेडींग वेगळ्या कारणांनी आहे. 359 फिडर हे लोडशेडींगखाली आहेत. कारण सिंगल फेसिंग झाले नाही आणि फिडर सेपरेशन झाले नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार आणि श्री. दिलीप वळसे-पाटील आपले अभिनंदन करावे लागेल की, आपण ही योजना सुरू केली होती, पण यामधील काही भाग सुटला आहे. आता माननीय मुख्यमंत्री महोदयांनी माननीय केंद्रीय ऊर्जामंत्री पियुष गोयलसाहेब यांच्याशी चर्चा करुन केंद्र शासनाकडून साडेचार हजार कोटी रुपये मिळविले आहेत. दिनदयाल उपाध्याय आणि आय.पी.डी.एस. योजनेंतर्गत पुन्हा एकदा महावितरण आपण उभे करीत असून त्यातून जवळपास संपूर्ण राज्य लोडशेडींगमुक्त करण्याचे नवीन काम आपण करीत आहोत. या ठिकाणी इन्फ्रा-2 बद्दल चर्चा करण्यात आली होती. ही गोष्ट खरी आहे की, मागच्या काळात 200, 300 कोटी रुपयांची कंत्राटे घेऊन कंत्राटदार पळून गेले. मोठ्या प्रमाणावर कंत्राटदार पळून गेल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या. पण आता शासनाने निर्णय घेतला आहे की, इन्फ्रा-2 ची जेवढी कंत्राटे आहेत ती पुन्हा आम्ही रिवाईज केले असून त्याचे पुन्हा आम्ही माईलस्टोन तयार केले आणि जे कंत्राटदार काम करीत नाहीत, त्यांच्यासाठी आता चिफ इंजिनिअर लेव्हलला 5 कोटी रुपयांचे अधिकार दिले आहेत. पूर्वी असे अधिकारच नव्हते. 10 लाख रुपयांच्या वर निविदा काढण्याचे अधिकार त्यांना नव्हते. चिफ इंजिनिअरला 5 कोटीचे अधिकार दिले. एस.ई.ला 1 कोटी रुपयांचे अधिकार दिले. जे कंत्राटदार कामे करीत नाहीत. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विजय भामरे यांनी परभणीसंबंधी सांगितले की, 200 कोटी रुपयांचे कंत्राट घेतले आहे, पण कंत्राटदार कामच करीत नाहीत, ही बाब खरी आहे. राज्यात जवळपास 16 कंत्राटदार असे आहेत की, ज्यांनी काम घेतले आहे पण ते कामच करीत नाहीत.

यानंतर H-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे ........

जे काम करणार नाही त्यांचे टेंडर स्क्रॅप करुन 5-5 कोटी रुपयांचे लोकल टेंडर काढून काम पूर्ण करण्याचे अधिकार दिलेले आहेत. विदर्भ, मराठवाडा व इतर काही भागाकरिता ॲडिशनल इंफ्रा करावे लागणार आहे. दीड हजार कोटी रुपये इंफ्रासाठी आणीत आहोत. ॲडिशनल 950 कोटी रुपये खर्च करीत आहोत. मी विश्वासाने आणि जबाबदारीने सांगतो की, डिसेंबर, 2017 पर्यंत ॲडिशनल इन्फ्रा-2 आणि आयपीडीएस, दीनदयाल योजना पूर्ण झाल्यातर महावितरण मजबूत होईल. त्यामुळे लोडशेडींग राहणार नाही. जे 4 कंत्राटदार उच्च न्यायालयात गेलेले आहेत त्या संदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल. केंद्र सरकारला खोटी माहिती गेलेली आहे की, राज्यामध्ये सर्व गावांमध्ये इलेक्ट्रीफिकेशन झालेले आहे. ही चुकीची माहिती केव्हा गेली याची माहिती घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी विचारले होते की, राज्यामध्ये काही वाड्या-वस्त्या, डोंगरी भाग, नक्षलग्रस्त भाग, आदिवासी भागातील काही ठिकाणी वीज नाही. 19 लाख परिवार आजही वीजेशिवाय राहत आहेत. 'पॉवर फॉर ऑल' सर्वांना वीज देण्याकरिता माननीय मुख्यमंत्री यांनी सूचना दिलेल्या आहेत. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी सरकारला सूचना दिलेल्या आहेत की, देशामध्ये 'पॉवर फॉर ऑल' असले पाहिजे. त्यासाठी 1 लाख 10 हजार कोटी रुपयांचे बजेट करावे लागणार आहे. एवढे बजेट केल्याशिवाय राज्य वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणार नाही. महाजेनको, महापारेषण, महावितरण अशा सर्व कंपन्यांनी 1 लाख 10 हजार कोटी रुपयांचा प्लॅन तयार करावा लागेल. अशाप्रकारचा प्लॅन तयार करुन निश्चितपणे पुढे जात आहोत. सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी 1305 उद्योगांना 550 कोटी रुपये दिल्याबाबत आरोप केला होता.

अध्यक्ष महोदय, याबाबतचा कायदा आपल्या राज्यात नाही. जो ओपन ॲकसेसमध्ये जातो त्याला इलेक्ट्रीसिटी ड्युटी लागत नाही. सरकार पुढच्या अधिवेशनामध्ये याबाबत कायदा आणणार आहे. त्याचे काम सुरु झालेले आहे. जो ओपन ॲकसेसमध्ये जाईल त्याला इलेक्ट्रीसिटी ड्युटी लागली पाहिजे असा कायदा करण्यात येईल. पुढच्या काळामध्ये जो ओपन ॲकसेसमध्ये गेला त्याला इलेक्ट्रीसिटी ड्युटी लावल्याशिवाय परवडणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिलीप

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे ........

वळसे-पाटील यांनी विचारल्याप्रमाणे हा कायदा सरकार आणत आहे. सन 2003 इलेक्ट्रीसिटी ॲक्ट च्या कलम 55 नुसार नियम पाळले गेले पाहिजे. या कलमाप्रमाणे सर्वांना मीटर दिले पाहिजे, सर्वांना श्वाश्वत वीज दिली पाहिजे. त्यामुळे इलेक्ट्रीसिटी ॲक्ट 2003 च्या कलम 55 नुसार काम करण्याचा प्रयत्न करू, पुढच्या काळात हे काम होईल एवढे आश्वासन देऊन सांगतो.

अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे की, प्रॉपर्टी टॅक्स आणि मीटर हे वगळे आहे. जर प्रॉपर्टी टॅक्सचा अभ्यास केला तर महाराष्ट्रामध्ये 10 ते 15 लाख लोकांनी प्रॉपर्टी टॅक्समध्ये मीटर घेतलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या भाषणाला आपण नव्हता त्यांनी मांडलेले हे मुद्दे आहेत. त्यांनी राज्याला चांगली दिशा देण्यात यावी असे सांगितले. प्रॉपर्टी टॅक्स किती आणि वीजेचे कनेक्शन किती याचे ऑडीट करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे वीजेची हानी, वीज चोरी थांबण्याकरिता मोठ्या प्रमाणात मदत होईल. प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपंचायता यांच्या प्रॉपर्टी टॅक्सचे रजिस्ट्रेशन घेऊन महावितरणचे मीटरिंग करण्याचे काम करण्यात येणार आहे. वीज चोरी करणारा गुन्हेगार ठरतो. पण त्याला वीज चोरी करण्यासाठी मदत करणारा गुन्हेगार नाही. मुख्य गुन्हेगार हा वीज चोरीसाठी मदत करणारा आहे. रिमोट तयार करुन देणे, वीज चोरी करण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन करणारा हा गुन्हेगार होत नाही. वीज चोरी करणाऱ्यापेक्षा चोरी करण्यासाठी तांत्रिक मदत करणारा हा खरा गुन्हेगार झाला पाहिजे. यासाठी वेगळे धोरण आखण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, बेरोजगार अभियंता योजना आणली, याचे काम सुरु होऊन 110 अभियंत्यांना काम मिळालेले आहे. फिडर मॅनेजमेंट योजनेची प्रोजिसर सुरु झालेली आहे.

**अध्यक्ष** : सभागृहाची वेळ आणखी 7 मिनिटांसाठी वाढविण्यात येत आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, प्रत्येक तालुक्याला ट्रान्सफर भवन, मेंटेनन्ससाठी साडेचार हजार कोटी रुपयांचा डीपीआर, डीपीसीमध्ये सिस्टीम इप्युव्हमेंट, राज्यामध्ये समाजकल्याण योजना, आदिवासी योजना, आरसीएफ चे 50 बॅलन्स हजार कनेक्शन, ॲग्रीकल्चरचे 60 बॅलन्स कनेक्शन, कर्मचारी मुख्यालयी राहत नाही याबाबतचे धोरण, ट्रान्सफार्मर 63 केव्ही

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे ........

ऐवजी 100 केव्ही चे लावण्यात यावे, जुन्या आणि नवीन ट्रान्सफार्मरचे ऑडीट करणे, ॲव्हरेज बिलींग करुन लोकांना लुटणे यासंदर्भात नवीन योजना तयार करण्यात येत आहे. नवीन बील सेंटर देण्यात येणे. प्रत्येक ग्रामपंचायतीला एक वीज कर्मचारी देणे अशी नवीन योजना ग्रामविकास आणि वीज विभागामार्फत आणीत आहोत. एक ग्रामपंचायत, एक लाईनमन असे समीकरण असायला पाहिजे अशी सूचना आपण दिलेले होती. ती योजना राज्यामध्ये आणत आहोत. माननीय ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी काल बैठक घेऊन याची अंतिम तयारी सुरु केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.पतंगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की, या कामासाठी 28 हजार लोक लागणार आहेत. या मध्ये ग्रामपंचायतीचा कर्मचारी राहणार आहे. ही योजना लवकरात लवकर सुरु करण्याचा प्रयत्न आहे. रिलायन्स आणि टोरेंट कंपनीचे मीटर खूप फिरतात. या संदर्भात आम्ही रिलायन्स आणि टोरेंट कंपनी मीटरचे ऑडीट करीत आहेत. 10 लाख मीटर चुकीचे व बोगस निघालेले आहेत, अश्ी तक्रार सन्माननीय सदस्यांनी केली. याची एसआयटी मार्फत इन्क्वायरी लावण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, पॉवरलुम च्या काही चूका झालेल्या आहेत. त्या दुरुस्त करण्यात येत आहेत. कृषी संजीवनी आणि एनर्जी इफीश्निसी चे पंप आणत आहोत. खाजगी प्रकल्पाचे 4 हजार मेगावॅटचे टोलिंग सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी विचारले होते की, 4 हजार मेगावॅटचे प्रकल्प सुरु आहेत. पण त्यासाठी कोळसा नाही. केंद्र सरकार कोळसा देण्याबाबत नवीन पॉलिसी आणत आहे. महावितरणचा कोळसा खाजगी कंपनीला देऊन त्यातून स्वस्तात वीज तयार करण्याचे काम सुरु आहे. टोलिंग पॉलिसी आली तर राज्यातील वीज प्रकल्प चालू होऊ शकतील. वीज शुल्क 4 पटीने वाढविण्यात आले म्हणजे 40 पैशावरुन 1 रुपया 20 पैसे केले असे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य म्हणले. मी त्यंना सांगू इच्छितो की, हे आम्ही केले नाही. आघाडी सरकारच्या काळात अमेंडमेंट करण्यात आली आणि आता विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य म्हणतात की वीज शुल्क आम्ही वाढविले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे ........

अध्यक्ष महोदय, ॲक्सीडेंट थांबविण्यासाठी राजीव गांधी योजनेचे 12 लाख 11 हजार 041 कनेक्शन पूर्ण झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांकडून विचारणा करण्यात आली होती की, किती राहिलेले आहेत. तर सर्व कनेक्शन पूर्ण झालेले आहे. लोड शेडींग होऊ नये म्हणून महावितरण आणि महापारेषणला सरकारी लॅन्ड देणे आणि त्या जिल्ह्यातील जेवढ्या रेटची लॅन्ड घेतली तेवढे इन्फ्रास्ट्रक्चर वाढवून देणे, शाखा वाढविणे, उप अभियंते वाढविणे, असे कार्य करावे लागेल. पवन ऊर्जा प्रकल्पामध्ये घोटाळा झालेला आहे असे सन्माननीय सदस्यांकडून सांगण्यात आले. याची तपसणी करावी लागेल. याठिकाणी जे-जे आरोप श्री.अजॉय महेता यांच्यावर केले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार, सन्माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जेवढी कागदपत्रे माझ्याकडे दिली आहेत त्याची स्वतंत्र चौकशी करण्यात येईल. चौकशीचा अहवाल तीन महिन्याच्या आत सादर करण्यात येईल. याबाबत मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा करण्यात येईल.

I-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे .....
महापारेषणकरिता ज्या शेतक-यांची जमिन घेतली आहे. त्याचे कलेक्टरच्या माध्यमातून नवीन कायद्या प्रमाणे त्या लोकांना पैसे मिळतील याची खात्री घेतो.

श्री.दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, नियम 293 च्या प्रस्तावाचे उत्तर प्रश्नोत्तराच्या तासानंतर घ्यावे. तोपर्यंत ऑनलेग ठेवावे.

**अध्यक्ष** : नियम 293 च्या प्रस्तावाचे उत्तर ऑनलेग ठेवण्यात येईल. आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक पुन्हा सकाळी 11.00 वाजता भरेल.

**( सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10 वाजून 50 मिनिटांनी स्थगित झाली. )**

J-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

*सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जंगलामधून*
*जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या प्रस्तावाबाबत*

*(१) * ३९७८९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*
*(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जंगला मधून जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता कार्यकारी अभियंता, सा.बा., चंद्रपूर यांनी अधीक्षक अभियंता, सा.बा., चंद्रपूर यांच्यामार्फत दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी उपसंचालक (बफर), ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांच्याकडे अंदाजपत्रकासह प्रस्ताव पाठविला असता, सदर प्रस्तावास अंतिम मंजूरी मिळण्याकरीता वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी, दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी मा.वने मंत्री व सचिव, वने विभाग यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे काय,*
*(४) असल्यास, या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) व (२) होय हे खरे आहे.*
*(३) व (४) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाकडे जाणाऱ्या एकूण ११ पोहच रस्त्यांपैकी महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:- डब्ल्यूएलपी-०२.१६/प्र.क्र.३६/फ-१, दिनांक ०२.०२.२०१६ अन्वये उपरोक्त ११ पोहच रस्त्यांपैकी २ रस्त्यांच्या दूरुस्तीकरीता रु. ४४७.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उर्वरित ९ पोहच रस्त्यांच्या दूरुस्तीचा समावेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.*
*(५) प्रश्न उद्‌भ‍वत नाही.*

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***काटेपूर्णा नदी (जि.अकोला) प्रकल्पावरील वितरण व्यवस्था पुन:स्थापित करण्याच्या कामाबाबत***

*(२) * ४६९५७ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) सन्माननीय जलसंपदा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*
*(१) काटेपूर्णा नदी (जि.अकोला) प्रकल्पावरील महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाअंतर्गत सहकारी पाणी वापर संस्थेचे कार्यक्षेत्रात वितरण व्यवस्था पुन:स्थापित करण्याच्या कामासाठी, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी ३८७.५० लक्ष निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, उक्त मंजूर केलेल्या निधीचे सन २०१४-२०१५ मध्ये वाटप करण्यात आले नाही तसेच प्रत्यक्षात आजपर्यंत वितरण करण्यात आले नाही, निधी अभावी कंत्राटदाराच्या कामाच्या देयकाचे भुगतान न झाल्याने कंत्राटदारांनी कामे बंद केली आहेत, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, मंजूर निधी प्रत्यक्षात वितरीत करण्याचे शासनाने काय नियोजन केले आहे,*
*(४) असल्यास, या प्रकल्पाची कामे सुरु होण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. गिरीष महाजन : (१) होय.*
*(२) होय.*
*(३) व (४) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाची मुदत दि. २८.०३.२०१४ रोजी संपलेली आहे.` त्यानंतर थकीत असलेली देयके अदा करण्यासाठी सक्षम स्तरावर मान्यता घेऊन देयके अदा करावयाची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.*
*(५) मान्यतेनंतर कार्यवाही करण्यात येईल.*

श्री.रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प जागतिक बँकेच्या माध्यमातून सुरु होता. दिनांक 31 मार्च, 2014 ला हा प्रकल्प बंद पडला आहे. तो प्रकल्प संपण्याची ती तारीख होती. हे काम अपूर्ण होते म्हणून आपण शासनाकडे याबाबत मंजूरी मागितली होती. शासनाने दिनांक 24 नोव्हेंबर, 2014 रोजी त्याची मंजूरी दिलेली आहे. पुन्हा काम सुरु झाले पण निधीचे वाटप न झाल्यामुळे सध्या 2 कोटी 77 लाखाचे बील पेंडींग आहे. 1 कोटी 10 लाखाचे कामसुध्दा पेंडींग आहे. म्हणून विनंती आहे की, काटेपूर्णा प्रकल्पांतर्गत बहिरखेड, तताडा, मुजरे मोहम्मदपूर, गोंदापूर, बोरगाव वितरिकांमध्ये 60 कामे थकीत असल्यामुळे स्पेशल रिपेअर्सद्वारे याची परवानगी देण्यात यावी, ठेकेदारांच्या उर्वरित पैशाबाबत नियोजन करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 2 कोटी 77 लक्ष रुपयांची देयके पेंडींग आहेत. महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प अंतर्गत काटेपूर्णा प्रकल्प, ता.वाशिम टाकळी येथे 45.27 कोटी विशेष दुरुस्तीच्या कामाची प्रशासकीय मान्यता दिनांक 16.9.2005 रोजी झाली होती. त्याची मुदत 28.3.2014 रोजी संपली आहे, कारण केंद्र शासनाचा हा प्रकल्प आहे. आता यामध्ये 2 कोटी 77 लक्ष रुपये देण्याचे बाकी आहेत. ही रक्कम लवकरात लवकर देऊन राहिलेले काम पूर्ण करण्यात येईल.

श्री.हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, हा प्रकल्प माझ्या व सन्माननीय सदस्य श्री.रणधीर सावरकर यांच्या मतदारसंघात आहे. सदरील प्रकल्पाच्या पूर्णतेकरिता केंद्र सरकार निधी देत आहे. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी टाईमबाऊंड प्रोग्राम असला पाहिजे. आता हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती निधी लागणार आहे, तो केव्हा वितरीत करण्यात येईल ? प्रकल्पाच्या कामाची मुदत दिनांक 28.3.2014 रोजी संपली आहे. केंद्र सरकार याकरिता निधी देत नाही. राज्य सरकार याकरिता निधी देत नाही. परंतु केंद्र सरकारची याबाबत मुदतवाढ का घेण्यात आली नाही, ही मुदतवाढ शासन किती दिवसात घेणार, हा प्रकल्प टाईमबाऊंड प्रोग्राममध्ये शासन किती दिवसात पूर्ण करणार ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे हा टाईमबाऊंड प्रोग्राम होता. दिनांक 28.3.2014 रोजी ही योजना संपलेली आहे. आता 2 कोटी 77 लक्ष रुपये देणे बाकी आहे. मी अगोदरही सांगितले आहे की, ही रक्कम देण्याची व्यवस्था आम्ही करीत आहोत. हा प्रकल्प जवळपास पूर्ण झालेला आहे. सदरील प्रकल्पास मुदतवाढ घेऊन आपण तो लवकरात लवकर पूर्ण करु.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य पोटतिडकीने विचारत आहे, त्यांच्या मतदारसंघातील महत्वाचा हा प्रकल्प आहे. अगदी लवकर हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या प्रकल्पाला दोन वर्षे पूर्ण होत आलेली आहेत. लवकरात लवकर म्हणजे कधी हा प्रकल्प पूर्ण करणार याची व्याख्या केली तर सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, या प्रकल्पाचे उर्वरित काम स्पेशल रिपेअर्समधून करण्याची मंत्री महोदयांनी परवानगी द्यावी. असेच काटेबाटी बॅरेज अकोला जिल्हयामध्ये आहे. स्ट्रॅटा नसल्यामुळे ते काम रद्द झाले होते, आता त्याचे डिझाईन ॲप्रूव्ह झालेले आहे. यामध्ये 365 हेक्टरचे नवीन भूसंपादन करावयाचे आहे. याकरिता माननीय मंत्री यांनी आमच्या आत्महत्याग्रस्त अकोला जिल्हयाकडे लक्ष द्यावे.

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, भूसंपादनाचा प्रश्न वेगळा आहे. सदरील प्रकल्प पूर्ण झालेला आहे. सध्याचे काम विशेष दुरूस्तीचे राहिले आहे. जागतिक बँकेचे अर्थसहाय्य संपले असले तरी शासनाच्या निधीतून 2 कोटी 77 लाख देता येतील. मी टाईमबाऊंड असे सांगणार नाही पण येत्या 2-3 महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येईल.

डॉ.सुनील देशमुख : अध्यक्ष महोदय, एखाद्या ठिकाणी अत्यावश्यक कामे करावयाची असतात पण त्याकरिता निधी नसतो. येथे निधी उपलब्ध असतानाही काम पूर्ण होऊ शकलेले नाही. हे काम पूर्ण न होण्याची कारणे काय ? प्रशासकीय स्तरावर दिरंगाई झाली असेल तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणार का ?

श्री.गिरीष महाजन : अध्यक्ष महोदय, याची मुदत संपली होती ही बाब खरी आहे. आता हे विशेष दुरूस्तीचे काम आहे. याकरिता 1-2 महिन्यात याकरिता निधी देऊन हे काम पूर्ण केले जाईल. उशीर का झाला, परवानगी का घेतली नाही हे मागचे जे झाले ते जाऊ द्या. पण आता परवानगी घेण्याची काही गरज नाही. राज्य शासनाच्या तिजोरीतून पैसे देऊन हा प्रकल्प पूर्ण करता येईल. तेथील टप्पा पूर्ण झालेला आहे. आता या विशेष दुरूस्तीच्या कामाकरिता निधी देण्यात येईल. तेथील बरेचसे प्रकल्प मुदतीत पूर्ण झालेले नाहीत.

डॉ.सुनील देशमुख : अध्यक्ष महोदय, हे काम टाईमबाऊंड का झाले नाही हे विचारण्याचा आमचा अधिकार आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सदरील काम दोन महिन्यात करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरील मौजे घाटीवळे (जि.रत्नागिरी)*
*येथील रस्त्याची झालेली दुरवस्था*

*(३) * ४८३४२ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरील मौजे घाटीवळे (जि.रत्नागिरी) येथील रस्त्याची दुरवस्था झ ााल्याने वाहन चालकांसह विद्यार्थी व ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे, मौजे घाटीवळे युवा मंडळ, मुंबई यांच्यावतीने जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून जिल्हा परिषद बांधकाम विभाग, रत्नागिरी यांच्याकडे रस्ता दुरूस्त करण्याबाबत मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,*
*(३) असल्यास, सदरहू रस्ता दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्रीमती पंकजा मुंडे : (१) निवेदन प्राप्त आहे.*
*(२) ते (४) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटपप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसारर रत्नागिरी िजिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५५कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गततसन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३७३३.८२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु.७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु.१७००.६३३लक्ष असा एकूण रु.६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुननदेण्यात आलेला आहे.*

*सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार प्रश्नाधिन रस्ता करंजारी मुसलमानवाडी ते घाटीवळी कदमवाडी रस्ता फाट्यासह ग्रामीण मार्ग क्र. ३२ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची प्रत्यक्षात लांबी ७/२०० कि.मी असून संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची आहे.*

*उपरोक्त रस्त्यांवर एस.टी.वाहतुक सुरु असून सदर रस्त्याच्या खराब लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम अर्थसंकल्पात/रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमातून उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.*

श्री.बाळासाहेब मुरकुटे : अध्यक्ष महोदय, सदरील प्रश्न रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरील घाटीवळे जि.रत्नागिरी येथील रस्त्याच्या दुरावस्थेबाबत आहे. राज्यातील ग्रामीण मार्ग हे मुख्य जिल्हा मार्गामध्ये रुपांतरीत होऊ शकतील का, जिल्हा मार्ग हे इतर जिल्हा मार्गामध्ये रुपांतरीत होणे गरजेचे आहे. नॉन प्लॅन रस्ते प्लॅनमध्ये घेणे गरजेचे आहे, ते घेतले जातील का ?

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 48342.....

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरील घाटीवळे जि.रत्नागिरी येथील रस्त्याच्या दुरावस्थेबाबतचा प्रश्न आहे. मौजे घाटीवळे युवा मंडळाने माननीय पालकमंत्री श्री.रविंद्र वायकर यांना निवेदन दिले होते. त्यांनी ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविले आहे. सदरील काम हे ग्रामीण रस्ता दुरस्तीचे हे काम असल्यामुळे ते ग्रामविकास विभागाकडे आलेले आहे याकरिता शासन सकारात्मक विचार करेल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या बाकीच्या दोन सजेशनबाबत भविष्यात शासन विचार करेल. पण नॉन प्लॅनचे सर्व रस्ते प्लॅनमध्ये घेता येतील का याबाबत माननीय नियोजन मंत्री याचे उत्तर चांगले देऊ शकतील.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण रस्ते हे मोठया संख्येने नादुरूस्त आहेत, त्यांची दुरावस्था आहे म्हणून मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरु केलेली आहे. त्या अंतर्गत आम्ही कामे सुरु केलेली आहे. त्यामुळे टप्प्याटप्प्याने ही ग्रामीण रस्त्याची कामे पूर्ण करुन दुरावस्था दूर करणार आहोत. राज्यात 2 लाख 36 हजार ग्रामीण रस्ते आहेत. याकरिता 30:54 व 50:54 हे हेड ग्रामीण रस्त्याकरिता ग्रामविकास खात्याकडे आहे. त्याकरिता आताच्या परिस्थितीत फार अल्पसा निधी आहे. दायीत्वसुध्दा आहे. त्यामुळे 50 टक्के दायीत्व व 50 टक्के डेव्हलपमेंट करिता देत असताना जिल्हानिहाय निधी कमी पडत असल्यामुळे ग्रामीण रस्त्याकरिता मोठी योजना राबविण्याचा शासनाचा मानस आहे. याकरिता काही निकष आहेत. 30:54 व 50:54 या हेड अंतर्गत ग्रामीण रस्ते टप्प्याटप्प्याने दुरूस्त करण्याचे शासनाचे धोरण आहे. निधीच्या उपलब्धतेप्रमाणे सदरहू रस्त्याचे काम करण्यात येईल.

यानंतर के-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*ता.प्र.क्र.४८३४२*

*श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे, त्यापैकी काही मुद्दयांवर माझा आक्षेप आहे. रस्त्यांच्या प्रमाणात निधी वाटप केला जातो, असे म्हटले जाते. ग्रामीण रस्त्याबाबत जी.आर.काढण्यासाठी लक्षवेधी सूचना मांडली गेली होती. त्यानंतही ग्रामीण रस्त्यांकरिता शासनाने वेगळा जी.आर.अद्याप काढलेला नाही. हा प्रलंबित जी.आर. तत्काळ काढून रस्त्यांच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय शासन घेणार आहे का ? रस्त्यांच्या एकूण लांबीच्या प्रमाणात जी.आर.झालाच नाही. या जी.आर.ची प्रक्रिया माननीय ग्रामविकास मंत्री यांच्याकडून माननीय मुख्यमंत्री यांच्यापर्यंत होऊन तेथेच थांबलेली आहे. हा जी.आर.न निघाल्यामुळे रस्त्यांच्या कामाकरिता व देखभाल दुरुस्तीकरिता अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.*

*अध्यक्ष महोदय, ग्रामविकास खात्याकडे २,३६,००० कि.मी.चे रस्ते असतांनाही त्याकरिता ज्या पध्दतीने निधी मिळत आहे, तो बघून माननीय मंत्री निधीकरिता भांडतात असे वाटत नाही. माननीय अर्थमंत्री येथे बसलेले आहेत. डोंगरी विकासाकरिता निधीकरिता आम्ही अनेक वेळा वाद घालतो. तेथील रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीकरिता पैसे नाहीत, अशा परिस्थितीत काय करावयाचे हेच सुचत नाही. शासन पीडब्ल्यूडीकडे पैसे देते,याबाबत मी अभिनंदन करतो. ग्रामीण रस्त्यांची अवस्था भयंकर असतांनाही ग्रामविकास मंत्री निधीकरिता भांडत नाहीत, असा आमचा आक्षेप आहे. ग्रामीण रस्त्यांच्या निधीबाबत शासन काय निर्णय घेणार आहे ?*

*श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी निधीकरिता प्रयत्न करण्याबाबतची सूचना केलेली आहे. परंतु मला अर्थमंत्री महोदय यांच्याशी निधीकरिता भांडण करण्याची गरज पडत नाही. माननीय अर्थमंत्री हे न भांडताच ग्रामीण रस्त्यांकरिता निधी देतात. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेकरिता ५५० कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. ३०५४ अंतर्गत मिळालेल्या निधीचे जिल्हावाईज वाटप केले जात आहे. ग्रामीण रस्त्यांची अवस्था मागील अनेक वर्षांपासून बिघडतच चालली आहे. परंतु आता या रस्त्यांच्या अवस्थेचे चित्र बदलत आहे. शासनाचा जास्तीत जास्त रस्ते मजबूत करण्याकडे कल आहे. विविध योजना ग्रामीण रस्त्यांच्या दर्जोन्नतीकरित आखून त्याची अंमलबजावणी केली जात आहे.*

*एक सन्माननीय सदस्य ( खाली बसून ): अध्यक्ष महोदय, ग्रामीण रस्त्यांचा निधी बीड*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*जिल्हयामध्ये वळविलेला आहे का ?* .....२



*ता.प्र.क्र.४८३४२*

*श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, माझ्या बीड जिल्हयामध्ये एचडीआय सर्वात जास्त असल्यामुळे तेथे सर्वात कमी निधी याकरिता नियोजित करण्यात आलेला आहे. सर्वात जास्त निधी सन्माननीय सदस्य श्री.भिमराव धोंडे यांच्या मतदारसंघामध्ये ग्रामीण रस्ते विकासांतर्गत देण्यात आलेला आहे.*

*तालिका सभाध्यक्ष ( श्री.योगेश सागर ): सदरहू प्रश्न केवळ रत्नागिरी-कोल्हापूर मार्गापुरती मर्यादित असून त्याचा स्कोप वाढवून मूळ प्रश्नावर अन्याय होता कामा नये, याची काळजी सन्माननीय सदस्यांनी घ्यावी. आपण रोज दहा तारांकित प्रश्नांपर्यंत गेलो पाहिजे.*

*श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, यासंदर्भातील जी.आर.बाबत विनंती केली गेली होती. यासंदर्भातील बैठकीमध्ये माननीय राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर हे होते. कॅबिनेट मंत्री महोदया श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकडे याबाबतचा निर्णय झालेला नाही. रस्त्याच्या लांबीबाबत जी.आर.झाला पाहिजे. या जी.आर.मुळे अनेक लोकांना फायदा होईल. या संदर्भातील जी.आर. शासनाकडून कधीपर्यंत निर्गमित केला जाईल ?*

*श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, जी.आर.म्हणजे शासन निर्णय होय. शासन निर्णय जोपर्यंत निर्गमित होत नाही, तोपर्यंत त्याला जी.आर. असे अधिकृतरित्या संबोधले जाऊ शकत नाही. या जी.आर.संदर्भातील विषय नियोजन विभागाकडे प्रलंबित आहे. त्यानंतर हा विषय वित्त विभागाकडे मंजूरीकरिता जाईल. अद्याप हा विषय पाईपलाईनमध्ये आहे. याबाबत यापेक्षा लवकर काम कोणीच करु शकत नाही. शासनाने ७००० कि.मी.लांबीच्या रस्त्यांचे नियोजन केलेले आहे. १६०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या कामांना मंजूरी दिलेली आहे. सध्या हा विषय पाईपलाईनमध्ये आहे. हा विषय सध्या नियोजन विभागाकडे प्रलंबित आहे. हा विषय लवकर झाल्यानंतर त्याचा शासन निर्णय होईल.*

*श्री.प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, ग्रामीण व्ही.आर.आणि ओ.डी.आर. यांची लांबी २,३६,००० कि.मी. दाखविण्यात आलेली आहे, असेच आता सभागृहामध्ये सांगितले गेलेले आहे. दहा-पंधरा वर्षांपासून काही मार्ग हे इतर जिल्हा मार्ग आणि व्हीआरमध्ये घ्यावयाला पाहिजे होते. एमआरइजीएस आणि इजीएसच्या माध्यमातून पांदण रस्ते घेण्यात आलेले आहेत.*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

काही ठिकाणच्या रस्त्यांचा सर्व्हे त्या त्या पातळीवरील अधिका-यांनी दाखविलेला नसल्यामुळे संदर्भाधीन निधी खर्च करता येत नाही. त्यामुळे ते डीपीडीसीमध्ये घेता येत नाही. याकरिता कालबध्द कार्यक्रम आखून त्या अंतर्गत रस्त्यांचा सर्वे करून ओडीआर आणि व्हीआर मध्ये त्याचा समावेश करण्यात येणार आहे का ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, याबाबत प्रयत्न करता येतील. सन्माननीय सदस्यांनी येथे पांदण रस्त्यांचा उल्लेख केलेला आहे. याकरिता अर्थसंकल्पामध्ये वेगळी योजना तयार केलेली आहे. एक-दोन जिल्हयांमध्ये पांदण रस्त्यांकरिता भरीव काम करण्यात आले होते. याकरिता राज्यात पांदण रस्त्यांचे काम व्हावे, याकरिता योजना तयार केलेली आहे. हे रस्ते ओडीआर आणि व्हीआरमध्ये घ्यावे की नाही याबाबत विचार करून जसजशा परिस्थितीत शक्य आहे, त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

------

....४

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सोनापूर (ता.जि.सातारा) या गावास लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)**
**तलाव होण्याच्या मागणीबाबत**

*(४)* * **४७६०९** ***श्री.शामराव*** **ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर)र:र** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
*(१)* सोनापूर (ता.जि.सातारा) या गावास लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) तलाव होण्याची मागणी मा.जलसंधारण मंत्री यांचेकडे कराड, (जि.सातारा) येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
*(२)* असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
*(३)* नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत *?*
**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
*(२)* लघु पाटबंधारे तलाव सोनापूर ता.जि.सातारा या योजनेचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात येवून रु. ६८२.८१ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, लवकरच प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.
*(३)* प्रश्न उद्‌भवत नाही.

*श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, १९७२ मध्ये या परिसरात तलावाचे काम झाले होते. परंतु पावसाळयानंतर दोन-तीन महिन्यांमध्ये त्यातील पाणी निघून जाते. त्या परिसरात पाण्याची मोठया प्रमाणात टंचाई भासते. अशा परिस्थितीत या संदर्भात मोठया प्रमाणात मागणी केली गेली होती. विचारणा केल्यास या कामाचे अंदाजपत्रक तयार झालेले आहे, असे सांगण्यात आले होते. अजूनही याबाबत प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. शासन ही मान्यता केव्हा देणार आहे ? मान्यता लांबली की निकष बदलतात. यामुळे कामामध्ये अडचणी निर्माण होतात. याकरिता शासनाने लवकर प्रशासकीय मान्यता द्यावी.*

*अध्यक्ष महोदय, कराड-उत्तर मतदारसंघामध्ये अंतवडी तलावाच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. त्याचे काम थांबलेले आहे. या भागामध्ये वेळूचे सर्वेक्षण चालू आहे. यामुळेही कामे थांबलेली आहेत. या तलावाच्या कामाला केव्हा सुरुवात होणार आहे ? याचा शासनाने खुलासा करावा.*

*श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सोनापूर गावामध्ये लघुपाटबंधारे स्थानिक स्तर अंतर्गत तलाव होण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली होती. पाझर तलावात पाणी थांबावे ही अपेक्षा नसते, त्याचे पर्कोलेशन व्हावे, ही अपेक्षा असते. त्याचे साठवण तलावामध्ये रुपांतर करण्यात यावे, अशी मागणी आहे. याबाबत कार्यवाही चालू आहे. या संबंधीचा प्रस्ताव*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. ४७६०९

मुख्य अभियंता, जलसंधारण यांच्याकडे हा प्रस्ताव दाखल झालेला आहे. याबाबत प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर या कामाला सुरुवात होऊ शकते.

डॉ.सतीश पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. ६८२.८१ लक्ष किंमतीचे या कामाचे अंदाजपत्रक याकरिता नियोजित करण्यात आलेले आहे. परंतु अद्यापहि या कामाकरिता प्रशासकीय मान्यता मिळण्यास दिरंगाई होत आहे. या दिरंगाईची काय कारणे आहेत ? हे काम कधी सुरु होणार आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, हा प्रस्ताव चीफ इंजिनियर यांच्याकडे आहे. सी.ई.यांच्याकडून हा प्रस्ताव शासनाकडे दाखल झाल्यानंतर पाझर तलावाचे साठवण तलावामध्ये रुपांतर करण्याकरिता ६८२.८१ रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. याबाबत सी.ई.यांच्या पातळीवर यासंदर्भातील निर्णय झाल्यानंतर प्रत्यक्ष या कामास सुरुवात होईल.

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सी.ई.यांच्याकडे हा प्रस्ताव किती दिवस झाले पडून आहे ? हे केवळ वेळकाढूपणाचे लक्षण आहे. हे काम केव्हा चालू होणार आहे ? हे शासनाने सांगावे.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सी.ई.यांच्याकडे हा प्रस्ताव असून त्याच्यावर लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल. लोकप्रतिनिधींनी याबाबत मागणी केलेली आहे. दिनांक १६ नोव्हेंबर,२०१५ रोजी हा प्रस्ताव आला होता. या प्रस्तावाचे मापदंड तपासून अभ्यास केला जात आहे. हा प्रस्ताव ७४,२५२ पीसीएम या मापदंडामध्ये बसतो. या सर्वांचा अभ्यास करुन निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे हा प्रस्ताव सी.ई.यांच्याकडे आहे.

------

......६

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्यांच्या कामांबाबत**

***(५)*** *** ४१८६२** ***श्री.जितेंद्र*** **आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद)दःद तारांकित प्रश्न क्रमांक २८३४८ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भातः** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

*(१)* पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

*(२)* असल्यास, या योजनेमध्ये पहिल्या टप्प्यात किती किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे करण्यात येणार असून या कामासाठी किती खर्च येणार आहे,

*(३)* तसेच राज्यातील ग्रामीण भागात दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

*(४)* नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

*(२)* मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत सन २०१५-१६ साठी २००० कि.मी. रस्त्यांची कामे करण्यात येणार असून या कामासाठी अंदाजे ४५ लक्ष प्रति कि.मी. याप्रमाणे रूपये ९००.०० कोटी खर्च येणार आहे.

*(३)* सन २०१५-१६ मध्ये निवड केलेल्या रस्त्याच्या कामांना शासनाची प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

*(४)४प्रश्न* उद्‌भवत नाही.

*श्री.पांडुरंग बरोरा : अध्यक्ष महोदय, सन २०१५-२०१६ मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत २००० कि.मी.ची कामे प्रस्तावित केलेली आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, संपूर्ण राज्याचे ओडीआर आणि व्हीआर हे २,३६,८९० कि.मी.लांबीचे आहेत.*

*एल-१/--*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41862......

श्री. पांडुरंगर बरोरा.....

दरवर्षी लक्ष 2 हजार कि.मी. रस्ते पूर्ण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण होईल काय ? माझ्या तालुक्यात व्हीआर आणि ओडीआरची लांबी 1200 कि.मी. एवढी लांब आहे. सर्व तालुक्याच्या लांबीनुसार कार्यवाही केली जाईल काय ? तालुक्याची जेवढी लांबी असेल, त्याप्रमाणे रस्त्यांची कामे हाती घेतली जातील काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी ग्रामीण भागातील रस्ते 2 लाख 36 हजार कि.मी. इतके लांब असल्याची माहिती दिलेली आहे. ही सर्व लांबी ग्राम सडक योजनेतून पूर्ण होईल असे काही अपेक्षित नाही. ज्या रस्त्यांना अपग्रेडेशन, ज्या गावांना कनेक्शनची गरज आहे अशी कामे पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर ही योजना राबविली जात आहे. भुतकाळात 2 हजार कि.मी. एवढे लांब रस्ते नव्हते. विभागाच्या माध्यमातून 30 हजार कि.मी. लांबीचे रस्ते टाईम बाऊंड कालावधीत पूर्ण केले जाणार आहेत. विभागानू शून्य कि.मी.वरुन 2 हजार कि.मी.पर्यंत रस्ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. पुढील आर्थिक वर्षात 7 हजार कि.मी.रस्ते पूर्ण करण्याचा आराखडा विभागाने तयार केलेला आहे. परिणामी अनेक रस्ते पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक तालुक्याला समान निधी दिला जाईल काय, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. यामध्ये विभागाने मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत काही निकष निश्चित केलेले आहेत. निकषानुसार लोकसंख्येला, एचडीआयला आणि बस फेऱ्यांना काही मार्क्स दिले आहेत. एखाद्या रस्त्याच्या बाजूला दवाखाना, शाळा असेल आणि असा रस्ता निवडावयाचा असेल तर त्यासाठी मार्क्स देण्यात आले आहेत. मार्क्स सिस्टिममध्ये आराखडा तयार होणार आहे. मार्क्सच्या वरील आराखड्या व्यतिरिक्त इतर काहीच करणे शक्य होणार नाही. त्यामुळे असा आराखडा नि:पक्षपातीपणे तयार केला जाणार आहे. त्यानंतर तालुक्याच्या पॅरामिटरवर रस्ता मंजूर होणार आहे.

......2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41862......

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, प्रश्न क्रमांक 3 च्या अनुषंगाने प्रश्न क्रमांक 5 आहे, याबाबत माननीय पीठीसीन अधिकाऱ्यांनी माहिती दिलेली आहे. पांदन रस्त्याच्या संदर्भातील मी प्रश्न विचारणार आहे. अनेक पांदन रस्ते नकाशा आणि ब्ल्यु-प्रिन्टमध्ये नाहीत. अशा वेळी पांदन रस्त्याला मंजुरी मिळत नाही. पांदन रस्ते नकाशा आणि ब्ल्यु-प्रिन्टवर आणण्यासाठी प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींसमवेत चर्चा करण्याबाबतची कार्यवाही केली जाईल काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सदर प्रश्न मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या संदर्भातील आहे. मी यापूर्वीच पांदन रस्त्याच्या संदर्भातील उत्तर दिलेले आहे. सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पात पांदन रस्त्याविषयी वेगळी योजना जाहीर करण्यात आलेली आहे. त्यामुळे एखाद्या रस्त्याला एका कॅटेगरीमधून काढून दुसऱ्या कॅटेगरिमध्ये टाकणे किती प्रॅक्टिकल आहे वगैरे तपासल्यानंतर निर्णय केला जाऊ शकतो. महाराष्ट्रातील पांदन रस्ते यामध्ये टाकता येतील काय...

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, अनेक पांदन रस्ते नकाशा आणि ब्ल्यु-प्रिन्टमध्ये नाहीत. असे रस्ते नकाशावर आल्यानंतर मंजुरी मिळते. शासनाकडून पांदन रस्ते नकाशा आणि ब्ल्यु-प्रिन्टवर आणण्यासाठी कोणते प्रयत्न करणार आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा तोच खरा मूळ गाभा आहे. एखाद्या रस्त्याला एका कॅटेगरीमधून काढून दुसऱ्या कॅटेगिरिमध्ये टाकायचे. ही देखील एक कॅटेगिरी आहे. सन्माननीय सदस्यांनी अनेक पांदन रस्ते नकाशा आणि ब्ल्यु-प्रिन्टमध्ये टाकण्यासाठी सूचना केलेली आहे, असे सर्वच ठिकाणी करता येत नाही. शासनाने पांदन रस्त्याच्या बाबतीत वेगळी योजना जाहीर केली. त्या माध्यमातून पांदन रस्त्याची दुरूस्ती केली जाणार आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन 2015-2016 साठी 2000 कि.मी. रस्त्यांची कामे करण्यात येणार असून, या कामासाठी अंदाजे 45 लक्ष प्रती कि.मी. याप्रमाणे 900.00 कोटी खर्च येणार आहे. आतापर्यंत किती खर्च झाला, 2000 कि.मी.मधील किती रस्ते पूर्ण झाले ? पांदन रस्ते ग्रामविकास विभागाकडून केले जाणार की, बांधकाम विभागाकडून केले जाणार आहेत ?

......3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41862......

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नास मी उत्तर देणार आहे. सदर योजना मागिल अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर सदर विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर आला होता. त्यानंतर त्याला मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली होती. सदर योजनेमध्ये 188 रस्ते मंजूर झालेले आहेत. अशा रस्त्यांची 1120 कि.मी.एवढी लांबी आहे. 34 जिल्ह्यांपैकी 18 जिल्ह्यांमधील रस्त्यांच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. संबंधित जिल्ह्याबरोबर व्हिडीओ कॉन्फरन्सींगच्या माध्यमातून रस्त्याची कामे करण्यासाठी प्रस्ताव मागितले जात आहेत. तसेच उर्वरित जिल्ह्यतील रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी या आठवड्यात प्रस्ताव मागविण्याबाबतची कार्यवाही पूर्ण केली जाणार आहे. त्यामुळे रस्त्यांची कामे पुढील कालावधीत पूर्ण होणार आहेत. सदर रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी 568 कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पात नमूद केल्यानुसार रस्ते जसे पूर्ण होतील, त्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. विभागाकडे उपलब्ध असलेल्या 50 कोटी रुपयांमधून टेंडर आणि प्लॅनिंगची कामे करण्यासाठी खर्च केला जात आहे. पांदण रस्ता ग्रामविकासाच्या माध्यमातून केला जाणार आहे. पांदन रस्त्यासाठी कॉन्व्हेजन्समधून वेगळी योजना करुन ते पूर्ण केले जाणार आहेत. पांदण रस्त्याची कच्ची कामे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून केली जाणार आहे. पांदण रस्त्यावरील स्ट्रेंदनिंगची कामे कॉन्व्हेजन्समधून विविध विभागाच्या माध्यमातून केली जाणार आहे.

प्रा. विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, सन 2015-2016 मध्ये निवड केलेल्या रस्त्याच्या कामांना शासनाची प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2015-2016 मध्ये निवड केलेल्या रस्त्याची कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता किती दिवसात दिली जाणार आहे ? माझ्या माहिती प्रमाणे ही कामे सन 2015-2016 मध्ये पूर्ण होणे शक्य नाही. टेडर आणि वर्क ऑर्डर देईपर्यंत पावसाळ्याला सुरुवात होणार आहे. सन 2015-2016 मध्ये निवड केलेल्या आणि प्रशासकीय मान्यता मिळालेल्या रस्त्यांची कामे सन 2016-2017 पर्यंत पूर्ण होतील काय ?

.......4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41862......

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सन 2015-2016 मध्ये निवड केलेले रस्ते होते. विभागाने 1128.95 कि.मी.पर्यंत रस्त्यांची कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उर्वरित रस्त्यांना आर्थिक वर्षात मान्यता मिळणार आहे. पण जे रस्ते पूर्ण होऊ शकणार नाहीत. असे रस्ते पुढे निश्चितपणे केले जाणार आहेत. दिनांक 31, मार्च, 2016 नंतर 7 हजार कि.मी.पर्यंतचे रस्ते सायमंटेनसली पूर्ण होतील. सन 2015-2016 मध्ये निवड केलेले रस्ते 31 मार्च, 2016 पर्यंत पूर्ण होऊ शकणार नाहीत. परंतु, 18 जिल्ह्यांमधील रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. येणाऱ्या 8 ते 10 दिवसांमध्ये उर्वरित जिल्ह्यांमधील रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली जाणार आहे.

डॉ. पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी रस्ते जसे पूर्ण होतील, त्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जाणार असे उत्तर दिलेले आहे. रस्त्याला प्रशासकीय मान्यता, बजेट प्रोव्हिजन असल्याशिवाय कोणतेही काम सुरु होऊ शकत नाही. पहिल्या प्रथम किती रस्ते पूर्ण करणार, बजेट किती असणार, प्रशासकीय मान्यता मिळाली आहे काय वगैरे प्रश्नाची उत्तर देण्याची गरज आहे. रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी टाईम बाऊंड किती निधी मिळणार आहे आणि प्रशासकीय मान्यता दिलेली आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, रस्त्यांच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता आणि आवश्यक असणारा निधी आणि रस्त्याची पूर्तता या सर्वांचा निर्णय योग्य वेळी आणि व्यवस्थितपणे घेतला जाणार आहे. विभागाने रस्त्याच्या संदर्भात जे टार्गेट निश्चित केलेले आहे, ते निश्चितपणे पूर्ण केले जाणार आहे.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, दिनांक 31 मार्च, 2016 रोजी आर्थिक वर्ष संपणार आहे. आज 23 मार्च, 2016 आहे. 31, मार्च संपण्यासाठी अजून 8 दिवस शिल्लक आहेत. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन 2015-2016 साठी 2000 कि.मी. रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत. या कामासाठी अंदाजे 45 लक्ष प्रती कि.मी. याप्रमाणे 900.00 कोटी खर्च येणार आहे.

.......5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41862......

श्री. अजित पवार.......

अध्यक्ष महोदय, सभागृहात वित्तमंत्री उपस्थित आहेत. 31, मार्चच्या पुढे कामे गेली तर ती लॅप्स होणार आहेत. यंदाच्या वर्षी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत 900 कोटी रुपये देण्यात आले आहेत. अशा रस्त्यांचे काय होणार ? पुढील अर्थसंकल्पात नवीन रस्ते सुचविण्यात आले आहेत. आज ग्रामीण भागातील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. ही सर्व कामे करण्यासाठी आवश्यक तो निधी मिळालाच पाहिजे.

M-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

याला प्रशासकीय मान्यता, पुन्हा काम सुरु करणे, ते वेळेत पूर्ण करणे आणि त्यातच बिल काढणे या सर्व बाबी दिनांक 31 मार्च, 2016 च्या आत कसे शक्य होणार आहे, यासंबधी माननीय ग्रामविकास मंत्री किंवा माननीय वित्त मंत्री महोदय खुलासा करतील काय?

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महाराज, या सर्व ऑन गोईंग प्रोसस आहेत. 900 कोटी रुपये हे 45 लक्ष किलो मीटर या दृष्टीकोनातून दोन हजार किलो मीटरच्या रस्त्यांसाठी खर्च होणार आहेत. हे 900 कोटी रुपये आताच खर्च केले पाहिजेत असे अपेक्षित नाही. 31 मार्च, 2016 पर्यंत टेंडर करण्याचा प्रयत्न त्या विभागाने केला आहे. दिनांक 31 मार्च, 2016 ला सदरचे पैसे लॅप्स झाले तर पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यासंबंधी मी माझ्या अर्थसaकल्पिय भाषणाच्या वेळी सांगितले होते. दिनांक 31 मार्च अगोदर 900 कोटी रुपये खर्च होतील हे अपेक्षित नाही. 900 कोटी रुपये खर्च करावे, हे आपण लक्ष्य ठेवले. काही तांत्रिक अडचणींमुळे हे पैसे खर्च झाले नाही तर पुढील वर्षी जास्तीचा निधी उपलब्ध करुन दिला जाईल. रस्त्याची जेवढी लांबी निश्चित केली आहे तेवढी लांबी पूर्ण करु.

श्री.राहूल कूल : अध्यक्ष महाराज, रस्ते तयार करताना काही निकष लावले असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. निकष ठरविले गेले, परंतु त्याचे तंतोतंत पालन करण्यात आलेले नाही त्यामुळे बऱ्याच ठिकाणी प्राधान्यक्रम ठरविताना गडबडी झालेल्या आहेत. त्यामुळे आपण या नेटवर्कचा फेरविचार करणार आहात काय? पंतप्रधान सडक योजनेचे नेटवर्क आपण पंधरा वर्षापूर्वी तयार केलेले आहे. त्या नेटवर्कचा वापर करण्याचा विचार मंत्री महोदय करणार आहेत का?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महाराज, पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर ही योजना आहे. यामध्ये आम्ही निकष लावलेले आहेत. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छिते की, यामध्ये 100 मार्कस आहेत. यामध्ये प्राथमिक शाळा, बसच्या फेऱ्या, तेथील लोकसंख्या, एचडीआय इंडेक्स, मेडिकल फॅसिलिटी हे सर्व विषय आम्ही त्यामध्ये घेतलेले आहेत. हे 100 मार्कस देऊन रस्त्यांची निवड करण्यात आलेली आहे. यासंदर्भात राज्यातून कोठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही. आता सर्व संगणकीकरण तसेच ऑन लाईन झालेले आहे. एचडीआय इंडेक्स ऑन लाईन

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहे. बसच्या फेऱ्या ऑन लाईन आहेत. तेथे असणाऱ्या शाळा तेथेच आहेत. जर असे कोठे वाटले की, तिथे योग्य निर्देश वापरले गेले नाही, मार्किंग सिस्टीम वापरली गेली नाही, तशी तक्रार सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे द्यावी, आम्ही त्यावर ॲक्शन घेऊ.

श्री.भिमराव धोंडे :अध्यक्ष महाराज, ग्रामीण भागामध्ये रस्त्यांची अतिशय वाई अवस्था झालेली आहे. आपण ती योजना आणली त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो, पण रस्त्यांची वाई अवस्था पाहता बांधकाम खात्यासाठी बजेटमध्ये अतिशय अपुरा निधी दिलेला आहे. माझ्या मतदारसंघातील शेजारच्या जिल्ह्यातले नगरचे डॉक्टर म्हणतात की, एखाद्या बाळंतीन बाईचे ऑपरेशन करायचे नसेल तर आष्टी तालुक्यातून तिला दहा किलो मीटरच्या रस्त्यावरुन फिरुन आणावे आपोआप तिचे काम होईल. एवढी रस्त्यांची वाईट अवस्था आहे. या निमित्ताने माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागातील रस्त्यांसाठी भरीव निधीची तरतूद करावी. सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये तरतूद नसेल तर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत अधिक भरीव आर्थिक तरतूद करण्यात येईल काय, याबाबत मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महाराज, सदरचा विषय हा बांधकाम खात्याशी निगडित आहे. सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघात 18 किलो मीटरचा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ता केलेला आहे. सहा कोटी रुपये थेट आमदारांसाठी आहेत. 30:54 च्या रेश्योमध्ये एका जिल्ह्यात अडीच ते तीन कोटी रुपये मिळतात, त्यातून काही रक्कम जिल्हापरिषदेला जाते. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेनुसार आम्ही 25 लाख रुपये त्यांना देतो. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून कमीत कमी चार किलो मीटरचे रस्ते आणि जास्तीत जास्त 20 किलो मीटरचे रस्ते आले आहेत. मी मघाशी सांगितले की, हा प्रवास शून्यापासून ते दोन हजार किलो मीटरपर्यंत झालेले आहे त्यामुळे याचे स्वागतच केले पाहिजे. बांधकाम खात्याचा वेगळा प्रश्न उपस्थित करावा. आम्ही जास्तीत जास्त रस्ते इन्कॉर्पोरेट करू.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बुलढाणा जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेची**
**काम निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(6) * ४७७५९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) ः सन्माननीय जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) शासनाच्या जलयुक्त शिवार या योजनेंतर्गत बुलढाणा जिल्हयात सन २०१५-१६ मध्ये मोठया प्रमाणावर कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्यापैकी केवळ ३० टक्के कामेच पूर्ण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर योजनेसाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे ही कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत करण्यात येत असलेली कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(2) होय, हे खरे आहे.
(3) हे खरे नाही.
जळगाव जिल्हयात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत रू.५५.६९ कोटी निधी शिल्लक आहे.
(4) व (५) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विविध स्त्रोतांद्वारे जिल्हयास निधी प्राप्त झाला आहे. सदर निधीमधून माहे फेब्रुवारी, २०१६ अखेर ४९४० कामे पूर्ण करण्यात आली असून सद्यस्थितीत ३०७ कामे प्रगतीपथावर आहेत.

सदर अभियानातून मृद संधारणाच्या विविध १६८५ कामांना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदरची कामे ई- निविदा प्रक्रियेत आहेत.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महाराज, माझा या प्रश्नाच्या उत्तराला आक्षेप आहे. सदरचा प्रश्न बुलढाणा जिल्ह्याविषयी विचारला असता छापील उत्तरामध्ये जळगाव जिल्ह्याची माहिती छापून आलेली आहे. एकूण सर्व काही आजबेल असे दिसते आहे. यासंदर्भात माझा आक्षेप आहेञ

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महाराज, मी क्षमा मागते. मी यामध्ये दुरूस्ती म्हणण्याऐवजी छापल्याप्रमाणे म्हणून जळगाव ऐवजी बुलढाणा असे म्हणायला हवे होते.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महाराज, 30 टक्के काम जलयुक्त शिवार योजनेतून पूर्ण झाले आहे काय, असा प्रश्न विचारला असता मंत्री महोदयांनी उत्तरात होय, खरे आहे, असे उत्तर दिलेले आहे. प्रगती पथावरील 307 कामे असून ई टेंडरिंग प्रक्रियामध्ये एकूण 1685 गावे आहेत. दोन हजार कामे अर्धवट अवस्थेमध्ये आहेत. यासाठी निधी 68 कोटी रुपये दिले, परंतु त्यातील 50 कोटी रुपये खर्च होतील अशी स्थिती आहे. प्रगती पथावरील असणाऱ्या कामांची ई टेंडरिंग

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रक्रियेची कामे ताबडतोबीने पूर्ण करण्यासाठी त्याला निधी एप्रिल महिन्यामध्ये वितरित केला जाणार आहे काय? बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जी कामे हाती घेतली गेलेली आहेत, त्यातील मूळ नियोजनातील 70 टक्के कामे अपूर्ण आहेत. त्या कामाचे संपूर्ण नियोजन पुन्हा करण्याकरिता पुढील वर्षी निधी वितरित केला जाणार आहे काय, याबाबत मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महाराज, उत्तरामध्ये सांगितलेले आहे की, 30 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. 21 हजार 600 कामांचा एका जिल्ह्याचा आराखडा आहे. त्यामधील 4940 कामे पूर्ण झालेली आहेत आणि 307 कामे प्रगतीपथावर आहेत. 1600 कामांची प्रशासकीय मान्यता झालेली आहे. या कामाचा कालावधी जानेवारी महिन्यापासून ते जून महिन्यापर्यंत आहे. आम्ही अर्थ विभागाला विनंती केलेली आहे की, आमचा निधी खर्च करणे हे आमचे ध्येय नसून काम पूर्ण करणे हे ध्ेय आहे. त्यामुळे कामे पूर्ण होतील. जी कामे पूर्ण होतील त्याला निधी मिळणार आहे. ही कामे जलसंधारणाची असल्यामुळे या कामांचा सिजन चार पाच महिन्याचाच असतो. त्यामुळे मार्च महिन्याच्या अखेरीस ही कामे पूर्ण होतील. या कामांची सुरुवात जानेवारीपासून होत असून ती कामे जूनपर्यंत करावयाची असल्यामुळे आम्हाला जून महिन्यापर्यंत पैसे खर्च करण्याची मान्यता द्यावी.

श्री.राहूल बोंद्रे : अध्यक्ष महाराज, मुख्यमंत्री महोदयांनी जलयुक्त शिवार योजनेचा एक महत्कांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. परंतु या चांगल्या योजनांचा अधिकारी कसा बोजवारा उडवितात, याचे आदर्श उदाहरण म्हणजे बुलढाणा जिल्हा आहे. बुलढाणा जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी इतर उपक्रम बाजूला ठेवून साखळी सिमेंट कॉंक्रीट बंधारे बांधण्याचा आदेश दिल्यामुळे सर्वांनी कामे थांबवून साखळी सिमेंट बंधारे बांधण्यासाठी बंधाऱ्याची साईट शोधायला सुरुवात केली. साईट सापडली नाही म्हणून जी साईट सापडेल तेथे साखळी सिमेंट बंधारे बांधण्यास सुरुवात केली. चार पाच फुटाचा नाला, त्याला दहा मीटर लांबीचे बंधारे बांधलेत. अशा प्रकारे 50 लाख रुपयांचे सिमेंट बंधारे बांधले आहेत. जेथे काहीही त्या बंधाऱ्याचा उपयोग नव्हता तेथे अशा प्रकारचे बंधारे बांधलेले आहेत. मी संपूर्ण माहिती जिल्हाधिकाऱ्यांना तसेच

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल बोंद्रे.... ता.प्र.क्र. 47759..

आपल्याकडे देतो. मंत्री महोदय आपण या प्रकरण्ांची तातडीने चौकशी करणार आहात काय?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महाराज, ही योजना जनतेसाठी असून लोकप्रतिनिधिंचे म्हणणे ग्राह्य धरणे हे कर्तव्य आहे. त्यामध्ये सन्माननीय सदस्यांची काही तक्रार असेल तर लेखी पुराव्यासह माझ्याकडे द्यावी किंवा सन्माननीय सदस्यांना हवे असेल तर त्यांच्याकडून तसा अहवाल मागविण्यात येईल.

डॉ.शशिकांत खेडेकर : अध्यक्ष महाराज, जलयुक्त शिवार योजना हा महत्वाकांक्षी कार्यक्रम या शासनाने सुरु केला, त्याबद्दल मी मुख्यमंत्री महोदयांचे तसेच नामदार श्रीमती पंकजा मुंडे यांचे अभिनंदन करतो. या योजनेची अंमलबजावणी करताना एक गोष्ट लक्षात आणून दिली पाहिजे की, ही योजना कितीही महत्वाकांक्षी असली तरी त्या योजनेचे परिपालन व्यवस्थित झाले नाही तर या योजनेतचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी पुढे पश्चाताप करण्याची पाळी येणार आहे.

यानंतर...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र 47759 ....

डॉ. शशिकांत खेडेकर ...

बुलढाणा जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जी कामे झाली त्यातील बरीचशी कामे अपूर्ण आहेत आणि काही कामे केवळ ठेकेदारांच्या सोयीसाठी काढण्यात आली, ती अतिशय निकृष्ट झालेली आहेत. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इ-टेंडरिंग प्रक्रियेमुळे जिल्ह्याच्या बाहेरील ठेकेदारांनी ही कामे घेतलेली आहेत. त्यामुळे या कामांवर कोणाचा कंट्रोल राहिलेला नाही. ज्या जिल्ह्यातील कामे आहेत, त्या जिल्ह्या व्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील ठेकेदारांना काम करण्यास मनाई केली जाणार आहे काय, निकृष्ट झालेल्या कामांकरिता ठेकेदारांवर कारवाई करणार आहात काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील खर्चाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सुरुवातीला प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छिते की, हे पैसे खर्च होणार आहेत, ही सर्व कामे पूर्ण होणार आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, हे बंधारे योग्य ठिकाणी झालेले नाहीत. याबाबतीत मी मघाशी असे सांगितले आहे की, आम्हाला तसे आढळल्यास आम्ही त्याच्यावर कारवाई करु. बाहेरच्या जिल्ह्यातील ठेकदार यावेत की नाही हा विषय माझ्या अखत्यारीतील नाही. आपण एकीकडे हे सांगत आहात की, आपल्याला ठेकेदारांसाठी योजना राबवयाची नाही मग कोणताही ठेकेदार आल्याने आपल्याला काहीच फरक पडता कामा नये. देशातील कोणतेही ठेकेदार कोणत्याही राज्यात जाऊन काम करु शकतात. हा देश एकसंघ आहे. त्यामुळे कोणतेही ठेकेदार कोठेही आले तर त्याच्यावर बंधन नाही. त्यांनी शासनाचे पैसे वाचविले पाहिजेत, त्यांनी त्या पैशात जास्तीत जास्त क्वालिटीचे काम केले पाहिजे. तसे त्यांनी केले नाही तर, त्याच्यावर शासनाने कडक कारवाई केली पाहिजे, या तिन्ही गोष्टींवर आम्ही ठाम आहोत. सन्माननीय सदस्यांची कामाच्या क्वालिटीबाबत तक्रार असेल तर आम्ही त्याची देखील चौकशी करु.

श्री. हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, मूळ प्रश्नाला दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने मंत्री महोदय ही संपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता निधी वितरित करतील, असे मला ज्ञात झाले आहे. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत वेगवेगळ्या यंत्रणा काम करतात. त्यामुळे अंदाजपत्रकात मोठी तफावत आढळून येते. सिमेंट नाला बांध जीएसडीएने बांधला तर तो 10 हजार रुपयांत होतो.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र 47759 ....

श्री. हर्षवर्धन सपकाळ ....

जिल्हा परिषदेने बांधला तर 13 हजार रुपयांत होतो. लोकल सेक्टरने बांधला तर 18 हजार रुपयांत होतो. एकसारखी लांबीची कामे असताना त्याच्या खर्चामध्ये 10 लाख, 12 लाख, 18 लाख अशी त्यामध्ये तफावत आढळून येते. कामाचे भूमी पूजन करण्याकरिता गेल्यानंतर आपले हसे होते. त्यामध्ये मोठ्या प्रोव्हीजन्स ठेवण्यात आल्या होत्या. काटकसरीचे धोरण, लोकसहभाग यातून जलयुक्त शिवार अभियान राबविले गेले पाहिजे हे अभिप्रेत असताना यामध्ये आढळून येणाऱ्या तफावतीची चौकशी करावी. या अंदाजपत्रकामध्ये युनिफॉर्मिटी असली पाहिजे यासाठी चौकशी करुन शासन काही धोरण हाती घेणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, तशी स्पेसिफिक तक्रार असल्यास जेथे तफावत आढळलेली आहे, त्यावर आम्ही सखोल चौकशी करु. शासनाच्या धोरणातूनच जलयुक्त शिवार योजना तयार झालेली आहे. विविध विभाग यामध्ये काम करीत आहेत. त्यांच्या एकाच जागी असणाऱ्या मापदंडामध्ये बदल आला तर तो विषय चौकशीचा आहे. परंतु, वेगवेगळ्या जागी, वेगवेगळे कॉस्टिंग येत असेल तर, त्याचे कारण काय आहे याचाही आपल्याला अभ्यास करावा लागेल. त्यामुळे मी यावर जनरलाईज असे स्टेटमेंट करु शकणार नाही. सन्माननीय सदस्यांना असे कोठे आढळले असल्यास त्यावर येथे चर्चा होणे शक्य नाही. आपण निवेदन घेऊन माझ्याकडे जावे, आपण त्यावर चर्चा करु

श्री. विजय भांबळे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना मला 2 प्रश्न विचारावयाचे आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, मागच्या वर्षी जलयुक्त शिवार योजना सुरु झाली. माझ्या परभणी जिल्ह्यात जिंतूर मतदारसंघातील 39 गावे निवडली होती. त्यापैकी 15 गावांमध्ये आजही जलयुक्त शिवार योजनेची कामे झाली नाहीत. ही कामे आपण या वर्षी पूर्ण करणार आहात काय ?

**तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) :** सन्माननीय सदस्य आपण प्रश्नाच्या स्कोपच्या बाहेरील प्रश्न विचारु नका. मंत्री महोदयांकडे त्याबाबतची माहिती नसल्यास आपल्याला उत्तर मिळणार नाही.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र 47759 ....

श्री. विजय भांबळे : अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, माझ्या शेलु तालुक्यात हातनुर आणि केमापूर या दोन गावांतील जलयुक्त शिवार योजनेंतर्गतची राहिलेली 19 कामे आपण यावर्षी पूर्ण करणार आहात काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी तेथील जिल्हाधिकाऱ्यांना तेथील किती कामे मंजूर होती याबाबतची विचारणा करीन. बाकीची कामे मंजूर नाहीत म्हणजे जेथे् सिमेंट बंधारे झाले नसतील तेथे कॉंक्रिटीकरण झाले असेल, ओढा-नाला खोदला नसेल तर तेथे सीएमबी झाले असेल. यामध्ये विविध प्रकारची कामे अंतर्भूत असल्याने त्यांच्या गावातील कोणती कामे झाली नाहीत, याबद्दलची विचारणा मला करावी लागेल.

श्री. विजय औटी : अध्यक्ष महोदय, मला एका तांत्रिक अडचणीबाबत सांगावयाचे आहे. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत आपण ओढ्या-नाल्यांवर सिमेंट बंधारे करीत आहोत. शासनाच्या सन 2013 च्या जी.आर. चा दाखला घेतला जातो. 1 मीटर 20 सेंटीमिटरपेक्षा अधिक पाया घेतला जाऊ नये ही अट शिथिल करण्यासाठी मी ग्रामविकास मंत्री महोदयांना स्वत: भेटलो. त्या दिवशीची बैठक होऊ शकली नाही. किमान 2 मीटर खोलीपर्यंत पाया घेण्याचा निर्णय शासन जाहीर करणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, हा निर्णय सरसकट जाहीर करणे शक्य नाही. परंतु, सन्माननीय सदस्यांचा प्रॉब्लेम जेन्युईन आहे. त्याबाबतचा आमचा तांत्रिक अभ्यास झाला आहे. त्यांना परवानगी देण्यास आमची हरकत नाही असे आम्ही त्यांना तोंडी सांगितले आहे व आता सभागृहा समोर सांगत आहे.

श्री. आकाश फुंडकर : अध्यक्ष महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री. हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितल्याप्रमाणे बुलढाणा जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजना म्हणजे बारा गावचा कारभार झालेला आहे. एकही विभाग जबाबदारी घेत नाही, त्यांची एकमेकांवर चालढकल चाललेली आहे. मंत्री महोदय, आपण जलयुक्त शिवारकरिता बुलढाणा जिल्ह्यात सिंगल विंडो सिस्टम करणार काय ? बुलढाणा जिल्ह्यातील केटी ट्रॅपचे गेट नियमित चोरीला जातात, ते नादुरूस्त असतात.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र 47759 ....

श्री. आकाश फुंडकर ....

आम्ही त्यामध्ये सिमेंट प्लगिंग करुन ते पूर्णपणे बंद करण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. याकरिता आम्ही वारंवार अर्ज केले आहेत. आपण त्याबाबत शासनाला आदेश देऊन ही कारवाई पूर्ण करुन घेणार काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, कोल्हापुरी बंधाऱ्यांचे गेट चोरीला जाण्यामुळे व तेथे पाणी न थांबल्यामुळे तेथे 1 मीटर उंचीचा प्लग करण्यासंदर्भातील निर्णय आम्ही जलयुक्त शिवार योजनेमध्ये आम्ही घेतलेलाच आहे. जलयुक्त शिवार ही मुळातच एकात्मिक योजना आहे. त्यामुळे त्यामध्ये सिंगल विंडो ही जिल्हाधिकारी आहे. प्रलंबित काम कृषी विभागाचे असल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे आपण तक्रार करावी. मी देखील त्यांना तसे आदेश देते की, त्यांनी त्या त्या ठिकाणी ॲक्शन घ्यावी. त्यांच्या अंडर येणाऱ्या सर्व विभागांचे काम सुरळीत चालावे याकरिता जिल्हाधिकारी सर्वस्वी जबाबदार आहेत. ती सिंगल विंडो आहे, त्याचा वापर लोकप्रतिनिधींनी करावा. मला या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, विविध जिल्ह्यात किती कामे झाली आहेत हे सांगावयाचे झाले तर, अहमदनगर जिल्ह्यात 100 टक्के काम झाले आहे. औरंगाबाद मध्ये 90 टक्के काम झाले आहे. उस्मानाबाद व हिंगोली मध्ये 80 टक्के काम झाले आहे. या तुलनेत बुलढाणा जिल्ह्याची परिस्थिती खरेच थोडीशी मागे राहिलेली आहे. यामध्ये आपण जिल्हाधिकाऱ्यांना बोलावून सर्व लोकप्रतिनिधींची एक वेगळी बैठक लावली पाहिजे. यामध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग, त्यांचे सहकार्य आणि अधिकाऱ्यांवरचा अंकुश या तिन्ही गोष्टी येथे थोड्या लॅकिंग वाटत आहेत. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींना बोलावून एक मिटिंग घेऊ आणि तत्काळ आम्ही ... (अडथळा) ... तालुक्याच्या आमदारांनाच अधिकार आहेत. सनियंत्रण करण्याचा अधिकार आमदारांनाच आहे. मी तुम्हाला जी.आर. पाठवते.

.............

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील काही रुग्णालयांनी***
***रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याबाबत***

*(७) * ४१५७६ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) सन्माननीय सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील काही रुग्णालयांनी रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतल्याच्या घटना माहे डिसेंबर २०१५ च्या अखेरीस निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,*

*(२) असल्यास, रुग्णांचे पैसे रुग्णालयांनी त्यांना त्वरीत परत करण्याबाबतच्या सूचना या योजनेच्या समन्वयक असलेल्या नॅशनल इन्शुरन्स कंपनीने दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,*

*(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार दोषी व्यक्तीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,*

*(४) नसल्यास,सविलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?*

*प्रा. राम शिंदे डॉ. दीपक सावंत यांच्याकरिता : (१) होय.*

*(२) होय.*

*(३) योजनेंतर्गत डिसेंबर, २०१५ अखेर अतिरिक्त पैसे घेतल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करुन आतापर्यंत ३ अंगीकृत रुग्णालयांचे निलंबन करण्यात आले असून ३ रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे.*

*(४) प्रश्न उद्‌भवत नाही.*

श्री. धनंजय गाडगीळ : अध्यक्ष महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही खरोखर चांगली योजना आपल्या येथे सुरु आहे. सर्वसामान्य जनतेला या योजनेचा खूप फायदा होत आहे. परंतु, या योजनेत काही हॉस्पिटल्सकडून रुग्णांची नियमबाह्यरित्या लूट केली जात

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र 41576 ....

श्री. धनंजय गाडगीळ .....

आहे. रूग्णांना ॲडमिट केल्यानंतर त्याच्या तपासण्या, त्याच्यावरचा उपचार, औषधोपचार यातील काही गोष्टींकरिता त्यांच्याकडून पैसे घेतले जातात. काही उपचार यात समाविष्ट नाहीत असे सांगून रूग्णांकडून वेगळे पैसे घेतले जातात. काही हॉस्पिटल्समध्ये तथ्य नसताना त्या गोष्टींवर उपचार केले जातात व त्यांच्याकडून पैसे घेतले जातात. सांगली मध्ये काही महिन्यांपूर्वी अशी घटना घडली की, रूग्णाला स्टेंट बसविण्यात आला, त्यानंतर 15 दिवसांनी त्याला त्रास होऊ लागल्यानंतर त्याला परत बोलावून बायपास करण्यास सांगण्यात आले आहे, या सर्व गोष्टींची चौकश्ी करुन अशा गोष्टींना आपण हद्दपार करणार आहात काय ?

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धनंजय गाडगीळ यांनी राजीव गांधी जीवनदायी योजने संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, राजीव गांधी जीवनदायी योजना ही अतिशय लोकप्रिय योजना आहे. रूग्णांना सेवा देणारी ही योजना राज्यात अतिशय उपयुक्त ठरलेली योजना आहे. काही हॉस्पिटल्समध्ये रूग्णांकडून पैसे घेतले जातात अशा स्वरूपाच्या तक्रारी राज्य सरकार व विभागाकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशीही केली आहे. काही हॉस्पिटल्सवर कारवाई देखील केली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगली जिल्ह्यातील त्या हॉस्पिटलचे नाव सांगितलेले नाही. परंतु, त्यांनी अशी तक्रार दिली तर, निश्चित स्वरूपात त्या हॉस्पिटलची संपूर्णतः चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्यात येतील.

O-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*डॉ. सुजित मिणचेकर : अध्यक्ष महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना महाराष्ट्रामध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु आहे. ही योजना राज्यातील गोरगरीब जनतेला अतिशय चांगल्यापद्धतीने दिलासा देणारी आहे. परंतु या योजनेमध्ये काही उणिवा देखील आहेत. एखाद्या पेशंटला ह्रदयामध्ये स्टेन्ट टाकायची असेल आणि एका वेळेला त्याला दोन किंवा तीन ब्लॉकेजेस असेल तर त्याकरिता देखील ६० हजार रुपयांचीच तरतूद आहे. डॉक्टर किंवा हॉस्पीटल दोन किंवा तीन स्टेन्टसाठी पैसे उपलब्ध करुन देऊ शकत नसल्यामुळे पेशंटला इतर स्टेन्ट टाकण्यासाठी वैयक्तिकरित्या स्वत: पैसे भरावे लागतात. अशा केसेसमध्ये त्याची किंमत वाढवून देण्याची आवश्यकता आहे. याचे कारण म्हणजे स्टेन्ट, औषधांचा खर्च व हॉस्पीटलमध्ये रहाण्याचा खर्च पकडला तर या योजनेत उपलब्ध करुन दिला जाणाऱ्या निधीमध्ये हे बसत नाही. त्यामुळे दोन किंवा तीन स्टेन्टकरिताचा निधी वाढवून देणार आहात काय आणि माझा दुसरा प्रश्न आहे की, काही वेळेला पेशंट दवाखान्यामध्ये ॲडमीट होतो. त्यानंतर कागदपत्रांची जुळवाजुळव करीत असताना काही वेळेस पेशंट दगावतो. कागदपत्र तयार करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्यामुळे त्याच्या नातेवाईकांना नाहकचा त्रास होतो. अशा प्रकारे एखाद्या गरीब पेशंटचा मृत्यू झाल्यानंतर देखील पैसे देण्याची तरतूद आहे काय, नसेल तर अशी तरतूद करण्यात येईल काय, हा माझा दुसरा प्रश्न आहे.*

*प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये काही उणिवा असल्याबाबत सन्माननीय सदस्य डॉ. सुजित मिणचेकर यांनी सांगितले. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या योजनेमध्ये ९७१ आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु यातील काही आजारामध्ये जास्तीचे रुग्ण आढळून येतात. तसेच यामध्ये अशा काही आजारांचा समावेश आहे की, त्याचा फायदा रुग्ण घेऊ शकत नाहीत. ही योजना दिनांक २०.११.२०१६ पर्यंत सुरु आहे. आता आपण नवीन योजना रिफॉर्म करीत आहोत. ज्या आजारामध्ये जास्तीचा खर्च येतो आणि शासनाकडून त्याकरिता कमी निधी दिला जातो, अशा ठिकाणी खर्चामध्ये वाढ करण्याचे ठरविलेले आहे. त्याचबरोबर यामधील जुने १२२ आजार कमी करीत असून नव्याने १८५ आजार समाविष्ट करीत आहोत. सर्वांना उपयुक्त ठरणारी योजना असल्यामुळे यासंदर्भात तसा प्रयत्न केला जाणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव कॅबिनेट पुढे येऊन अंतिम निर्णय होईल. डॉ. सुजित मिणचेकर हे*

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )*

प्रा. राम शिंदे.....

*डॉक्टर आहेत. त्यांनी स्टेन्टच्या संदर्भात देखील मुद्दा उपस्थित केला. यामध्ये पॅकेजेस नुसार स्टेन्ट उपलब्ध करुन दिली जाते. परंतु यामध्ये जास्तीचा खर्च मिळावा त्यादृष्टीने नवीन एमओयुमध्ये त्याची तरतूद करण्यात आलेली आहे.*

*डॉ. पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, डॉ. सुजित मिणचेकर यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. या योजनेतील १२० आजार कमी करुन नव्याने १८५ आजार ॲडीशनल केले जाणार असल्याचे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. कोणते आजार कमी केले जाणार आहे व नव्याने कोणते आजार समाविष्ट करणार आहात, याची माहिती सदनाला देण्यात यावी.*

*प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सद्या सुरु असलेल्या योजनेमध्ये ९७१ आजारांचा समावेश आहे. ज्या आजारामध्ये डुप्लीकेशन आले, अपटेक मिळत नाही, असे १२२ आजार कमी केले जाणार आहे आणि १८५ आजार वाढविले जाणार आहे. ज्या आजारासंदर्भात सातत्याने जनतेकडून मागणी होते आणि हा आजार या योजनेमध्ये बसत नाही, असे रुग्णांना हॉस्पीटलकडून सांगितले जाते, त्या आजारांचा यामध्ये समावेश केला जाणार आहे. अभ्यासाअंती, तसेच लोकांच्या आलेल्या मागण्यांचा जास्तीत जास्त समावेश केला जाणार आहे. कोणते आजार कमी करण्यात येणार आहे व कोणते आजार वाढविण्यात येणार आहे याची यादी स्वातंत्ररित्या पटलावर ठेवण्यात येईल.*

*श्री. राजेश क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. माझ्या माहितीप्रमाणे शासनाने ठरवून दिलेले दर कोणत्याही दवाखान्याकडून पाळले जात नाहीत. मंत्री महोदयांनी सांगितले की, काही दवाखान्यांसंदर्भात तक्रारी येतात. परंतु माझा स्पष्ट आरोप आहे की, प्रत्येक दवाखान्यामध्ये ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त पैशाची मागणी केली जाते. आमच्याकडे अशा अनेक तक्रारी येतात. ही योजना अत्यंत चांगली आहे. ९७१ आजारांचा या योजनेमध्ये समावेश आहे. तसेच यामध्ये आणखी १८५ आजारांचा समावेश केला जाणार आहे. ही योजना चांगली चालण्यासाठी आणि पेशंटला चांगला न्याय मिळण्यासाठी जिल्हास्तरीय समिती नेमण्याची आवश्यकता असून अशी समिती नेमण्यात येईल काय, असा माझा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्याचे मी मान्य केले आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली. त्यात काही हॉस्पीटल्स दोषी आढळले व त्यांच्यावर निलंबनाची आणि मान्यता रद्द करण्याची कारवाई देखील करण्यात आलेली आहे. ही योजना चांगली असल्याचे संपूर्ण महाराष्ट्राचे व सभागृहाचे मत आहे. या योजनेमध्ये काही लॅक्युना असेल, काही त्रुटी असेल त्या दूर करुन लोकांना जे अपेक्षीत आहे, अशा सर्व योजनांचा यामध्ये समावेश करुन ही बाब कॅबिनेटपुढे आणून त्याला अंतिमत: मूळ स्वरुप देऊन ही योजना चांगल्या पद्धतीने कार्यान्वित करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे आणि आम्ही ते निश्चित स्वरुपात करु. तसेच सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात समिती नेमण्यात येईल काय, असा प्रश्न विचारला. त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात एक्झमाईन करुन निश्चितपणे उचित कार्यवाही करण्याच्या संदर्भात राज्य सरकार काम करेल.*

*श्री. सुरेश खाडे : अध्यक्ष महोदय, ही योजना चांगली चालू असल्याबाबत मी सरकारचे अभिनंदन करतो. परंतु या योजनेपूर्वी जीवनदायी आरोग्य योजना ही योजना सुरु होती. यासंदर्भात मी बऱ्याच वेळा पत्रव्यवहार केला आहे. परंतु अगोदरच्या योजनेचे रुग्णालयांचे पैसे देणे बाकी असून हे पैसे देणार आहात काय, असल्यास केव्हा देण्यात येणार आहे, असा माझा प्रश्न आहे.*

*डॉ. दिपक सावंत : अध्यक्ष महोदय, जुन्या राजीव गांधी योजनेचे पैसे देणे बाकी असल्याची बाब खरी आहे. आपण हे पैसे वेळोवेळी, टप्प्याटप्प्याने देत असतो. आताच्या बजेटमध्ये देखील वित्त मंत्री महोदय काही प्रोव्हीजन करतील, असे ठरलेले आहे. त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने पैसे दिले जातील.*

*श्री. धनंजय गाडगीळ : अध्यक्ष महोदय, या योजनेमध्ये एकूण कोणकोणते आजार आहेत. व कमी केल्या जाणाऱ्या आणि समाविष्ट केल्या जाणाऱ्या आजारांची माहिती व प्रत्येक आजाराला किती रक्कम ॲलोकेट केली आहे, याची माहिती सभागृहाला दिली जाईल काय, असा माझा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.*

*प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, ही योजना दिनांक २०.११.२०१६ रोजी संपुष्टात आल्यानंतर नवीन योजना जाहीर केली जाणार आहे. कोणते आजार कमी केले, कोणत्या आजारांचा समावेश करण्यात आला, कोणत्या आजारावर किती रक्कम खर्च करणे अपेक्षीत आहे,*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*प्रा. राम शिंदे.....*

*कोणत्या आजारावर पूर्वी किती रक्कम शासन देत होते, नव्याने त्यामध्ये किती वाढ करण्यात आली, याबाबतची संपूर्ण माहिती अध्यक्ष महोदयांच्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.*

*श्री. अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, दिनांक २०.११.२०१६ रोजी नवीन योजना आणली जाणार असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. मुंबईमधील जसलोक हॉस्पीटल, हिंदुजा हॉस्पीटल व इतर मोठ्या हॉस्पीटल्सचा समावेश राजीव गांधी योजनेमध्ये करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.*

*प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, या योजनेमध्ये सद्या ४९१ हास्पीटल्सचा समावेश आहे. आमचे हॉस्पीटल या योजनेमध्ये समाविष्ट नाही, अशा अनेक तक्रारी विभागाला प्राप्त झालेल्या आहेत. नवीन एमओयु साईन करीत असताना, नवीन योजना आणत असताना हॉस्पीटल्सची संख्या मर्यादीत न ठेवता हॉस्पीटलमध्ये कोणत्या सुविधा प्राप्त आहेत, त्यानुसार याकरिता बंधन न ठेवता, अशा सर्व हॉस्पीटल्सचा विचार निश्चित स्वरुपात केला जाईल.*

*अध्यक्ष : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.*

*...P/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

डॉ. रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील खर्चाचा तपशिल सभागृहासमोर ठेवतो :-

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये सामान्य प्रशासन विभागाची सन 2010-2011 व सन 2011-2012 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत आणि सन 2010-2011 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

-----------

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील खर्चाचा तपशिल सभागृहासमोर ठेवतो :-

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा सन 2010-2011 या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

-----------

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवते :-

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा (सुधारणा) संहिता, 2016 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक व्हीपीएम. 2015/ प्र.क्र.309/ पंरा-4 (22), दिनांकित 3 मार्च, 2016 सभागृहामोर ठेवते.

**अध्यक्ष** : अधिसूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

----------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील खर्चाचा तपशिल सभागृहासमोर ठेवतो :-

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये पर्यावरण विभागाचा सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि सन 2010-2011 व 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

-----------

**अध्यक्ष :** माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सदनामध्ये फाईल व पत्रावर मंत्री महोदयांच्या स्वाक्षऱ्या घेऊ नये. कारण त्यामुळे प्रश्नाकडे मंत्री महोदयांचे दुर्लक्ष होऊन प्रश्नाला न्याय मिळत नाही. सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांच्या ऑफिसमध्ये जाऊन स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** नियम समितीचा अहवाल सभागृहास सादर करणे.

ॲड.आशिष शेलार (सदस्य) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेच्या नियम समितीचा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

अध्यक्ष महोदय, विधानसभा नियम समितीचा सन 2016 चा अहवाल आज दिनांक 23 मार्च, 2016 रोजी सभागृहास सादर करण्यात येत आहे. महाराष्ट्र विधानसभा नियमामध्ये सुधारणा करण्यासाठी एकूण तीन सूचना समितीपुढे विचारार्थ होत्या. त्यामधील काही अत्यंत महत्वाच्या शिफारशी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

अध्यक्ष महोदय, विधानसभा नियम 4 च्या पोट नियम 2 मध्ये सभागृहाच्या बैठकीच्या वेळा सामान्यत: सोमवार ते शुक्रवार या दिवशी सकाळी 11 वाजता सुरु होऊन 18 वाजता म्हणजे सायंकाळी 6 वाजता समाप्त होतील, असा बदल करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, विधानसभा नियम 72 च्या पोट नियम 2 मध्ये नवीन परंतुक दाखल करण्यात येत असून त्यामध्ये अतारांकित प्रश्नांची उत्तरे विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात आली नसली तरी ती छापण्याचा, प्रसिध्द करण्याचा, प्रस्तूत करण्याचा तसेच, सन्माननीय सदस्यांना 40 दिवसांच्या आत वितरीत करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, विधानसभा नियम 244 (त), नवीन नियम 244 (थ) व नियम 244 (द) अन्वये मराठी भाषा समितीची रचना करण्यात आली असून त्याची कार्ये दाखल करण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, नियम समितीच्या अहवालामध्ये सुधारणा करण्याची नोटीस आजपासून 10 दिवसांच्या आत द्यावी अथवा नियम 225 (3) अन्वये सुधारणांची नोटीस 10 दिवसांच्या आत देण्यात आली नसेल तर समितीच्या शिफारशी सभागृहाने मान्य केल्या आहेत असे मानले जाईल. उक्त मुदत संपल्यानंतर समितीने शिफारस केल्याप्रमाणे नियमातील सुधारणा राजपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, मला प्रस्ताव मांडण्याची संधी दिली त्याबाबत मी आपला आभारी आहे.

**अध्यक्ष :** अहवाल सभागृहास सादर करण्यात आला आहे.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष.......**

विधानसभा नियम समितीचा अहवाल आज दिनांक 23 मार्च, 2016 रोजी सभागृहात सादर करण्यात आला असून अहवालाच्या अनुषंगाने नियम समितीच्या अहवालातील कोणतीही सुधारणा करण्याची नोटीस विधानसभा नियम 225 (1) व (3) च्या तरतुदी अन्वये सन्माननीय सदस्यांनी आज पासून सुरु होणाऱ्या 10 दिवसांच्या आत द्यावी.

--------------

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.: स्थगन प्रस्तावाच्या सूचना.**

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी "दंतवाडी ता.बारामती जि.पुणे येथे दुचाकीवर प्रवास करणाऱ्या विद्यार्थीनीचा व तिच्या वडिलांचा दिनांक 22 मार्च, 2016 रोजी करण्यात आलेली हत्या" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरी विषयाचे गांभिर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे, असे निदेश देऊन मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. सन्माननीय सदस्यांना या विषयावर बोलण्याची मी संधी देत आहे त्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. मंगळवार दिनांक 22 मार्च, 2016 रोजी बारामती व दौंड तालुक्यांना लागून असलेल्या परिसरातून एक शेतकरी त्याच्या मुलीला सायंकाळी 4 ते 5 वाजेच्या दरम्यान दुचाकीवर घेऊन जात होता. सायंकाळी सर्व ठिकाणी सुर्यप्रकाश असतो. अशा वेळी शेतकरी व त्याची मुलगी दुचाकीवरुन जात असताना त्यांच्या डोळ्यामध्ये मिरचीची पूड टाकून मुलीला बेदम मारहाण करण्यात आल्याने ती जागेवर मृत्यूमुखी पडली. त्या मुलीच्या वडिलांवर देखील वार करण्यात आले होते त्यांना दवाखान्यामध्ये ॲडमिट करण्यात आले आहे. सध्या राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. सदनामध्ये राज्याचे गृह राज्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. एवढी गंभीर घटना घडली असून त्यासंदर्भात राज्य सरकार कोणती कारवाई करणार आहे ? एका मुलीची दिवसा ढवळ्या हत्या करण्यात आली व तिच्या वडिलांना मारहाण करण्यात आली आहे. अशा परिस्थितीमध्ये सामान्य माणसाने कोणाच्या विश्वासावर जगावे, यासंदर्भात राज्य सरकारने विचार करण्याची वेळ आली आहे, त्यामुळे मी हा स्थगन प्रस्ताव मांडला आहे.

**अध्यक्ष :** सदरहू प्रकरणी शासनाकडून कधी निवेदन करण्यात येणार आहे ?

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : सदरहू प्रकरणी सोमवारी सदनामध्ये निवेदन करण्यात येईल.

-----------------

......6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत पाटील, संदिप नाईक व प्रा.वर्षा गायकवाड यांनी "देवनार (मुंबई) येथील डम्पींग ग्राऊंडला लागलेल्या आगीच्या धुरामुळे एका बालिकेचा दिनांक 22 मार्च, 2016 रोजी गुदमरुन झालेला मृत्यू." या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरी विषयाचे गांभिर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. सन्माननीय सदस्यांना या विषयावर बोलण्याची मी संधी देत आहे त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, देवनार येथील डम्पींग ग्राऊंडला महिनाभरामध्ये दुसऱ्यांदा आग लागली आहे. काल एका लहान बालिकेचा डम्पींग ग्राऊंडला लागलेल्या आगीच्या धुरामुळे गुदमरुन मृत्यू झाला आहे. या आगीचा परिणाम नवी मुंबई, वाशी, कोपर खैरणे, चेंबूर व मुंबईच्या आसपासच्या सर्व उपनगरांवर होत आहे. दुसऱ्यांदा या डम्पींग ग्राऊंडला आग लागली असून त्यामुळे शाळा व कॉलेज बंद ठेवावी लागली आहेत. जगातील प्रगतीशील असलेल्या या शहराच्या डम्पींग ग्राऊंडसाठी चांगली व्यवस्था निर्माण केली नाही. या डम्पींग ग्राऊंडला दुसऱ्यांदा आग लागली आहे. ही आग कोणी लावली, कशामुळे लावली, कोणी तरी आग का लावत आहे, कोणाला बदनाम करण्यात कोणाचा इंटरेस्ट आहे काय, एखाद्या सत्तारुढ पक्षाची लक्तरे बाहेर काढण्यासाठी दुसरी बाजू विशेष प्रयत्न करीत आहे काय, हे सर्व प्रश्न अनुत्तरीत आहेत. त्यामुळे आमची मागणी आहे या डम्पींग ग्राऊंडला लागलेल्या आगीच्या संदर्भात सदनामध्ये चर्चा घेण्यात यावी. आगीमुळे निर्माण होणाऱ्या धुराच्या लोटामुळे लोक गुदमरुन मरत आहेत. सदरहू प्रकरणी स्थगन प्रस्ताव नाकारावयाचा असेल तर या विषयावर शासनाने निवेदन करावे. महानगरपालिका प्रशासनातील संबंधित अधिकारी व राज्य सरकारमधील पर्यावरणाची जबाबदारी असणारे अधिकारी यांच्या संदर्भात सरकार कोणती कारवाई करणार, याचा खुलासा करावा.

यानंतर Q-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंबंधी आपल्या देशामध्ये मुंबई ही या देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखले जाते आणि मुंबईचे महत्व सर्वांच्या लक्षात आलेले असताना देखील सातत्याने या घटना घडत आहेत. वास्तविक या सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या सभागृहात काही प्रश्नांना उत्तरे देत असताना हा मुद्दा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी प्रकर्षाने मांडलेला होता. आता तर मार्च महिना आहे. अजून एप्रिल आणि मे महिना जायचा आहे. त्यावेळी उन्हाची तीव्रता वाढली म्हणजे त्यामध्ये आणखी गॅसचे प्रमाण वाढणार आहे. वाढत्या उष्णतेमुळे त्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात आग लागण्याचे प्रमाण वाढणार आहे. त्या परिसरात आपले आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. त्या भागामध्ये लोकांना जाणे-येणे असह्य होत आहे. या घटनेमध्ये जी निष्पाप मुलगी मृत्यूमुखी पडली असून तिच्या आईवडिलांचे म्हणणे असे आहे की, तेथील वातावरण इतके खराब झाले आहे की, तेथे जगणे आणि श्वास घेणे मुश्कील आहे. असे असताना सभागृह सुरू आहे. हे सभागृह सुरू असताना याचे गांभीर्य सरकारला दिसत नाही अशी परिस्थिती आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, विधानसभेचे अध्यक्ष या नात्याने आपण सरकारला निदेश देण्याची गरज आहे. यामुळे मुंबईतील संपूर्ण जनता भयभीत झालेली आहे, ही बाब सर्वांना लक्षात आलेली आहे. यामध्ये मुंबई महानगरपालिका, राज्य सरकार आणि नगरविकास विभागाचा दोष आहे. याच्या पाठीमागे कोण आहे ? ज्याप्रमाणे एसआरएच्या योजना करण्यासाठी काही ठिकाणी जाणीवपूर्वक झोपडपट्टीला आगी लावल्या जातात आणि निष्पाप लोकांना त्रास होतो. त्या पध्दतीने काही कारण आहे काय ? याची शहानिशा झाली पाहिजे आणि म्हणून या संदर्भातील हा स्थगन प्रस्ताव अत्यंत महत्वाचा असल्यामुळे यासंबंधी निर्णय देण्यात यावा.

**अध्यक्ष :** सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरीही विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. सरकार हे निवेदन कधी करणार आहे ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सोमवारी यावरील निवेदन करण्यात येईल.

**अध्यक्ष :** उर्वरित स्थगन प्रस्तावाच्या सूचना मी दालनात नाकारल्या आहेत.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन घोषणा

**अध्यक्ष :** या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. अबु आझमी यांचा आज वाढदिवस आहे. सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात येत आहे.

श्री. अबु आजमी : अध्यक्ष महोदय, आज मेरा जन्म दिन नही है.

--------

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत**

श्री अबु आजमी : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है. कल दोपहर नंदुरबार में माली और मुस्लिम समाज के बीच झगड़ा हुआ. यह झगड़ा कल ही खत्म कर दिया गया. लेकिन आज सुबह 9.30 बजे अँग्लो उर्दू स्कूल पर माली समाज के लोगों ने हमला कर दिया. आधे बच्चे स्कूल में नहीं जा सके, आधे बच्चे परीक्षा नहीं दे सके. पुलिस ने औरतों को अरेस्ट किया है. गर्भवती महिला पुलिस स्टेशन में बंद है. पुलिस की ओर से एकतरफ कार्रवाई हो रही है. दो समुदाय में तणाव बढ़ रहा है. मैं गृहमंत्री जी से कहना चाहता हूं कि वहाँ पर तुरंत पुलिस तैनात कर के कानून व्यवस्था की स्थिति को बरकरार किया जाए. दो समुदायों के बीच कोई घटना न होने पाए, कानून व्यवस्था की स्थिति बिगड़ने न पाए, इसके लिए शासन ने कानूनी कार्रवाई करनी चाहिए.

**अध्यक्ष** : मंत्री महोदयांनी यासंबंधी लक्ष द्यावे.

-----

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जितेंद्र आव्हाड : अध्यक्ष महोदय, मी या सदनाला माहिती देऊ इच्छितो की, काल फर्ग्युसन कॉलेजमध्ये काही विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या. त्यावर फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिंसीपल यांनी या मुलांनी देशद्रोहाच्या घोषणा दिल्या असे पत्र पाठविले आहे आणि आता ते असे म्हणतात की, ते पत्र मी चुकून पाठविले आहे, कारण काही टायपिंग मिस्टेक झाल्या आहेत. फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिंसीपल यांनी असे म्हणणे म्हणजे त्या मुलांचे आयुष्य उध्वस्त होईल अशी व्यवस्था करणे आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करा अशा प्रकारचे पत्र पोलिसांना देणे, हे सारे संशयास्पद आहे. या ठिकाणी गृहराज्यमंत्री बसले आहेत, एखाद्या प्रिंसीपलने एखादा गुन्हा दाखल करावा म्हणून असे पत्र देणे आणि नंतर ते परत घेणे हाच एक गुन्हा आहे. त्यामुळे आपण त्या प्रिंसीपलवर त्वरीत गुन्हा दाखल करावा. अन्यथा या विद्यार्थ्यांमध्ये फूट पडून तेथे एखादा मोठा वाद निर्माण होईल. म्हणून यामध्ये सरकारने मध्यस्थी करावी.

**अध्यक्ष :** यामध्ये शासनाने लक्ष द्यावे.

------

5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख : अध्यक्ष महोदय, कल नंदुरबार में जो घटना हुई, वह मामला बाद में नियंत्रण में आ गया था. लेकिन क्या वजह है कि आज सुबह फिर से वहां पर दंगल शुरु हो गई है. पुलिस नाकाम रही है. कानून व्यवस्था की स्थिति न बिगड़ पाए इसके लिए शासन ने स्पेशल पुलिस फौर्स वहां पर भेजना चाहिए. किस समाज के लोग वहां पर इस तरह की बार बार हरकतें कर रहा है, जब भी अधिवेशन चलता है ऐसी घटनाएं होती है. दो समुदायों के बीच कोई अनुचित घटना न होने पाए, दंगल न होने पाए, वहाँ तनाव नहीं बढ़े इसके लिए सरकार ने वहां पर पुलिस फौर्स बढ़ाना चाहिए. होली का त्यौहार है. इसको ध्यान में रखते हुए, जो दोषी होगा उस पर कार्रवाई होनी चाहिए. इस बारे में निवेदन किया जाना चाहिए.

**अध्यक्ष :** आपले म्हणणे बरोबर आहे. तणाव वाढणार नाही याची दक्षता शासनाने घ्यावी.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष साबणे : अध्यक्ष महोदय, काल दिनांक 22 मार्च 2016 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील पान क्रमांक 63 वर प्रश्न क्रमांक 44001 हा प्रश्न लागला प्राथम्य क्रमांक 54 वर होता. राज्य शासनाच्या सेवेतील जात वैधता प्रमाणपत्र सिध्द न करु शकलेल्या कोळी समाजाच्या कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा हा प्रश्न होता. या प्रश्नामध्ये माझ्या नावाचा चुकीने उल्लेख झालेला आहे. मी ऑनलाईनमध्ये जो प्रश्न होता, त्यानुसार 16101 या ऑनलाईन क्रमांकानुसार त्या प्रश्नाचे स्वरुप असे दिले होते की, राज्य शासनाच्या सेवेत असणाऱ्या व जात प्रमाणपत्र वैधता सिध्द न करु शकलेल्या कोळी समाजाच्या कर्मचाऱ्याला शासकीय सेवेतून काढून टाकण्यात येऊ नये असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी माहे जुलै 2015 च्या सुमारास दिले होते, हे खरे आहे काय, असा प्रश्न मी विचारला होता. तर प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये या चुकीच्या ठिकाणी माझे नाव छापून आले आहे. यामुळे माझ्या मतदार संघात आणि वृत्तपत्रातून चुकीची माहिती गेल्यामुळे त्या समाजामध्ये माझ्याबद्दल रोष निर्माण झालेला आहे. त्यामुळे या प्रश्नामध्ये दुरुस्ती करण्यात यावी. कारण मी त्यांच्या हितासाठी प्रश्न उपस्थित केला होत. एवढेच मला या माध्यमातून निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

**अध्यक्ष :** ठीक आहे. या प्रश्नामध्ये दुरुस्ती करण्यात येईल.

श्री. नितेश राणे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. काल नाशिकच्या एका पत्रकार परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रहाटकर यांनी काल स्वतंत्र मराठवाड्याच्या मागणीचे समर्थन केलेले आहे. यासंबंधी राज्य शासनाची काय भूमिका आहे ? या शासनामध्ये काय चालले आहे. कधी ॲडव्होकेट जनरल बोलतात, कधी महिला आयोगाच्या अध्यक्षा बोलतात हे काय चालले आहे.

**अध्यक्ष :** ठीक आहे. आपण हे तपासून घ्यायला सांगू. मी आता नियम 293 च्या ऊर्जा विभागाच्या प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेल्या उत्तरास सुरूवात करण्यात यावी.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितेश राणे यांच्या म्हणण्यासंदर्भात माझा शासनाला एकच छोटासा प्रश्न आहे की, राज्याचे किती तुकडे सरकारने पाडायचे ठरविले आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. नितेश राणे आपण खाली बसावे.

7......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** राज्यातील बंद असलेले विद्युत प्रकल्प सुरु करुन आवश्यक वीज निर्मिती करणे, वीज कंपन्यांतील सुरु असलेला गैरव्यवहार, भ्रष्टाचार रोखणे, तसेच केंद्राने बंद केलेला निधी परत मिळवून व राज्य शासनाने स्वत:चा निधी देऊन राज्यातील बंद योजना पूर्ण करणे.

**मु.शी. :** राज्यातील बंद असलेले विद्युत प्रकल्प सुरु करुन आवश्यक वीज निर्मिती करणे, वीज कंपन्यांतील सुरु असलेला गैरव्यवहार, भ्रष्टाचार रोखणे, तसेच केंद्राने बंद केलेला निधी परत मिळवून व राज्य शासनाने स्वत:चा निधी देऊन राज्यातील बंद योजना पूर्ण करणे या विषयाबाबत सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, गणपतराव देशमुख, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री मकरंद पाटील, सुनील केदार, संदीप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री जयकुमार गोरे, नसीम खान, राणाजगजितसिंह पाटील, अमित देशमुख, दिलीप सोपल, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री बबनराव शिंदे, डी.एस.अहिरे, राहुल मोटे, डी.पी.सावंत, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, कालिदास कोळंबकर, दत्तात्रय भरणे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम जगताप, अमीन पटेल, राजेश टोपे, ॲड. के. सी. पाडवी, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशिराम पावरा, अवधूत तटकरे, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. आसिफ शेख, श्रीमती निर्मला गावित, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव **:-**

( चर्चा पुढे सुरु......

8.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी या चर्चेला उत्तर देत असताना मी मघाशी सांगितले होते की, एक ग्रामपंचायत, एक कर्मचारी अशी एक योजना आहे. या ठिकाणी माननीय वित्तमंत्री आणि माननीय ग्रामविकास मंत्री उपस्थित आहेत. मी सन्माननीय श्रीमती पंकजाताई मुंडे यांचे अभिनंदन करतो की, मघाशी मी एक सांगायचे राहिले होते ते म्हणजे एका ग्रामपंचायतीसाठी एक आकृतिबंध वाढवून ग्राम विद्युत सेवकाची एक योजना त्यांनी केली आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक ग्राम विद्युत सेवकाची नेमणूक लवकरात लवकर करण्यात येणार असल्यामुळे मी ग्रामविकास मंत्र्यांचे अभिनंदन करतो. या ठिकाणी पॉवरलूमच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. सुरेश हाळवणकर आणि सन्माननीय सदस्य श्री. नसीम खान

R-1.....

श्री अबु आजमी : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इम्फोर्मेशन है. कल दोपहर नंदुरबार में माली और मुस्लिम समाज के बीच झगड़ा हुआ. यह झगड़ा कल ही खत्म कर दिया गया. लेकिन आज सुबह 9.30 बजे अँग्लो उर्दू स्कूल पर माली समाज के लोगों ने हमला कर दिया. आधे बच्चे स्कूल में नहीं जा सके, आधे बच्चे परीक्षा नहीं दे सके. पुलिस ने औरतों को अरेस्ट किया है. गर्भवती महिला पुलिस स्टेशन में बंद है. पुलिस की ओर से एकतरफ कार्रवाई हो रही है. दो समुदाय में तणाव बढ़ रहा है. मैं गृहमंत्री जी से कहना चाहता हूं कि वहाँ पर तुरंत पुलिस तैनात कर के कानून व्यवस्था की स्थिति को बरकरार किया जाए. दो समुदायों के बीच कोई घटना न होने पाए, कानून व्यवस्था की स्थिति बिगड़ने न पाए, इसके लिए शासन ने कानूनी कार्रवाई करनी चाहिए.

श्री आसिफ शेख : अध्यक्ष महोदय, कल नंदुरबार में जो घटना हुई, वह मामला बाद में नियंत्रण में आ गया था. लेकिन क्या वजह है कि आज सुबह फिर से वहां पर दंगल शुरु हो गई है. पुलिस नाकाम रही है. कानून व्यवस्था की स्थिति न बिगड़ पाए इसके लिए शासन ने स्पेशल पुलिस फौर्स वहां पर भेजना चाहिए. किस समाज के लोग वहां पर इस तरह की बार बार हरकतें कर रहा है, जब भी अधिवेशन चलता है ऐसी घटनाएं होती है. दो समुदायों के बीच कोई

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अनुचित घटना न होने पाए, दंगल न होने पाए, वहाँ तनाव नहीं बढ़े इसके लिए सरकार ने वहां पर पुलिस फौर्स बढ़ाना चाहिए. होली का त्यौहार है. इसको ध्यान में रखते हुए, जो दोषी होगा उस पर कार्रवाई होनी चाहिए. इस बारे में निवेदन किया जाना चाहिए.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

पॉवरलूम मध्ये एफएसी कमी-जास्त लावली असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आम्ही ही चूक दुरुस्त करण्याचा निर्णय घेतला आहे. पॉवरलूम मे जो एफएसी कम जादा हुई थी उसका कल फायनल कर रहे है.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना आधुनिकीकरणाच्या माध्यमातून 30 ते 40 टक्के एनर्जीचे संवर्धन करणारे पंप मिळावे यासाठी एक नवीन योजना आणत आहोत. यातून मोठ्या प्रमाणावर एनर्जीचे संवर्धन होईल त्यामुळे सबसिडीची वीज मोठ्या प्रमाणावर वाचेल. त्यामुळे एनर्जी संवर्धन पंप शेतकऱ्यांकरिता आणण्याचा विचार शासनाचा आहे. यातून 35 ते 40 टक्के एनर्जी संवर्धन होऊ शकते. सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी सांगितले होते की, 4 हजार मेगावॅटचे खाजगी प्रकल्प उभे आहेत. परंतु ही वीज शासन घेत नाही. कारण कोळशाचे लिंकेज नाही. माननीय केंद्रीय मंत्री श्री.पियुष गोयल यांनी या संदर्भात एक नवीन पॉलिसी जाहीर केली जाणार आहे असे सांगितले. सदर पॉलिसी अजून यायची आहे. त्यामध्ये महाजेनकोकडे जर कोळसा असेल तर तो कोळसा खाजगी कंपनीला देऊन टोलिंग करुन स्वस्तात वीज तयार करता येईल काय असा हा प्रस्ताव असून याबाबत शासन विचार करीत आहे.

अध्यक्ष महोदय, दुष्काळ असताना विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये वीज पंपांना काही बील आलेली आहेत. त्यामुळे दुष्काळात पंप कसे चालले असतील म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकडून कोणत्या गावात पंप बंद होते किंवा कुठे पाणी नव्हते याची माहिती घेऊन तेवढे वीजचे बिल परत घेण्यात येईल. त्यामुळे बिलच लागणार नाही.

**अध्यक्ष** : प्रत्येक पंपाची जिल्हाधिकारी कशी माहिती घेणार?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, 15 हजार 800 गावांची माहिती घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.पंतगराव कदम यांनी सांगितले की, टिल्लू ठेवल्यामुळे लोक मरण पावत आहेत. एखाद्या लाईनमनला पोलवर चढता येत नाही आणि त्याने 8-10 हजार रुपयांमध्ये टिल्लू ठेवला किंवा झिरो लाईनमन नेमल. तुमच्याकडे त्याला झिरो लाईनमन म्हणतात. विदर्भात त्याला टिल्लू म्हणतात. हे टिल्लू ठेवल्यानंतर जर ॲक्सीडंट झाला तर त्या लाईनमनवर एफआयआर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एफआयआर करुन त्या लाईनमनला सेवेतून

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

निलंबीत करण्यात येईल. त्यामुळे असे ॲक्सीडंट होणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, महापारेषण आणि महावितरण या दोन कंपन्यांना गावागावात जागा घ्याव्या लागतात. 33 केव्ही सेंटर टाकण्याकरिता किंवा 220, 400 केव्हीकरिता त्यांना सरकारकडे खूप पैसे भरावे लागतात. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी असा निर्णय घेतला आहे की, यानंतर महापारेषण आणि महावितरणला नझूल किंवा महसूलच्या ज्या जागा लागतील त्या जागा मोफत देण्यात येतील. जेवढी जागेची किंमत आहे तेवढे त्या जिल्ह्याचे इन्फ्रास्ट्रक्चर वाढवून देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शंभू राजे यांनी वाईनगरचे उच्चदाब कृषी उपसा सिंचन योजने संदर्भात विचार मांडले होते की, त्याला जास्त बिल आलेले आहे. त्यामुळे 164 कोटी रुपयांची लायबिलिटी शासनावर आहे. याबाबतचा योग्य विचार करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, शाखा वाढविणे, उप अभियंते वाढविणे, कार्यकारी अभियंते वाढविणे, नवीन ग्राहक निर्माण झालेत त्याकरिताही एक प्लान सुरु आहे. याबाबत लवकरच निर्णय होईल. याठिकाणी सांगण्यात आले की, पवन ऊर्जा घोटाळा, मीटर घोटाळा असे 4-5 घोटाळे सांगितले आहेत. विरोधी पक्षाकडून घोटाळे झाल्याचे सांगण्यात आले आहे. याची चौकशी करण्यात येईल. खासकरुन श्री.अजॉय महेता यांच्याबद्दल त्यांचा रोष होता. याची चौकशी करुन चौकशीमध्ये काही तथ्य आढळून आल्यास मुख्यमंत्री महोदय जे काही ठरवतील त्याप्रमाणे पुढील चौकशी करण्यात येईल. प्राथमिक चौकशी झालेली नाही त्यामुळे आता काही घोषणा करणे शक्य होणार नाही. प्राथमिक चौकशी करुन जी काही माहिती येईल त्याप्रमाणे पुढची कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, मागच्या अनेक वर्षापासून महावितरणमध्ये पद भरतीच झालेली नव्हती. नवीन सरकार आल्यानंतर 8 हजार 250 जागा भरण्यात आलेल्या आहेत. एक हजार कनिष्ठ अभियंते नव्हते, 850 ऑडिटर नव्हते, जवळपास 6 हजार लाईनमन नव्हते. आता वर्षभरात 8 हजार 250 पदे भरण्यात आलेली आहे. त्यामुळे याठिकाणी जो त्रास होता तो आता बंद होईल.

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

अध्यक्ष महोदय, अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. कंपन्यांमध्ये 10 लाख रूपयांचे टेंडर काढण्याचे अधिकार मुख्य अभियंत्याला नव्हते. मी मार्चमध्ये कंपन्यांना आदेश दिले होते की, मुख्य अभियंत्याचे अधिकार वाढविले पाहिजेत. आपणही अशाप्रकारची सूचना दिलेली होती. त्यामुळे आता मुख्य अभियंत्याला 5 कोटी रूपयांपर्यंतचे टेंडर काढण्याचे आणि अंतिम करण्याचे अधिकार, अधिक्षक अभियंत्याला 1 कोटी रूपयांपर्यंतचे अधिकार देण्यात आले आहे. यापुढे कोणतेही टेंडर मुख्यालयामध्ये येणार नाहीत याची काळजी घेण्यात आलेली आहे. याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे.

अध्यक्ष महोदय, महानिर्मितीचे शेवटचे तीन मुद्दे सांगतो. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी याबाबत अभ्यास केलेला आहे त्यांना सांगायला पाहिजे. श्री.बिपीन श्रीमाळी यांचे याठिकाणी अभिनंदन करेन की त्यांनी ऑपरेटिंग पॅरामीटर वाढविले. पीएलएफमध्ये वाढ केली आहे. आता कोळशाचा प्रश्न सुटलेला आहे. त्यामुळे पुढच्या 40 वर्षांपर्यंत महाराष्ट्राच्या वीज निर्मितीला जेवढा कोळसा लागेल तेवढा कोळसा केंद्र सरकारने दिला आहे. त्यामुळे आता ओरिसा आणि छत्तीसगडचा कोळसा घेणे बंद करीत आहोत. त्यामुळे रॉयल्टी वाचणार आहे. ओरिसाला 600 कोटी रूपयांची आणि छत्तीसगडला 500 कोटी रूपयांची रॉयल्टी देत होतो ती आता महाराष्ट्र सरकारला मिळेल. आपण डब्ल्युसीएल बरोबर स्वॅपिंग केले आहे. पुढच्या डिसेंबरपर्यंत एसीसीएल आणि एमसीएल कडून कोळसा घेणे बंद करीत आहोत. याचा राज्याला खूप मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे.

अध्यक्ष महोदय, कोराडीचा प्रकल्प सुरु केला होता त्याचे सीओडी झाले आहे. आपण 2 हजार 500 मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचे टेंडर महाजनको तर्फे काढले आहे. याबाबत लवकर बैठक घेण्यात येईल. महाजनको ही ईपीसी आणि पीपीपी मॉडेलमध्ये 2500 मेगावॅटचे पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट करेल. शासनाने तयार केलेल्या मेथडोलॉजिप्रमाणे जर कोणी पीपीपी मॉडेलमध्ये आले तर 2500 हजार मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प आपण सुरु करणार आहोत. आपण खास करुन मराठवाड्यामध्ये सौर ऊर्जा प्रकल्प सुरु करणार आहोत. त्याठिकाणी महाजेनकोच्या जागा आहेत.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

त्यामुळे याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. सौर ऊर्जा प्रकल्पाचे 2500 हजार मेगावॅटचे टेंडर निघालेले आहेत.

अध्यक्ष महोदय, आपल्याकडे राख खूप आहे. परंतु यापूर्वी ॲश पॉलिसी नव्हती. कोणीही राख घेऊन जायचा, कायद्याचा भंग करायचा. आज आम्ही ॲश पॉलिसी तयार करीत आहोत. ही पॉलिसी कॅबीनेटसमोर ठेवण्यात येणार आहे. राखेपासून आज कुठलाही पैसा मिळत नाही. जवळपास 400 ते 500 कोटी रुपये केवळ राखेपासून शासनाला मिळतील. जी राख बाहेर पडते याचेही नियोजन करण्यात आलेले आहे. कोल वॉशरी लावणे, इंपोर्टेड कोल बंद करणे, कोल वॉशरीपासून चांगला कोळसा मिळविणे असे प्लॅनिंग करण्यात आलेले आहे. नांदेडवरुन परळीला सांडपाणी वापरण्याचा निर्णय केला. कोराडीला महानगरपालिकेचा निर्णय करुन दिला. तसाच परळी वीज प्रकल्पासाठी 60 एमएमक्यु पाणी लागणार आहे. त्यासाठी परळीचे दोन सेट नांदेडवरुन नेहमीकरिता चालू राहु शकतात. म्हणून नांदेडवरुन पाणी उचलून परळीचे दोन सेट सुरु करण्याचा निर्णय घेत आहोत. दीड वर्षामध्ये काम पूर्ण करण्याची योजना तयार केलेली आहे. लवकरच त्याचे टेंडर काढून नांदेडसोबत करारनामा करुन परळी प्रकल्प सांडपाण्यावर सुरु करण्याचे ठरविले आहे. शेतकऱ्याचे पाणी वापरायचे नाही, पिण्याचे पाणी वापरायचे नाही. प्रकल्प सुरु करायचा असेल तर सांडपाण्यावर सुरु करायचा असा निर्णय घेत आहोत.

S-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.....

पाचही प्रकल्प चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा यांचे कोळशाचे ट्रान्सपोर्ट बंद करतो आहोत. कोल बेल्टवर आणतो आहोत. ट्रकच्या ट्रान्सपोर्टने अपघात होतात. म्हणून अंडरग्राऊन बेल्ट करतो आहोत. बेल्टने कोळसा आणल्यामुळे मोठया प्रमाणात चोरी थांबणार आहे. ट्रान्सपोर्ट बंद होणार त्यामुळे मोठया प्रमाणात फायदा होणार आहे. कोळसा ट्रान्सपोर्ट बेल्टवरुन करणार यामध्येही सुधारणार करतो आहोत. महाजनकोला जवळपास 10900 प्रकल्पग्रस्तांपैकी 6300 प्रकल्पग्रस्तांच्या जागा मागच्या काळापासून सुरु आहेत. यावर्षी महाजनकोमध्ये जवळपास 1600 जागा भरल्या आहेत. यामध्ये 50 टक्के पी.ए.पी.ए. घेतो आहोत. 950 ची काल पुन्हा ॲड काढली. 50 टक्के पावर पी.ए.पी.ए. शिल्लक राहिले होते. कोराडीचे, परळीचे, भुसावळ, नाशिकचे पी.ए.पी.ए. शिल्लक आहेत. पुढचे जे पी.ए.पी.ए. शिल्लक राहिले ते मग त्या ठिकाणी प्रकल्पग्रस्त पूर्ण महाजनको, महावितरण आणि महापारेषण कारण पहिली एम.ए.सी.बी. एक मंडळ होते. सर्वमंडळात त्या ठिकाणी पी.ए.पी.ए. लागायची. परंतू कंपन्या वेगळया केल्यामुळे फक्त महाजनको घेतो. पुढच्या काळामध्ये महावितरण, महापारेषणकडे जागा निघतील तिथेही पी.ए.पी. महाजनकोच्या माध्यमातून घेणार आहोत. त्यामुळे पी.ए.पी. चे संपूर्ण प्रश्न सुटणार आहेत. मी महापारेषणच्या माध्यमातून एवढेच सांगेन वर्षभरात मुंबईला आपण चांगले काम केले. मुंबईकरिता महापारेषणाच्या माध्यमातून मुंबईत 400 के.व्ही.चे रोहित्र सुरु केले. खारघर कळवा, बोरिवली, बोईसर, ही 600 मेगॅवॅटची यावर्षी लाईन टाकली. यावर्षी कळवा सालसेड हे 500 मेगावॅटची लाईन टाकली. त्यामुळे मुंबईकरिता 1100 मेगावॅटचे नवीन पारेषण निर्माण झाले. मुंबईला वीजेचा प्रॉब्लेम राहणार नाही. पारेषणचा प्रश्न राहणार नाही. मुंबईकरिता 1100 मेगावॅटचे नवीन पारेषण निर्माण केले. महापारेषणमध्ये 8200 कोटीचे प्लॅनिंग केले. एम.डी.ओ. प्लॅन तयार केला तो आपल्याकडे पाठवितो. राज्यामध्ये 2019 पर्यंत महापारेषण मजबूत करुन 101 अतिउच्चदाब केंद्र नवीन त्याच्याने 21900 नवीन मेगावॅट कॅपॅसिटी वाढवितो आहे. 108 नवीन 220 के.व्ही., 132 के.व्ही. केंद्र बांधतो आहे. लवकरच या महिन्यामध्ये उद्घाटन व भूमीपूजन करणार आहे.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

त्याकरिता 101 अतिउच्चदाब केंद्र 21000 मेगावॅट मराठवाडयामध्ये याबाबत प्रश्न आहे. या ठिकाणी महापारेशनची कॅपॅसिटी वाढवितो आहे. 220 के.व्ही. आणि 232 के.व्ही. ही 5615 मेगावॅटने वाढवितो आहे. महापारेषणची 9696 कि.मी. ची लाईन वाढवितो आहोत. ही लाईन वाढविताना शेतक-यांना त्या लाईनचे पैसे मिळाले पाहिजे. पहिल्याकाळात मनो-याचे पैसे मिळायचे. त्यांना मधल्या लाईनचे पैसे मिळायचे नाहीत. आता त्यांना मध्यल्या लाईनचेही पैसे देणार आहे आणि दोन मनो-याचे पैसे देणार आहे. अशा प्रकारे पॅलिशी सुधारणा केली. त्यातून शेतक-याचे नुकसान होणार नाही.

अध्यक्ष महोदय, मराठवाडयामध्ये पावर ग्रीड आणि अदानीच्या लाईन्स् गेल्या आहेत. त्यांना अजूनही पैसे मिळाले नाहीत. काही लाईन्स तर अशा टाकलेल्या आहेत की, 400 के.व्ही.च्या खाली हात लावला तर करंट लागतो. त्यामुळे त्याच्यामध्ये सुधारणा करणे, मोठया प्रमाणावर शेतक-याचे आर.ए.डब्ल्यू करिता अडचणी आहेत. त्या सोडविण्याचे प्रत्यन करतो आहे. मुंबईकरिता पुढच्या काळामध्ये विक्रोळीला 400 के.व्ही. उपकेंद्र आणि 220 ची एम.एम.आर. लाईन, पुन्हा 400 के.व्ही.ची पावर ग्रीडच्या माध्यमातून लाईन, आणि 400 के.व्ही. बोईसर याप्रकारे नवीन कॅपॅसिटी वाढवितो आहे. यातून मुंबईला कधी धोका होणार नाही. याची काळजी घेणार आहोत.

अध्यक्ष महोदय, हे करत असताना मागच्या काळामध्ये महापारेषण आणि स्टर्रलाईट या दोन कंपन्यांनी जॉईंट व्हेंचर करुन त्या ठिकाणी फायबर ऑपटीक्सची योजना तयार केली. त्यामुळे टेलिफोन आणि मोबाईलमध्ये मोठया प्रमाणावर क्रांती होणार आहे. यातून इन्कमचे मार्ग वाढविण्याची योजना तयार केली आहे. महापारेषणच्या लाईनमधून फायबर ऑपटीक्सच्या माध्यमातून उत्पन्न मिळविणार आहोत. त्याठिकाणी त्याचे चांगले शेअरींग होणार आहे. त्याप्रमाणे महावितरणमध्ये विचार करतो आहोत की, जी मोठी शहरे आहेत, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर हया मोठया शहरामध्ये महावितरणच्या लाईन्स् सोबत वायफाय याला परवानगी देऊन पूर्ण

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

शहरामध्ये वायफाय या इन्फ्रास्ट्रचर सोबत घेता येईल. जेणेकरुन वायफायल वेगळे टाकण्याची गरज राहणार नाही. या महावितरणच्या इन्फ्रास्ट्रक्चरचा वापर करुन महावितरणचे उत्पन्न कसे वाढेल याची काळजी घेणार आहोत. संपूर्ण महावितरणच्या सोबत वायफाय सिस्टीम कशी आणता येईल याची योजना तयार केली आहे.

अध्यक्ष महोदय, महाऊर्जा, अपारंपारीक ऊर्जेच्या माध्यमातून 14400 मेगावॅट ग्रीड पॉलिसी, रुफ टॉप पॉलिसी, एनर्जी कन्झर्व्हेशन पॉलिसी नळयोजनेचे जे पंप 10 मेगावॅट पर्यंत सौर ऊर्जेवर वॉटर पंप आणण्याची पॉलिसी केली. आदिवासी, समाज कल्याण विभाग यांच्या माननीय मंत्र्यांनी मान्यता दिली आहे. काल माननीय श्रीमती पंकजा मुंडे यांनी मान्यता दिली. 1021 च्या नळयोजना या सौर ऊर्जेवर केल्या तर जवळपास नियमित 12 तास 10 एच.पी.चा पंप चालतो. हा पंप आपल्या वीजेच्या पंपापेक्षा जास्त स्पिडणे चालतो. याबाबतचे प्रेझेन्टेशन सोमवारी ठेवले आहे. एल.ई.डी. टॉवर लाईट लावणे, रस्त्यावरच्या स्ट्रीट लाईस्टस् एल.ई.डी. करणे, सामाजिक न्याय विभागाच्या वाडया वस्त्या असतील, आदिवासी विकास विभागाच्या वाडया वस्त्या असतील तेथे अशा ते-हेचे पंप बसविता येतील.

अध्यक्ष महोदय, शिर्डीच्या साई संस्थानामध्ये संपूर्ण स्वयंपाक हा सौर ऊर्जेवर होतो. त्याप्रमाणे कारागृहे, रुग्णालये असतील तेथील स्वयंपाक यंत्रे सौर ऊर्जेवर आणणे. याकरिता पॉलीसी तयार केली. वॉटर गिझर व इतर उपकरणांवर एनर्जी कन्झर्व्हेशची पॉलिसी करतो आहोत. याच्या कंन्सल्टंन्सी नेमण्याचे काम सुरु झाले. चार ठिकाणी कार्यालय सुरु करतो आहोत. पुणे येथे कार्यालय आहे. औरंगाबाद, नागपूर, मुंबई, कोकण याकरिता आपण महाऊर्जेची चार कार्यालये करतो आहोत. या चार कार्यालयांच्या माध्यमातून जवळपास 20 हजार मेगावॅट पर्यंत सौर ऊर्जेमध्ये क्रान्ती करू अशी पॉलिसी चार वर्षात तयार केली आहे. त्याकरिता 961 कोटी केंद्र सरकाने दिले आहेत. 961 कोटी रुपयांचे नियोजन केले आहे. ग्रीन कॉरीडारपासून या योजनपर्यंत 961 कोटी रुपये केंद्र सरकारने दिले आहेत. 13 व्या वित्त आयोगाचे पैसे केंद्र सरकारकडे खूप

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे ......

दिवसांपासून पडले होते. ते माननीय श्री.पीयुष गोयल साहेब आणि मुख्यमंत्री यांनी पुढाकार घेऊन केंद्र सरकारने 961 कोटी रुपये केवळ ग्रीन ऊर्जेकरिता दिले आहेत. या ठिकाणी मी केंद्र सरकारचे अभिनंदन करतो. काही सन्माननीय आमदारांनी प्रश्न मांडले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रेड्डी यांनी सांगितले होते की, शेतक-यांना दिवसा 12 तास वीज द्या. शेतक-यांना कनेक्शन लवकर द्या. महावितरणच्या ट्रान्समिशनच्या लाईन्स् चांगल्या करण्याकरिता 3 वर्षे लागणार आहेत. त्यामुळे तुमचा योग्य विचार होईल. याबाबत चिंता करु नका. सन्माननीय सदस्ये श्री.शंभुराजे देसाई यांनी कोयनाची वीज मिळाली पाहिजे याबाबत प्रस्ताव मांडला होता. सन्माननीय सदस्य श्री अबु आजमी जी, आपने मानखुर्द के बारे में बताया था. कल वन विभाग से क्लीअरन्स के लिए फाईल गई है. महसूल विभाग ने वन विभाग के पास क्लीअरन्स लेने के लिए फाईल भेजी है. कल ही रिलायन्स के अधिकारियों के साथ हमारी बैठक हुई. मानखुर्द के विषय में जल्द ही काम शुरु करने वाले है. उन्होंने कल क्लीअरन्स दिया है. वह फाईल मैं आपको दे सकता हूं. आपने बताया कि वहां पर बिजली चोरी हो रही है. वहां पर बहुत ज्यादा क्राईम हो रहे है. बिजली नहीं रहती है. इन सभी प्रश्नों के संबंध में मैं आपसे अलग से बैठक लेकर निर्णय लेंगे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राहूल कुल यांनी पाच विषय सांगितले आहेत. याबाबतची मी नोंद घेतली आहे. त्याबाबत वेगळी बैठक घेऊ. सन्माननीय सदस्य श्री.जयदत्त क्षीरसागर यांनी मराठवाडयाचे 11 विषय मांडले आहेत. त्यांच्या विषयाबाबत वेगळी बैठक घेऊ. सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल यांनी बेस्ट बद्दल सांगितले. त्याबद्दल वेगळी बैठक घेऊ. सन्माननीय सदस्य श्री.पंडीतजी आपण सांगितले सौर ऊर्जेचे मंजूरीचे जे अधिकार तहसिलदारला द्या. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करु कारण सौ ऊर्जे संदर्भात कलेक्टरचे काही नियम आहेत. याचा वेगळा अभ्यास करुन आपण सांगितलेल्या सूचनेचा निश्चितपणे विचार करु. सन्मननीय सदस्य प्रा.विरेद्र जगताप आपण 8 मुद्दे सांगितले आहेत. या 8 ही मुद्याबद्दल मुख्यालयी लोक राहत नाहीत, चोरी, विद्युत तारा बदलल्या नाहीत, हया करिता 5000 कोटी रुपये लागतात.

.....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे......

30 वर्षापासून त्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रचर बदलले नाही. पावर प्रोजेक्टचे आर.एन.एम. करावे लागणार आहे. वीज वितरण प्रणालीच्या आर.एन.एम. करीता 5000 कोटी रूपये लागणार आहेत. त्यामुळे डि.पी.सी.ला सिस्टीम सुधारणेचे काही अधिकार दिले आहेत व पैसे वाढवून दिले आहेत. हया कामाकरिता कोणत्याही सरकारला 5000 कोटी रूपये लागणार. त्यासाठी 5000 कोटी रूपयांचे बजेट तयार करावे लागणार आहे. त्यासाठीही प्रयत्न करत आहे. काही निकृष्ट दर्जाची कामे आहेत. रस्त्याच्या बाजूला लाईन निकृष्ट दर्जाची आहे. राजूरला आमलाचे काम सुरु झालेले नाही. दिन दयाळचे आय.पी.टी.एस.ची दिल्ली सरकारकडून प्रोक्रुटमेंट पॉलिसी यायची आहे. आपल्याला 4500 कोटी रूपये मिळाले आहेत. प्रोक्रुटमेंट कसे असले पाहिजे याबाबत दिल्ली सरकारची पॉलिसी येत आहे. लवकरच राज्यात दिन दयाळ आणि आय.पी.टी.एस. ची कामे सुरु होणार आहेत. त्यामध्ये संपूर्ण राज्य कव्हर केलेले आहे. 220 के.व्ही. नेरला मंजूर केले आहे. नेर आणि दोन्ही विधानसभा कव्हर केल्या आहेत. ते काम लवकर सुरु करू

T-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे .....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुनील देशमुख यांना सांगू इच्छितो की, रिजनल रिस्ट्रक्चरींग आपण करीत आहोत. ॲडीशनल डी.जी. लेवलचे अधिकारी श्री.गुप्ता हे आपल्याकडे आहेत पण ते या महिन्यामध्ये सेवानिवृत्त होत आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपल्याकडे व्हिजीलन्स नाही. पण मी सांगू इच्छितो की, आपल्याकडे चांगला व्हिजीलन्स आहे. माझी चर्चा झाली आहे की, महावितरण व महापारेषणवर व्यवस्थीत लक्ष देणारा चांगला डी.जी. तेथे नेमण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.सुनील केदार यांनी श्री.अजय मेहता यांच्याबाबत सांगितले. अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे प्रश्न उपस्थित केलेले आहे. याबाबत प्राथमिक चौकशी करावी लागेल, यानंतर आवश्यकता भासल्यास पुढील चौकशी करू.

अध्यक्ष महोदय, तिरोडा ते तिरंगी, अकोला या ट्रान्समिशनकरिता सदस्यांनी सांगितले की, महापारेषण त्याकरिता निधी देत आहे याबाबत 100 टक्के चौकशी व फेरऑडीट करण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांना आरओडब्ल्यूचे पैसे दिलेले नाहीत याबाबत आपण नवीन पॉलीसी आणत आहोत की, फक्त मनोऱ्याचे पैसे अगोदर द्यावयाचे आहेत. मधल्या लाईनबाबत त्याला काही तरी पैसे मिळाले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मी माझ्या भाषणात टिल्लूबाबत बोललो आहे. रोहना 132 केव्ही उपकेंद्राबाबत बोललो आहे. खापरखेडयाचा सीएसआर आपणास यावर्षी पूर्ण मिळेल. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर कोहळे यांनी सांगितले की, महाजनकोच्या मुख्यालयात 550 कर्मचारी आहेत आणि महावितरणच्या मुख्यालयात 950 कर्मचारी आहेत. याबाबत आपण ऑडीट करुन रिजनल रिस्ट्रक्चरींगमध्ये आपण त्यांना खाली पाठविण्याचा प्रयत्न करणार आहोत.

अध्यक्ष महोदय, एलिफंटाला तुम्ही आतापर्यंत वीज दिलेली नाही. तुम्ही आतापर्यंत हे जागतिक पर्यटन केंद्र विनाविजेचे ठेवले आहे. आम्ही नवीन निर्णय घेतला आहे व आता आम्ही समुद्रातून अंडरग्राऊंड लाईन टाकत आहोत. याकरिता आम्ही अमेरिकेतून प्रोजेक्ट मिळविला आहे. समुद्रातून केबल टाकण्याचे काम आम्ही 15 ऑगस्टला चालू करीत आहोत. याकरिता 28 कोटीची तरतूद केलेली आहे. यावर्षी एलिफंटाला एलईडी टॉवर लाईट देऊन ते सुंदर दिसण्याची काळजी आपण घेत आहोत. जे काम 40 वर्षात झाले नाही ते आपण आता करीत आहोत. मी हा आरोप करणार नाही की, कोणत्या सरकारच्या काळात काम झालेले नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रशेखर बावनकुळे .....

सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी थोडया वेळापूर्वी भिवंडीबाबत सांगितले आहे. रिलायन्स आणि टोरंटच्या मिटरचे ऑडीट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. जुन्या काळातही चांगले काम झाल्यामुळे आपण आज चांगल्या परिस्थितीमध्ये आहोत. आपण असा आरोप करीत नाही की, जुन्या काळात चांगले काम झाले नाही. पण हे काम पुढे गेले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत वीज कंपन्या इफिशिएन्सीने चालल्या पाहिजेत. सरकारकडे बजेट न मागता कंपन्यांनी आपल्या स्वतःच्या निधीच्या भरवशावर इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत केले पाहिजे. सरकारकडून कोणताही सपोर्ट मागू नये, शेवटी सरकार किती सपोर्ट करणार आहे. कंपन्यांनी आपल्या भरवशावर मजबूत झाले पाहिजे. विजेचे दर कंपन्यांनी आपल्या भरवशावर कमी केले पाहिजे. बजेटमधून विजेकरिता किती इन्सेटीव्ह द्यायचा. त्यामुळे भविष्यात या कंपन्यांची इफिशिएन्सी वाढविणे, कोळशाचा पुरवठा व वापर चांगला करणे हे महत्वाचे आहे. चांगल्या काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले पाहिजे. श्री.बिपीन श्रीमाळी यांनी महाजनकोमध्ये चांगले काम केलेले आहे. श्री.संजीव कुमारसारख्या अधिकाऱ्यांनी केंद्रात उर्जा विभागात काम केलेले आहेत ते आपल्याकडे रुजू झालेले आहेत. श्री.मुकेश खुल्लर यांनी मागील दीड वर्षात प्रचंड मेहनत घेतली आहे. राज्याचे नियोजन करताना पॉलीसी तयार करावी लागते. राज्यातील या सर्व अधिकाऱ्यानी चांगले काम केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे मागील सरकारने चांगले करीत आणलेले काम यापुढेही आम्ही करु भविष्यात महाराष्ट्र हे देशातील सर्वात चांगले राज्य राहील याची मी काळजी घेईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे. सदस्यांनी राज्याचे, जिल्हयाचे, मतदारसंघाचे प्रश्न मांडले आहेत. यावर मंत्री महोदयांनीही चांगले, सविस्तर व पॉझीटीव्ह उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी खूप जास्त संकल्प जाहीर केलेले आहेत. जास्त संकल्प करताना आपणास त्याचे वेळापत्रकही ठरवावे लागेल, निधीची उपलब्धताही बघावी लागेल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

त्याशिवाय हे सर्व संकल्प तुम्हाला पुर्ण करता येणार नाहीत. मी अगोदर माझे भाषण केलेले आहे पण राईट ऑफ रिप्लायमध्ये 2-3 मुद्दे मी मांडणार आहे. एका बाजूला थकबाकी वाढत आहे. कृषी

.....3



श्री.दिलीप वळसे-पाटील .....

व उद्योगाच्या वीज थकबाकी करिता उर्जा विभागाला मोठया प्रमाणात बजेटमधून सपोर्ट घ्यावा लागतो. तसेच केंद्रसरकाकडून आर्थिक सपोर्ट घ्यावा लागतो. वीज कंपन्यांनी अगोदर त्यांचे उत्पन्न वाढविण्याचे काम केले पाहीजे. सध्या केंद्र सरकारने ओपन ॲक्सेसची पॉलीसी स्वीकारली आहे. ओपन ॲक्सेसमुळे इंडस्ट्री बाहेर गेलेली आहे. यामुळे तुमचा इलेक्ट्रीसिटी डयुटीचा लॉस होत आहे. याकरिता तुम्ही कायदा करुन मार्ग काढत आहात, त्याबाबत तुमचे अभिनंदन करतो. पण रेल्वेसारखा मोठा ग्राहक आज आपल्या वीज मंडळातून बाहेर जाऊ देणे हे वीज मंडळ व राज्याच्या दृष्टीने हिताचे नव्हते व नाही. अजूनही तुम्हाला रेल्वेला ग्राहक म्हणून घेता आले तर त्याकरिता तुम्ही नक्की प्रयत्न करावेत.

अध्यक्ष महोदय, आपण मोठया प्रमाणावर वीज खरेदी खाजगी कंपन्यांकडून करतो याचा मी माझ्या भाषणात उल्ल्ेख केला होता. आपले स्वत:चे वीज निर्मितीचे संच बंद ठेऊन आपण ही खरेदी करीत आहोत. आपली महाजनकोची वीज आपणास महाग पडत असेल, परंतु हे संच बंद ठेवले तर त्यावरील बर्डन दिवसेंदिवस जास्त वाढत जाईल व वीज मंडळ पुन्हा जास्त अडचणीमध्ये येईल. एका बाजूला आपण संच बंद ठेवत आहोत. मी तुमचे एका गोष्टीसाठी अभिनंदन करतो की, केद्र सरकारकडे पाठपुरावा करुन कोळशाच्या लिंकेजमध्ये सुधारणा करुन घेतली आहे. यामध्ये तुम्हाला केंद्र सरकारनेही मदत केलेली आहे. परंतु आज आपण आपले संच बंद ठेवत आहोत व मार्केटमधून वीज खरेदी करीत आहोत. आज महाजनकोला देण्याकरिता महावितरणकडे पैसे नाहीत. बाहेरच्या कंपन्यांकडून वीज घेण्याकरिता आपणास खर्च करावा लागत आहे. मंत्री महोदयांनी नवीन वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेऊन सुरु करण्यासंबंधी घोषणा केली आहे. आता खरे तर नवीन प्रकल्प आपण सुरु करण्याची गरज नाही. आता नॅशनल ग्रीड झालेले असल्यामुळे संपूर्ण देशभर आज अतिरिक्त वीज आहे. देशात अनेक राज्ये अशी आहेत की, ज्यांची वीज खरेदीची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

क्षमताच राहिलेली नाही. आज अतिरिक्त वीज उपलब्ध आहे. जसे आपले महाजनकोचे संच बंद आहेत तसे खाजगी वीज निर्मिती प्रकल्पातून निर्माण होणारी वीज खरेदी करण्यासाठी ग्राहक

.....4

23-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-4

PNG/ AKN/ ST/ 12:40

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील .....

नसल्यामुळे त्यांनाही ते प्रकल्प बंद ठेवावे लागत आहेत. देशातील सरप्लस विजेबाबत विचार करुन तुम्ही भूमिका घ्यावी. मी माझ्या भाषणात उदय योजनेबाबत बोललो होतो. आपण त्याबाबत जरुर तो अभ्यास करावा. पण त्याबाबतचे ॲग्रीमेंट केंद्र सरकारशी लवकर करावे. आपण आता काही निर्णय घेऊन त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु तुमचा आगामी एआरआर कितीचा आहे हे मला माहिती नाही.

यानंतर यु-1

श्री.दिलीप वळसे-पाटील.......

एआरआरचा विचार करता वीज दरवाढीसंदर्भात वीजमंत्री महोदयांनी आताच आपल्या भाषणात असा उल्लेख केला की, वीज मंडळाला स्वयंपूर्ण व्हावे लागेल. याकरिता आता सरकारी मदतीवर फार काळ अवलंबून राहता येणार नाही. याबाबत वीज मंडळाला स्वयंपूर्ण व्हावयाचे असेल तर माननीय मंत्री महोदयांना अनेक वेळा नाही म्हणावयाला शिकले पाहिजे. अधिका-यांना होय म्हणायला शिकले पाहिजे. असे स्व.यशवंतराव चव्हाण यांनी सांगितले होते. सर्वांना होय म्हटल्यामुळे काही प्रश्न उपस्थित झालेले आहेत.

अध्यक्ष महोदय, एफआरपीचा मुद्दा जेवढया नेटाने पुढे नेला जाईल तेवढे त्यामुळे लवकर वीज मंडळे सक्षम होऊन त्यांना त्याची मदतच होणार आहे. फर्दर रिस्ट्रक्चरिंग सरकारने करा का नका करु किंवा सरकारने याबाबत जो सह व्यवस्थापकीय संचालक नेमण्याचा निर्णय जाहीर केलेला आहे, त्यामध्ये मुंबईकरिता सह व्यवस्थापकीय संचालक नेमण्यात येणार आहे की नाही याबाबत काहीच उत्तर आलेले नाही.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे ( खाली बसून ) : अध्यक्ष महोदय, मुंबई आणि कोकण मिळून जॉईंट एमडी नेमण्यात येणार आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, समान वीज दरासंदर्भात एमईआरसी कधीच मान्यता देणार नाही. याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट पाहिजे. सरकारने लोकांना सांगितले पाहिजे की, कंपनी ज्या दराने वीज पुरवठा करेल, त्याच दराने वीज खरेदी करणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा समान वीज दराकरिता राज्याच्या तिजोरीमधून सपोर्ट देणे आवश्यक आहे. त्याशिवाय मुंबईमध्ये समान वीज दर देता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, सौरपंपाबाबत माननीय मुख्यमंत्री व माननीय वीजमंत्री खूप वेळा बोललेले आहेत. याबाबत शासनाचे आकडे व्हेअरी होतांना मला आढळून आलेले आहेत. पुढील पाच वर्षात व पुढील एका वर्षामध्ये शासन किती सौर पंप देणार आहे, याबाबत माहिती सांगण्यात यावी. याकरिता निधी कुठून येणार आहे, यामध्ये शासनाने स्पष्टता आणावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

अध्यक्ष महोदय, विदर्भ आणि मराठवाडा येथे सवलतीच्या दरामध्ये वीज देण्याकरिता एक हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, असे माननीय अर्थमंत्री यांनी बजेटच्या भाषणामध्ये सांगितले होते. माननीय वीज मंत्री यांनी यासंदर्भातील उत्तर देतांना यामध्ये खानदेशचाही उल्लेख केलेला आहे. परंतु या संदर्भात माननीय अर्थमंत्री यांनी भाषणामध्ये खानदेशचा उल्लेख केला नव्हता. असे असतांना निश्चितपणे खानदेशमध्येही सवलतीच्या दराने वीज पुरवठा करण्यात येणार आहे का ? या अंतर्गत किती रक्कम दिली जाणार आहे यापेक्षा या भागामध्ये पर यूनिट किती सवलत देण्यात येणार आहे ? याबाबतचा निर्णय शासनाला जाहीर करावा लागणार आहे ? तरच शासनाला या सर्व गोष्टी करता येतील.

अध्यक्ष महोदय, शासन जनको, ट्रान्सको,डिस्ट्रीब्यूशन असे अनेक आराखडे तयार करीत आहे. मी ऊर्जामंत्री असतांना अशाच प्रकारे तिन्ही विभागाचे आराखडे तयार करुन ते सभागृहात मांडून त्यावर चर्चा घडवून आणली होती. शासनाला याबाबतचे आराखडे तयार करण्याकरिता जेवढे दिवस लागतील ते घेण्यात यावे. ते आराखडे आमच्यासमोर येऊ द्यावे. निश्चितप्रकारे किती वर्षामध्ये हे काम करण्यात येणार आहे, हे आम्हाला कळू द्यावे.

अध्यक्ष महोदय, लोड-शेडींगचा मुद्दा अजूनही सुटलेला नाही. कृषीपंपाकरिता अजूनही केवळ आठ तास वीज पुरवठा केला जातो. आठवडयातील चार दिवस कृषी पंपाकरिता रात्री वीज पुरवठा केला जातो. तीन दिवस दिवसा कृषी पंपाकरिता वीज पुरवठा केला जातो. हा पुरवठा तीन फेज कनेक्शनच्या माध्यमातून केला जातो. शेतक-याच्या ज्या अवस्थेला सामोरे जावे लागते, त्या अवस्थेला सामोरे जावेच लागते. त्यामुळे यात सुधारणा करण्यासाठी फीडर सेपरेशन, सिंगल फेजिंग, इन्फ्राच्या माध्यमातून काय करायचे ते करा त्याबाबत निधीकरिता विचार करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने प्रत्येक वीज वितरण कंपनीला नॉन - कन्व्हेन्शनल एनर्जीचा वापरण्यासंदर्भात परवानगी दिली होती. महाराष्ट्राने देखील या संदर्भातील धोरणाची अंमलबजावणी करायचे ठरविले होते.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रात ज्या भागामध्ये सर्वाधिक ऊस उत्पादन होते, त्या भागामध्ये को-जनकोच्या माध्यमातून पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट केले जात होते. नव्याने सहकारी व खाजगी साखर कारखान्यांसोबत को-जनकोमार्फत पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट करण्याची शासनाने भूमिका घेतली होती. परंतु वीज मंडळ याबाबत वेगळीच भूमिका घेत आहे. सरकारने व वीज मंडळ को-जनकोमार्फत पीपीए करण्याकरिता टार्गेट संपलेले आहे, असे सांगितले जात आहे. खाजगी कंपनीकडून मोठया प्रमाणात वीज शासन घेत आहे. को-जनकोमार्फत पीपीए केल्यानंतर त्यातून मिळणारा पैसा हा गरीब शेतक-यांना मिळणार आहे. यामुळे शेतक-यांना मदतच होणार आहे. शासनाने पीपीए संदर्भातील टार्गेट वाढविण्याची भूमिका घेणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, कोयनेच्या संदर्भात प्रती युनिट जनरेशन मर्यादेमधून कोयनेला दरवर्षी सर्वसाधारणपणे 2.5 ते 3 भूकंपाचे धक्के बसतात. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.शंभुराज देसाई यांनी येथे सांगितले असते. परंतु आज ते येथे नाहीत. त्यावेळी त्या परिसरातील लोकांना दिलासा देण्याकरिता माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली भूकंप निधीला जनरेशन कंपनीच्या माध्यमातून काही पैसा देण्याची भूमिका घेतली गेली होती. या माध्यमातून प्रती वर्षी 5 कोटी रुपये देण्याची भूमिका घेतली गेली होती. याची अंमलबजावणी झालेली नाही.

अध्यक्ष महोदय,मी माननीय वीजमंत्री यांचे आभार मानून त्यांचे अभिनंदन करेल की, त्यांचा दृष्टीकोन चांगला आहे. त्यांना या क्षेत्रात काहीतरी चांगले करण्याची इच्छा आहे. या विकास क्षेत्रामध्ये असा विचार केल्याशिवाय पुढे जाता येत नाही. आपल्याला आमच्या शुभेच्छा आहेत. या क्षेत्रात शिस्तीचे पालन करुन सर्व काही चौकटीत बसविता आले पाहिजे. माननीय मंत्री यांनी केलेले भाषण रेकॉर्डवर राहील. आपण या निमित्ताने जे काही विचार व भूमिका मांडलेली आहे, त्याचे आम्ही स्वागतच करतो. एक वर्षानंतर बजेटच्या भाषणाच्या वेळी एक वर्षापूर्वीची आजची ही भाषणे काढून त्यापैकी काय पूर्ण झाले व काय नाही झाले, याबाबत उत्तर द्यावे लागणार आहे.

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महोदय, केंद्रीय वीजमंत्री माननीय श्री.पियुष गोयल यांनी दिनांक 15 ऑक्टोबर रोजी टॉवरसंदर्भात शेतक-याला मदत जाहीर करण्यासंदर्भातील निर्णय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल केदार.....

जाहीर केला होता. तो निर्णय अद्यापपर्यंत राज्य शासनाने का लागू केलेला नाही ? तो निर्णय केव्हा लागू करण्यात येईल ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, या खात्यामध्ये आजपर्यंत जी काही कामे करण्याचे ठरविले होते, त्याकरिता मी एक वेळापत्रक बनवून निधीची उपलब्धतता कशी होईल, याचाही विचार केलेला आहे. थकबाकीसंदर्भात सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना मला मान्य आहेत. थकबाकी वाढत आहे, त्याला नियंत्रणात आणणे आवश्यक आहे. यामुळे आर्थिक महसूली तूट येणार नाही, याची काळजी घेतली जाईल.

अध्यक्ष महोदय, उत्पन्नवाढीकरिता वायफाय योजना महावितरणला जोडल्यामुळे चार पाचशे कोटी रुपयांचा फायदा होणार आहे. महाजनकोकडे पैसे येऊ शकतात. कोळशामुळे वीजनिर्मितीमध्ये बचत होणार आहे. उत्पन्न वाढीकरिता महाजनको, महावितरण येथील जागांबाबत नवीन प्लान एफआरपी झाल्यावर तयार करण्यात येणार आहे. रेल्वेसारखा ग्राहक जाऊ नये, ही गोष्ट खरी आहे. आरजीपीपीएलला एनपीए संपूर्णपणे जात होता. एवढ मोठ ॲसेट त्या ठिकाणी चालले होता. त्यामुळे या अंतर्गत कोणाला ना कोणाला तरी वीज द्यावीच लागणार होती. हा ग्राहक नाही परंतु या बरोबरीचे ग्राहक कसे परत येतील, याची काळजी घेण्यात येईल. यामधूनही शासनाला उत्पन्न मिळेल. ओपन ॲक्सेस पॉलिसीमधून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. कोळशाची रॉयल्टी ओरिसाला मिळत आहे. ही 1200 कोटी रुपयांची रॉयल्टी पुढच्या काळात वाचविली जाणार आहे. त्यामधून आपल्याला फायदा होणार आहे. महाजनकोचे संच नव्याने करण्यात येणार नाही. सन 2019-2015 च्या हिशोबाने हे सर्व नियोजन करावे लागेल. देशामध्ये चार-पाच राज्ये अशी आहेत की, त्या ठिकाणी पायाभूत सुविधा नाहीत यामुळे ओपन ॲक्सेस पॉलिसीच्या माध्यमातून विजेचा खप होत नाही. उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांनी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरु केलेले आहे. सन 2019 पर्यंत यामुळे पुन्हा विजेचा तुटवडा भासण्याची शक्यता आहे. पूर्वी त्या राज्यांकडे पायाभूत सुविधा नव्हत्या म्हणून त्यांना वीज लागत नव्हती. पुढील काळात काही प्लांट याकरिता केले जाणार आहेत. 4 हजार मेगावॅट वीज निर्मिती संच राज्यात उभे आहेत. कोल पॉलिसीमुळे आता राज्यात स्वस्त वीज उपलब्ध होणार आहे. आज याकरिता महाजनकोचे प्लांट उभे आहेत.

व्ही-1/--

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.........

पण महाजेनकोचे नवीन सेट टाकणार नाही. आयलन्डकरिता एरिया गुड्स नाही. सदर लाईन भुसावळ आणि नाशिकमार्गे येत आहे. त्यामुळे भविष्यकाळात आयलन्ड एरियाचा विचार करावा लागणार आहे. नाही तर तो एरिया खाली बसणार आहे. आयलन्डकडे कोणतीही वीज नाही. त्यामुळे त्याबाबत विचार करावा लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, वीज वितरण व्यवस्था स्वयंपूर्ण करण्याकरिता या वर्षी विजेची दरवाढ ही 5.5 टक्क्यावरुन 6 टक्के अशी सुचविण्यात आलेली आहे. नॅशनल इम्पिरेशन आहे. त्यामुळे ते पाळावेच लागणार आहे. नाही तर कंपन्या चालणार नाहीत. एमईआरसी वीज दरवाढीबाबत कोणता निर्णय घेणार आहे, याची मला माहिती नाही. वीज वितरण कंपन्या स्वयंपूर्ण करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या मान्य कराव्या लागणार आहेत. एफआरपी या महिन्यात होत आहे. ते देखील अंतिम होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरातील विजेचे दर सदर समान ठेवण्याबाबत जनतेची आणि सन्माननीय सदस्यांची आग्रही मागणी आहे. विजेचे दर समान ठेवण्याबाबत एमईआरसी कंपनी मान्यता देणार नाही, याची मला कल्पना आहे. परंतु, विजेचे दर समान करण्याबाबत काय करायचे आणि काय करायचे नाही याबाबत संबंधित एजन्सीकडून माहिती घेतली जाणार आहे. सद्य:स्थितीमध्ये विजेचे दर समान होऊ शकत नाही. 500 युनिट वीज वापरणारे जे लहान ग्राहक आहेत, अशा ग्राहकांना सूट देता येईल काय अशा प्रकारचा प्रयत्न एमईआरसीमधील सल्लागारांच्यामार्फत केला जात आहे. संबंधित सल्लागाराकडून रिपोर्ट मागविला जात आहे. सदर रिपोर्ट प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, 7500 सौरपंप घेतले जात आहेत. हा पायलट प्रोजेक्ट आहे. हा पायलट प्रोजेक्ट क्लिअर झाल्यानंतर सौरपंप किती वाढवायचे याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. सौरपंप सेपरेट घेण्यापेक्षा नवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पुढील कार्यवाही केली जाणार आहे. आता फिडर हे सौरचे केले जाणार आहे. शेतकऱ्यांचे फिडर हे सौरमध्ये करुन दिले तर विद्युत

.......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.........

लाईनच्या माध्यमातून 12 तास पंप सुरु राहणार आहेत. व्यक्तीगत पंप 4 ते 5 लाखाचा असतो. अशा ठिकाणी फिडर तयार करुन दिल्यानंतर सर्वच पंप फिडरवर कव्हर होण्यास मदत होतील. यासाठी विभागाकडून योग्य तो प्रयत्न केला जात आहे. सौरपंपाचे सोमवार दिनांक 28 मार्च, 2016 रोजी प्रेझेंटेशन सादर केले जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भ, मराठवाड्याबरोबर उत्तर महाराष्ट्र आणि 'डी प्लस' झोनचा देखील विचार केला जाणार आहे. कॅबिनेट नोटमध्ये या सर्व गोष्टींचा अंतर्भाव केलेला आहे. नवीन आणि जुन्यासाठी किती इन्सेंटिव्ह द्यायचे यासाठी 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. कोणत्या विभागाला किती द्यायचे, ट्रान्समिशन चार्जेस किती लागतील, प्रदूषणाचे चार्जेस किती लागतील, यासाठी समितीने रिपोर्ट दिलेला आहे. सदर रिपोर्टच्या आधारे कॅबिनेट नोट तयार केली जाणार आहे. त्यामध्ये ब्रिफ केले जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, महापारेषण कंपनीने आराखडा तयार केलेला आहे. सदर आराखडा सभागृहासमोर मांडला जाणार आहे. त्यानंतर सदर आराखड्याच्या संदर्भात अंतिम चर्चा केली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, मागिल सरकारने शेतकऱ्यांना 8 ते 10 तास वीज देण्याबाबत निर्णय घेतलेला होता. वीज आणखी काही तास देणे तरी शक्य नाही. कारण जमिनीतून पाणी किती उपसायचे याचा देखील अंदाज घेतला पाहिजे. चोवीस तास जमिनीतून पाणी उपासल्यानंतर ड्रायझोन तयार होतील. वॉटर कन्झरव्हेशन पॉलिसी आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज कशी उपलब्ध होईल या दृष्टीकोनातून विचार केला जाणार आहे. माझ्या मते शेतकऱ्यांना दहा तास वीज पुरेशी आहे. जर चोवीस तास शेतकऱ्यांना वीज दिली तर अजून ड्रायझोन तयार होणार आहे. परिणामी जमिनीतील पाण्याची पातळी कमी होणार आहे. यासंदर्भात विभागाच्या माध्यमातून एक वेगळा विचार केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या शासनाने कोजनच्या संदर्भात 80 पैशांची वाढ केलेली आहे. 6 रुपये 52 पैशांची वाढ केलेली आहे. याबाबत विरोधी पक्षाने आमच्या सरकारचे अभिनंदन केले

.......3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.........

पाहिजे. शेतकऱ्याची एफआरपी होत नव्हती, कारखानदारी अडचणीत आली होती. हे सर्व दूर करण्यासाठी विजेच्या दरात वाढ केल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लक नव्हता. 123 कारखान्यांना 6 रुपये 52 पैशांची वाढ केलेली आहे. यासंदर्भात माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी साहेबांनी सूचना दिल्या होत्या.

**अध्यक्ष** : माननीय ऊर्जा मंत्री सौर ऊर्जेसाठी कारखान्याचे पीपी करतील काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, कोजनचा रेट वाढवून दिलेला आहे. 250 मेगावॅटचे कोजन तयार झाले आहेत. हे आता पॉलिसीमध्ये नाही. पॉलिसी संपली आहे. महावितरण कंपनीला अडचणीतून बाहेर काढले पाहिजे असे आपण नेहमी बोलत असतो. मला मार्केटमधून 3 रुपये दराने वीज मिळत आहे. तर दुसरीकडे कोजनची वीज 6 रुपये 52 पैशांनी विकत घ्यावी लागत आहे. परिणामी 3 रुपये 52 पैशांचा तोटा सहन करावा लागत आहे. कोजनची वीज घेतल्यामुळे महावितरण कंपनी तोट्यामध्ये जाणार आहे. आजच 40 पैशांचा भाव वाढविल्यामुळे 100 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. असे असले तरी शेतकऱ्यांचा विचार केला जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचे पालन केले जाणार आहे आणि कोजनची पॉलिसी पुन्हा आणली जाणार आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, कोजनची वीज महाग असली तरीसुध्दा त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे आणि त्यामाध्यमातून सहकाराला त्याचा फायदा होणार आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी आणखी 1 हजार मॅगावॅटचे पीपी साईन केले जातील अशा प्रकारची घोषणा सभागृहात जाहीर करावी. अशा प्रकारचे आश्वासन आम्हाला माननीय ऊर्जा मंत्र्याकडून हवे आहे. तरच या चर्चेचा शेवट गोड होणार आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, मी सभागृहात जबाबदारीने उत्तर देत आहे. मागिल वेळेस कारखानदार अडचणीत आले होते. त्यावेळी एफआरपी होत नव्हती. त्यावेळी साखर संघाने माझ्याकडे येऊन विनंती केली होती. त्यानंतर एमईआरसी कंपनीकडे आम्ही गेलो होतो.

.......4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.........

40 पैसे रेट वाढविल्यामुळे 100 कोटी रुपये महावितरण कंपनीला जास्तीचे द्यावे लागले आहेत. आता पुन्हा 250 मेगावॅट कॅपेसिटी पुन्हा तयार झालेली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांना काही ना काही तरी वचन देणार आहे. यासंदर्भात विचार केला जाणार आहे. या विषयी माननीय मुख्यमंत्री, माननीय वित्त मंत्री आणि साखर संघासमवेत विचारविनिमय करावा लागणार आहे. राज्य शासनाकडून त्यांना सबसिडी द्यावी लागणार आहे. महावितरण कंपनी 6 रुपये 52 पैशांनी वीज घेईल. मार्केटमधून मला अडीच रुपये दराने वीज घ्यावी लागत आहे.

**अध्यक्ष** : माननीय ऊर्जा मंत्री संबंधिताबरोबर ज्यावेळी चर्चा करणार आहे, त्यावेळी त्यांनी सन्माननीय सदस्यांना देखील चर्चेत सहभागी करुन घ्यावे, अशी माझी सूचना आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, मी यातून निश्चितपणे मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार आहे. कोणत्याही कोजनच्या कारखान्यांना त्रास किंवा अडचण होणार नाही अशी काळजी शासनाकडून घेतली जाणार आहे. धन्यवाद.

**अध्यक्ष** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केलेला आहे.

-----

.......5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेले औचित्याचे मुद्दे आणि लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे. आज सर्व सन्माननीय सदस्यांना होळी सणासाठी मतदारसंघात जावयाचे असल्यामुळे सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा दुपारी 4.00 वाजेपर्यंत संपवावयाची आहे.

आज वेळ मिळाला तर लक्षवेधी सूचना शेवटी चर्चेला घेतल्या जातील, याची सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चा झाल्यानंतर लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ नका. सर्व लक्षवेधी सूचना सोमवार दिनांक 28 मार्च, 2016 रोजी चर्चेला घेण्यात याव्या अशी माझी विनंती आहे.

**अध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांना सांगू इच्छितो की, संबंधित सन्माननीय सदस्य मतदारसंघात निघून जातील म्हणून मी तसे म्हणलो होतो.

आता सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चेला डॉ. पतंगराव कदम यांनी सुरुवात करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

U-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु. शी.** : सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु........

डॉ.पतंगराव कदम (पलुस-कडेगाव ) : अध्यक्ष महाराज, माननीय वित्त मंत्र्यांनी अतिशय अवघड काम सोपे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. एकंदरित पगार, कर्जफेड या सर्व लॉयबिलिटी पूर्ण केल्यानंतर विकासाच्या कामांसाठी फक्त 11 टक्के रक्कम शिल्लक राहते. अशा परिस्थितीमध्ये माननीय वित्त मंत्र्यांनी लोकाभिमुख, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने सुध्दा चांगल्या पध्दतीचा प्रयत्न केलेला आहे. नवनवे पायंडे पाडलेले आहेत. महिलांच्या दृष्टीने रस्त्यावर किती अडचणी येतात, ही नवी गोष्ट नाही. या राज्याचा अर्थसंकल्प मांडताना महिलांसाठी रस्त्यावर माननीय हाय कोर्टाच्या आदेशानुसार शौचालये बांधण्याचा निर्णय घेतला. दुसरी एक नाविन्यपूर्ण गोष्ट केली त्याबद्दल मला माननीय वित्त मंत्र्यांना धन्यवाद द्यावयाचे आहेत. स्व.आर.आर. पाटील हे जिल्हा परिषदेचे सदस्यांपासून ते उप मुख्यमंत्री पदापर्यंत अशा कर्तत्ववान आणि श्री.शरद पवार यांच्या आशिर्वादाने एका ग्रामीण भागातील, दुष्काळी भागातील एक नेता मोठा झाला. स्वतः त्यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद गृहमंत्री असताना स्वीकारले. महाराष्ट्राच्या या इतिहासामध्ये असे कधी घडले नाही. माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार साहेब मी आपणास धन्यवाद देतो. स्व.आर.आर. पाटील यांच्या सांगली जिल्ह्यातील स्मारकासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद केली. त्या जिल्ह्यातील एक कार्यकर्ता म्हणून मला मनापासून आपल्याला धन्यवाद द्यावयाचे आहेत.

अध्यक्ष महाराज, आदिवासी भागातील समाजकल्याण विभागाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र बजेट असते. त्याला कट लागत नाही, पण काय अवस्था आहे, याची माहिती कृपया माननीय अर्थ मंत्र्यांनी जाणून घ्यावी. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था नाही. आमच्या काळामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये मागासवर्गीय महिलांसाठी होस्टेल सुरु केली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहेबांच्या नावाने जिल्ह्याला आंबेडकर भवन, मुला/मुलींसाठी होस्टेल

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.पतंगराव कदम....

अशा सुविधा निर्माण केल्या होत्या. परंतु आता त्या मुलींच्या होस्टेलची अवस्था काय आहे? त्यांना गणवेश मिळत नाही. तेथे रेक्टर नेमले जात नाहीत. गेल्या दोन वर्षापासून या संस्थांना निधी नाही. मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फीची बिले दिली जात नाहीत. स्व.मारूतराव कन्नमवार साहेबांच्या मतदारसंघातून आपण निवडून आला आहात. अतिशय तगडा नेता, त्यानंतर माननीय अर्थ मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार हे तगडे नेते व्हावेत, अशी आम्हाला अपेक्षा आहे. त्यांना जास्त वेळ मिळाला नाही. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी योग्य अशा माणसांची निवड केली होती. आदिवासी समाज हा पिचलेला, मागासलेला वर्ग आहे. त्यांचे पैसे त्यांना मिळत नाहीत. आदिवासी मुला/मुलींचे फीचे पैसे दिले पाहिजेत. आपल्याला एकच करावे लागेल की, आपल्याला सर्व सोंगे आणता येतात, परंतु पैशांचे सोंग करता येत नाही. या राज्याची आर्थिक ताकद वाढविण्याच्या दृष्टीने आपल्याला विचार करावा लागेल. माजी मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण बोलले होते. उत्तर प्रदेश राज्य आपल्या राज्यापेक्षा कितीतरी मोठे आहे, परंतु त्यांच्या मानाने आपल्या राज्याचे बजेट 40 टक्के अधिक आहे. आपले राज्य हे शक्तीशाली राज्य, ताकदीचे राज्य आहे, परंतु यासाठी सोर्सेसचा शोध घेतला पाहिजे. इकडची योजना तिकडे असे करुन चालणार नाही. शेवटी आपल्याला उत्तर द्यावेच लागणार आहे. मी परवाच्या दिवशीचे बजेटचे आकडे बघितले तर 42 टक्के खर्च आणि 31 मार्च अखेर आमचे सरकार असताना सुध्दा 50 टक्के खर्च होत होता. वर्षभरात जेवढा खर्च होत होता तेवढा खर्च एका महिन्यात होतो. ही पध्दत आपल्या कारकीर्दित होता कामा नये. म्हणून 42 टक्के खर्च झाला बाकीचे पैसे का खर्च होत नाहीत. पैसे रिलीज होत नाहीत का?

अध्यक्ष महाराज, इरिगेशनसाठी जी तरतूद केली ती अतिशय तुटपूंजी आहे. आपले मंत्री मंडळातील मंत्री म्हणाले की, आम्ही 50 कोटी रूपयांचे कर्ज काढणार आहोत. कर्जाचा निर्णय ग्राह्य धरूनच योजना वाटपाचे कार्यक्रम होतात. बच्छाव समितीचा निर्णय झाला तेव्हा आपल्या वाट्याला 595 टीएमसी पाणी आले. त्यानंतरच्या पाण्यासह 625 टीएमसी पाणी झाले, परंतु आपण पाणी उचलू शकलो नाही. आपल्या राज्यात वैधानिक महामंडळ आले. बच्छाव समितीचा निर्णय वेगळा करावा म्हणून मी अनेकवेळा मागणी केली. राज्यात आमचे सरकार असताना

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.पतंगराव कदम....

तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शंकरराव चव्हाण होते. त्यावेळी मी बच्छाव समितीचा निर्णय वेगळा करावा म्हणून भांडण उकरुन काढले, परंतु तो झाला नाही. टेंभू, ताकारी, म्हैसाळ या प्रकल्पामध्ये पंप लावून पाणी उचलावयाचे आहे. या योजनेसाठी धरणे वगैरे बांधावयाची नाहीत. या प्रकल्पाच्या खाली चार किलो मीटर अंतरावर कर्नाटक राज्य आहे. ही योजना कोणासाठी आहे, याचा शासनाने विचार केला पाहिजे. या दुष्काळी अवस्थेमध्ये महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्याची अवस्था काय आहे? माझ्या पक्षातील दोन सन्माननीय सदस्यांनी मला मदत केलेली आहे. सन्माननीय वित्त मंत्री महोदय नुसत्या योजना करुन, भूल भूलय्या करुन उपयोग होणार नाही. दुष्काळी परिस्थितीच्या वेळी मागील सरकारच्या काळामध्ये जिल्ह्यामध्ये मंगळवारी सब कमिटीच्या माझ्या अध्यक्षतेखाली बैठक होत असे आणि बुधवारी मंत्रालयात कॅबिनेटची बैठक होत असे. बुधवारी कॅबिनेट झाली की, संध्याकाळपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांना पैसे दिले जात होते. आम्ही त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना विचारणा करीत होतो की, तुमची अडचण सांगा. त्यांनी अडचण सांगितली की, मी लिहून देतो, हे माझे आदेश आहेत. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांच्या हातामध्ये जी.आर. पडत असे. आता या शासनाने खालच्या स्तरावर अधिकार दिले आहेत. चारा छावण्यांचे अधिकार आयुक्तांना दिले. दुष्काळी परिस्थितीच्या वेळेस असा निर्णय घेऊन चालत नाही. प्रत्यक्षात त्या स्पॉटवर जाऊन कृती करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, परवाच्या दिवशी आपण लातूर जिल्ह्याची बातमी ऐकली की, तेथे कलम 144 जमावबंदीचे आदेश लावण्यात आले. ही काय अवस्था आहे? मला या सभागृहात राजकारण करायचे नाही, परंतु प्रशासन परिणामकारक चालविण्याचे काम किती जीकिरीचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची भूमिका, सन्माननीय वित्त मंत्र्यांची भूमिका याबद्दल आमचे दुमत नाही, परंतु आपले म्हणणे प्रशासन ऐकत नाही. प्रशासन परिणामकारम काम करीत नाही. पहिल्यांदा एवढी गडबड झाली की, नाटक केले माहित नाही. या सिजनमध्ये मराठवाड्यामध्ये पूर्ण मंत्रिमंडळ गेले. इतिहासातील पहिलीच ही घटना असेल. तेथे जाऊन परिणाम काय आहे? त्यानंतर मी अनेक जिल्ह्याधिकाऱ्यांना फोन केला ते म्हणाले साहेब आम्हाला आदेश नाही. माननीय मंत्री महोदय आले आणि गेले, आम्हाला कसलेही आदेश दिले नाहीत. आमचे सरकार असताना आपल्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

23-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W-4

ADB/ ST/ AKN/ 13:10

डॉ.पतंगराव कदम....

पक्षातील सन्माननीय सदस्य सांगत होते की, चारा मोटार सायकलवरुन नेतात... (अडथळा)... मी त्यांचा उल्लेख केला नाही....अडथळा)... म्हणून त्या घोषणाबाजीला काही अर्थ नाही.

यानंतर X-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. पतंगराव कदम ...

माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार आपण सिन्सिअर आहात. गोरगरिबांचे काही तरी व्हावे असे आपल्याला वाटते अशी आमची खरी भावना आहे. एक साधी गोष्ट शेवटी आमच्याकडून राहिली. माझ्या मतदारसंघात मुलींचे वसतिगृह बांधण्यात आले आहे. तेथे वीज नाही, पाणी नाही. महाराष्ट्रातील सर्व मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहाला कंपाऊंड वॉल बांधण्याबाबत मी आपल्याला अनेकदा विनंती केली. आपण मला फार सन्मानाने वागविता आणि सांगता की, तुम्ही माझ्याकडे अजिबात येऊ नका, तुमच्या पी.ए. ला पाठवा. आपण सगळे करता परंतु काही होत नाही. माझ्या येथील मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह दोन वर्ष झाली तसेच पडले आहे. मुली पाणी, वीज नसल्याने त्यात जाऊ शकल्या नाहीत.

फार मोठ्या योजना आखल्या गेल्या. मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे की, या सेक्शनला तुम्ही प्रायॉरिटी दिली पाहिजे. मुलांची फी मिळत नाही, त्यांना गणवेष मिळत नाहीत. 2-2, 3-3 वर्षे त्यांना ग्रांटही मिळत नाही. या पध्दतीने काम करुन होणार नाही. मंत्री महोदय तुमच्या सारखा सामान्य गोरगरिबांचे ज्ञान असलेला व खऱ्या अर्थाने तळमळ असलेला नेता हे करु शकतो. महिलांच्या नाराजगीची गोष्टच आगळीवेगळी आहे. नेहमी पक्ष, नेहमी राजकारण हे इलेक्शन पुरते ठीक आहे. नवनवीन बिले आहेत, त्यावर मी बोलणारच आहे. सहकार आम्ही मोडणार, मग काय करणार, आमच्या माणसाच्या ताब्यात घेणार. तुमच्या सरकारच्या पाठीमागे एक शिस्तबध्द संघटना आहे. त्यांना 1-1 संस्था काढायला लावा आणि चालवायला लावा. दुसऱ्यांच्या संस्थांकरिता तुम्ही दुरूस्तीचे बिल आणणार काय ? जे चांगले नाही ते दुरूस्त करा, जे बरोबर नाही त्यावर ॲक्शन घ्या. परंतु, काही न करता आम्ही सत्तेवर आलो आहोत ही महाराष्ट्रात पध्दत नाही. महाराष्ट्रातील काम व देशातील इतर राज्यातील कामामध्ये फार फरक आहे. इतर राज्यात कोठेही खाजगी संस्थांचे काम नाही सर्व सरकार करते. महाराष्ट्रात सरकारपेक्षा किती तरी मोठ्या पटीने खाजगी संस्था काम करतात. हे राज्य आर्थिकदृष्ट्या एवढे सक्षम असूनही आपले उद्योगधंदे 300 पट वाढले. परंतु, सरकारचे फक्त एक इंजिनिअरिंग कॉलेज पुण्यामध्ये होते. मी पुणे विद्यापीठाच्या एज्युकेशन कौन्सिलवर 12 वर्षे होतो. मुंबई विद्यापीठातही कौन्सिलवर होतो,

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. पतंगराव कदम ...

आपल्याकडे काही नव्हते. मारोतवार कन्नमवार यांच्यासारखाच स्वर्गीय वसंतदादांसारखा एक सातवी इयत्ता शिकलेला माणूस मुख्यमंत्री झाला आणि त्यांनी धोरण आखले. त्यानंतर 400 विनाअनुदानीत इंजिनिअरिंग कॉलेजेस निघाली. साडेचारशे पॉलिटेक्नीक महाराष्ट्र सरकारचा छदाम खर्च न होता निघाली. विद्यार्थ्यांचे वर्गच भरत नाहीत तर कोणत्या संस्थेला पैसे मिळतात ? वर्गच भरत नसल्याने याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेतला. अशा पध्दतीने दणकून निर्णय घेऊन ते राबवावे लागतात. असे निर्णय घेताना सामान्य माणसावर आपल्या निर्णयाचा काय परिणाम होईल या दृष्टीने आपण बजेटमध्ये अनेक चांगल्या गोष्टी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, तुम्ही 11 टक्क्यांमध्ये काही सोर्सेस वाढविण्याचे निर्णय घेतले नाहीत. वर चादर पांघरली तर, खाली पाय उघडे राहतात व पायावर चादर टाकली तर वर उघडे रहावे लागते असेच बजेट व पैसे आपल्याकडे उपलब्ध आहेत. यादृष्टीने काही ठोस निर्णय विशेषतः इरिगेशनच्या बाबतीत त्या योजना पूर्ण करण्याच्या बाबतीत घेतले पाहिजेत.

आपण काही गंमतीदार निर्णय घेता. मी साधे सांगितले की, आमच्या काळात विजेच्या ज्या सरकारी योजना होत्या त्याचे विजेचे पैसे आम्ही भरले. माननीय श्री. एकनाथराव खडसे हे आता मदत व पुनर्वसन मंत्री आहेत, त्यांनी मला फोन केला की, आमच्या जळगावची मुक्ताई योजना घ्यावी. दुसऱ्या दिवसापासून आम्ही त्यांची योजना घेतली. कमीत कमी टँकरकरिता आपला जेवढा खर्च होतो तेवढा तरी हिशोब करावा. तेवढे पैसे मिळाले तर लोकांना दिलासा मिळेल. लोकांच्या पिण्याच्या पाण्याची जी अवस्था आहे, ती तुम्हाला आम्हाला कोणालाही भूषणावह नाही. तेथे पोलीस ठेवण्याची वेळ आलेली आहे.

दुष्काळाच्या काळात आचारसंहिता असताना तत्कालीन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी रात्री 12.00 वाजता स्पेशल निर्णय घेण्याकरिता बैठका घेतल्या. आम्ही म्हटले की, जाऊ दे आचारसंहितेमध्ये आपल्यावर काय ॲक्शन घ्यायची ती घेऊ दे. परंतु, लोकांना आम्ही पैसे देणार नाही आणि लोकांना मुशीने मारणार ? हे सरकार लोकांचे आहे. तुम्ही काही तरी चांगले कराल म्हणून लोकांनी तुम्हाला संधी दिली आहे. तुम्ही अच्छे दिन आणणार आहात, सर्व काय काय होणार आहे. मी बाकीचे राजकीय बोलणार नाही. 15 लाख रुपये मिळणार, महिलांना फुकट गॅस

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. पतंगराव कदम ...

मिळणार, मराठ्यांच्या सर्व मुलांना नोकऱ्या मिळणार. यावर काही मला येथे भाष्य करावयाचे नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, तुम्हाला संधी मिळाली आहे ना, मग आगळेवेगळे लोकांच्या हिताचे राज्य करा. दुस्वासाने दुसऱ्यांच्या संस्था, सहकार मोडायला हा सहकार एका दिवसात तयार झाला आहे काय ? देशाच्या 50 टक्के सहकार महाराष्ट्रात आहे. जे चांगले नाहीत, ज्यांनी चुका केल्या आहेत त्यांच्यावर ॲक्शन घ्यावी.

मी 5 वर्षे सहकार मंत्री होतो. काही लोकांना सांगितले तसे चालणार नाही, संधी द्या. माझ्या काळातील निर्णय आहे की, एखादा कारखाना बिघडला तर तो दुसऱ्या सहकारी संस्थेला द्या. काडीमोड करुन तो विकू नका. ही सहकार चळवळ ही महाराष्ट्राची ताकद, शक्ती आहे. आपण अशा पध्दतीने बिल आणायचे आणि अशा पध्दतीने आमची माणसे घुसवा. अरे कशाला घुसवा ? तुम्ही संस्था काढा, त्यांना मदत करा, घुसून काय करताय ? सरकार चालविणारी तुमची मोठी संघटना आहे. सरकार कोण चालविते यावर मी भाष्य करणार नाही. ती संघटनाच तुमचे सरकार चालविते. त्यांना कामाला लावा. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार आपल्याला काय माहीत आहे ? आपण मध्ये बोलू नका. त्यांना काम द्या, त्यांना संस्था द्या, त्यांना मदत करा. त्यांना म्हणावे जरा काम करा म्हणजे त्यातील अनुभव, अडचणी लक्षात येतील.

माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार मी आपल्या अर्थसंकल्पाचा विरोध न करता स्वागत करतो. आपण बऱ्याच चांगल्या गोष्टी आणलेल्या आहेत. ही पध्दत तुम्ही वाढवा, सोर्स वाढवा. महाराष्ट्र हे देशातील आगळेवेगळे शक्तिमान असे राज्य आहे ते विकासाने दुस्वासाने नाही. शेवटी हे सर्वांचे राज्य आहे. आपल्याला हे माहीत आहे काय, माडखोलकरांनी यशवंतराव चव्हाण यांना राज्य झाल्यानंतर हे राज्य कोणाचे असे विचारल्यानंतर त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व मराठी जनतेचे हे राज्य आहे. त्यांनी जाणीवपूर्वक विचार केला. कन्नमवारांच्या नंतर वसंतराव नाईक यांना मुख्यमंत्री केले. आबासाहेब केळकर, बॅरिस्टर वानखेडे, तिडके, वैराळे, तिरपुडे सर्वांना महत्त्वाची खाती दिली. आता काय चालते ? परवा जे घडले त्यातून तुम्ही चांगले सुटलात. तुमच्या ॲडव्होकेट जनरलने मराठवाडा वेगळा करण्याबाबत सांगितले. तुमच्यावर शिवसेना तुटून पडली. राष्ट्रवादीही होते. सर्व बोऱ्याच वाजला असता. परंतु, मुख्यमंत्री महोदय हुशार असल्याने

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. पतंगराव कदम ...

त्यांनी कालच्या काल योग्य निर्णय घेतला. हे सर्व साफ करुन टाकले. मराठवाड्याला काय कमी केले ? शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री केले, शिवाजीरावांना केले, विलासरावांना केले. श्री. पद्मसिंह पाटील हे किती तरी वर्षे पाटबंधारे मंत्री होते. भूमिका एकच होती. हे राज्य सहजासहजी आलेले नाही. याकरिता 106 लोकांनी हौतात्म्य पत्करलेले आहे. सर्व लोकांनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ पाहिलेली आहे. मी लहान होतो, प्रतापगडावर यशवंतरावांनी पंडित जवाहरलाल नेहरुंना आणलेले मी पाहिले आहे. हे अतिशय वेगळ्या पध्दतीचे राज्य आहे.

साखरपुडा झाला, लग्न झाले, पोर झाली, नातू होण्याची वेळ आली आणि आता आम्हाला वेगळे व्हायचे आहे हे काही मला कळत नाही. कशाला वेगळे होत आहात, कोणाला तरी सत्ता देण्यासाठी तुम्हाला वेगळे व्हायचे आहे काय ? सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार म्हणत आहेत की, वेगळे व्हायचे नाही. त्यांना मला हे सांगावयाचे आहे की, आपण तेथे पक्षाचे धोरण घ्यावे. अशा पध्दतीची भूमिका घेऊ नका महाराष्ट्र अखंडच राहीला पाहिजे. कुणाला कुठली तरी सत्ता मिळण्यासाठी अशी भूमिका मांडू नका. महाराष्ट्र हे आपल्या देशातील फार महत्त्वाचे असे राज्य आहे. त्याची अस्मिता टिकविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा आणि तो कराल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...............

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, आपण भाषण करणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या नावाची यादी वाचावी.

**तालिका सभाध्यक्ष (डॉ. सतीश पाटील) :** आता सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू बोलणार आहेत. त्यानंतर सन्माननीय सदस्या संगिता ठोंबरे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. उन्मेष पाटील जयदत्त क्षीरसागर बोलणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात मुद्दे मांडले तर सर्वांना बोलण्याची संधी मिळेल. आता सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. सुनील प्रभू ( दिंडोशी ) : अध्यक्ष महोदय, राज्यात दुसरी हरित क्रांती आणण्यासाठी युती शासनाने सन 2016-2017 मध्ये हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांना समर्पित केला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये या राज्यात सततचा दुष्काळ, शेतकऱ्यांची आत्महत्या, अवकाळी पाऊस इत्यादी संकटामुळे शेतकरी पुरता उद्ध्वस्त झाला आहे.

Y-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. सुनील प्रभू.....*

*अशा शेतकऱ्याला सावरण्यासाठी प्रसंगी शहरामध्ये प्रतिवर्षी ज्या पद्धतीने आर्थिक तरतूद करतो, त्यापेक्षाही जास्त तरतूद ग्रामीण भागाकडे वळवून जवळजवळ २५ हजार कोटी रुपयांची तरतूद आगामी वर्षात शेतकरी स्वाभिमानी वर्ष साजरे करण्याच्या दृष्टीने करण्यात आली. या सदनामध्ये अर्थसंकल्पावर बोलत असताना खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम या राज्यामध्ये येणाऱ्या काळात होणार आहे. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने सक्षम करणारा हा अर्थसंकल्प आहे. असा अर्थसंकल्प या राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीस आणि वित्त मंत्री माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार आपण सादर केला असून त्याबद्दल मी आमच्या पक्षाच्या वतीने आपले मनापासून अभिनंदन करतो.*

*अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पावर दोन्ही बाजूचे सदस्य ज्या पद्धतीने बोलतात, मागील अनेक बाबींचे उदाहरणे देतात, परंतु आज राज्याची जी परिस्थिती आहे, हे सर्व पहात असताना राज्याच्या विकासाच्या दराकडे पहाणे आवश्यक आहे. सन २०१४-२०१५ मध्ये राज्याचे स्थुल उत्पन्न ५.०८ होते. २०१५-२०१६ चा कृषी विकास दर उणा केला तरी या राज्याचे स्थुल उत्पन्न ८ टक्के झाले आहे, हे आपणा सर्वांना मान्य करावे लागेल. त्यामुळे पावसाची कृपा झाली आणि पाऊस वेळेवर पडला तर शेतकऱ्यांवर आलेले संकट आणि त्याला दिलासा देण्यासाठी राज्य सरकार करीत असलेले काम पहाता, हा स्थुल दर १० टक्क्यांपर्यंत गेल्याशिवाय रहाणार नाही, असा मला विश्वास आहे. डॉ. पतंगराव कदम या सभागृहातील ज्येष्ठ सदस्य आहेत. आपणही या विषयावर बोलले आहात. त्यामुळे आपले भाषण आमच्या सारख्यांना आदर्शवत असते. आपले भाषण मला किंवा सन्माननीय सदस्य श्री. आशिष शेलार किंवा इकडे बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांना मार्गदर्शक असते.*

*अध्यक्ष महोदय, दुष्काळाचे निवारण असेल, एलबीटी रद्द करण्याचा तुमच्या सरकारने घेतलेला निर्णय किंवा आमच्या सरकारने टोल माफी करण्याचा घेतलेला निर्णय असेल, याचा विचार केला तरी देखील राज्य सरकारला या वर्षी अंदाजे ८ हजार कोटी रुपयांची महसुली तूट या अर्थसंकल्पामध्ये अपेक्षित आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेवर जो वाढीव परिणाम होणार आहे आणि प्रतिकूल परिस्थितीत राज्याचा विकास दर ८ टक्के इतका असून देखील केंद्राचा विकास दर*

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. सुनील प्रभू.....*

*७.६ टक्के आहे. म्हणून निश्चितपणे या राज्याचा विकास दर केंद्रापेक्षाही जास्त आहे, म्हणजे राज्य प्रगतीच्या दिशेने जात आहे, हे आपण नाकारु शकणार नाही. त्यामुळे आपले मार्गदर्शन आमच्यासाठी खूप महत्वाचे आहे. या विकासाचा दर अतिशय चांगला आहे. परंतु आजमितीला ज्या परिस्थितीतून राज्य जात आहे, त्याच्या मागील कारणे कोणती आहे, त्याचा विचार देखील या अर्थसंकल्पावर बोलत असताना सदनामध्ये करणे आवश्यक आहे.*

*अध्यक्ष महोदय, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सन्माननीय गटनेते सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यांनी आपल्या भाषणामध्ये बोलताना अनेक वेळा उल्लेख केला की, १९९५ मध्ये आपण सत्तेवर असताना आपण हे केले, त्यानंतर आपले सरकार असताना आपण हे केले. परंतु या सभागृहाने हे मान्य करणे आवश्यक आहे. राज्याचा अर्थसंकल्प २ लाख ७० कोटी रुपयांचा असून त्यावर जवळजवळ ३ लाख ३२ हजार कोटी रुपयांचे कर्ज असून वर्षाअखेर ३ लाख ५६ हजार कोटी रुपये इतके कर्ज होणार आहे, हे यावळचे निश्चित असे अवलोकन आहे. कर्जाच्या व्याजापोटी राज्याला शासनाला ३० हजार कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. अर्थसंकल्पात जवळजवळ १०० रुपयाहून अधिक खर्च आहे. म्हणजे ३९ रुपये इतके वेतन, निवृत्ती, व्याज, कर्जावरील व्याजासाठी द्यावे लागणार आहे. त्यामुळे विकासासाठी केवळ ११ टक्के निधी रहाणार आहे. मंत्री महोदय या ११ टक्क्यामध्ये महाराष्ट्रातील शहरी भागामध्ये ग्रामीण भागामध्ये कोणत्या पद्धतीचा स्थूल स्वरुपात विकास करणार आहोत, याचे देखील उत्तर आपल्याला निश्चितच द्यावे लागेल. कारण महाराष्ट्रातील जनता त्या दृष्टीने विचार करते. एका बाजूला आपण शेतकऱ्यांना सावरतो. परंतु राज्य प्रगतीपथावर येण्यासाठी या राज्यामध्ये, शहरामध्ये ज्या पद्धतीची इन्फ्रास्ट्रक्चर सेवा-सुविधा देणे आवश्यक आहे, ही कामे करण्यासाठी आपण येणाऱ्या वर्षात ११ टक्क्यामध्ये कशा पद्धतीने तारेवरील कसरत करणार आहात, याबाबत राज्यातील जनतेचे आपल्याकडे लक्ष आहे.*

*अध्यक्ष महोदय, १९९५ साली युतीचे सरकार सत्तेवर होते. आम्ही सत्तेत असताना जवळजवळ १६ हजार कोटी रुपयांचे कर्ज आमच्यावर होतो. म्हणजेच आपली सत्ता जाऊन आमची सत्ता आल्यावर आमच्यावर तेवढे कर्ज होते. १९९५ साली राज्यात शिवशाहीचे सरकार आल्यावर जवळजवळ १९९५ ते १९९९ यामधील साडेचार वर्षाच्या कालावधीत हे कर्ज १६ हजार कोटी वरुन*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. सुनील प्रभू.....*

*४५ हजार कोटी रुपयांवर गेले. आम्ही यातील जवळजवळ २९ हजार कोटी रुपये कृष्णा खोरे प्रकल्पासाठी खर्च केले आणि कमी पडणारे पैसे राज्यातील जनतेकडून रोखे उभे केले आणि काढलेल्या कर्जाचा हिशोब दिला. त्यामुळे या कर्जाची रक्कम कुठे खर्च केली याची राज्यातील जनतेला माहिती दिली. परंतु आज वेगळी परिस्थिती आहे. शासनावरील १९९९ नंतर ४५ हजार कोटी रुपये असलेले कर्ज आजमितीला ३ लाख ११ हजार कोटी रुपयांवर गेले आहे. आपल्याला कल्पना असेल की, आपण ७० हजार कोटी रुपये सिंचनावर खर्च केले. या रकमेतून केवळ ०.१ टक्का एवढेच सिंचन वाढले. परंतु आपण ३ लाख ११ हजार रुपये कोटीं घेतलेल्या कर्जाचा हिशोब राज्यातील जनतेला देणे आवश्यक आहे. मला सभागृहामध्ये मागणी करायची आहे की, शिवशाहीचे सरकार असताना आपण २९ हजार कोटी रुपयांचे कर्ज केले, त्याचा हिशोब जनतेला दिला. या राज्यावर असलेल्या ३ लाख ११ हजार कोटी रुपये कर्जाचा हिशोब जनतेला द्यायचा असेल, तर मागे ज्या पद्धतीने कर्ज वाढले, आज ज्या पद्धतीने कर्जाची जास्तीत जास्त आकडेवारी जनतेसमोर येत आहे, मला असे वाटते की, कर्ज कशाकरिता काढले, कुठे खर्च झाला, याची माहिती राज्यातील जनतेला देण्यासाठी याची श्वेतपत्रिका काढण्यात यावी. ही काळाची गरज आहे. या सरकारने आजमितीला शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्यामध्ये वेगवेगळ्या योजना सुरु केल्या आहेत. आपण जलयुक्त शिवार योजना आणली. या राज्यामधील भूगर्भातील पाण्याचा साठा वाढला पाहिजे, याकरिता आपण हा क्रांतीकारी निर्णय घेतला. या पूर्वीच्या सरकारने देखील ही योजना राबविली होती, परंतु आपल्या सरकारमध्ये अतिशय काटेकोरपणे ही योजना राबवित असताना ग्रामीण भागातील आवश्यक असलेल्या ठिकाणी ही योजना राबविण्याची गरज आहे. असे झाल्यास मला विश्वास आहे की, पाऊस व्यवस्थित पडला तर दुष्काळ असलेल्या भागात पुढील काळामध्ये पाण्याचा चांगला साठा होईल आणि दुष्काळावर मात करता येईल.*

*अध्यक्ष महोदय, सौर ऊर्जा पंप असेल, शेतीतील अनेक योजना असेल, शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ असेल, अशा अनेक योजनांचा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आला. परंतु आम्ही ज्या मुंबई शहरामधून निवडून या सदनामध्ये आलो, या मुंबई शहराकरिता या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेल्या तरतूदीमध्ये आणखी वाढ करण्याची आवश्यकता आहे. मेट्रो,*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. सुनील प्रभू.....*

*मोनो यांची येणाऱ्या काळामध्ये गरज आहे. आर्थिक दृष्ट्या एक हब म्हणून जगामध्ये हे शहर उभे रहात असताना, जगामध्ये असलेल्या प्रसिद्ध शहरांतील सेवा-सुविधा या मुंबईमध्ये मिळाली पाहिजे. मोनो, मेट्रो, भूमिगत मेट्रो या सर्व बाबी करणे आवश्यक आहे. पूर्वीच्या सरकारने जे केले, ते पुढे नेण्याचे काम हे सरकार करीत आहे. त्यामुळे मुंबई शहरामध्ये या सेवा देत असताना बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून जे काम स्थानिक स्वराज्य संस्था करते त्यातील काही कामांना राज्य सरकारने केंद्राबरोबर आर्थिक निधी देणे तितकेच महत्वाचे आहे.*

*.../-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल प्रभू....

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात असलेल्या कचऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरामध्ये जवळपास 10 हजार मे.टन कचरा दररोज निर्माण होतो. डम्पींग ग्राऊंडची परिस्थिती आपण पाहिली तर भांडूप मधील नागरिक डम्पींग ग्राऊंडसाठी विरोध करीत आहेत. मुलुंड मधील नागरिक म्हणतात आमच्या शेजारी डम्पींग ग्राऊंड नको. देवनार येथील डम्पींग ग्राऊंडला दररोज रोज आग लागत आहे. तेथील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महानगरपालिकेने जी यंत्रणा उभारली होती त्यांनी काम व्यवस्थीत न केल्यामुळे रद्द करण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरात दररोज 10 हजार मे.टन कचरा निर्माण होतो त्याची विल्हेवाट लावण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री महोदय श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी एमएमआर रिजनमधील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आसपासच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील कचरा एकत्र करुन त्यावर प्रक्रिया करण्याच्या दृष्टीने एमएमआरडीएमार्फत प्रस्ताव सादर केला होता. त्यावर काय झाले याबाबतची माहिती मला नाही. परंतु मुंबईतील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मुंबई शहरालगत 100 एकर जमीन मुंबई महानगरपालिकेला राज्य सरकारने द्यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता जागा उपलब्ध असेल तर त्यावर व्यवस्थित प्रक्रिया करणे शक्य आहे. मुंबईतील कचऱ्याची विल्हेवाट लावून आपण नागरिकांना होणारा त्रास दूर करु शकतो, असा मला विश्वास आहे. या शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे त्याकरिता शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावली पाहिजे व शहरातील पर्यावरण चांगले ठेवले पाहिजे ही नैतिक जबाबदारी केंद्र सरकार व राज्य सरकारची आहे. त्यामुळे राज्य सरकारने मुंबई महानगरपालिकेला 100 एकर जमीन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची घोषणा करण्याबाबत माननीय वित्त मंत्री यांनी पुढाकार घेऊन मुख्यमंत्री महोदयांना सांगावे व जमीन उपलब्ध करुन द्यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहरामध्ये ब्रीम स्टोअर, सुरज प्रकल्प आहेत. मुंबई शहरातील रस्त्यांचे जाळे विणण्याकरिता कोस्टल रोड तयार करण्यात येणार आहे. कोस्टल रोड ठराविक वेळेत पूर्ण करण्यचा प्रयत्न सरकार करीत आहे. मागील अनेक वर्षे दिल्लीच्या बासनामध्ये बांधून

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल प्रभू....

पडलेली कोस्टल रोडच्या फाईलवर निर्णय घेण्याचे काम विद्यमान पंतप्रधान महोदय, मुख्यमंत्री महोदय व पर्यावरण मंत्री महोदयांनी करुन त्यासंदर्भातील अडचणी दूर केल्या आहेत. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. हा कोस्टल रोड पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत टेंडर काढण्यात येणार आहे. पुढील 10 वर्षाच्या काळात कोस्टल रोडमुळे मुंबईतील वाहतूक सुरळीत होईल. परंतु हा कोस्टल पूर्ण करीत असताना मुंबईचे भूमीपूत्र असलेले व आद्यनागरिक असलेल्या कोळी बांधवावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होता कामा नये. त्यांच्या व्यवसायावर परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन कोस्टल रोडचे काम करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी उल्लेख केला की, मुंबई मेट्रोसोबतच आम्ही कोस्टल रोड करणार आहोत. मुंबई शहरासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार पॅकेज देते. परंतु मागील अनेक वर्षापासून मुंबईत पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आहे. आता उपलब्ध पाण्याचा साठा व पुढील काळात वाढणारी मुंबईची लोकसंख्या विचारात घेता घारगाळ आणि पिंजाळ हे प्रकल्प मध्य वैतरणा प्रकल्पाप्रमाणे उभारणे आवश्यक आहे. या प्रकल्पासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्री महोदयांनी परवानगी दिली असून त्यासंदर्भात महानगरपालिका सर्व्हे करीत आहे. घारगाळ व पिंजाळ प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प घोषित करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा. तसेच, मुंबई शहरासाठी सदरहू प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेला आर्थिक निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मागच्या वेळी मुंबई शहरामध्ये प्रचंड पाऊस पडून महाप्रलय निर्माण झाल्याची घटना मला आठवते. त्यावेळी सन 2005 मध्ये पंतप्रधान महोदय मुंबई शहरामध्ये आले होते व त्यांनी पावसाचे पाणी मुंबई शहरात तुंबू नये याकरिता 1 हजार कोटी रुपयांचे आपत्कालीन पॅकेज दिले होते. त्यानंतर ब्रीम स्टोअरचे काम मुंबई शहरात ज्या प्रमाणात करणे आवश्यक त्याप्रमाणात करण्याकरिता महानगरपालिकेने अर्थसंकल्पात तरतूद करुन काम केले. परंतु त्यानंतरच्या काळात मुंबई सारख्या प्रगत शहराला, ज्या शहराकडे आपण देशाची आर्थिक राजधानी म्हणून पाहतो, त्या शहराला चांगले स्वरुप देण्याचा प्रयत्न करतो, त्याकरिता कोणतेही पॅकेज

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल प्रभू....

उपलब्ध करुन दिले नाही. मला वाटते मध्य वैतरणा प्रकल्पासाठी केंद्र सरकारने निधी उपलब्ध करुन दिला आहे. ब्रीम स्टोअर प्रकल्प सुरु झाला त्यावेळी पॅकेजमधून निधी प्राप्त झाला होता. ब्रीम स्टोअर प्रकल्प, एमईटीपीचा प्रकल्प, सुरज प्रकल्प टप्पा क्रमांक 2 व 3 हे सर्व प्रकल्प मुंबई शहराच्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे मुंबई शहरातील प्रकल्पाकडे विशेष लक्ष देऊन निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी वित्त मंत्री यांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प मंजूर करताना काही बाबी अप्पर डिप्पर करुन काही योजनेसाठी अधिकचा निधी आपण देऊ शकतो. मला अनेक विषयावर बोलावयाचे आहे परंतु बोलण्यासाठी वेळ कमी आहे. सन्माननीय विधानसभा अध्यक्षांनी वेळ कमी असल्याने मुद्देसूद बोलण्याकरिता सांगितले आहे. माझ्याकडे अनेक मुद्दे असले तरी ते वेळे अभावी मी ते पुढील वेळेकरिता राखून ठेवतो व इथेच थांबतो. धन्यवाद !

--------------

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-17 चा अर्थसंकल्प वित्त मंत्री महोदयांनी सादर केला आहे. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पाशी संबंधीत कागदपत्रे व पुस्तके सन्माननीय सदस्यांना वेळेत देण्याची आतापर्यंतची प्रथा व परंपरा आहे. यावेळी प्रथमच असे घडले की, सदनामध्ये अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पाशी संबंधीत कागदपत्रे व पुस्तके मिळण्यासाठी बराच उशीर झाला. याप्रकरणाची नोंद वित्त मंत्री महोदयांनी घ्यावी व पुढील वेळी अशा प्रकारची चूक होऊ नये, याबाबत दक्षता बाळगावी.

अध्यक्ष महोदय, अर्थ मंत्री महोदयांनी प्रचंड इच्छा शक्ती दाखवून प्रतिकूल परिस्थितीमध्ये राज्याचा अर्थसंकल्प सादर केला आहे, त्याचे भान व जाण सभागृहाला आहे. ज्यावेळी मुख्यमंत्री महोदय व वित्त मंत्री महोदय विरोधी पक्षात होते त्यावेळी ते राज्यावरील अर्थसंकल्पावर प्रखर प्रहार करुन बोलत होते. त्याची जाणीव त्यांना आहे व आम्हालाही माहिती आहे. त्यावेळी माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार हे अर्थसंकल्प कसा नसावा हे वारंवार बोलून दाखवत होते व त्यातील खानाखोचा प्रकर्षाने त्यावेळच्या सरकारच्या निदर्शनास आणून देत होते. त्यामुळे अशा अभ्यासू अर्थ मंत्री महोदयांकडून राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना काही मुलभूत गोष्टींचा उल्लेख करणे आवश्यक होते.

अध्यक्ष महोदय, आज राज्यात अभूतपूर्ण असे जलसंकट निर्माण झाले आहे. लातूर सारख्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या टँकरमधून पाण्याचे वाटप करताना 144 कलम लावावे लागत आहे. पिण्याच्या पाण्याची परिस्थिती ही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती होऊ पाहते की काय, असे चित्र राज्यातील अनेक शहरामध्ये व विशेषतः मराठवाड्यामध्ये निर्माण झालेले आहे. टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी करावयाच्या अल्पकालीन व दीर्घ कालीन उपाययोजनेच्या बाबतीत अर्थसंकल्पामध्ये उल्लेख करणे गरजेचे होते. मला खेदाने सांगावेसे वाटते की, टंचाईचा साधा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करण्यात आला नाही.

अध्यक्ष महोदय, मागील वर्षात राज्यामध्ये 3,225 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांच्या कुटुंबियांना केवळ 1 लाख रुपये आर्थिक मदत करुन भागणार नाही. त्यांची पुढील पिढी

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

बर्बाद होत आहे ती सावरण्याची जबाबदारी कल्याणकारी सरकारची आहे. निसर्गाने मारले तर सरकारने तारावे, ही भूमिका कोणत्याही कल्याणकारी राज्यात घेतली जाते. परंतु या अर्थसंकल्पात राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पुढील पिढीचे भवितव्य सुरक्षित ठेवण्याकरिता व त्याला आकार देण्याकरिता राज्य सरकार काय करणार आहे, याचा उल्लेख कोठेही दिसून येत नाही. नाम फाऊंडेशन, जैन फाऊंडेशन या संस्था आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या भावी पिढीतील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी व त्यांच्या राहण्याचा खर्च करील आहेत, हा खर्च शासनाला करण्यासाठी काय अडचण आहे ?

अध्यक्ष महोदय, मागील वर्षाच्या अर्थसंकल्पातील खर्चाचे प्रमाण आपण पाहिले तर उपलब्ध आकडेवारीनुसार केवळ 46 टक्के खर्च झाला असून 54 टक्के खर्च होणे शिल्लक आहे. आज 23 तारीख असून पुढील 7 दिवसामध्ये उर्वरित 54 टक्के खर्च शासन कसा करणार व तो पारदर्शीपणे कसा सत्कारणी लावणार, हे मोठे आव्हान व कोडे आहे. यासंदर्भात अर्थ मंत्री महोदयांनी सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे. टप्प्या टप्प्याने कॅश फ्लो प्रमाणे खर्च करण्यात यावा, असे वित्त विभागाचे सूत्र आहे, हे वित्त मंत्री महोदय विरोधी बाकावर असताना सातत्याने सांगत होते. परंतु आज तेच सूत्र त्यांच्या सरकारच्या काळात डावलले गेले आहे.

यानंतर AA-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षिरसागर......

आज ते सूत्र आपल्या काळात डावलले गेले आहे. आणखी 54 टक्के खर्च व्हावयाचा आहे. कॅशफ्लोप्रमाणे टप्प्याटप्प्याने खर्च झालेला नाही. हे आपण लक्षात घेणे गरजेचे आहे आणि यामुळे राज्याची आर्थिक शिस्त बिघडते. एवढ्याच वर्षापुरते नाही तर पुढच्या वर्षी सुध्दा त्यावर परिणाम होतो. हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांना समर्पित केला आहे, शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाला समर्पित केला आहे. बळीराजाला समर्पित करण्यात आला असे सांगण्यात आले आणि त्याकरिता 25 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांकरिता तरतूद करण्यात आली आहे, असे सांगण्यात आले. केंद्र शासनाचा अर्थसंकल्प नुकताच सादर करण्यात आला आहे. त्यामध्येही ग्रामीण भागाकडे आणि शेतकऱ्याकडे केंद्र सरकारचे फार लक्ष आहे आणि म्हणून त्यांच्यासाठी खूप तरतुदी केल्या आहेत असे चित्र निर्माण केले आहे. त्याच पावलावर पाऊल टाकून, आम्ही ग्रामीण भागाकडे फार लक्ष देतो, आमचे सरकार हे व्यापारी आणि उद्योगपतींचे नाही, अशा प्रकारचा आघात होता, ज्यामुळे दिल्ली आणि बिहारच्या निवडणुकीत जो फटका बसला तो आता पुढच्या 5 राज्यांच्या निवडणुकांमध्ये बसू नयेत, ज्या ठिकाणी ग्रामीण मतदार जास्त आहे. त्यामुळे ग्रामीण भाग आणि शेतकऱ्यांकरिता आम्ही खूप काही करतो असे दाखविण्याचा प्रयत्न झाला. पण आपल्या 25 हजार कोटी रुपयांचा ब्रेकअप पाहिला तर शेतकऱ्यांकरिता 25 हजार कोटी रुपयांची जी तरतूद केली असे जे म्हटले आहे, त्यामध्ये दुष्काळ निवारण निधी, मनरेगा, सिंचन, वीजपंप या सर्वांची गोळाबेरीज करुन 25 हजार कोटी रुपये त्या ठिकाणी दिले आहेत. त्यामुळे हे निव्वळ शेतकऱ्यांकरिता मिळत नाहीत. या ठिकाणी सिंचनाकरिता ज्या बाबीचा उल्लेख केला गेला आणि सिंचनासाठी मागच्या वेळेसपेक्षा थोडी जास्त तरतूद ठेवली आहे. या ठिकाणी अर्थमंत्र्यांनी सांगणे आवश्यक होते, कारण आपण 1 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल असे म्हणत आहात तर मागच्या वर्षामध्ये सिंचन किती टक्के वाढले, किती एकर जमीन सिंचनाखाली आली हे आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कारण आपण नेहमी टक्केवारीचा उल्लेख करीत असता. मागच्या वेळी सिंचनावरील खर्च आणि सिंचनाखालील क्षेत्र याचा उल्लेख आपल्याकडून आवर्जून विचारण्यात येत होता. आम्हाला अर्थमंत्र्याना विचारावयाचे आहे की, मागच्या अर्थसंकल्पात सिंचनासाठी आपण 7 हजारपेक्षा अधिक निधी ठेवला होते, त्यामध्ये किती टक्के सिंचन वाढले आहे. जलयुक्त शिवार योजनेमुळे सगळीकडे आबादी आबाद होईल, सर्व क्षेत्र पाण्याखाली येईल अशा प्रकारचा डोलारा

2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षिरसागर......

उभा करण्यात येतो. मागच्या वर्षी या कामासाठी 2 हजार कोटी रुपये ठेवले होते, या वर्षी 1 हजार कोटी रुपये ठेवले आहेत. किती गावामध्ये कामे मंजूर झाली आहेत. प्रत्यक्षात किती कामे झाली आहेत याची जर टक्केवारी सांगितली तर हे हिमनगावरचे टोक आहे अशा उपाययोजनांमुळे दुष्काळी भागामध्ये सिंचनाचे क्षेत्र वाढणार नाही आणि सिंचनाचे क्षेत्र वाढले नाही तर आत्महत्यांचे प्रमाण मात्र दुर्दैवाने वाढत राहील, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. यासाठी माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश असतील आणि माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशाप्रमाणे जी 7 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक तरतूद केलेली आहे त्यामध्ये मराठवाड्याला 1362 कोटी रुपये मिळतात. यामध्ये कृष्णा खोऱ्यामधून जे पाणी उपलब्ध होणार आहे त्यासाठी किती रक्कम खर्च होणार आहे तर अतिशय तोकडी रक्कम खर्च होईल. अशा वेगाने गेलो तर तो प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आणि कृष्णा खोऱ्याचे पाणी येण्यासाठी आपल्याला 100 वर्षे लागतील. मराठवाड्यासाठी आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. आम्ही असतानाही प्रयत्न केले आहेत. आम्हाला 100 टक्के यश मिळाले नाही. सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाणसाहेब मुख्यमंत्री होते त्यावेळी आम्ही आग्रह केला 18 टीएमसी पाणी मराठवाड्यासाठी उपलब्ध होत आहे आणि ज्यासाठी भूसंपादनाला अधिकचा खर्च लागणार नाही. छोटे छोटे अडीचशे प्रकल्प मराठवाड्यात होऊ शकतात. पाणी उपलब्ध झाले आहे. माननीय राज्यपाल महोदयांकडे जाऊन त्यासंबंधी परवानगी घेऊन जे छोटे छोटे प्रकल्प जर पूर्ण केले तर त्या त्या भागातील क्षेत्र सिंचित होईल आणि स्थलांतर वाढणार नाही. दुर्दैवाने याही बाबीकडे सरकारने लक्ष दिले नाही. 1800 कोटी रुपयांमध्ये 18 टीएमसी पाणी उपलब्ध करण्याचे प्रकल्प होऊ शकतात. माननीय अर्थमंत्री महोदय आपण यासाठी निधी उभारावा. आपण मनात आणले तर हे करु शकता याची आम्हाला जाणीव आहे. त्यामुळे मराठवाड्यावरील दुष्काळाचे सावट आणि त्याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी उपयोगी ठरु शकतात. हे प्रकल्प दीड ते दोन वर्षात पूर्ण होऊ शकतात. यासाठी आपण निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. या दुष्काळी परिस्थितीमुळे स्थलांतराचे प्रमाण पुष्कळ वाढले आहे.

अध्यक्ष महोदय, माणसाला जगण्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा या जशा मूलभूत गरजा आहेत, तसेच विकासाचे मापदंड मोजले जाते ते पाणी, वीज आणि सडक तसेच जगण्याचा दर्जा मोजावयाचा असेल तर शिक्षण आणि आरोग्य हे मापदंड आणि इंडिकेटर अतिशय महत्वाचे

3......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षिरसागर......

असतात. सर्व शिक्षा अभियानंतर्गत आपण निधीची तरतूद पाहिली आणि आरोग्यासाठीची तरतूद पाहिली तर मुंबई महापालिकेची आरोग्यासाठी आपल्यापेक्षा दुप्पट तरतूद आहे. आपल्या 11.5 कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रामध्ये त्यापेक्षा 50 टक्के तरतूद कमी केली.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी सुध्दा विचारणा केली की, आरोग्य विभागाची मागच्या वर्षीची तरतूद का खर्च करण्यात आली नाही. हायकोर्टाने सुध्दा दुष्काळाच्या बाबतीत आणि दुष्काळी गावे घेण्याबाबतीत विचारणा केली आहे, आत्महत्या का होतात याचीही विचारणा केली आहे. या बाबतीत सतर्क राहणे आवश्यक आहे. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी मंत्रिमंडळ मराठवाड्यात आले आणि सर्व मंत्र्यांनी वाटून तालुके आणि जिल्ह्यांची पाहणी केली. आमच्या बीड तालुक्याच्या वाट्याला सन्माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार साहेब आले होते. तालुक्यामध्ये ते ठिकठिकाणी फिरले. त्यांना देखील लक्षात आले असेल की येथील तीव्रता किती आहे आणि त्यामुळे स्थलांतर किती प्रमाणात होत आहे. हाताला काम मिळत नाही म्हणून माणसे कच्चेबच्चे सोडून, शेती सोडून पुण्या-मुंबईकडे यायला लागले आहेत. एक स्थलांतर झाले तर पुढची पिढी बरबाद होते. आपल्याला हे स्थलांतर रोखायचे असेल तर त्या त्या भागामध्ये मनरेगाची कामे ही मोठ्या प्रमाणात काढणे आवश्यक आहे. 1971 साली महाराष्ट्रात जो कडकडीत दुष्काळ होता, त्या वर्षी मराठवाड्यातल्या एका जिल्ह्यामध्ये 1 लाख मजूर कामावर होते. एकएका जिल्ह्यामध्ये एक-एक लाख मजूर होते. सगळ्यांना वेळेवर मजूरी मिळायची. कामाचे दाम मिळायचे. महाराष्ट्रात आज काय चित्र आहे, मनरेगाची आकडेवारी पाहिली तर मराठवाड्यातल्या 8 जिल्ह्यामध्ये आज 50 हजाराच्या वर मजूर नाहीत. बीड जिल्ह्यामध्ये 12 हजार मजूर आहेत. कुठल्याही गावात गेले तर आपल्याला लक्षात येईल की, शेतकरी मजुरीवर जाण्यासाठी तयार आहेत. सन्माननीय वित्तमंत्री महोदय आम्ही आपल्याला आपण म्हणाल त्या कुठल्याही एका गावामध्ये प्रायोगिक स्तरावर नेणार होतो. दवंडी दिली जाते आणि 200 लोक जमा होतात आणि ते सांगतात की आमच्या हाताला काम पाहिजे. फक्त त्याला शाश्वती आणि हमी पाहिजे आहे. परंतु या नरेगामधील किचकट आणि जाचक अटींमुळे आपण मजुरी देऊ शकत नाही. अनेक ठिकाणी जॉब कार्ड वाटली आहेत. पण त्यांचा काही फायदा होत नाही. जेथे एक एक लाख कामे दिली पाहिजेत, त्यासंबंधी आता साखर कारखान्याचे पट्टे पडतील. साधारणतः एप्रिल, मेमध्ये सर्व मजूर

4.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षिरसागर......

परत येतील. बीड जिल्हा हा मजूरांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. साधारणतः अडीच लाख लोक हंगामी स्थलांतर पोटापाण्याची खडगी भरण्यासाठी करतात. ते परत आल्यानंतर मराठवाड्यात हाताला काम मागणाऱ्यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यासाठी आताची नरेगा योजना कुचकामी ठरणार आहे. यासंबंधी आम्ही मुख्यमंत्र्यांनाही भेटलो आहोत. मागेही आग्रह केला होता की, आपण या 14 जिल्ह्यांमध्ये दुष्काळ संपेपर्यंत जुनी रोजगार हमी योजना आणि त्याचे निकष आहे तसेच लागू केले तर काही तरी मार्ग निघेल. अन्यथा स्थलांतराचे प्रमाण दुर्दैवाने खूप मोठ्या प्रमाणात वाढेल.

अध्यक्ष महोदय, मी अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याच्या संबंधी बोलत होतो. खायला अन्न लागते आणि ते शेतात पिकले नाही, सरकारने अन्न सुरक्षा योजना सुरू केली, सरकार थोडेसे उदार झाले आणि जेवढे शेतकरी असतील त्यांच्याकडे रेशनकार्ड नसले तरी 7/12 वर 2 रुपये किलोने गहू आणि 3 रुपये किलोने तांदूळ देऊ अशा प्रकारची भूमिका घेतली, त्याबद्दल सरकारला मी धन्यवाद देतो. परंतु ग्रामीण भागात असलेला जो शेतमजूर आहे, ज्याच्याजवळ शेती नाही, त्याची अवस्था अतिशय बिकट आहे. शहरामध्ये जो बांधकामावरील मजूर आहे, असंघटित कामगार आहे आणि ज्याला कुठलेही उत्पन्न मिळत नाही आणि पाणी नसल्यामुळे शहरातील सर्व बांधकामे बंद आहेत.

यानंतर BB-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर ..........

जशी अन्न सुरक्षा योजना शेतकऱ्यांसाठी सुरु केलेली आहे. तशी दुष्काळ संपेपर्यंत कमीत कमी या सगळ्या मजूरांकरिता जगण्याकरिता धान्य मिळेल अशाप्रकारची योजना सुरु करावी अशी आग्रहाची विनंती करतो. याठिकाणी शिक्षणाबाबत सांगणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षणाच्या 5 लाख शाळा महाराष्ट्र राज्यामध्ये आहेत. यातील बऱ्याच शाळा मोडकळीस आलेल्या आहेत याची कुठलीही खबरबात या अर्थसंकल्पामध्ये नाही. अंगणवाडी सेविकांचा विमा काढण्याचे म्हटले आहे. पण अंगणवाडी सेविकांच्या मागणीच्या पूरक आहाराचे 6-6 महिने बीले जात नाहीत. अनेक ठिकाणी कुपोषण आहे. आज सर्वे नुसार राज्यातील कुपोषणाची संख्या 50 हजार कुटूंबे कुपोषित आहेत. पालघर तालुक्यामध्ये 6 हजार कुटूंबे कुपोषित आहेत अशाप्रकारचा सर्वेक्षण आलेला आहे. काही दिवसांपूर्वी सुरेश वाकोडे नावाच्या आदिवासी माणसाने खायला अन्न मिळत नाही म्हणून आपले अधिवेशन सरु व्हायच्या आदल्या दिवशी आत्महत्या केलेली आहे. हा भूकबळी गेलेला आहे. सकाळी चूल पेटली तर संध्याकाळी चूल पेटेल की नाही याची भ्रांत या लोकांना नसते अशा लोकांना मदत करणे गरजेचे आहे. राज्यामध्ये 50 हजार कुटूंबे कुपोषित असताना एकाही शब्दाचा अर्थसंकल्पामध्ये मदतीच्या बाबतीत उल्लेख झालेला नाही. फक्त वारली कला जोपासण्यासाठी वारलीहाट करु असे सांगितले. परंतु वारलीहाटमध्ये उत्पादन करणाऱ्या माणसांचे हात जगले नाही तर वारलीहाट चालवणार कोण? कुणासाठी वारलीहाट आहे. त्यामुळे कुपोषणाच्या बाबतीत जास्तीत जास्त संवेदनशील राहणे गरजेचे आहे एवढेच यानिमित्ताने सांगतो.

अध्यक्ष महोदय, खर्चावरील राज्याची पिछाडी आणि उत्पन्न वाढीवरील मर्यादा याची जाणीव अर्थमंत्र्यांनाही आहे. आपल्यापेक्षा लहान लहान राज्यांमध्ये त्यांच्या वार्षिक योजनेचे आकारमान हे महाराष्ट्र राज्यापेक्षा अधिक आहे. तेलंगणासारखे छोटे राज्य आता गठित झाले. या राज्याचे वार्षिक योजना आकारमान 67 हजार 630 कोटी रुपये आहे. आपले 57 हजार कोटीच्या आसपास आहे. तेव्हा याकडे लक्ष देण्याची गरज आहे. उत्पन्नाची साधने वाढविण्याच्या बाबतीत एक गोष्ट अर्थ मंत्री महोदयांना याठिकाणी मुद्दाम सांगू इच्छितो की, 28 हजार कोटी रुपयांचा कर त्यापैकी 24 हजार कोटी रुपये कर पात्र लोकांकडून यायचा राहिलेला आहे. कर वसूलीकरिता कारवाई का

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर ..........

होत नाही. जोपर्यंत उत्पन्नाची साधने वाढविणार नाही. अभय योजना आणली पण मागच्या वर्षी काय झाले. मागच्या वर्षी वसूलीच्या बाबतीत काय प्रयत्न झाले. राज्याचा आर्थिक स्त्रोत वाढविण्याबाबत काय प्रयत्न झाले, याची माहिती जर आम्हाला मिळू शकली तर चांगले होईल. नको तो खर्च ओढवून घेतलेला आहे. एलबीटी माफ केला, टोल माफ केला. सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील वजनदार मंत्री आहेत म्हणून त्यांच्याकरिता टोल माफ करण्यात आला. बाकी ठिकाणी टोल चालू आहेत तेथील टोल माफीचे काय? टोल संदर्भात आनंद कुलकर्णी समिति स्थापन करण्यात आली होती. आनंद कुलकर्णी गेले आणि त्यांचा अहवालही आला आणि मग बाकी ठिकाणचा टोलमाफ का होत नाही याचे उत्तरही माननीय मंत्री महोदयांनी देणे आवश्यक आहे. आपली घोषणा होती, टोलमुक्त महाराष्ट्र आता टोलयुक्त महाराष्ट्र अशी घोषणा सुरु झाली. जे काम हाती घेतले जाते ते पी डीपीडी मॉडेलवर घेतले जाते.

अध्यक्ष महोदय, शेतकरी स्वाभिमान योजना याठिकाणी जाहीर केली. पाणी, वीज, सडक याबाबतीत मागण्या मांडल्या. शेवटी आमदार फंडाच्या बाबीवर मी बोलणार आहे. महागाई वाढलेली असल्यामुळे आमदार फंडाची मर्यादा वाढविण्यात यावी. निर्देशांक वाढलेला आहे, दोन कोटी रुपयांमध्ये सध्या कामे होत नाहीत. आमदार फंडाची तरतूद 5 कोटी रुपये करण्यात यावी अशी माझ ी मागणी आहे. विकासात्मक कामावर हा खर्च करणार आहोत. त्यामुळे दोन्ही बाजूच्या सर्व सदस्यांची मागणी आहे की, आमदार फंडाची मर्यादा वाढवून देण्यात यावी. दुसरी बाब म्हणजे शेततळी करण्याकरिता मागेल त्याला शेततळी ही चांगली घोषणा केली. पण प्रत्यक्षात जमिनीवर गेल्यावर 30.30 चे शेततळे परवडत नाही. हे शेततळे जोपर्यंत 60.60 चे होत नाही आणि एक लाख रुपयांची सबसिडी मिळत नाही. तोपर्यंत शेततळी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर घेतली जाणार नाहीत. शेततळी वाढली तर सिंचनाचे क्षेत्र वाढेल हे होणे शक्य नाही.

अध्यक्ष महोदय, दुसरी गोष्ट अशी की, खासदार फंडाचा निधी जसा बीडीएसला राहतो त्याप्रमाणे आमदार फंडाचा निधी 31 मार्च संपल्यांनतर वित्त विभागाला जमा होतो. परत जिल्हाधिकाऱ्याकडे यायला 4-4 महिने लागतात. खासदार फंडाचा निधी जसा 5 वर्षापर्यंत

........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर ..........

बीडीएसला राहतो. तशा प्रकारची तरतूद माननीय अथमंत्र्यांनी करावी एवढी आग्रहाची विनंती करतो. ज्या बाबींचा मी उल्लेख केला. विशेषतः टंचाई, दुष्काळ, स्थलांतर, अन्न, मजूर, बांधकाम मजूर, शेतमजूराला याठिकाणी दोन रुपये आणि तीन रुपये धान्य देणे. सर्वात महत्वाचे म्हणजे 100 टक्के कर्जमुक्त करणे आणि 100 टक्के वीज बील माफी करण्यात यावी. यंदा "दे दान फिटे ग्रान" म्हणून टाका. महाराष्ट्रात जगणे महाग आणि मरणे स्वस्त झालेले आहे ही चर्चा सगळीकडे झ ालेली आहे. अधिक पैसा लागणार नाही, 15-20 कोटीच्या आसपास होईल. पण त्यामुळे संपूर्ण कर्जमाफी होईल. वीज बील माफ होईल तेवढे औदार्य दाखवा. शेतकऱ्यांचा अर्थसंकल्प आहे असे म्हणतात. शेतकऱ्यांचा स्वाभीमान जागा ठेवायचा म्हणतात तर मरणाऱ्या शेतकऱ्याला वाचविण्यासाठी आणि सातबारा कोरा करण्यासाठी शासनाने निश्चित काहीतरी धोरण आखावे आणि तशी घोषणा करावी. धन्यवाद.

--------

........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जयकुमार रावल (सिंदखेडा) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत क्रांतीकारी असा अर्थसंकल्प माननीय अर्थमंत्र्यांनी मांडला त्याचे अभिनंदन करण्याकरिता मी याठिकाणी उभा आहे. राज्य सरकारचा यावर्षीचा अर्थसंकल्प म्हणजे शेती आणि शेतकरी यांना केंद्रबिंदू मानून तयार करण्यात आलेला आहे. कृषी क्षेत्रासाठी अनेक भरीव तरतूदी यामध्ये करण्यात आल्या. अलीकडच्या काळामध्ये केंद्र सरकारने देखील आपला अर्थसंकल्प सादर केला आणि त्याच्यामध्ये सुध्दा कृषी ग्रामविकास तसेच पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर दिला. यासंदर्भात महाराष्ट्र सरकारने एक पाऊल पुढे टाकत 25 हजार कोटी रुपयांची तरतूद कृषी आणि कृषीसंदर्भात केली. किंबहूना सन 2016 हे शेतकरी स्वाभिमानी वर्ष साजरे करण्याचा संकल्प महाराष्ट्र सरकारने केला. मला असे वाटते की, महाराष्ट्राच्या इतिहासामध्य असे घडले नव्हते. माननीय अर्थमंत्र्यांनी भाषण सुरु करीत असताना हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांना समर्पित आहे ही भावना त्यांनी व्यक्त केली. यामुळे महाराष्ट्रामध्ये नवचैतन्याचे वातावरण निर्माण झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, सातत्याने 15-16 महिन्याचे राज्य करणारे सरकार आहे. मागचे 15-16 वर्षे राज्य करणारे लोक हे सरकार कोणाचे आहे, उद्योगपतींचे आहे का, सुटबूटच्या लोकांचे आहे अशाप्रकारची विचारणा करीत होते. पण मला त्यांना सांगायचे आहे की, हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी मांडून त्यांना चपराक देण्याचे काम माननीय अर्थमंत्र्यांनी केले. खरे तर शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय अवघड आहे. या महाराष्ट्रामध्ये हरित क्रांती झाली, सहकार आले.

CC-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार रावल.........

महाराष्ट्रातील शेतकरी सातत्याने आत्महत्या करीत आहे ही चिंतेची बाब आहे. शेतकरी आज आत्महत्या करत असेल तर त्याचे नियोजन दोन तीन दशकापासून चुकल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून आजचा हा काळा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये आला. शेतक-यांचे जीवन सुखकर करायचे असेल तर अनेक उपाययोजना करणे गरजेचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय अर्थमंत्र्यांनी हाच विचार करुन सदर अर्थसंकल्प सादर केलेला आहे. शेतक-यांना कोठेतरी स्वाभीमान देण्याची, ताकद देण्याची गरज आहे. इनपुटच्या संदर्भात मदत करण्याची गरज आहे. म्हणून निरनिराळया माध्यमातून त्यांना उभे करण्याचे काम करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती अशी झाली की, आज वकिलाचा मुलगा आहे. तो लॉ फर्मचा मालक असेल तर वकिलाचा मुलगा वकील होईल, डॉक्टरचा मुलगा वडिलांचे हॉस्पिटल सांभाळेल. बॉलिवूडच्या कलाकाराचा मुलगा फिल्म इंडस्ट्रीमध्ये जाईल. एखादा मोठा शेतकरी असेल, त्याचा मुलगा काय करेल असे विचारले तर त्याला सुध्दा धाडस होत नाही. मी माझ्या वडिलांसारखा शेतकरी होईल व शेती करील असे म्हणत नाही. आज शेतक-यांची परिस्थिती वाईट आहे म्हणून त्या शेतक-याला उभे करण्याचे काम करावे लागेल. सर्व प्रकारचे नियोजन करावे लागेल. एका अर्थसंकल्पामध्ये हे काम करता येणार नाही. अगोदरच राज्यावर कर्ज आहे. त्याचा एक मोठा प्रयत्न, त्याचे एक मोठे पाऊल टाकण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पामधून माननीय अर्थमंत्री महोदयांनी केला.

अध्यक्ष महोदय, जर शेती करायची असेल तर पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे. मागच्या काळामध्ये 1000 कोटी रुपयांचा सिंचनाचा घोटाळा पाहिला आहे. मागच्या काळात नियोजन शुन्य कारभार चालला. किती तरी प्रकल्प चालू केले. आमचे सहकारी म्हणत होते की, 1 लाख कोटी रुपयांचे कर्ज घेतले पाहिजे. 1 लाख कोटी रुपयांचे जरी कर्ज घेतले तरी आपले सिंचन प्रकल्प पूर्ण होणार नाहीत. सन 2014 मध्ये सरकार सत्तेवर आले. त्यावेळी दुष्काळाचे सावट होते, तिजोरी रिकामी होती. महाराष्ट्राच्या सरकारने जलयुक्त शिवार नावाची योजना काढली. या योजनेच्या माध्यमातून 5 वर्षामध्ये 2500 गावांना दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला. सुरुवातीला काही हजार कोटी रुपयांची तरतूद केली. वर्षभरामध्ये 24 टी.एम.सी. पाणी उपलब्ध झाले. जवळपास 6

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार रावल.........

लाख हेक्टरला जमिनीला योजनेच्या माध्यमातून फायदा झाला. शाश्वत सिंचन ही समृध्दीकडे वाटचाल आहे असा विचार माननीय मुख्यमंत्र्यांनी केला. मुख्यमंत्र्यांनी केवळ विचार केला नाही तर त्याचा अंमल देखील केला. अंमल केलाच नाही तर शेतापर्यंत जाऊन अनेक ठिकाणी ही योजना व्यवस्थित चालली का ? ते पाहण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीच्या काळात योजना आली या योजनेवर विरोधी बाकांवरुन टिका झाली. ज्यावेळी ही योजना यशस्वी झाली. त्यावेळी आम्हीच ही योजना केली होती. हे श्रेय घेण्यासाठी ते सुध्दा पुढे आले. राज्यासमोर अनेक संकटे आहेत. या संकाटातून शेतकऱ्यांना दिलासा द्यायचा असेल तर सिंचनाचा मार्ग काढला पाहिजे म्हणून या अर्थसंकल्पामध्ये अनेक तरतूदी केल्या. एक लाख शेततळी करण्याचा संकल्प यावर्षी महाराष्ट्र सरकारने केला. 50 हजार रुपयांचे मागेल त्याला शेततळे देण्याचा संकल्प केला. 37500 विहिरी करण्याचा संकल्प केला. एक लाख विहिरी महाराष्ट्रामध्ये करुन 5 लाख एकर जमीन दुष्काळामधून काढून ती बागायती करण्याचा संकल्प केला. विहिरी तयार झाल्यानंतर त्यांना इलेक्ट्रीसिटी मिळाली पाहिजे. म्हणून 90 हजार विद्युत पंप जोडण्याचे उद्दिष्ट अर्थसंकल्पामध्ये ठरविण्यात आले. सिंचनाकरिता कमी बजेट आहे. त्या बजेटमधून जवळपास 10 हजार कोटी रुपये यावर्षी सिंचनासाठी उपलब्ध होणार आहे. सिंचनामध्ये 7850 कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारच्या माध्यमातून आणि पंतप्रधान सिंचन योजनेच्या माध्यमातून 2080 कोटी रुपयांची तरतूद होणार आहे. राज्य व केंद्राचे सरकार नवीन आहे. त्यांनी एखादी योजना घेतली तर त्याचा परिणाम आजच दिसेल, उद्या दिसेल असे होऊ शकत नाही. अनेक योजना केंद्राच्या माध्यमातून व राज्याच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न केला आहे. युतीच्या सरकारमध्ये 21 हजार कोटी रुपये कृष्णा खो-यावर खर्च केले. नॅशनल क्लस्टरचे 21 हजार कोटी रुपये त्याकाळामध्ये खर्च केले. आता नॅशनल क्लस्टरच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून विदर्भ आणि खांदेशमध्ये तापी खोऱ्याचा विकास करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. नवीन प्रकल्प क्लस्टर योजना ही नॅशनल प्रोजेक्ट म्हणून घेण्याचा संकल्प केला. तशा प्रकारचा प्रस्ताव तयार करण्याचे काम होत आहे. विदर्भ रिझनमध्ये भूसंगी बॅरेज असेल, अकोल्याचे पूर्ण बॅरेज असेल, बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव प्रकल्प असेल य

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार रावल.........

सर्व प्रकल्पांच्या माध्यमातून एक लाख हेक्टर जमीन बागायती होणार आहे. तापीमध्ये जळगावचे बोधवड, जळगावचे शेगाव बॅरेज, जळगावचे लोअर तापी असेल अशा प्रकारे दोन ते सव्वादोन लाख हेक्टर क्षेत्र बागायत करण्याचा संकल्प केला. या क्लस्टर नॅशनल प्रोजेक्टमध्ये लोअर तापीच्या पुढे धुळे जिल्ह्यातील सुलवाडे जामफड प्रकल्पाला केंद्र सरकारने क्लेअरन्स दिलेला आहे. या प्रक्लपाच्या माध्यमातून दिड लाख एकर जमीन बागायती होणार आहे. त्याचा सुध्दा यामध्ये समावेश करण्यात यावा अशा प्रकारची मागणी या निमित्ताने करु इच्छितो. शेती संदर्भात पिण्याच्या पाण्याची किंवा शेतापर्यंत पाण्याची व्यवस्था झाल्यानंतर अनेक गोष्टी त्याला लागणार आहेत. माननीय कृषी मंत्र्यांनी जाहीर केले आहे की, शेतीसाठी इनपूट बीयाने, खते, औषधे असतील यांचा भाव 5 वर्षासाठी स्थिर ठेवला जाईल. हा फार मोठा निर्णय आहे. शेतीसाठी लागणा-या या सर्व गोष्टींचा भाव वाढणार नाही त्याला स्थिर ठेवण्याचे काम करण्यात येईल. तसेच त्याचा आऊटपुट वाढविण्याचा प्रयत्न होणार आहे.

अध्यक्ष महोदय, एकदा पाणी शेतापर्यंत आले की, पैशांची गरज पडते. जिल्हा बँकांची परिस्थिती काय झाली ते आपण पाहिले. मागच्या काळामध्ये जवळपास 400 कोटी रुपये देऊन तीन जिल्हा बँकांना उभे करण्याचे काम राज्य सरकारने केले. शेतीसाठी अल्प दराने पीक कर्ज देण्यासाठी जवळपास 100 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. केंद्र सरकारने असे ठरविले आहे की, पुढच्या 5 वर्षामध्ये 9 लाख कोटी रुपयांचे कर्ज शेतक-यांना देऊन शेतक-याचे उत्पन्न कसे वाढेल. अशा प्रकारचा प्रयत्न पुढच्या काळामध्ये होणार आहे. आपल्याला माहीत आहे की डाळीबाबत प्रश्न निर्माण झाला होता. मागच्या 20 ते 25 वर्षामध्ये कडधान्याबाबत राज्यात कुठल्याही प्रकारचे नियोजन झाले नाही. परंतु डाळींचा प्रश्न सोडविला गेला पाहिजे. म्हणून अर्थसंकल्पाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय कडधान्य यासाइी वर्षभरामध्ये 80 कोटी रुपयांचा नियतव्यय तेलबिया आणि कडधान्याच्या विकासासाठी उभे करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, मघाशी मी कृषी संदर्भात सांगितले की, मी शेतक-याचा मुलगा आहे. मी शेती करेन अशा प्रकारचे कोणी धाडस करीत नाही. कार्पोरेट सेक्टरमध्ये ज्या प्रकारचे नियोजन होते, तशा प्रकारे शेतीला दर्जा देण्याचे काम राज्य सरकारच्या माध्यमातून होत आहे. पंडित दिन दयाळ उपाध्ये कृषी मार्गदर्शन योजना अर्थसंकल्पाच्या माध्यमातून उभी करण्यात आली. शेती

......4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार रावल.........

संदर्भातील कॉन्फरन्स होतील. शेतीच्या बाबतीत विचारांची देवाण-घेवाण होईल. या माध्यमातून शेतीमध्ये जे काही नवनवीन प्रयोग केले जातात त्याची माहिती त्यांच्यासमोर आणली जाईल. दरवर्षी आदर्श शेतक-याला महाराष्ट्र सरकार पुरस्कार देत असते. प्रतिकूल परिस्थितीमध्ये एखाद्या शेतक-यालाही शेती करता येईल, त्याला घाबरण्याचे कारण नाही. यासंबंधीची कृषी गुरुकुल योजना शासनाने आणलेली आहे. आपल्याकडे अनेक गोष्टींचे उत्सव होतात. छोट्या छोट्या गोष्टींसाठी उत्सव केले जातात. त्यात जेवणाचाही उत्सव होतो. परंतु कृषी हा जगातील सर्वात जुना व्यवसाय असल्याने याचाही महोत्सव व्हावा ह्या भावनात्मक उद्देशाचाही विचार केला आहे. अनेक गोष्टींचा ऊहापोह करण्याची गरज आहे. शेती संदर्भात कांद्याचा प्रश्न आहे, कांदा फार फेमस झाला आहे. कांद्याचा थोडासा भाव वाढला की, टी.व्ही. वर त्याची बातमी येते. उत्सवाच्या माध्यमातून, लोकप्रबोधनाच्या माध्यमातून ज्या काही गोष्टी होणार आहेत. एखाद्या 5 व्यक्तींच्या कुटूंबाला दिवसाला 100 ते 200 ग्रॅम कांद्याची आवश्यकता भासू शकते. महिन्याला 10 ते 15 किलो कांदा एका परिवाराला पुरेसा आहे. शेतक-याला कांद्याचा भाव 15 ते 20 रुपये मिळाला तर तो समाधानी आहे. महिन्याच्या बजेटमध्ये 200, 250 किंवा 300 रुपयांचा कांदा हा एवढा वांदा करतो का ? कांद्याचा थोडासा भाव वाढला की त्याच्या बाबतीत चर्चा होते.

DD-1...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार रावल .....

कांद्याचा भाव वाढला तर लगेच त्याची बातमी होती. आम्ही सातत्याने चर्चा करतो की, उत्सव आयोजित करुन लोकप्रबोधनाच्या माध्यमातून काही चांगल्या गोष्टी होणार आहेत. एका घरामध्ये 5 लोकांच्या कुटूंबाला 100-200 ग्रॅम कांदा लागतो. महिन्याला 10-15 किलो कांदा हा एका परिवाराला पुरेसा आहे. आज बाजारात शेतकऱ्याला 15-20 रुपये किलो भाव मिळाला तर तो समाधानी आहे. महिन्याच्या बजेटमध्ये 200-300 रुपयांचा कांदा एवढा वांधा करतो का ? कांद्याच्या भाव वाढला तर त्याबाबत लगेच चर्चा का होते. त्यामुळे त्यातून शेतकऱ्यांच्या कांद्याचा भाव पडत असतो. त्यामुळे यावरसुध्दा विचार करण्याची गरज आहे की, शेतीतील प्रॉडक्टचे महत्व का आहे ? शेतीविषयक कॉलेज काढण्याचे काम अहमदनगर व बुलढाणा येथे शासन करीत आहे ते स्वागतार्ह आहे. अशा प्रकारचे कॉलेज काढले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे की, हे विभागवार बजेट नसून महाराष्ट्राचे बजेट आहे. खान्देशमध्ये अशी भावना होत आहे की, हे मराठवाडा व विदर्भाचे बजेट आहे. महाराष्ट्रात कृषी विद्यापीठ वेगळे होणे गरजेचे आहे म्हणून धुळे येथे स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापन करणे गरजेचे आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र उत्तर महाराष्ट्राच्या टोकापासून दक्षिण महाराष्ट्राच्या टोकापर्यत म्हणजे कर्नाटक सीमेपर्यत आहे. म्हणून नवीन कृषी विद्यापीठ स्थापन करणे गरजेचे आहे. धुळे येथील कृषी महाविद्यालयाकडे 1000 एकर जमीन आहे, 700 कोटीची मालमत्ता आहे, 30 हजार पुस्तकांचे ग्रंथालय आहे. तेथे सर्व प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर असल्यामुळे नवीन विद्यापीठ धुळे जिल्हयाला मिळण्याची मागणी आहे. शेतीबरोबर झाले पाहिजेत. याचा विचारही पुरक व्यवसाय मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन सुरु बजेटमध्ये आला. करण्याचा शासनाचा विचार आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून आता 70 वर्षे होत आहेत. महिलांकरिता हायवेवर स्वच्छतागृहे नसतात हा तसा लहान विषय आहे पण याचाही राज्य सरकारने विचार केलेला आहे. सरकारवर सातत्याने टीका होत असते. आपण पाहतो की, महाराष्ट्रात 3-4 वर्षांपासून दुष्काळ आहे. दुष्काळी परिस्थितीमध्येही महाराष्ट्राचा विकासदर वाढत आहे याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. 2011-12 ते 2013-14 मध्ये आघाडी सरकारवेळी

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार रावल .....

विकासदर 6.6 टक्के होता. आताच्या दुष्काळी परिस्थितीत, कर्जबाजारीपणामध्येही मॅन्युफॅक्चरींग व सर्व्हिस सेक्टरच्या जोरावर हा विकासदर 8 टक्क्यापर्यंत आला आहे. समाजाच्या सर्व घटकांना घेऊन हा अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे. माझी विनंती आहे की, सर्व विभागांना योग्य न्याय देणारा अर्थसंकल्प झाला पाहिजे. जीडीपीमध्ये व विकासदरामध्येही सुध्दा वाढ झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मागील काळात लोडशेडींग, महागाई हे मुद्दे सातत्याने चालू होते. या अधिवेशनात लोडशेडींगचा विषय येत नाही. कारण हा विषय आमच्या सरकारने चांगल्या प्रकारे हाताळला आहे. युपीएच्या काळात महागाई अगदी गगनाला भिडली होती. महागाई निर्देशांक 9.6 टक्के होता. माननीय श्री.नरेंद्र मोदींचे सरकार आल्यानंतर 5.4 टक्क्यापर्यंत हा निर्देशांक पोहचला आहे. विरोधी पक्षाने या बजेटवर केलेल्या टिकेवर मला एवढेच म्हणावयाचे आहे की, ‘कहां गए, कहां गए, अच्छे दिन कहां गए ? आ गए आ गए अच्छे दिन आ गए.” एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रमेश लटके : अध्यक्ष महोदय, गेली 4 दिवस मरोळ पोलीस कॅम्प व वरळी पोलीस कॅम्प येथील पोलीस कर्मचाऱ्यांचे कुटूंबिय आझाद मैदान येथे विविध मागण्यांसाठी उपोषण करीत आहेत. पुढील चार दिवस विधिमंडळाला सुट्टी असल्यामुळे तेथे ज्या पोलीस कर्मचाऱ्यांचे कुटूंबिय उपोषणाला बसलेले आहेत त्यांची त्वरीत दखल घ्यावी. त्यांच्या मागण्या ऐकून घ्याव्यात व त्यांचे उपोषण सोडवावे अशी मी आपणास विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष** : याबाबत शासनाने लक्ष द्यावे.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....4

श्री.उदय सामंत (रत्नागिरी) : अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्री श्री.सुधीर मुंनगंटीवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाबाबत मी त्यांचे कौतुक करतो. मी सदनाचा जास्त वेळ घेणार नाही. हा शेतकऱ्यांसाठीचा अर्थसंकल्प असून तो शेतकऱ्यांसाठी मांडलेला आहे. शेतकऱ्यांमुळे आम्ही सर्व जण सदनामध्ये आहोत याची देखील जाणीव आमच्या सारख्या सर्व आमदारांना आहे. परंतु सांगण्यास खंत वाटते की, या अर्थसंकल्पात शेतकरी केंद्रबिंदू ठेवल्यामुळे माननीय मुख्यमंत्री, माननीय अर्थमंत्री व मंत्रिमंडळातील सदस्यांचे मी अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य डॉ.पतंगराव कदम मला म्हणाले की, तू दोन दिवसानंतर सभागृहामध्ये दिसत आहेस. त्याचे कारण हे होते की, अर्थसंकल्पातील कोकण मी शोधत होतो. अर्थसंकल्पातील कोकण मला आज 30 कोटीच्या रुपाने दिसला आहे. माननीय अर्थमंत्री हे आमचे जेष्ठ सहकारी आहेत. मी येथे कोकणाबाबत ज्या मागण्या करेल त्या आपण आपल्या भाषणात पूर्ण कराल अशी आशा बाळगतो. आपण अर्थसंकल्पात ग्रामपंचायती सक्षम करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. ग्रामपंचायतीला विकासात्मक ताकद देण्याचा आपण निर्णय घेतला आहे तो नक्की कौतुकास्पद आहे पण त्याची पार्श्वभूमी बघणे गरजेचे आहे. माननीय ग्रामविकास मंत्री सभागृहात आहेत, ग्रामविकास खात्याने सरपंचाचे अधिकार काढून घेतलेले आहेत. सरपंचाचे घरदुरुस्तीचे व घरबांधणीचे अधिकार काढून घेतलेले आहेत व हे अधिकार आता महसूल खात्याला दिलेले आहेत. हे सरपंच व महसूल खात्यालाही कळाले नाही म्हणून नगर रचनाकारांनी त्याच्या परवानग्या द्याव्यात अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. जर आपणास खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती सक्षम करावयाच्या असतील तर पूर्वीप्रमाणेच ग्रामपंचायतीच्या सरपंचानेच काही निर्णय घेतले पाहिजेत. सरपंचाचे हे निर्णय अबाधीत राहिले पाहिजेत हे मला अर्थसंकल्पाच्या निमित्ताने मांडावयाचे आहे. शासनाने पर्यटनाचा देखील विचार केला असून त्याचे मनापासून कौतुक करतो. पण रत्नागिरी जिल्हयाचा पर्यटन आराखडा हा फक्त 536 कोटी रुपयांचा आहे. एका जिल्हयाचा पर्यटन आराखडा पूर्ण करावयाचा असेल तर 536 कोटी रुपये लागतात. जिल्हाधिकारी यांनी केलेला पर्यटन आराखडा पूर्ण करावयाचा असेल तर किती हजार कोटी रुपये लागतील हे समजणारे माननीय अर्थमंत्री आहेत. या रकमेमध्ये मोठी वाढ करुन देणे गरजेचे आहे. आपण किनारपट्टीकरिता फक्त 30 कोटी

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उदय सामंत.....

रुपये दिलेले आहेत. यामध्ये पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे आहेत. बजेटचे पुस्तक वाचेपर्यंत मला असे वाटत होते की, कोठेतरी शुन्याची गल्लत झालेली आहे. 30 वर एक शुन्य द्यायचा राहिला आहे, पण आज माझी पूर्ण खात्री झाली की, या करिता फक्त 30 कोटी रुपये दिलेले आहेत. यामध्ये प्रामाणिकपणे वाढ करण्याची गरज आहे. आपण पालकमंत्री यांच्या नावाने पांदण विकास योजना नव्याने सुरु केलेली आहे. कोकणातील वाटांना गोवंड म्हणतो तो 3 फुटाचा असतो. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या भागात पांदणला आपण गोवंड म्हणतो. आपण अर्थमुव्हींग मशीनरी घेणार आहात. परंतु जेसीबी मशीन घेऊन या 3 फुटाच्या रस्त्यावर आपण जाऊ शकणार नाही. याचा वेगळा विचार करुन कोकणात गोवंड तयार करण्यासाठी कोणती मशीनरी पालकमंत्री यांच्या समितीने विकत घेतली पाहिजे हा विचार आपण करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पात रस्त्यासाठी निधी दिलेला आहे, मुख्यमंत्री सडक योजना आपण जाहीर केलेली आहे. आज निम्म्या कोकणामध्ये ही कामेच सुरु होऊ शकत नाहीत. कारण तेथे खडीचे, वाळूचे, चिरेखाणीचे प्रश्न आहेत. गौणखनिजाचा आमचा प्रश्न निम्मा सुटलेला आहे, निम्मा सुटायचा आहे. आम्ही कोकणातील सर्व आमदारांनी दोन वेळा माननीय मुख्यमत्री यांचीदेखील भेट घेतलेली आहे. इको सेन्सेटीव्ह झोनचा मोठा प्रश्न कोकणात निर्माण झालेला आहे तो शासनाने सोडविल्याशिवाय कोकणातील कामे सुरु होणार नाहीत याबाबत अर्थमंत्री महोदयांनी नोंद घ्यावी अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, लोकमान्य टिळकांच्या स्वराज्य माझा जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळवणार या वाक्याला 100 वर्षे पूर्ण होत आहेत. माननीय अर्थमंत्री हे रत्नागिरीचा या निमित्ताने उल्लेख करतील असे मला वाटले होते. माझी विनंती आहे की, लोकमान्य टिळकांचे स्मारक आपण पाहिले तर लक्षात येईल की, त्याची किती हालाखीची परिस्थिती आहे. त्याचे कारण सरकार आहे असे मी म्हणणार नाही. परंतु पुरातत्व खाते तेथील एकाही कौलाला हात लावू देत नाही. म्हणून पुरातत्व खात्याची परवानगी घेऊन किमान 5 कोटी रुपये या स्मारकाला दिले तर खऱ्या अर्थाने आपण त्यांचे वाक्य अंगीकारतो आहे असे वाटेल.

यानंतर इइ-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उदय सामंत......

ते कुठेतरी शासन अंगिकारत आहे, असा वेगळा संदेश महाराष्ट्रात व देशात जाईल. शासनाने याकरिता अधिक निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र सरकारने नळ पाणी पुरवठा योजना तयार केलेली आहे. महाराष्ट्रातील पाणी टंचाईचा विचार करता या योजनेकरिता दिलेला निधी व योजनेंतर्गत असणारी कामे यामध्ये तफावत आहे. ही तफावत दूर करण्याकरिता अधिकचा निधी देणे आवश्यक आहे. आज राज्यात 4.5 ते 5 हजार नळ पाणीपुरवठा योजना बंद अवस्थेत आहेत. त्यांना चालना देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय पेय जल योजना राज्यात निधीअभावी कार्यान्वित होत नाही. ही योजना कार्यान्वित करण्याकरिता व नळ पाणीपुरवठा योजना चालू करण्याकरिता शासनाने आवश्यक तो निधी द्यावा.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये म्हणजेच रत्नागिरी जिल्हयामध्ये महिलांकरिता असणारे सर्वात पहिले रुग्णालय आहे. याच्या कामाला आता सुरुवात झालेली आहे. परंतु पुढील कामाकरिता निधी मिळत नाही. निधीअभावी हे रुग्णालय बंद पडले तर कोकणातील समस्त महिलांवर हा एक फार मोठा अन्याय ठरेल. या रुग्णालयाकरिता आवश्यक तो निधी शासनाने दिला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मत्स्यव्यवसायाकरिता शासनाने खूप मोठी तरतूद केलेली आहे. आज कोकणातील मत्स्यव्यवसाय ठप्प झालेला आहे. या संदर्भात देखील कोकणातील पुढा-यांनी माननीय मुख्यमंत्री व माननीय महसूलमंत्री यांची भेट घेतलेली आहे. शासनाच्या एका अध्यादेशामुळे मिनी पर्ससीन व मोठे ट्रॉलर्स बंद पडलेले आहेत. हा अध्यादेश चुकीचा आहे की बरोबर आहे, या वादात मला पडायचे नाही. पारंपारिक मच्छिमार जगला पाहिजे, असे आम्हालाही वाटते. परंतु शासनाच्या पैशाने ज्या मच्छिमारांनी मिनी पर्ससीन जाळे व मोठे ट्रॉलर विकत घेतलेले आहे, ते चालल्याशिवाय या खात्याचे काम व व्याप्ती वाढविण्यासंबंधी निर्णय घेण्यात येत आहेत. असे अध्यादेश काढले तर या विकासाला काहीही अर्थ उरणार नाही. मुंबई आणि सिंधुदूर्ग किना-यावर हजारो बोटी किना-याला लागलेल्या आहेत. मंत्रिमंडळामध्ये हा निर्णय लवकर घेणे गरजेचे आहे. मच्छिमारांचा धंदा व युवकांचा रोजगार चालू राहील, याकरिता शासनाने यातून मार्ग काढावा.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उदय सामंत......

अध्यक्ष महोदय, आमच्या जिल्हयामध्ये माननीय मुख्यमंत्री यांनी तीन-चार महिन्यांपूर्वी दौरा केला होता. या दौ-याचे औचित्य माझ्या मतदारसंघामध्ये कै.शामराव पेजे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त महोत्सवाचे होते. बॅ.नागवळी, कै.मधु दंडवते यांच्यानंतर स्व.यशवंतराव चव्हाण यांचा वारसा चालविणारे कै.शामराव पेजे हे होते. कै.पेजे हे केवळ कुणबी समाजाचीच नव्हे तर संपूर्ण कोकणाची अस्मिता मानले जात होते. माननीय मुख्यमंत्री यांनी सांगितले होते की, कोकणातील समाजाला न्याय देण्यासाठी कै.पेजे यांनी अनेक प्रयत्न केले. त्याच पध्दतीने महाराष्ट्राच्या विकासाला दिशा देण्याचे काम कै.पेजे यांनी केलेले आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये बजेटमधून कै.पेजे यांच्या न्यासाकरिता 5 कोटी रुपये देण्यात येतील, असेही त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये सांगितले होते. हा कोकणातील कुणबी समाजाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. हे जे कै.पेजे न्यासाला पाच कोटी रुपये देण्याचे कबूल करण्यात आले होते, ते लवकर देण्यात यावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( कराड-दक्षिण ): अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय सर्वसाधारण चर्चेमध्ये सहभागी होऊन त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रातील जनतेच्या विकासाकरिता व त्यांच्यासमोर असणारे प्रश्न सोडविण्याकरिता अर्थसंकल्प मांडणे हे अतिशय महत्त्वाचे काम आहे. अध्यक्ष महोदय, सन्माननीय अर्थमंत्री हे आपला दुसरा अर्थसंकल्प मांडत आहेत. सुरुवातीला अर्थसंकल्प मांडत असतांना जे काही प्रश्न निर्माण झाले, त्याचा आम्ही उल्लेख केलेला आहे, तो विषय तेथेच संपला होता असे मला वाटले होते. परंतु मी आज वर्तमानपत्रात वाचले की, त्यामध्ये माननीय वित्तमंत्री यांनी असे म्हटलेले आहे की, बजेटच्या कागदांच्या बॅगा घेण्यासाठी गर्दी झाली म्हणून भाषणाची प्रत बॅगेमध्ये ठेवता आले नाही. आमदारांच्या पीए यांना बॅग घेण्याची घाई झाली होती. इतक्या वर्षाच्या अनुभवामध्ये अर्थसंकल्पीय कागदपत्रे ठेवण्यामध्ये इतका मोठा गलथानपणा झाल्याचे मी कधीही पाहिलेले नाही. अंदाजपत्रकाच्या बॅगेमध्ये अर्थसंकल्पीय भाषणाची प्रत नव्हती. त्यानंतर आमच्या स्टाफने इतर संबंधित कागदपत्रे पाहिल्यानंतर काही कागदपत्रेही त्यामधून मिसिंग होते. काल दुपारी 4 वाजता वित्तमंत्री यांनी माननीय अध्यक्षांची परवानगी घेऊन 5-6 पुस्तके सादर केली. नियम पुस्तिकेप्रमाणे अंदाजपत्रकीय सर्व कागदपत्रे दिली जाणे म्हणजे अर्थसंकल्प पूर्णपणे मांडले जाणे होय. अंदाजपत्रकामधील सर्व कागदपत्रे दिली गेली नाहीत म्हणजेच अर्थसंकल्प सादर झालेलाच नाही असा याचा अर्थ होतो. त्याबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त केली नाही. परंतु ठीक आहे, काही चूक झाली असेल किंवा अधिकारी हे सर्व फार गांभीर्याने घेत नाही, असे दिसते. पुन्हा असे काही होऊ नये, हीच अपेक्षा यातून करता येईल. इंग्लंड या देशातून बजेटशी निगडित व गुप्ततेची प्रक्रिया आपण भारतात आणली. तेथे काय काय घटना घडलेल्या आहेत, हे माननीय वित्तमंत्री महोदयांना माहिती असेल. अशा प्रकारचा गलथानपणा जर इतर देशात झाला असता तर तेथील वित्तमंत्री महोदयांना ताबडतोब राजीनामा द्यावा लागला असता, आज वित्तमंत्री महोदयांनी याबाबत दिलगिरी व्यक्त केली नाही. पूर्वी काय झाले, यामध्ये कृपा करुन कोणीही जाऊ नये. असे काही होऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे. सरकार ही प्रक्रिया फार लाईटली घेत आहे, असे वाटत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

23-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE-4

JN/ AKN/ 14:30

श्री.पृथ्वीराज चव्हाण......

अर्थसंकल्पीय कागदपत्रे तर दिली गेलीच नाहीत. या वर्षीची ही माहिती शासनाने वेबसाईटवर ठेवली का ? पूर्वी काय झाले त्यामध्ये कृपा करुन जाऊ नका. आज महाराष्ट्र समृध्द राज्य आहे. आपली अर्थव्यवस्था सर्वात मोठी आहे. महाराष्ट्र राज्याकडे आज इतर राज्ये बघतात. पण वेबसाईटवर साधी अर्थसंकल्पाची माहिती शासन ठेवू शकत नाही. राजस्थान, मध्यप्रदेश व इतर राज्यांमध्ये माननीय अर्थमंत्री भाषण देऊन खाली बसले की दुस-या क्षणाला बजेटची सर्वच्या सर्व कागदपत्रे ही वेबसाईटवर टाकलेली असतात. त्यामुळे अभ्यास करण्याकरिता मदत होते. आपल्या राज्यामध्ये गेल्या वर्षाच्या अर्थसंकल्पाची कागदपत्रे कुठे मिळत नाहीत, वेबसाईटवरही याबाबतची काही माहिती नाही. त्यामुळे मला विनंती अशी करायची आहे की, जो गलथानपणा या वर्षीच्या बजेटच्या वेळी झाला, तो पुन्हा होऊ नये. माननीय वित्तमंत्री यांनी आपले भाषण वेळेवर दिले असेल पण कोणी छापले नाही, याची चौकशी झाली पाहिजे. शासनाने या बाबीकडे इतके सहजासहजी पाहणे योग्य नाही. या वर्षीचा अर्थसंकल्प शासनाने ताबडतोब सर्व कागदपत्रासह वेबसाईटवर टाकावा. वेबसाईटवर अर्थसंकल्प ठेवण्याकरिता जर अडचणी येत असेल तर प्रत्येक सन्माननीय सदस्यांना आपण पेनड्राईव्ह किंवा डिस्कवर अर्थसंकल्पाची सॉफ्ट कॉपी द्यावी. याची आम्हाला अभ्यास करण्याकरिता मदत होईल. नागालॅण्डसारख्या छोटया राज्यांमध्ये गेल्या पाच वर्षाचे अर्थसंकल्प वेबसाईटवर मिळतात. यामध्ये शासन दुरुस्ती करेल अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, विशिष्ट परिस्थितीमध्ये आपण ही चर्चा करीत आहोत. महाराष्ट्र राज्यावर एक प्रचंड मोठे दुष्काळाचे संकट आहे. दुष्काळ गेल्या चार-पाच वर्षापासून सतत चालू आहे. या वेळी केवळ कृषीविषयक समस्या निर्माण झालेले नाहीत तर पाणी टंचाई ज्याचा परिणाम सर्व सामान्य माणसावर होतो. शेतकरी,शेतमजूर ,विद्यार्थी, पालक, शिक्षक, व्यापारी, वकिल, डॉक्टर या सर्वांना पाणी देता आले नाही तर काय होणार आहे ? अशा प्रकारची प्रचंड मोठी आणि गंभीर अशी पाणी टंचाई समस्या आज विशेषतः मराठवाडयामध्ये आणि इतर भागामध्ये निर्माण झालेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण........

या माध्यमातून सरकारचे अपयश दिसून येऊ लागले आहे. पावसाळा संपल्यानंतर अमुक-अमुक धरणांमध्ये पाणीसाठा झालेला नाही याचा सर्वांना अंदाज आलेला होता. मराठवाड्यातील धरणामध्ये किती पाणीसाठा शिल्लक आहे, याची रोज माहिती घेतली जाते. अजून काही दिवसानंतर अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणार आहे. सदर माहिती शासनाला नव्हती काय ? धरणे भरलेली नसल्यामुळे पुढे काय करायचे याची सामान्य माणसांना माहिती होती. मराठवाड्यातील लातुर, उदगीर, बीड, उस्मानाबाद वगैरे भागामध्ये न भुतो न भविष्यती अशा प्रकारची तीव्र पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. या माध्यमातून सरकारचे अपयश समोर आलेले आहे. शासनाने पावसाळा संपल्यानंतर योग्य तो निर्णय घेऊन कार्यवाही करावयास हवी होती. तसेच कन्टेजन्सी प्लॅन तयार करायला हवा होता. पण अशी कोणतीच कार्यवाही केलेली नाही. भविष्यात काय होणार याबाबत सर्वांच्या मनात चिंता निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारने अर्थसंकल्पाला कृषी प्रधान अर्थसंकल्प म्हटलेले आहे. तसेच हे वर्ष स्वाभीमान वर्षे म्हणून साजरे केले जाणार अशी घोषणा केलेली आहे. शेतकऱ्यांसाठी किती मोठ्या प्रमाणावर तरतूद केलेली आहे याचे चित्रण वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पातून सादर केलेले आहे. काही दिवसांपूर्वी केंदीय अर्थसंकल्पात अशीच फसवणूक केल्याचे दिसून आलेले आहे. त्यानंतर शेतकऱ्यांसाठी कृषी वगैरे बाबतीत मार्गदर्शन करणारे अनेक फलक लावण्यात आले होते. याबाबत मी येथे बोलणे उचित नाही. कारण हा केंद्र शासनाचा अर्थसंकल्प नाही. केंद्राच्या अर्थसंकल्पात मी काही सूचना करणार आहे. अर्थसंकल्पात 25 हजार कोटी रुपयांचा आकडा जाहीर केलेला आहे. 25 हजार कोटी रुपयांचे विश्लेषण करताना भांडवली खर्च किती आहे ? या माध्यमातून कायमस्वरुपी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे काय ? महसुली खर्च किती आहे ? भविष्यात शेतकऱ्यांना आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहता यावे याकरिता पायाभूत सुविधा केलेल्या आहेत काय ? शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाणी ही सर्वात मोठी पायाभूत सुविधा आहे. यासाठी सिंचन व्यवस्था आणि सूक्ष्म सिंचन योजनेच्या माध्यमातून त्यांना फायदा होत असतो. आज शेतकऱ्यांसाठी तलाव,

......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण........

शेततळी, मामा तलाव किती बांधले आहेत ? या त्यासंदर्भातील आकड्यांचे विश्लेषण केलेले आहे. 26 हजार 881 कोटी रुपयांपैकी 52 टक्के खर्च महसुली स्वरुपाचा आहे. हा निधी मिळाला तरच शेतकरी खर्च करणार आहे. यामधील 48 टक्के खर्च भांडवली स्वरुपाचा आहे आहे. या अंदाजपत्राकात कृषी, शेतकरी आणि संबंधित विषयांमध्ये 12 हजार 800 कोटी रुपयांची कामे होणार आहेत. माननीय वित्तमंत्र्यंनी गेल्या वर्षीचे किंवा त्याच्या गेल्या वर्षीचे बजेटचा अभ्यास करण्याची गरज आहे. आज जे आकडे हेडमध्ये टाकण्यात आलेले आहे, त्याची तुलना करण्याची गरज आहे. त्यानंतर माननीय वित्तमंत्र्यांनी किती भरीव वाढ केलेली आहे, त्याची माहिती मला द्यावी. परंतु, यामध्ये काही ही भरीव वाढ झालेली नाही, हे मला या ठिकाणी दुर्दैवाने सांगावे लागत आहे. सन 2016-2017 चा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी आहे असा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न माननीय वित्तमंत्र्यांनी केलेला आहे. कोरडवाहू शेतकऱ्याला पाणी आणि सिंचनाची आवश्यकता असते.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने 2 लाख 30 हजार कोटी रुपये परिवहन क्षेत्रांतर्गत, हायवे आणि रेल्वेसाठी तरतूद केलेली आहे. ऊर्जा आणि पेट्रोलियम विभागासाठी 2 लाख 5 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु, केंद्र शासनाने त्यांच्या अर्थसंकल्पात सिंचनासाठी फक्त 5 हजार 700 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. केंद्र शासन आणि राज्य शासन सिंचनाला पायाभूत सुविधा समजत नाही. पायाभूत सुविधा म्हणजे हायवे, रेल्वे विमानतळ असे असले तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने सिंचन हीच खरी पायाभूत सुविधा आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी सिंचनामध्ये भरीव तरतूद करण्यासाठी धाडसी पाऊल टाकण्याची गरज होती. सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पात सिंचनाकरिता 9 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली होती. या वर्षीच्या अर्थसंकल्पात सिंचनासाठी केवळ 3.1 टक्के एवढी वाढ केलेली आहे. शेजारच्या राज्यांमध्ये देखील दुष्काळी संकट कोसळलेले आहे. ती राज्ये आपल्यापेक्षा छोटी राज्ये आहेत. आंधप्रदेश आणि तेलंगना अशी नवीन राज्ये निर्माण झालेली आहेत. त्या राज्यातील लोकसंख्या साडेतीन कोटीच्या आसपास आहे.

......3....

श्री. पृथ्वीराज चव्हाण........

आंधद्रपदेश सरकारने 4554 कोटी रुपयावरुन 7180 कोटी रुपये म्हणजे 57 टक्के सिंचनासाठी एका वर्षात तरतूद केलेली आहे. तेलंगना सरकारने 8966 कोटी रुपयावरुन 24,132 कोटी रुपये म्हणजे 170 टक्के सिंचनासाठी तरतूद केलेली आहे. अशा प्रकारे धाडसी निर्णय घेणारे सरकार हवे आहे. त्यासाठी माननीय वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आपले वजन वापरुन केंद्र शासनाने त्यांच्या अर्थसंकल्पात परिवहन विभागासाठी ज्याप्रमाणे 2 लाख कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, त्याच धर्तीवर सिंचनासाठी किमान 1 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्याबाबत सांगण्याची आवश्यकता आहे. माझ्या माहितीनुसार 1 लाख कोटी रुपये देखील सिंचनासाठी कमी पडणार आहेत. सिंचनासाठी केवळ 5 ते 7 हजार कोटी रुपये खर्च करुन काहीच होणार नाही. माननीय वित्तमंत्र्यांनी पुरवणी मागण्यांमध्ये सिंचनासाठी आणखी भरीव तरतूद करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, 1972 च्या दुष्काळामध्ये हजारोंच्या संख्येने पाझर तलाव बांधण्यात आले होते. त्यावेळी कामाचा दर्जा जेमतेम होता. त्यावेळी हाताला काम देण्यासाठी प्रयत्न केलेला होता. त्यावेळी शासनाने रोजगार हमी योजना आणली होती. 1972 च्या दुष्काळामध्ये हजारोंच्या संख्येने तयार झालेले पाझर तलाव आज काळानुरुप दुरुस्त करण्याची गरज आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी आम्हाला 5 आणि 10 वर्षाचा कालावधी लागेल असे सांगू नका. हे सर्व काम पावसाळ्याच्या आत पूर्ण होण्यासारखे आहे. मामा तलावासाठी 150 कोटी रुपयांची तरतूद केलेली असून, ती अतिशय कमी आहे. जवळ जवळ 7 हजार मालगुजारी तलाव आहेत. अशा मालगुजारी तलावातील गाळ पावसाळा सुरु होण्यापूर्वी काढण्यासाठी योग्य तो प्रयत्न करण्याची गरज आहे. या कामासाठी 150 कोटी रुपये दिले असून, शासनाने आणखी मदत देण्यासाठी आणखी हात आखडता घेऊ नये. यास इंग्रजीमध्ये Low hanging Fruit असे म्हटले जाते. या माध्यमातून पाझर तलावाची, कोल्हापूर बंधाऱ्याची दुरुस्ती करता येणे शक्य होणार आहे. महाराष्ट्रात पावसाळा सुरु होण्यापूर्वी एकही बंधारा रिपेअर केल्याशिवाय राहता कामा नये अशा प्रकारचे नियोजन आखण्याची गरज आहे.

........4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण........

अध्यक्ष महोदय, मी अर्थसंकल्पातील आकड्यांबाबत माहिती देणार आहे. अंदाजपत्रकामध्ये 8 टक्के विकास दर झाल्याचे म्हटले आहे. मागिल वेळेस महाराष्ट्र राज्याचा आर्थिक विकास दर 10 ते 13 टक्के होता. दुष्काळ पडला असल्यामुळे कृषी विकास दर कमी झालेला आहे, आर्थिक मंदीचे सावट आहे वगैरे मान्य आहे. अंदाजपत्रकामध्ये 8 टक्के वाढ होणार असल्याचे म्हटले असून, त्याबद्दल आमच्या मनात शंका येत आहे. केंद्र सरकारने आकड्यांमध्ये काही प्रमाणात बदल केलेला आहे. विकास दर मोजत असताना आपण तेच आकडे विचारात घेतले आहेत. या आकड्याबद्दल आपल्या देशातच नव्हे तर जगात देखील साशंकता निर्माण झालेली आहे. मी जास्त बोलणार नाही. नवीन बजेट येईल तेव्हा पाहू. एका बाजूला केळी 15 महिने निर्यात कमी होऊ लागली आहे. असे पूर्वी कधीच झाले नव्हते. आज मोठमोठे मॉल बंद पडू लागले आहेत. कारण " ई-कॉमर्सचे " युग आलेले आहे. आज हाताला काम मिळत नाही. अशा परिस्थतीत विकास दर 8 टक्के झालेला आहे, हे आम्हाला न पटण्यासारखे आहे. महसुली तुटीत 150 टक्क्यांपर्यंत वाढ झालेली आहे. या वर्षी सातव्या वेतन आयोगाचा खर्च धरणार आहे किंवा कसे याबद्दल मला माहिती नाही. राज्य शासनामधील कर्मचाऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर सातव्या वेतन आयोगाने केलेल्या शिफारशी या वर्षी स्वीकाराव्याच लागणार आहेत. सातव्या वेतन आयोगातील शिफारशीनुसार कर्मचाऱ्यांना मदत केली पाहिजे.

GG-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

तो खर्च पकडल्यानंतर हा तुटीचा आकडा 9290 कोटीवरुन 15 हजार, 16 हजार कोटी रुपयांपर्यंत वाढणार आहे. आपल्या राज्याच्या कराचे उत्पन्न कमी कमी व्हायला लागले आहे. Tax to GDP रेश्यो पाहिला तर आपल्या राज्याच्या स्थूल उत्पन्नापेक्षा किती टक्के कर हे राज्य गोळा करते, हे बघणे आवश्यक आहे. राज्याचा विकास करावयाचा असेल तर अधिकाधिक कर वसुल केला पाहिजे. कराचे लिकेज थांबविले पाहिजे. श्रीमंतांकडून जास्त कर गोळा केला पाहिजे. गेल्या दोन तीन वर्षापासून स्थूल उत्पन्नापेक्षा कराचे उत्पन्न कमी व्हायला लागले आहे आणि तूट वाढत आहे. तुट का वाढते आहे, याबद्दल आपल्या मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरणाचे जे पिवळे पुस्तक असते त्यामध्ये सवंग लोकप्रियतेमुळे एलबीटी आणि टोल माफी मुळे ही तुट वाढलेली आहे, असा उल्लेख आहे. तुट वाढलेली आहे, ही बाब आपण मान्य केलेली आहे. आपल्या राज्याचा कर कसा वाढेल याकडे माननीय वित्त मंत्र्यांनी लक्ष दिले पाहिजे. सवंग लोकप्रियतेच्या घोषणा यावेळी करु नका. या वर्षीच्या दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना प्रचंड मदत करावयाची आहे. सभागृहात राज्याच्या कर्जाबद्दल चर्चा झाली. नव्याने सरकार आले तेव्हा घोषणा झाली की, कर्जाचा डोंगर झालेला आहे, तिजोरी मोकळी असून त्यामध्ये घुसी फिरतात ही वाक्ये आपण ऐकली. सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी कर्जाबद्दल चर्चा केली त्यावेळेला आकडे सांगितले गेले. तेव्हा मी जाहीर आवाहन केले होते की आपण राज्यावरील कर्ज कमी करुन दाखवा. चित्ररेखाच्या दिनांक 9 डिसेंबरच्या अंकात राज्यावर फार कर्ज झालेले असून दोन तीन वर्षात आम्ही टप्प्या टप्प्याने आम्ही कर्ज कमी करु असे मुख्यमंत्री महोदयांचे स्टेटमेंट छापून आले होते. मुख्यमंत्री महोदयांचे दुसरे सहाकरी मंत्री महोदय श्री.विनोद तावडे म्हणाले की, राज्यावरील कर्ज अडीच वर्षात कमी करु लोकमत दिनांक 2 डिसेंबर, 2014 रोजीच्या वर्तमानपत्रत आलेली ही बातमी आहे. मी त्यावेळी सांगितले होते की, आमच्या वेळेला जेवढे कर्ज होते त्यातील एक रुपया जरी कर्ज कमी झाला तर मी राजकारण सोडून देईल. कर्ज घेतले पाहिजे...(अडथळा)... कर्ज काढणे म्हणजे आपण कुठेतरी कमी पडतो आहोत असे नव्हे. आपण काय चुका केल्या आहेत, ते मी आपल्याला सांगणार आहे. आपण आज कर्ज काढा कारण शेतकरी उपासी मरत आहेत. एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्या व्हायला लागलेल्या आहेत, असे केंद्र सरकारने आपल्याला

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सर्टिफिकेट दिलेले आहे. गेल्या पंधरा वर्षामध्ये सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. आपले केंद्रिय कृषी मंत्र्यांनी महाराष्ट्र राज्याला सर्टिफिकेट दिलेले आहे, याचा काय अर्थ आहे? आपण सांगितले की, कर्जाची टक्केवारी कमी झालेली आहे, परंतु आपण आज कर्ज काढा आणि शेतकऱ्याला वाचवा. आपण 16, 17 टक्के कर्ज झाले आहेत म्हणून सांगत आहात. आपल्या देशावर 64 टक्के कर्ज आहे. अमेरिकेमध्ये त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा 100 टक्के, जपान मध्ये 222 टक्के म्हणजे 16 टक्क्यापेक्षा जास्त आहे, परंतु त्या देशांनी चांगले काम केले आहे. आपण धाडसाने कर्ज काढा. आज महाराष्ट्र राज्याची कर्ज फेडायची ताकद, क्षमता आहे. एकतर शासन कर वाढवित नाही आणि दुसरीकडे कर्ज काढत नाही. कर्ज काढा आणि फेडायची ऐपत असेल तर जरुर कर्ज काढावे.

अध्यक्ष महाराज, सन 1991 पासून राज्याचे आकडे पाहिले तर एकाही वर्षी कर्ज कमी झाले असे झाले नाही. पेन्शन, जीपीएफ, ही सर्व स्मॉल सेव्हींग आहेत. ते कर्ज म्हणून वाढत जाते. अनेक चांगल्या गोष्टींसाठी कर्ज वापरले तर त्यामुळे शेतकऱ्यांचे काही प्रमाणात प्रश्न सुटतील, परंतु राज्यावरील कर्ज कमी झाले, ही राज्याला भूषणावह अशी गोष्ट नाही.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार पाण्यासंदर्भात बोलले. लातूर जिल्ह्याची काय परिस्थिती झालेली आहे? आज तेथे कलम 144 वापरावे लागत आहे. टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी पोलीस एस्कॉर्ट वापरावे लागत आहे. जणुकाही खजिना माणसे लुटतील की काय, अशा रितीने तेथे काम चालले आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व उद्योग बंद झालेले आहेत. औरंगाबाद आयुक्तांनी आज औरंगाबाद आयुक्तालयामध्ये फक्त पिण्याकरिता पाणी वापरले जाईल, शेतीकरिता, उद्योगांकरिता पाणी मिळणार नाही, असे जाहिर करून टाकले आहे. उद्योगाला पाणी देणार नसाल तर उद्योग पुढे कसे येतील? आपण केवळ मोठ मोठ्या घोषणा केल्या, त्याबद्दल मी बोलणार आहे. कसले नियोजन आपण करीत आहात? आपल्याला वेळीच पाणी पुरवठ्याची योजना पूर्ण करता आली नाही. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. मी माननीय वित्त मंत्र्याच्या निदर्शनास आणून देतो की, लातूर, बिड जिल्ह्यातील परिस्थिती पाहता एक उच्चस्तरीय बैठक घेऊन त्यामध्ये आपला काय प्लॅन आहे, ते आपण कृपया सांगावे. मध्येच कोणीतरी सांगितले

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

त्याला एवढा खर्च येईल. 170 किलो मीटरवरुन पाणी आणण्याचा विचार करु. तेथिल अधिकारी परिक्षा लवकर घ्याव्यात म्हणून निर्णय घेत आहेत. त्यानंतर आपण नातेवाईकांकडे रहायला जावे असेही त्यांना सांगण्यात येते. आता लवकरच परिक्षा संपणार असून तेथिल काही लोक आपल्या नातेवाईकांकडे रहायला जाणार आहेत. उन्हाळ्यामध्ये प्रशासनाने सांगितले की, यावर्षी क्लॉसेस होणार नाहीत. तेथिल उद्योग बंद व्हावेत, तेथिल शिक्षण संस्था बंद व्हाव्यात, ही गोष्ट राज्याला भूषणावह नाही. आजरोजी पिण्याच्या पाण्याअभावी लोक स्थलांतर करीत आहेत. उद्योग बंद पडले, ही गोष्ट आपल्या राज्याला भूषणावह नाही. याला कोण जबाबदार आहे? जेव्हा पाऊस कमी पडला तेव्हा सलग दोन तीन वर्षे दुष्काळ होता. त्यावेळी युध्द पातळीवर निर्णय घ्यायला पाहिजे होता, परंतु तसा निर्णय घेतलेला नाही. आम्ही आमचे सरकार असताना तसे निर्णय घेतले होते. म्हणून आज ही परिस्थिती उद्‌भवली आहे. आम्ही आमच्या पक्षाचे सरकार असताना तसे निर्णय घेत होतो. मी भूषण म्हणून सांगत नाही. उदा. उस्मानाबाद येथे पाणी पुरवठा मिळणार नाही असे जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीमध्ये सांगितले, तेव्हा सन्माननीय सदस्य डॉ.पतंगराव कदम त्या खात्याचे मंत्री होते. ते मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या आदल्या दिवशी उप समितीची बैठक घेत असत. ते निर्णय आम्ही लगेच मान्य करीत होतो. तो निर्णय झाल्यावर लागलीच त्याची अंमलबजावणी केली जात असे. उस्मानाबाद जिल्ह्यात आज पाणी टंचाई जाणवत आहे. तेथे 110 किलो मीटरवरुन उजनी धरणातून पाईपलाईन करुन तेथे पाणी दिले होते. आज उस्मानाबाचीं 8 एमएलडीची क्षमता आहे. तेथे आणखी पंप लावले असते तर दुप्पट क्षमता होऊ शकली असती. टेंडर काढावे लागेल, पंपाची क्षमता वाढविणे, पंप बिघडले असते तर ते दुरुस्त करावे, याकडे दुर्लक्ष केले जात आहे. टँकर भरायला जागा नाही अशी परिस्थिती जालना, उस्मानाबाद जिल्ह्यात निर्माण झाली आहे. युध्द पातळीवर हे काम करायला पाहिजे, ते केले गेले नाही. आज उस्मानाबाद जिल्ह्यात टँकर भरायला जागा नाही. जे युध्द पातळीवर काम करायला पाहिजे होते ते केले गेले नाही. आज प्यायला पाणी नाही त्यामुळे लोक स्थलांतरित होत आहेत. या गोष्टी आपण सोडवु शकले नाही. आज मराठवाड्यातील शेती उद्‌ध्वस्त होण्याची पाळी आलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

याशिवाय इतर ठिकाणची परिस्थिती चांगली आहे असे नाही. मराठवाड्यातील परिस्थिती अत्यंत चिंताजनक झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याकरिता एक बैठक घेऊन सातत्याने प्लॅन केला पाहिजे. तेथे कार्यक्षम अधिकारी नसतील तर चांगले अधिकारी नेमावे, परंतु अशी परिस्थिती येऊ देऊ नका. संपूर्ण देशामध्ये लातूर जिल्ह्यातील चर्चा चाललेली आहे. देशामध्ये महाराष्ट्राच्या पाणी संकटाची चर्चा चाललेली आहे. आपण एकीकडे सांगत आहात की, सर्वात प्रगती करणारे महाराष्ट्र राज्य आहे.

अध्यक्ष महाराज, "मेक इन इंडिय" संदर्भात मी थोडे बोलणार आहे. मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत, परंतु चिंतेचा विषय हा आहे की, उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाच्या नियतव्ययामध्ये 35 टक्के कपात केली आहे.

यानंतर HH-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

ठीक आहे तुम्ही काटछाट केली आहे ती कशाकरिता केली, का केली याबाबत आपल्या उत्तरात सांगाल. परंतु, मेक इन इंडियावर बोलण्यापूर्वी मला दुसरी एक चिंता व्यक्त करावयाची आहे की, सन 2014 च्या तुलनेत सन 2015 मध्ये अधिक संप झाले, काम बंद पडले. सन 2014 मध्ये संप व टाळेबंदीची संख्या 192 होती तर सन 2015 मध्ये ती 215 होती. सन 2014 मध्ये बाधित कामगारांची संख्या 95,900 तर सन 2015 मध्ये ती 1,19,590 होती. सन 2014 मध्ये वाया गेलेले मनुष्य दिवस 25 लक्ष होते, तर सन 2015 मध्ये 30,10,000 मनुष्य दिवस वाया गेले. काय झाले ते माहीत नाही परंतु, या वर्षी औद्योगिक फ्रंटवर देखील परिस्थिती बिघडलेली आहे.

अध्यक्ष महोदय, ईज ऑफ डुईंग बिझिनेसबाबत बोलले गेले. आज उद्योग आले तर त्यांचे स्वागत होते, त्यांना रेड कार्पेट ट्रिटमेंट मिळते. परंतु, ईज ऑफ डुईंग बिझिनेसबाबतचे 3 अहवाल माझ्याकडे आहेत. एक अहवाल केंद्र सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रिअल पॉलिसी अँड प्लानिंगचा आहे. जागतिक बँकेने सादर केलेल्या अहवालात ईज ऑफ डुईंग बिझिनेसची पाहणी केली गेली. ही पाहणी जानेवारी, 2015 ते जून, 2015 या 6 महिन्यांच्या कालावधीत केली गेलेली आहे. तो अहवाल माझ्याकडे आहे, तो मी आपल्याला सादर करीन. त्या अहवालामध्ये ईज ऑफ डुईंगमध्ये आपल्या महाराष्ट्र राज्याचा क्रमांक आठवा क्रमांक होता. देशातील राज्यांबाबत हा अहवाल केलेला होता. त्याच बरोबर दिल्लीमध्ये एनसीएईआर नावाची एक मोठी प्रसिध्द आर्थिक संस्था आहे. त्या संस्थेच्या अहवालाप्रमाणे गुंतवणुकीत आकर्षक असलेल्या राज्यांच्या क्रमवारीत महाराष्ट्राचा क्रमांक पहिला नाही तर पाचवा आहे. इतर राज्य आपल्या पुढे आहेत. त्याच बरोबर परदेशी गुंतवणुकीमध्ये देखील दुसरी राज्ये आपल्यापेक्षा जास्त पुढे आहेत.

अध्यक्ष महोदय, मेक इन इंडिया सप्ताह साजरा केला गेला. त्याचा खूप गाजावाजा झाला आणि येथेच गिरगाव चौपाटीवर कार्यक्रम करण्याचा आग्रह केला गेला. त्याप्रमाणे गिरगाव चौपाटीवर तो कार्यक्रम केला गेला. तो कार्यक्रम तेथे घेताना कोणाला कॉंट्रॅक्ट दिले होते, कोण कोण इव्हेंट मॅनेजर होते काही माहीत नाही. परंतु, तेथे लागलेली आग हा महाराष्ट्राच्या इतिहासात आपली मान शरमेने खाली घालणारा प्रकार झाला. आपली इतकी मोठी नामुष्की झाली. साधा एक कार्यक्रम व स्टेज तुम्हाला मॅनेज करता येऊ नये ?

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

अध्यक्ष महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर बोलताना मी असे सांगितले होते की, सर्वच कारभार गलथानपणे चाललेला आहे. विशेषतः मेक इन इंडियामध्ये फार यशस्वी कार्यक्रम झाला म्हणून जाहिरातबाजी केली गेली. त्यातील चूक मी शासनाला दाखविली होती. चूक काय होती तर, मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्राच्यावतीने घोषणा केली की, 7 लाख 9 हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार झालेले आहेत, त्यातून 30 लाख रोजगार निर्माण होणार आहेत. त्याच दिवशी केंद्र सरकारच्या प्रेस इन्फर्मेशन ब्युरोने देशातील परिस्थितीची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, 15 लक्ष 20 हजार कोटी रुपयांचे गुंतवणूक करार देशात झालेले आहेत आणि त्यांनीही 30 लाख रोजगार निर्माण होणार असे सांगितले. ही माहिती मी सादर केली होती. त्याला मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले, दुर्दैवाने मी त्यावेळी सभागृहात उपस्थित नव्हतो. ठीक आहे मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले, मी विषय सोडून दिला. परंतु, मी सभागृहात अतिशय काळजीपूर्वक माहिती मांडली होती की, ही विसंगती आहे, गलथानपणा आहे, कोणाची तरी चूक आहे. 30 लाख रोजगार निर्माण होणार म्हणून आकडा दिला जातो. केंद्र सरकारनेही म्हटले आहे की, 15 लाख 20 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीनंतर देशात 30 लाख रोजगार निर्माण होणार आहेत. महाराष्ट्राचेही सरकार म्हणते की, आमच्याकडे 8 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे आणि 30 लाख रोजगार निर्माण होणार आहेत. त्यावर मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिल्यामुळे मी आपला मुद्दाम वेळ घेऊ इच्छितो. मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत, परंतु, आपण त्यांना हे सांगाल अशी मला खात्री आहे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदय काय म्हणाले ते मी उद्‌धृत करतो, "आमच्या राज्याचे माजी मुख्यमंत्री माननीय बाबा म्हणाले की, 8 लाख कोटी रुपये महाराष्ट्रात गुंतवणूक होणार आहे आणि त्यातून 30 लक्ष रोजगार निर्मिती होणार आहे". असे मी म्हटल्याचे मुख्यमंत्री महोदय सांगतात. ही वस्तुस्थिती आहे, मी तसे म्हटले आहे. पुढे ते म्हणतात की, "अलीकडच्या काळात बाबांना विसर पडायला लागलेला आहे." ठीक आहे आता माझेही वय होऊ लागले आहे, विसर पडणे स्वाभाविक आहे. पुढे ते म्हणतात "त्यांची सरमिसळ होऊन जाते."

...3/-

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

सरमिसळ काय झाली ? ते पुढे सांगतात की, "केंद्र सरकारची एक जाहिरात होती. त्यामध्ये 30 लाख होतील आमच्याकडे नाहीत." मी मुख्यमंत्री महोदयांचे 17 तारखेचे भाषण वाचत आहे. ते पुढे म्हणतात की, "माननीय बाबांनी दोन जाहिरातींमध्ये गल्लत केली. 30 लाख रोजगार निर्मितीची जाहीरात आपल्या राज्याची नव्हती तर ती केंद्र सरकारची होती." हे मुख्यमंत्री महोदयांचे भाषण आहे. अर्थात ही असुधारित प्रत आहे, यामध्ये बदल केला असेल तर माहीत नाही.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या परवानगीने ही पूर्ण पानाची जाहीरात दाखवितो. ती आपल्याला तेथून दिसेल. ही राज्य सरकारची जाहीरात प्रत्येक वर्तमानपत्रात आली आहे, त्यामध्ये किती कोटी रुपयांचा चुराडा झाला हे माहीत नाही. त्यात असे म्हटले आहे की, 2598 सामंजस्य करार, महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रांना प्रतिनिधित्व, 7.9 लक्ष कोटी रुपयांच्यावर गुंतवणूक, 30 लक्ष नवे रोजगार, ही जाहीरात कोणाची आहे ? मेक इन महाराष्ट्राची वाट झाली सुकर. ठीक आहे. एखादी काही गल्लत होऊ शकते. परंतु आपण माझ्यावर आरोप करीत आहात की, मला विसर पडू लागला आहे. त्यात काही चुकीचे नाही ? ... (अडथळा) ...

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे बसून बोलत आहेत, ते रेकॉर्डवर येत नाही.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी हे बोलणे योग्य आहे काय ते आपण मला सांगावे. मी दुसरे काही बोलत नाही. मला एवढाच मुद्दा सांगावयाचा आहे की, चांगला कार्यक्रम झाला. तो राज्याच्या दृष्टीने चांगला झाला असेल. माझी प्रामाणिक इच्छा आहे की, हा कार्यक्रम यशस्वी व्हावा. कारण आज आपल्या राज्यातील लाखो सुशिक्षित बेरोजगार कामाच्या प्रतिक्षेत आहेत. आज सरकार काही तरी नवीन योजना आणेल, काही तरी गुंतवणूक होईल म्हणून सांगितलेले आहे. याकरिता मी त्यावेळेला बोललो होतो की, तुम्ही कुठले करार केले ते आम्हाला सांगा, त्याची माहिती वेबसाईटवर ठेवा. तुम्ही 2598 करार केले असे म्हणत आहात आणि कुठे, कुठे काय, काय आकडे येत आहेत. मराठवाड्यामध्ये दीड लाख कोटी रुपयांचे करार होणार आहेत. मराठवाड्यात पाणीच नाही. तेथे कोण येणार आहे ते मला सांगा, मी

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

त्यांना विचारेन ते कसे येणार आहेत ते. आता असे सांगण्याची वेळ आलेली आहे की, आमच्या देशात गुंतवणूक करा तुम्ही बॅगा भरुन डॉलर आणा आणि येताना टँकरही घेऊन या.

अध्यक्ष महोदय, हा गंभीर विषय आहे. आपल्याकडे रोजगार निर्माण झाले पाहिजेत. परंतु, त्याकरिता आपल्याला पायाभूत सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. मुख्यमंत्री महोदय व माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांना मला हे सांगावयाचे आहे की, मिहान प्रकल्प आमच्या सर्वांच्या दृष्टीने प्रेस्टिजस प्रकल्प आहे. नागपूरचा एक शो केस प्रकल्प म्हणून आपण तो केला. तेथे किती नवीन उद्योग आले ? त्याकरिता काही तरी करा. परंतु, मला असे वाटते की, अशाप्रकारे घोषणाबाजी करुन काही होत नाही.

अध्यक्ष महोदय, वीज दराबाबत काही तरी केले पाहिजे, नाही तर उद्योग येणार नाहीत. पाण्याची व्यवस्था केली पाहिजे, त्यांना विश्वास दिला पाहिजे. आम्ही औरंगाबाद येथील शेंदरा येथे मोठी औद्योगिक महानगरी करण्याचा प्रयत्न त्यावेळेस केला होता. सर्वात प्रथम आम्ही 900 कोटी रुपयांची जायकवाडी ही पाण्याची योजना मंजूर केली होती. त्याचे काय झाले माहीत नाही. परंतु आता राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात शेंदरा येथे मोठी औद्योगिक नगरी करणार असल्याबाबत सांगितले आहे.

आम्ही जेव्हा आमचे औद्योगिक धोरण जाहीर केले होते तेव्हा आमचा असा उद्देश होता की, आता आपले निर्मिती क्षेत्रात जे 17 ते 18 टक्के योगदान आहे ते 25 टक्क्यांपर्यंत गेले पाहिजे. परंतु, तसे होताना दिसत नाही. अजूनही आपण 17 टक्क्यांवर अडकून बसलो आहोत. याकरिता आपण थोडेसे गांभीर्याने पाहिले पाहिजे. ज्या प्रमाणे बजेटच्या कागदपत्रांबाबत गोंधळ झाला तसाच या जाहिरातीत घोळ आहे. सरकार कोण चालवित आहे, जाहिरात कंपनी सरकार चालवित आहे काय, त्यांना पूर्ण पान जाहिरात देण्याची काय घाई आहे ? माहिती योग्य आहे की नाही ते न पाहताच आपण ती देत आहात.

अध्यक्ष महोदय, मी शेवटचे 1-2 मुद्दे मांडून थांबणार आहे. पायाभूत सुविधांबाबतचा विषय चर्चेत आला. आपण आपल्या अंदाजपत्रकात मेट्रोकरिता काही पैसे दिलेले आहेत. आमच्या

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

सरकारने जेव्हा मेट्रो करण्याचा निर्णय घेतला, त्यावेळेस आम्ही आदेश दिले की, आपण लोकसंख्येप्रमाणे शहरे निवडावीत. सर्वात प्रथम सर्वात जास्त लोकसंख्या असलेले मुंबई शहर, त्यानंतर पुणे, त्यानंतर नागपूर, त्यानंतर ठाणे, नवी मुंबई अशाप्रकारे कोणताही विभागीय विचार त्यामध्ये नव्हता. पुण्याच्या मेट्रोचा प्रस्ताव आधी मंजूर झाला. त्यानंतर नागपूरचा मंजूर झाला. परंतु, मी मुद्दाम काळजी घेतली. असे झाले तर पुन्हा काही तरी वाद निर्माण होईल म्हणून मी थांबलो. मी केंद्राला विनंती केली की, तुम्ही पुणे आणि नागपूरचा प्रस्ताव एकत्र घ्या आणि दोन्ही प्रस्तावांना केंद्रीय नगरविकास मंत्रालयाने एकाच दिवशी मंजुरी दिली. परंतु, नंतर सरकार बदलले.

II-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. पृथ्वीराज चव्हाण.....*

*सरकार बदलल्यावर काय झाले, नागपूर येथील मेट्रोचे भूमिपुजन झाले. परंतु पुण्याच्या प्रकल्पाकरिता मंजुऱ्याच मिळत नाही. नागपूरचे केंद्रीय मंत्री आहेत, मुख्यमंत्री आहेत, वित्त मंत्री आहेत, त्यामुळे तेथील प्रकल्पाला परवानग्या मिळतात. त्याला आमचा विरोध नाही. परंतु पुण्यातील प्रकल्पाकरिता का परवानगी दिली जात नाही. पुणे हे औद्योगिक महानगर आहे.*

*अध्यक्ष महोदय, केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये नागपूर मेट्रोला ६०३ कोटी रुपये तर पुणे मेट्रोला १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये नागपूर मेट्रोकरिता १६० कोटी रुपये आणि पुणे मेट्रोकरिता केवळ १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. आपण असे का करीत आहात. दोन्हीही प्रकल्पांना सारखा निधी द्यायला पाहिजे होता. आम्ही लोकसंख्येच्या प्रमाणात मेट्रो प्रकल्प करण्याचे काम हाती घेतले होते, त्यामध्ये काही चूक होती काय. नाहीतर अगोदर चंद्रपूरला मेट्रो करुया. बाकीचे प्रकल्प नंतर बघुया. असे कसे होऊ शकेल.*

*अध्यक्ष महोदय, स्मार्ट सीटीबद्दल चर्चा केली जाते. याकरिता दोन शहरे निवडण्यात आली. माझा स्मार्टसिटी प्रकल्पाला मूलभूत विरोध का आहे, त्याबाबत मी अगोदर देखील बोललो आहे. यामध्ये कशाप्रकारे गावे निवडण्यात आली, इत्यादीबाबत मी पुन्हा पुनरावृत्ती करणार नाही. परंतु आपण कृपा करुन केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा करावी, याबाबत हट्टीपणा किंवा दुराग्रह करु नका. आपण वर्षाला मुंबईकरिता १०० कोटी रुपयांचा निधी देणार ही बाब ठीक आहे. प्रत्येक प्रकल्पाला निधी मिळाला पाहिजे, याकरिता आमचे दुमत नाही. परंतु लक्षद्वीप बेटावरील कवरट्टी नावाच्या राजधानीच्या शहराची केवळ ११ हजार लोकसंख्या आहे, याकरिता देखील १०० कोटी रुपये दिले जाणार आणि दीड कोटी लोकसंख्येच्या शहराला देखील १०० कोटी रुपये दिले जाणार आहे. असे करु नये. यामध्ये वर्गवारी करण्यात यावी.*

*अध्यक्ष महोदय, माझा आणखी एक आग्रह आहे. मुंबईतील देवनार प्रकल्पाचे काय चालले आहे, हे आपण पहात आहे. देवनार येथील कचरा डेपोची मी एसीबी मार्फत चौकशी लावली होती. देवनारचे बीओटी तत्वावर टेंडर दिले होते, टिपींग फीज आणि इत्यादीबाबत ऊर्जा प्रकल्पाकरिता आणखी काही बाबी करण्यात येणार होत्या. ते झाले नाही. आपल्या एका सचिवाच्या अध्यक्षतेखाली देखील चौकशी करण्यात आली होती. त्याचे काय झाले हे माहीत नाही. आता आपण त्यासंदर्भात*

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. पृथ्वीराज चव्हाण.....*

*काय करणार आहात. एखाद्या उद्योजकाकडून चुका झाल्या असतील तर त्या कशा दुरुस्त करणार आहात. आज तेथे आग लागलेली आहे, ही चांगली बाब नाही. देवनार डंपिंग ग्राऊंडच्या आगीमुळे मुंबईतील प्रदुषण खालावले असल्याबाबतच्या बातम्या दररोज वर्तमान पत्रामध्ये येतात. कोणी असे म्हणते की, महापालिकेच्या निवडणुकीसंदर्भात कोणीतरी आग लावली. यासंदर्भात चौकशी करायला पाहिजे. माझे तर असे म्हणणे आहे की, सर्व स्मार्टसिटीचे पैसे जमा करुन राज्यातील सर्व घनकचरा प्रकल्प करण्यात यावे. घनकचराप्रकल्प करणे फार अवघड आहे. त्याकरिता कोणी जमीन देत नाही. टेक्नॉलॉजीकडे कोणी लक्ष देत नाही. आपले चंद्रयान आणि मंगळयान उडविण्यामध्ये जास्त लक्ष आहे. कारण त्याला खूप चांगली फोटो ऑपॉर्च्युनिटी मिळते. परंतु आपण घनकचऱ्यासंदर्भात एखादी चांगली टेक्नॉलॉजी करु शकत नाही काय? आपल्या वैज्ञानिकांना हे करता येत नसेल तर परदेशातून टेक्नॉलॉजी आणावी. परंतु आज नागरिकरणाचा सर्वात महत्वाचा प्रश्न घनकचऱ्याचा आहे. पुण्यातील व इतर सर्व ठिकाणचे पैसे खर्च करावे. आपण देशामध्ये स्मार्टसिटी करिता ५० हजार कोटी रुपये खर्च करणार आहात, यापैकी महाराष्ट्राला १० हजार कोटी रुपये मिळणार असेल, तर माझ्या मते हे सर्व पैसे घनकचरा प्रकल्पाकरिता वापरण्यात यावे, अशी माझी सूचना आहे.*

*अध्यक्ष महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडणार आहे. मुख्यमंत्री महोदयांनी काही प्रकल्पांची नावे घेतली. वित्त मंत्री महोदयांनीही प्रकल्पांकरिता किती पैसे देणार याबाबत सांगितले. त्यामध्ये ट्रान्स हार्बर लिंक व कोश्टल रोडचा उल्लेख झाला. ह्या कल्पना जुन्या आहेत. या कल्पना कार्यान्वित करण्याची कामगिरी आमच्या सरकारने केली. कोश्टल रोडकरिता आम्ही उच्चस्तरिय समिती नेमली. आर्किटेक्ट घेतले, प्रयोगशाळामधील तज्ञ घेतले आणि त्याचा अहवाल तयार करुन केंद्र सरकारला सादर केला. त्यामध्ये काही मूलभूत पर्यावरणाच्या नियमामध्ये बदल करण्याची चर्चा चालली होती. तो नामंजूर झाला नव्हता, परंतु मंजुरही झाला नव्हता, हे मी मान्य करतो. ते काम आपल्याला पुढे न्यायचे असून आपण ते पुढे न्यावे. तसेच ट्रान्स हार्बर लिंकचे दोन वेळेस टेंडर झाले, परंतु जागतिक परिस्थितीमुळे टेंडर भरण्यास कोणी पुढे आले नाही. परंतु या प्रकल्पाच्या सर्व परवानग्या आमच्या काळात मिळाल्या होत्या. म्हणूनच आम्ही त्याचे दोनदा टेंडर काढले होते.*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. पृथ्वीराज चव्हाण.....*

*त्याला सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. त्यास आता परवानग्या मिळाल्या नाहीत. परंतु आपल्याला ते प्रकल्प पुढे करायचे आहे. शेवटी सरकार हे कन्टीन्युइंग असते. एक सरकार गेले की, दुसरे सरकार येते. यासंदर्भात माझा आपल्याला असा प्रश्न आहे की, आपण हे प्रकल्पांना पूर्ण करावे. तसेच नवी मुंबई विमानळाला सर्व परवानग्या मिळाल्या होत्या. तेथे केवळ जमीन अधिग्रहन करण्याची अडचण आहे. त्याकरिता आम्ही नवीन कल्पना मांडलेली आहे. ते आपण पुढे न्यावे आणि लवकरात लवकर पूर्ण करावेत. आपण प्रकल्प पूर्ण होण्याच्या तारखा २०१९ मधील सांगत आहात. २०१९ हे वर्षे कसे महत्वाचे आहे, याबाबत सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी अतिशय प्रभावीपणे मांडलेले आहे. प्रकल्प तो पर्यंत झाले तर चांगलीच बाब आहे. परंतु आता ही कामे सुरु करावीत.*

*अध्यक्ष महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे. आपण काहीतरी नवीन प्रकल्प आणावेत. महाराष्ट्रामध्ये आम्ही हे नवीन प्रकल्प करणार आहोत, यासंदर्भात काही नवीन कल्पना मांडाव्यात. एक नव्या प्रकल्पाची कल्पना दिल्लीतून आलेली आहे. ती कल्पना बुलेट ट्रेनची आहे. एक लाख कोटी रुपये खर्च करुन बुलेट ट्रेन आणली जाणार आहे. माझा या प्रकल्पाला कडाडून विरोध रहाणार आहे. मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्त मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण लातूरला जावे, उस्मानाबादला जावे, बीडला जावे आणि तेथील लोकांना सांगावे की, आम्ही एक लाख कोटी रुपये खर्च इतक्या वेगाने धावणारी करुन बुलेट ट्रेन आणणार आहोत. तेच एक लाख कोटी रुपये मराठवाड्यातील पाण्याचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वापरण्यात यावे, असे माझे म्हणणे आहे. पाण्यामुळे तेथे उद्योग येतील. अशा मोहम्मद तुगलकी कल्पना मांडू नका. आपल्याला महाराष्ट्र खऱ्या अर्थाने प्रथम क्रमांकाचे राज्य ठेवायचे असेल तर त्याकरिता आपल्याला मूलभूत कल्पना स्विकाराव्या लागतील. ज्या कल्पना आम्ही मांडल्या, ज्या प्रकारे आम्ही दुष्काळाचे नियोजन केले, त्याप्रमाणे आपण नियोजन करावे, आमच्या आपल्याला शुभेच्छा आहेत. शेवटी महाराष्ट्रातील जनतेकरिता दुष्काळामध्ये आणखी सुनियोजन व्हावे, अशी आमची अजूनही कल्पना आहे. आपण कराल म्हणून आम्हाला वाटत नाही. परंतु या अर्थसंकल्पामध्ये मी दोन, तीन मुद्दे मांडले. कर्जाबद्दल व कर वाढविण्याबद्दल दोन, तीन मुद्दे मांडले, त्याबद्दल वित्त मंत्री धाडसी निर्णय घेतील अशी अपेक्षा करतो आणि रजा घेतो. धन्यवाद.*

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*तालिका सभाध्यक्ष : अजून बरेच वक्ते बोलणार आहेत. नावाची यादी वाचली तरी त्याकरिता १० मिनिटे लागतील. भारतीय जनता पक्षाचे ६० मिनिटे झाले असून एकूण २८ वक्त्यांपैकी ३ वक्त्यांचे बोलणे झाले आहे. शिवसेना पक्षाचे ८७ मिनिटे झाले असून ३ वक्ते बोलले आहेत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे १३६ मिनिटे झाले असून ३ वक्ते बोलले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे १०७ मिनिटे झाले आहेत आणि इतर व अपक्षांची २३ मिनिटे झाली आहेत. जवळजवळ ही चर्चा ७ तासांच्या वर झालेली आहे. अर्थसंकल्पावर सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी हवी असते, हे मला माहीत आहे. परंतु आपण अशाच पद्धतीने चालत राहिलो तर रात्री १२ वाजेपर्यंत चर्चा चालविली तरी पूर्ण होणार नाही. मला काहीही अडचण नाही. याबाबत सभागृहानेच ठरवावे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की केवळ दोन, तीन मिनिटांमध्ये सूचना करुन चर्चा संपवूया.*

*श्री. राणा जगजितसिंह पाटील (उस्मानाबाद) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे.*

*अध्यक्ष महोदय, वित्त मंत्री महोदयांनी हा अर्थसंकल्प शेतकरी राजाला समर्पित केल्याचा आवर्जून उल्लेख केला होता. त्याचबरोबर त्यांनी २०१६-२०१७ हे आर्थिक वर्ष शेतकरी स्वाभिमान वर्ष म्हणून साजरा करण्याचा निर्णय जाहीर केला. कृषी क्षेत्र आणि शेतकरी यांच्या विविध योजनांसाठी २५ हजार कोटी रुपये एवढी भरीव तरतूद करण्याच्या बाबतीतही त्यांनी आवर्जून उल्लेख केला होता. खरे तर २०१५ मधील ८ मार्चचे अर्थसंकल्पीय भाषण बघितल्यास त्यामध्ये अनेक मुद्दे मांडण्यात आले होते, अनेक नवीन योजनांची घोषणा करण्यात आली होती. तरतुदींच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला होता. मी या ठिकाणी दोन, तीन बाबी सांगणार आहे.*

*अध्यक्ष महोदय, जलयुक्त शिवार अभियानाच्या बाबतीत २०१५ मध्ये उल्लेख करण्यात आला होता. ही योजना अतिशय चांगली आहे. जुनी संकल्पना विस्तृत केलेली आहे आणि त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला, याबद्दल कोणाच्याही मनात दुमत नाही. २०१५-२०१६ मध्ये १ हजार कोटी रुपये देण्याचे ठरले होते. परंतु प्रत्यक्षात १६०० कोटी रुपये खर्च झाल्याचे आताच्या भाषणामध्ये सांगण्यात आले. परंतु तरतूद करीत असताना या वर्षी या योजनेसाठी १ हजार कोटी रुपयांचीच तरतूद केलेली आहे. यासरकारची ही फ्लॅगशीप योजना आहे. ५ हजार गावांमध्ये कामे सुरु झाली*

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. राणा जगजितसिंह पाटील.....*

*आणि गेल्यावर्षी १६०० कोटी रुपये खर्च केले असतील तर या वर्षी योजनेची रक्कम १६०० कोटी रुपयांवरुन १ हजार कोटी रुपयापर्यंत कमी का करण्यात आली याचे उत्तर मंत्री महोदयांनी देणे अपेक्षीत आहे.*

*...JJ/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राणाजगजितसिंह पाटील......

एक हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक तरतूद या योजनेसाठी करणे गरजेचे आहे, असे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते.

अध्यक्ष महोदय, सन 2015 च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये श्री.मोतीरामजी लहाने कृषी समृध्दी योजना जाहीर करण्यात आली होती. त्याकरिता 50 कोटी रुपयांचे नियतव्यय चिन्हांकीत केला आहे, असे वित्त मंत्री महोदयांनी त्यावेळी सांगितले होते. यवतमाळ जिल्ह्यातील आत्महत्यांची संख्या लक्षात घेता ही नवीन पथदर्शी योजना राबण्यिात येईल, असेही सांगितले होते.

अध्यक्ष महोदय, श्री.मोतीरामजी लहाने कृषी समृध्दी योजनेमध्ये त्यानंतरच्या काळात उस्मानाबाद जिल्ह्याचा समावेश करण्यात आला होता. सदरहू योजनेची 50 कोटी रुपयांची तरतूद वाढवून यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्याकरिता प्रत्येकी 550 कोटी रुपयाची तरतूद केल्याचे सांगण्यात आले होते. परवा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आला की, या दोन जिल्ह्यांसाठी 1200 कोटी रुपये दिले जातील. परंतु अर्थसंकल्पीय भाषणात त्यासंदर्भात कोठेही उल्लेख करण्यात आला नाही. तो शोधण्याचा आम्ही प्रयत्न केला पण या योजनेसाठी पैसे बाजूला काढून ठेवल्याचे अर्थसंकल्पात दिसून आले नाही. ही अतिशय खेदाची बाब आहे.

अध्यक्ष महोदय, उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्याकरिता श्री.मोतीरामजी लहाने कृषी समृध्दी योजनेकरिता किती तरतूद करण्यात येणार आहे, ती कशासाठी वापरण्यात येणार आहे, याचा उल्लेख त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये वित्त मंत्री महोदयांना कराव,ा अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2015 च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये सूक्ष्म सिंचनाच्या महत्वाकांक्षी कार्यक्रमासाठी 330 कोटी रुपये तरतूद करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले होते. प्रत्यक्षात या कार्यक्रमावर किती निधी खर्च झाला, याची माहिती सदनाला समजण्याची आवश्यकता आहे. तसेच, सन 2016-17 या आर्थिक वर्षामध्ये सूक्ष्म सिंचनासारख्या महत्वाकांक्षी योजनेसाठी किती निधीची तरतूद करण्यात आली, याची माहिती सदनाला मिळणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील उस्मानाबाद, बीड व लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती भयानक आहे. या भागातील जनता पाण्याच्या टंचाईमुळे त्रस्त आहे. उस्मानाबाद संदर्भात

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राणाजगजितसिंह पाटील......

सांगावयाचे झाले तर मागील तीन वर्षात दरवर्षी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दुपटीने वाढत आहे. अशा भयावह परिस्थितीत शासनाकडून मोठ्या प्रमाणात मदतीची अपेक्षा आहे. पुढील काळात या भागामध्ये पाणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी ठोस तरतूदीची अपेक्षा आहे. दुर्दैवाने या दोन्ही गोष्टींच्या बाबतीत अर्थसंकल्पामध्ये फार विचार केल्याचे दिसून येत नाही.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्याच्या हक्काचे कृष्णा खोऱ्यातील 23.66 टीएमसी पाण्याकरिता मंत्रिमंडळाने मंजूरी दिली होती व त्यानुसार 7 कामे सुरु आहेत. परंतु या कामासाठी या अर्थसंकल्पात भरीव तरतूद न करता 5-10 कोटी रुपये इतकी किरकोळ तरतूद करण्यात आली आहे. सदरहू कामांसाठी पैसे उपलब्ध करुन देण्यात यावे, अशी माझी वित्त मंत्री महोदयांना आग्रहाची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शेततळे योजनेकरिताच्या 50 हजार रुपये अनुदानासंदर्भात सदनामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा करीत असताना उल्लेख केला. कृषी विभागाच्या माध्यमातून रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या 30 बाय 30 बाय 3 च्या शेततळ्याच्या कुशल व अकुशल कामासाठी जवळपास 1 लाख 70 हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. शेततळ्यासाठी लागणाऱ्या प्लास्टीकच्या खर्चाचा योजनेत विचारच केला नाही. शेततळे घेण्यासाठी शेतकऱ्याकडे पैसे उपलब्ध नसतील तर तो शेततळे कसे उभे करेल व त्यासाठी प्लास्टीक खरेदी करण्यासाठी कोठून पैसे आणणार ? यासंदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, एनडीआरएफ आणि एसडीआरएफचे नॉर्मस् आपल्या राज्याने स्वीकृत केले आहेत. त्यानुषंगाने राज्यात नैसर्गिक आपत्ती उद्‌भवून 33 टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाले तर मदत किंवा अनुदान देणे अपेक्षित आहे. त्यानुसार खरीप कालावधीत अनुदान मिळाले. परंतु रबी हंगामाकरिता कोणत्याही अनुदानासाठी तरतूद करण्यात आली नाही. मागील वर्षीच्या तुलनेत नैसर्गिक आपत्तीसाठीच्या निधीमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे, हे मला नमूद करावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, वर्धा नागपूर व बुलडाणा येथील तीन मध्यवर्ती बँकांना सरकारने 400



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राणाजगजितसिंह पाटील......

कोटी रुपयापेक्षा अधिक मदत त्यांना बँकींग लायसन्स मिळावे याकरिता केली होती. त्यांच्याप्रमाणेच उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेला मदत करण्याची आवश्यकता आहे. या बँकेने स्वतःच्या ताकदीवर लायसन्स मिळवले आहे. परंतु या बँकेत आज चलन तुटवड्याचा प्रश्न निर्माण झाल्याने वारंवार शासनाने मदत करण्याची मागणी आम्ही करीत आहोत. या बँकेला दोन सहकारी साखर कारखान्याकडून पैसे येणे आहे. दोन्ही साखर कारखान्यांकडे मिळून जवळपास 700 ते 800 कोटी रुपये शेतकऱ्यांनी बँकेत ठेवलेले पैसे अडकले आहेत. त्यामुळे साखर कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांना बोलवून त्यांची बैठक आयोजित करावी. सदरहू बँकेची आर्थिक परिस्थिती कोलमडल्याने तिला मदत केली तर त्या भागातील शेतकऱ्यांना व लोकांना दिलासा मिळेल.

अध्यक्ष महोदय, मालगुजारी तलावांच्या संदर्भात अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली होती व काही प्रमाणात तलावांची कामे झाली होती. त्याच धर्तीवर उस्मानाबाद जिल्हा व आसपासच्या जिल्ह्यामधील केटीवेअरच्या दुरुस्तीसाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील शेतकरी दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणीमध्ये आहे. त्यामुळे त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक शुल्काचा विषय आपणा सर्वांसमोर आहे. परंतु त्यासंदर्भात दुर्दैवाने अर्थसंकल्पामध्ये विचार करण्यात आला नाही. आमची मागणी आहे की, दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची 100 टक्के शैक्षणिक फी व वार्षिक फी माफ करण्यात यावी. त्याकरिता तरतूद उपलब्ध करुन देऊन दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यात यवा.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागासाठी सन 2015-16 मध्ये 14,747 कोटी रुपये सुधारित तरतूद केली असून सन 2016-17 या आर्थिक वर्षाकरिता 17,762 कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. नगर विकास विभागासाठी मागील वर्षाच्या तुलनेमध्ये जवळपास 51 टक्क्यापेक्षा अधिक तरतूद करण्यात येत आहे, ही चांगली बाब आहे. त्याबद्दल माझे दुमत असण्याचे कारण नाही. राज्यातील 50 टक्क्यापेक्षा अधिक जनता शेतीवर अवलंबून असून राज्याचे कृषी विषयक योगदान 10 टक्के आहे. हे योगदान वाढवावयाचे असेल व अडचणीत सापडलेल्या

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राणाजगजितसिंह पाटील......

शेतकऱ्याला मदत करावयाची असेल तर स्वाभाविक आहे त्याकरिता आपल्याला अजून काही पावले उचलावी लागणार आहेत. गुजरात सारख्या राज्याची वार्षिक योजना 85 हजार कोटी रुपयापर्यंत जात असेल, कर्नाटक राज्याची 85 हजार कोटी रुपयांच्या वर असेल, तेलंगणा सारख्या लहान राज्याची 65 हजार कोटी रुपयापेक्षा अधिक असेल तर महाराष्ट्राची वार्षिक योजना मर्यादित का आहे, असा प्रश्न माझ्यासमोर उभा राहतो.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता सरकारने ज्या वेगवेगळ्या योजना जाहीर केल्या आहेत त्या कागदावर न राहता प्रत्यक्षात येण्याकरिता निधीची तरतूद करावी व कामांची अंमलबजावणी करण्यात यावी. यावर्षी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणा सरकारने केली आहे. शेतकरी स्वाभिमान वर्ष म्हणून हे वर्ष साजरे करण्याचा शब्द दिला आहे. यावर्षीचा अर्थसंकल्प शेतकऱ्यांना समर्पित केला आहे. हे सर्व अर्थहीन राहू नये. त्यामुळे माझी विनंती आहे की, शेतकरी प्रचंड अडचणीत असल्याने शेतकऱ्याच्या शेतमालाच्या खर्चाच्या वर 50 टक्के अधिक देण्याचा शब्द सरकारने दिला होता तो पाळावा. तसेच, पीक विम्याच्या संदर्भातील विषयाकडे सरकारने गांभीर्याने पहावे व त्याकरिता तरतूद करुन आपण शेतकऱ्यांच्या बरोबर आहोत हे दाखवून द्यावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद !

-------------------

यानंतर KK-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बच्चू कडू (अचलपूर) : अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे अर्थमंत्री महोदयांचे मी एका गोष्टीसाठी अभिनंदन करील आणि आभार मानतो. जरी त्यांनी विधवा, निराधार आणि अपंगांचा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये केला नसला तरी पण त्यांच्यासाठी काही मानधन वाढवून अर्थसंकल्पात तरतूद केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, त्यांना धन्यवाद देतो. तसे ते वाघावर आले आणि उंदिर होऊन गेले अशी परिस्थिती आहे. वनमंत्री असताना वाघासारखा हा अर्थसंकल्प असायला पाहिजे होता. या ठिकाणी रक्कम मोठी दिसत असली तरी म्हणजे 25 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांसाठी दिल्याचा दिलासा दिसत असताना ते किती खोटे आहे हे तपासले तर निश्चितच निराशा हाती आल्याशिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, आम्ही पाहतो की, एकीकडे अर्थसंकल्प सादर करीत असताना आपली 51 टक्के राशी शहरांच्या बाजूने जात आहे. 51 टक्के शहरांसाठी निधी उपलब्ध करून देत असताना ग्रामीण भागातील अवस्था पाहिली तर अजूनही आम्हाला टँकरशिवाय पिण्याचे पाणी मिळत नाही. सर्वत्र पाहिले तर शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा व्यवस्थित नाहीत. त्यामुळे ही नाहीची फळे आमच्या ग्रामीण भागात येत आहेत. आपण आम्हाला सांगावे की, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद असेल या ठिकाणी टँकरने कधी पाणी द्यावे लागते काय ? भविष्यात 20 वर्षानंतर कधी द्यावे लागेल काय तेही सांगावे. शेवटी आपली विचारसरणी काय आहे हे महत्वाचे आहे, 50-60 वर्षानंतरही गावातील लोकांना टँकरने पाणी का प्यावे लागते ? धरणे आमच्या बाजूने झाली आहेत, धरणांमध्ये शेती आमची गेली, गावे आमची उठविली गेली, पण पाणी मात्र शहरांना देण्यात आले आहे. त्यांना पाणी दिले नाही पाहिजे अशा मताचा मी नाही. पण आपला जो विचार आहे, सरकारचे जे डोके आहे ते फक्त शहरांच्या बाजूचा विचार करते. अजूनही पाहिले तर साधे शिक्षण, आरोग्य यापासून आम्हाला वंचित रहावे लागते. गावातील लोकांना टँकरने पाणी देण्याची वेळ कधीपासून बंद होणार हे ठामपणे सांगता आले पाहिजे, आणि ते येथे सांगितले नाही, याचे दु:ख आहे. तसे पाहिले तर आज शहीद दिन आहे, होळीचा दिवस आहे, साडेतीन लाख शेतकऱ्यांची होळी झाली आहे. हे आपल्या सरकारने केली आहे. त्यामध्ये मग कॉँग्रेस असेल, राष्ट्रवादी असेल, भारतीय जनता पक्ष असेल आणि शिवसेना असेल या सर्वांनी शेतकऱ्यांची होळी

2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बच्चू कडू.....

पेटविली. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत असताना त्यांना किती लुटले ते पाहिले पाहिजे. "लूट ज्यादा हो रही है और पैसा कम दे रही है सरकार". आपण 25 हजार कोटी रुपये तरतूद करीत असताना या राज्यात कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लुटले किती, याचा हिशेब मांडला तर एका एकराला सरासरी 5 क्विंटल कापूस पिकतो असे धरले तर या राज्य सरकारने त्या कापसाला उत्पादन खर्चावरील हमी भावाची जी शिफारस केली आहे त्याची रक्कम 6892/- रुपये प्रति क्विंटल इतकी आहे. म्हणजे आमचे राज्य सरकार म्हणते की, शेतकऱ्याला जर 6892/- रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला नाही तर त्याचा उत्पादन खर्च सुध्दा निघू शकत नाही. हे मी म्हणत नाही तर आपले राज्य सरकार म्हणत आहे. केंद्राने भाव काय जाहीर केले तर 4100/- रुपये, बाजारभाव काय आहे तर 4500/- रुपये. म्हणजे हमी भाव 6892/- रुपये इतका ठरला असताना आम्हाला 4500/- आणि 4100/- 6892/- रुपये भेटले आहेत. म्हणजे एका क्विंटलमागे 3 हजार 6892/- रुपयांची तफावत आहे. एका क्विंटलमागे आपण आम्हाला 3 हजार रुपये कमी दिले म्हणजे आपण आम्हाला जास्त लुटले आहे. आता आपण आम्हाला एकरी 2 हजार रुपये मदत देणार आहात. मार्चअखेर जाहीर करणार आहात. जलयुक्त शिवार आणणार, शेततळी आणणार आहात, हे सर्व जरी असले तरी एका एकरासाठी 4 हजार रुपये यापेक्षा अधिक मदत मिळत नाही. आपण कितीही बोंब मारली आणि केंद्राने दहा आठ नाही तर वीस लाख खर्च केले किंवा आपण 25 हजार नाही तर 50 हजार रुपयांची तरतूद केली तरी "लूट ज्यादा हो रही है और आप दे कम रहे". एका एकरात 5 क्विंटल कापूस म्हणजे 5 त्रिक 15 हजाराने लुटले आणि आपण फक्त 3-4 हजाराने मदत दिली. यात काय अर्थ आहे, जे आम्ही मागतो ते आपण देत नाही. आम्ही ज्यासाठी आटापिटा करतो ते आपल्याकडून देण्यात येत नाही, खऱ्या अर्थाने हे चुकीचे आहे.

अध्यक्ष महोदय, स्मार्ट सिटी बांधायच्या आणि आमचे ताट खाली ठेवायचे, येथे आमची खायची सोय नाही. पण आपण पावडर घ्या म्हणता, ते तोंडाला लावून कुठे फिरायचे आहे ! स्मार्ट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बच्चू कडू.....

सिटी करीत असताना आणि शहरांसाठी प्रचंड खर्च करीत असताना आमच्याकडील सिंचन प्रकल्प असेच पडून आहेत. माझ्या मतदार संघामध्ये 6 सिंचन प्रकल्प आहेत. मोर्णी नाला, करजगाव, वासनी, भगाडी, राजूरा, पूर्णा, चंद्रभागा या सिंचन प्रकल्पांसाठी सरकारने एक खडकू दिलेला नाही. एकीकडे भारतीय जनता पक्षाचे सरकार म्हणजे विदर्भाच्या बाजूने बोलणारे सरकार आहे असे आम्ही मानत होतो. पण प्रत्यक्षात आपण अनुशेषाचा विचार केला आणि बजेटमध्ये तरतूद पाहिली तर शून्य आहे. आजही आमच्या धरणांचे प्रकल्प पाहिले तर ते आमच्याकडे आ वासून बसले आहेत. एकंदरीत अवस्था पाहिली तर आणि बजेटमध्ये तरतूद झाली नाही तर आम्हाला आमच्या जमिनी पेरणीविना तशाच ठेवाव्या लागतील. सिंचनासाठीच्या जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार बंद झाले आहेत आणि त्यामुळे शेतकऱ्याला त्या जमिनी ना विकता येत ना पिकविता येत अशा प्रकारची अवस्था आहे.

अध्यक्ष महोदय, एकीकडे काँग्रेसवाले आणि भारतीय जनता पक्षावाले म्हणतात की, सातवा वेतन आयोग द्या. म्हणजे ज्या कलेक्टरचा पगार 90 हजार रुपये आहे तो आता 2 लाख 50 हजार रुपये होणार आहे. चपराश्याचे शिक्षण पाहिले तर तो चौथा वर्ग पास असतो. त्याला 25 हजार रुपये पगार देणार आहोत. म्हणजे आमच्या बजेटवर एकंदरीत 18 हजार कोटी रुपयांचा भूर्दंड पडणार आहे. 1 लाख 34 हजार आणि 18 हजार असे जर पाहिले तर सातवा वेतन आयोग देत असताना आपण स्वामिनाथन आयोगाने दिलेल्या शिफारशींकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. बजेटमध्ये यासाठी काही व्यवस्था नाही. सातवा वेतन आयोग देण्याची काय गरज आहे ? आणखी दोन वर्षे देऊ नका, मेले काय कोणी ? एखादा कर्मचारी मेला काय, अहो वरुन तर पैसे भेटतात पण खालून किती जातात ते सांगा ना ? आम्ही आपल्याला सांगतो की, सातवा वेतन आयोग द्या, पण या मंत्रालयातील 6 मजले बिगर भ्रष्टाचारी करुन दाखवा. मंत्रालयातील मुख्यमंत्र्यांचे ऑफिस जरी करप्शनमुक्त झाले तरी राज्य सुधारु शकते. सातव्या वेतन आयोगाचे सर्व पैसे निघू शकतात. पण मंत्रालयातील 6 मजले सुध्दा बिगर भ्रष्टाचारी होऊ शकत नाहीत. जेथे मुख्यमंत्री आणि 12 मंत्री बसतात तेथील व्यवस्था चांगली झाली आणि ते जरी नॉन-करप्ट केले तरी राज्य सुधारण्यास

श्री. बच्चू कडू.....

वेळ लागणार नाही. म्हणून हा सातवा वेतन आयोग दिला तर आणि ऑर्डर दिल्यानंतर त्या कर्मचाऱ्याला मरेपर्यंत तेवढाच पगार का ठेवता ? त्याला त्याच्या श्रमावर आधारीत पगार द्यावा. त्याला त्याच्या श्रमावर आधारीत पगार देता येत नाही. पण आमचा माल खरेदी करताना ग्रेड 1, ग्रेड 2 अशा प्रकारे घेता आणि कर्मचारी, अधिकारी व आमदारांना त्यांचा पगार देताना त्याच्या कामाचे मुल्यमापन न तपासता आपण पगार देतो, हे खऱ्या अर्थाने थांबले पाहिजे. आज शहीद दिन आहे. मागच्या वर्षी सन्माननीय वित्तमंत्री श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी शहिदांच्या स्मारकासाठी 25 कोटी रूपये दिले होते. त्यापैकी एक खडकूही खर्च केला नाही. राज्यभरातून यासंबंधी 48 प्रस्ताव आले होते. पण एकही खडकू खर्च करण्यात आला नाही. तिर्थक्षेत्रांच्या फाईल्स आपल्याकडे आल्या आणि त्या पूर्ण झाल्या. परंतु या देशासाठी जे शहीद झाले आहेत त्या शहिदांच्या स्मारकांच्या 48 प्रस्तावांच्या फाईल्स आपल्याकडे तशाच पडून आहेत आणि या वर्षात यासाठी तरतूदही नाही. याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे. एकीकडे आपण स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करीत असताना 371 (2) कलमानुसार आम्हाला जे अधिकार प्राप्त झाले आहेत त्यानुसार नोकरीमध्ये समान भरती होणे गरजेचे आहे. नोकर भरती करणे हे बिनापैशाचे काम आहे. त्यामध्ये फक्त तरतूद करणे आवश्यक आहे. आमच्या विदर्भाचे मुख्यमंत्री, वित्तमंत्री आणि सर्व मंत्री असताना फक्त कागदाचे घोडे नाचविण्याचे प्रकार सुरू आहेत. लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार 371 (2) कलमानुसार नोकरीचे वाटप समसमान झाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपण शेतकऱ्याच्या शेतीमालाला भाव द्यावा. आपण जलयुक्त शिवार यासारख्या योजनांमधून आपण उत्पादन वाढविण्याच्या मागे लागलो आहोत. गेल्या 50-60 वर्षामध्ये शेतकऱ्याने उत्पादन वाढविले आहे, यामध्ये कोणतीही खोट नाही. एका एकरामध्ये 2 क्विंटल पूर्वी घेत होता आता तो 4 क्विंटल पीक घेतो म्हणजे उत्पादन वाढले आहे. त्यामुळे स्वामिनाथन आयोग म्हणतो की, उत्पादन वाढल्यापेक्षा उत्पन्न वाढले पाहिजे. उत्पन्न हे भावाशिवाय वाढू शकत नाही आणि म्हणून रोजगार हमी योजनेसारखी एक महत्वाकांक्षी योजना पेरणी ते कापणीपर्यंतची सर्व कामे एमआरईजीएसमध्ये घेण्याचे काम आपण केले नाही तर यामध्ये सुधारणा होऊ शकत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बच्चू कडू.....

अध्यक्ष महोदय, आमच्या भागात गारपीट झाली आहे आणि त्या गारपीटीमध्ये संपूर्ण कांदा उत्पादक शेतकरी उध्वस्त झाला. बेलोरे गावच्या गजानन चौधरी नावाच्या अशाच एका शेतकऱ्याच्या भेटीसाठी मी गेलो असता, तो असे सांगत होता की, दोन दिवसापूर्वी त्याने निंदण-खुरपण केले होते. त्याने खतही टाकले होते. यामध्ये 20 ते 25 हजार खर्च झाला आणि लगेच रात्री गारपीट आली. यामध्ये कांदा तर हातचा गेलाच पण काल हाती दिलेले पैसेही गेले.

यानंतर LL-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बच्चू कडू........
स्वामीनाथन समिती म्हणते की, पीक संरक्षण व्यवस्था निर्माण करणे या सगळ्या गोष्टीकडे जर लक्ष दिले नाही तर हे मरण थांबणार नाही. माननीय वित्त मंत्री हे वन मंत्री सुध्दा आहेत आणि विदर्भातील असल्याने त्यांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. वाघाने चावले तर पैसे देण्यात येतात आणि सापाने चावले तर पैसे देत नाही यामध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. विधवा महिलांचा पगार वाढवित असताना अपंगांचा पगार वाढविणे सुध्दा गरजेचे आहे. याचा विचार करुन वित्त मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये याची घोषणा करणे गरजेचे आहे.

---------

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

श्री मंगल प्रभात लोढा (मलबार हिल) : अध्यक्ष महोदय, महोदय, मैं सन 2016-17 के अर्थसंकल्प पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, पारदर्शिता से काम करने वाली, अतिशय प्रामाणिक रूप से काम करने वाले अभ्यासू वित्तमंत्री ने एक बॅलन्स अर्थसंकल्प पेश किया है, मैं इस बात का हार्दिक स्वागत करता हूं. कर्जो का बोझ, अधूरी पड़ी हुई योजनाएं, एलबीटी का विथड्राल, टोल टैक्स का विथड्राल, जागतिक पेट्रोल दरों में कमी होने के कारण ऑक्ट्रॉय में कमी, जागतिक मंदी के कारण सरकारी टैक्स में कमी, इसके अलावा अकाल, ओलावृष्टी, फसल का नुकसान, इससे ज्यादा निगेटिव बातो का सामना 18 महीने में किसी सरकार को नहीं करना पड़ा. यदि इरादे मजबूत हो, काम करने में आनंद आता हो, यह सरकार ऐसी है कि माननीय मुख्यमंत्री और वित्त मंत्री आनंद से काम करते है. यदि आनंद से काम करने का मन हो, तो हजारों रूकावटें होने के बावजूद मंजिल पर पहुंचने के लिए कोई पत्थर उसको भारी नहीं लगता. इस बजट में महाराष्ट्र सरकार ने केवल लोगों का ही ध्यान नहीं रखा, बल्कि पहली बार केंद्र से ज्यादा से ज्यादा बजट महाराष्ट्र को मिला है. केंद्र सरकार से मिले हुए बजट से फायदा यह है कि पहले केंद्र सरकार से 100 रूपये निकलते थे तो केवल 20 रूपये नीचे पहुंचते थे. इस बार यदि 100 रूपये निकलते है तो पूरे 100 रूपये जनधन योजना के माध्यम से लोगों के खाते में पहुंचते है. ऐसी सरकार लोगों के भले के लिए पहले कभी नहीं आयी. मैं विरोधी नेताओं से निवेदन करना चाहता हूं कि जेएनयू की मेन्टॅलिटी से बाहर आईए, होली का अवसर है, मिलजुल के वातावरण में बजट का, सरकार का समर्थन करे. इस सरकार ने किसानों के लिए, युवाओं के लिए, महिलाओं के लिए, व्यापारियों के लिए, इन्फ्रास्ट्रक्चर के लिए काम किया है.

अध्यक्ष महोदय, मेरे दो-तीन ही सुझाव है. गोवंश रक्षा के लिए टैक्स फ्री सरकारी फंड से एक स्पेशल फंड बनाया जाए. उसमें सारे दुनिया से, भारत से विशेष तौर पर फंड मांगा जाए, लोग बॉण्ड खरीदेंगे. मेरा सरकार से, वित्त मंत्री जी से निवेदन रहेगा कि किसानों के जो अनाथ बच्चे है, उनकी शिक्षा का भार उठाने के लिए सरकार इस बजट में कोई प्रावधान करें या सरकार उसके लिए विशेष फंड की स्थापना करे.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री मंगल प्रभात लोढा.....

अध्यक्ष महोदय, सरकार सीएसआर फंड को इन्कम टैक्स के रुप में वसूल नहीं करना चाहती है. लेकिन महाराष्ट्र की विशेष परिस्थिति को देखते हुए, माननीय वित्त मंत्री जी महाराष्ट्र की सारी कंपनियों को कम से कम अपील करें कि अपने सीएसआर फंड का कम से कम पांच प्रतिशत रकम अकाल राहत के लिए, जिन किसानों ने आत्महत्या की उनके परिवारों के लिए वह पैसा डायवर्ड किया जाए.

अध्यक्ष महोदय, सरकार ने दो ॲमिनिटी स्कीम्स लायी है. इसके लिए मैं उनको धन्यवाद देना चाहता हूं. वॅट के 40 हजार से ज्यादा केसेस थे. लोगों को वॅट के केसेस से बहुत तकलीफ हो रही थी, सरकार का लाखों रुपया वकील की फीस के लिए जा रहा था. सब के लिए स्टे था. वित्त मंत्री ने महत्वपूर्ण निर्णय लेकर, वॅट के संबंध में ॲमिनिटी स्कीम लाकर, सरकार को न केवल 10 हजार करोड़ रुपये से ज्यादा की इन्कम मिलेगी, बल्कि जो व्यापारी अपने आपको परेशान महसूस कर रहे थे उनको भी राहत मिलेगी.

अध्यक्ष महोदय, वित्त मंत्री महोदय ने महाराष्ट्र औद्योगिक धोरण के संबंध में अभय योजना लायी है, बंद पड़े हुए जो उद्योग है, जो पढ़े-लिखे विद्यार्थी है, वे इंडस्ट्री चलाना चाहते है, उसके लिए मैं धन्यवाद देना चाहता हूं.

स्वराज्य माझा जन्म सिध्द अधिकार आहे असा नारा देणाऱ्या लोकमान्य टिळकांची यावर्षी स्वर्णजयंती आहे. यासाठी सरकारने निधीची घोषणा करण्याचा मानस दाखविलेला आहे. स्वराज्यभूमी गिरगांवजवळ एक मोठा उत्सव साजरा करणार आहे. मी सभागृहाच्या वतीने माननीय वित्त मंत्र्यांना सूचना देऊ इच्छितो की, यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील गणपती मंडळांची एक समिति गठित करुन गणेश उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला पाहिजे अशी मी यानिमित्ताने विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मैं मेरा भाषण समाप्त करने से पहले एक बात मन से कहना चाहता हूं. विरोधी पक्ष में रहकर विरोध करना सब की जिम्मेदारी रहती है. लेकिन कभी कभी व्यक्ति को भी समझना चाहिए. जो व्यक्ति माननीय वित्त मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार जी के सम्पर्क में आते है, वे

.......4

श्री मंगल प्रभात लोढा........

चाहे विरोधी पक्ष के हो, किसी भी पक्ष का हो, उनको कभी निराश नहीं होना पड़ा. ऐसे ही मुख्यमंत्री जी भी है. दो हंसो का जोड़ा कई सालों के बाद महाराष्ट्र को मिला है, इन हंसों के जोड़े से महाराष्ट्र भी आनंद ले रहा है. विरोधी पक्ष भी आनंद ले और आने वाले समय में, महाराष्ट्र जो प्रथम क्रमांक पर था, पांच साल के बाद, सन 2019 की केवल घोषणा नहीं रहेगी, कल्पना नहीं रहेगी, इलेक्शन का नारा नहीं रहेगा. यहाँ पर विरोध में बैठने वाले सदस्यों को विरोध करने के लिए कोई मौका नहीं रहेगा, अखबार में उनके विरोध को छापने के लिए कॉलम नहीं मिलेंगे. इतना अच्छा काम ये सरकार कर रही है, महाराष्ट्र को सुजलाम, सुफलाम करने के लिए पांच साल में अपना काम करेगी. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

--------

......5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुरेश गोरे (खेड-आळंदी) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मला संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. हे वर्ष शेतकरी स्वाभीमान वर्ष म्हणून साजरे करण्याचा चांगला निर्णय शासनाने घेतला त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. या अर्थसंकल्पामध्ये 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याने शेतकऱ्यांचे खऱ्याअर्थाने भले होणार आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी अन्नधान्याच्या उत्पन्नामध्ये 24.9 टक्के झालेली घट निश्चितपणे भरुन निघेल. ग्रामीण भागाच्या विकासासाठी ग्रामपंचायतींना अधिक सक्षम करण्यासाठी स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत व महिला सक्षमीकरण अभियान ही एक महत्वपूर्ण योजना राबविण्याचे शासनाने ठरविले आहे त्याबद्दल मी मनापासून आभार मानतो. ग्रामीण दुर्गम भागाकरिता राज्याने मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना सुरु केली, यामुळे ग्रामीण जनतेचा फायदा होईल. परंतु नवीन योजना सुरु करताना ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना आहेत त्या योजनांसाठी लाखो रुपये खर्च करुन अजूनही काही ठिकाणी बंद आहेत. त्या पुन्हा पुनर्जिवित करण्यासाठी बंद असलेल्या योजना पुन्हा सुरु करण्यासाठी काही मोहिम राबविण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पामध्ये वन विभागाकडे विशेष लक्ष दिल्याचे आढळते. वन पर्यटनाकरिता 47 कोटी 25 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. वनांचा विकास करुन वन पर्यटन प्रकल्प महाराष्ट्रात उभा करण्याची गरज आहे. जलयुक्त शिवार योजनेमध्ये वन विभागाचा महत्वाचा सहभाग आहे. वन विभागाच्या हद्दीमध्ये वनतळे आणि वनबंधारे यासारखी जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात येतील अशा प्रकारचे नियोजन या अर्थसंकल्पामध्ये केल्याचे दिसून येते. पर्यटन स्थळांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी 285 कोटी रुपयांची तरतूद या अधिवेशनामध्ये केलेली आहे. खेड तालुक्यातील भीमाशंकर आणि भोरगिरी पर्यटनासाठी प्रस्ताव दाखल केलेले आहेत त्याचाही विचार यामध्ये व्हावा अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करतो. ग्रामीण भागातील बहुतांशी गावांच्या पाणी पुरवठा योजना आहेत त्यामध्ये पाणी शुध्दीकरणाची यंत्रणा नाही यासाठी विशेष तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, आळंदीसारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दूषित पाणी प्यावे लागते. नदी शेजारील गावाचे सांडपाणी आणि कंपन्यांचे रसायनमिश्रीत पाणी सोडल्यामुळे बंधाऱ्याचे पाणी दूषित झालेले आहे. कित्येक वेळा मागणी करुनही हे रसायनमिश्रीत पाणी बंद होत नाही. बऱ्याच तक्रारी

.......6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुरेश गोरे.......

करुन सुध्दा पाणी शुध्दीकरणासाठी मोठा प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. मोठमोठे प्रकल्प उभे राहत असताना या प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे प्रश्न सुध्दा महत्वाचे आहेत. हे प्रश्न सुटण्यासाठी शासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे.

MM-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुरेश गोरे .........

त्यांना योग्य मोबदला, परताव्याच्या रक्कमा, भूखंड पुनर्वसनाचे प्रश्न, असे अनेक प्रश्न आहेत. ते कालबध्द कार्यक्रम आखून ते सोडविण्यासाठी तरतुद करणे आवश्यक आहे. राज्य शासनाच्या अखत्यारित असणा-या पुरातन वास्तुंच्या संवर्धानासाठी अधिक निधीची तरतूद करणे आवश्यक होते. धरण प्रकल्पग्रस्तांना अनेकवेळा मदत करण्याचा प्रयत्न करतो. प्रकल्प उभे राहण्यासाठी शेतक-यांचे योगदान आहे. त्यांचा प्रश्न मात्र ब-याच वर्षापासून प्रलंबित आहे. अशा भागांचा सिंचनाचा प्रश्न बराच मोठा आहे. आवर्तने सुटली की, त्या बुडीत क्षेत्रातील गावांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. अशा ठिकाणी बुडीत बंधा-यांची योजना शासनाने खास विशेष तरतुद करुन मान्य करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. या अर्थसंकल्पाला पाठींबा देतो, मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल त्याबद्दल विशेष आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

.........

....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे (माण) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. मला सभागृहाचा सदस्य होऊन सात वर्षे झाली. या बाजूला जेव्हा मी पलिकडच्या बाजूने बसलो होते. तेव्हा या बाजूने अर्थसंकल्पावर आपापली मते मांडणारे आणि खासकरुन दोन माणसे या राज्याच्या अर्थसंकल्पाबद्दल परखड मते माडत एका बाजूला मुख्यमंत्री महोदय, दुस-या बाजूला माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार हे दोघे होते तेव्हा पोटतिडकीने अर्थसंकल्प मांडायचे आणि त्याच पोटतिडकीने अर्थसंकल्पामध्ये तरतूदी होतील अशा पध्दतीची अपेक्षा होती. शेतक-यांच्या सर्वांगिण विकास आणि त्याला पुरक असा ग्रामविकास अर्थसंकल्पाचा मुख्य आधार आहे. शेतकरी स्वाभीमानी वर्ष आम्ही साजरे करणार आहोत. शेतकरी आणि या राज्यातील जनता पिण्याच्या पाण्यासाठी तडफडते. शेतीच्या पाण्याचा विषय आहे. शेतकरी पिण्याच्या पाण्यासाठी स्तलांतरीत होत आहे. त्याला कर्जाच्या बोजाण्याने जगने मुष्कील झाले आहे. दुष्काळाबरोबर गेल्या तीन, चार वर्षापासून संघर्ष करीत असताना शेतक-यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली. गेल्या एक वर्षाच्या कालखंडामध्ये 3500 शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. शेतक-याला कोणी मायबाप, वाली आहे किंवा नाही अशा पध्दतीचे वातावरण तयार झाले. पलिकडच्या सन्माननीय सदस्यांनी बाके वाजविली, भाषणे केली, सरकारचे कौतुकही केले, मराठवाडयातील, विदर्भातील असतील प्रत्येक भागातील आमदार महोदय असतील, मतदार संघातील वास्तव मांडायचे म्हटले तर सर्वांन पुढे वास्तव प्रश्न आहे. तो जनावरांच्या चा-याचा विषय आहे. दुधाला दर नाही, शेतकरी अगदी उघडा पडलेला आहे. शेती मालाला भाव नाही, थोडे पिकले तर त्याला भाव नाही, अशी परिस्थिती आहे. सरकारने आता शेतकरी स्वाभीमानी वर्ष साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. अशा वेळी शेतक-यांची किती थट्टा करणार आहोत, दिनदुबळया, गरीबांचा अर्थसंकल्प मांडत असतांना अलंकारीक सुरुवात माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार साहेबांनी केली. ही सुरुवात करत असताना सांगितले की, सुजलाम सुफलाम पराक्रमी महाराष्ट्र घडविण्याचे स्वप्न त्यांनी या महाराष्ट्राला दाखविले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने योजना, शिवाजी महाराजांच्या नावाने योजना हे सर्व करीत असताना पंडीत दिनयाळ यांच्या

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे.......

अंत्योदयाची स्वप्न शेवटच्या माणसाच्या वेदना मनात जपून ठेवायच्या आहेत. अशा पध्दतीची भूमिका मांडली. हे सरकार सत्तेवर आले तेव्हा पासून माणसाच्या वेदना जपून ठेवायचे काम केलेले आहे. कारण त्या वेदना जपूनच हयांचे राजकारण चालते. जर शेतक-यांच्या वेदना संपल्या आणि त्याच्याशी खेळ केले तर कसे होणार ! मागच्या वर्षीचा 9000 कोटी रुपयांच्या तुटीचा मागच्या वर्षीचा अर्थसंकल्प, साडेतीन हजार कोटी रुपयांची चालू वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये महसूली तूट आहे. मांडलेल्या अर्थसंकल्पाच्या आकडेवारीचा व त्याच्या टक्केवारीचा विविध भागात दिलेला नियतव्यय कितीही सांगितले तरी वर्ष संपताना या अर्थसंकल्पाचा मेळ, शिस्त कुटेच राहणार नाही. मागच्या शासनाच्या वेळी माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार माझ्या पुढच्या बाकावर बसले होते. तेव्हा पोटतिडकीने सांगत होते की, राज्य कर्जाच्या खाईमध्ये लोटले गेले आहे, दिवाळखोळीत गेले आहे. आम्ही सत्तेत आलो तर राज्यावरचा कर्जाचा बोजा कमी करु या ठिकाणी मला सांगायचे आहे की, सन 2015-16 आणि 2016-17 चा अर्थसंकल्प श्री.सुधीर मुनगंटीवार साहेब मांडत आहेत. हा अर्थसंकल्प मांडत असताना जेव्हा त्यांच्या हातामध्ये सत्ता आली तेव्हा राज्यातील प्रत्येक माणसाच्या डोक्यावर साधारण 28000/- रुपयांचे कर्ज होते. गेल्या 16 महिन्यांच्या कालाखंडात ते कर्ज 34500/- रुपयांवर गेले. म्हणजे प्रति माणसी 6000/- रुपयांचे कर्ज वाढले. सर्वांना मला सांगावयाचे आहे की, एल.बी.टी. माफ करतो आहोत, कोटयावधीचा भार पडलेला आहे, राज्याचे महसूली उत्पन्न कमी होते आहे, खर्च वाढला यांचा मेळ कोठे बसत नाही. हे सर्व होत असताना एल.बी.टी. 6000 ची आणि टोलसाठी 8000 अशी माफी देतो आहोत. हे सरकार नेमके कोणाचे आहे ? राज्यातील मुठभर व्यापा-यांसाठी या सर्व घोषणा करतो आहोत.

अध्यक्ष महोदय, राज्याचा खरा कणा हा शेतकरी आहे. शेतक-यासाठी 25000/-कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली. मी नवीन आमदार आहे. गेली 7 वर्षापासून काम करतो आहे. पण या 7 वर्षामध्ये प्रत्येक अर्थसंकल्पाचे बारकाईने वाचन केले. जेव्हा हे अर्थसंकल्प वाचत होतो. तेव्हा 35 हजार कोटी रुपयांच्या ज्या तरतूदी आहेत. त्याच सर्व तरतूदी आताच्या अर्थसंकल्पामध्ये क्लब केल्या आणि 25 हजार कोटी रुपयांचे स्वप्न दाखविले.

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे.........

अध्यक्ष महोदय, जलयुक्त शिवारची योजना या सरकारने पुढे नेली. याबद्दल मला सरकारला मनापासून धन्यवाद द्यायचे आहेत. ही योजना मागील सरकाने घेतली. या योजनेची खरी सुरुवात मानखटाव या तालुक्यात झाली. आपण अर्थसंकल्प वाचला असेल त्यामध्ये पहिल्यांदा सिमेंट बंधा-याला मानखटाव तालुक्यामध्ये 10 कोटी रुपयांची तरतूद झाली. मला या निमित्ताने अभिमानाने आपल्याला सांगावेसे वाटते की, मानखटाव दुष्काळी तालुका आहे. जेव्हा दुष्काळ पडतो तेव्हा सर्वात जास्त दुष्काळ मानखटाव, मराठवाडा तसेच सर्व भागात पडतो. या दुष्काळी भागात आज एवढा मोठा दुष्काळ पडलेला असताना फक्त तिस गावांमध्ये पाण्याचे टँकर दिले जातात. अशी परिस्थिती आहे. खूप मोठे काम मागील सरकारने केले. या निमित्ताने माननीय श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या निदर्शनास काही गोष्टी आणावयाच्या आहेत. आपण उत्तर देताना सकाळी सांगितले की, या योजनेबद्दल काही तक्रारी असतील तर आमच्याकडे द्याव्यात, त्यावर निश्चित कारवाई करु. जलयुक्त शिवार योजनेच्या बाबतीत घोषणा खूप मोठया मोठया झाल्या. मागील वर्षामध्ये 6200 गावे जलयुक्त शिवार योजनेमध्ये घेतली. माझ्या तालुक्यातील 24 गावे या योजनेमध्ये घेतली. या 24 गावांचा आराखडा तयार झाला. या 24 गावातील एकही आराखडा पूर्ण झालेला नाही. चालू वर्षामध्ये पुन्हा 42 गावांची निवड झालेली आहे. या 24 गावातील कामे संपली नाहीत. कामांचा दर्जा निकृष्ट आहे. मी आपणाकडे पत्र दिले आहे, त्यामध्ये म्हटले आहे की, 74 बंधारे बांधले, त्यातील पहिल्या टप्पातील काही बंधा-यांमध्ये पाणी साठले.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.जयकुमार गोरे आपल्याला भाषणासाठी 8 मिनिटे दिलेली आहेत. इतर सन्माननीय सदस्यांना अजून भाषणे करायची आहेत.

श्री.जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, मी, सभागृह सुरु झाल्यापासून आतापर्यंत सभागृह सोडले नाही. मी एवढावेळ सभागृहामध्ये भाषणासाठी थांबून आहे. मला वेळ मिळायला पाहिजे. मी इतर वेळी कधीच आग्रह केला नाही. अर्थसंकल्पाच्या विषयावर बोलताना आग्रह करतो. हया अर्थसंकल्पामध्ये दुसरे आहेच काय ? जलयुक्त शिवार योजनेबाबत सांगत असताना तहसिलदार कामे करीत आहे, कलेक्टर कामे करीत आहेत किंवा प्रांत कामे करीत आहेत. याबद्दल कोणाला श्रेय द्यायचे, या आमदाराला किंमत द्यायची किंवा नाही ? या आमदाराला श्रेय द्यायचे की, नाही ? जलयुक्त शिवार योजनेचा अध्यक्ष कोणाला करायचे, मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली त्याप्रमाणे झाले की नाही ? या विषयात मला जायचे नाही ?

NN-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे .....

आपण निवडलेल्या व बांधलेल्या बंधाऱ्याच्या कामांकरीता निधीचा योग्य विनियोग झाला की नाही हे पाहणे गरजेचे आहे. बंधाऱ्याच्या साईट कोणी निवडल्या, बंधाऱ्याच्या साईट योग्य आहेत की अयोग्य आहेत. काही कामे अयोग्य ठिकाणी केलेली आहेत. मी एका उदाहरण सांगतो. एका ओढा 70 मीटरचा असून तेथे 50 मीटरचा बंधारा बांधला आहे. बाजूने ओढा तसाच वहात जातो. मी ग्रामविकास मंत्री महोदयांना चौकशीकरिता पत्र दिलेले आहे. 74 पैकी 38 बंधारे गळत आहेत. तेथील काम निकृष्ट झालेले आहे. अजूनही तेथे पाणी साठले की नाही हे माहिती नाही याबाबत भूमिका मांडली होती. पाझर तलाव दुरूस्तीच्या वेळी मी आपणास सांगितले की, सर्वात प्रथम माण खटाव येथील दुरूस्तीची कामे झाली. तेथून पुढे राज्यात यातून सरकारी यंत्रणेने काम करण्याचा निर्णय झाला. यातून खूप मोठे काम झाले. आता हे सर्व काम जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेले आहे. अध्यक्ष महोदय आपणही मतदारसंघात काम करता. बुलढाणा येथील तहसिलदार माझ्याकडे काम करीत आहे. त्यांना ओढा व नदी कशाला म्हणतात ते माहिती नाही. माझ्या मतदारसंघातील कामाची निवड तहसिलदार करतो. कृषी अधिकारी माहिती देतात. स्थानिक स्तरचा अधिकारी कोठे असतो हे माहिती नाही. जिल्हयामध्ये याकरिता 5 जणांचा स्टाफ आहे. पाच जणांकडून जिल्हयाच्या जलयुक्त शिवार योजनेचा आराखडा तयार होतो व त्याची अंमलबजावणी होते. त्यामुळे 70 मीटरच्या ओढयामध्ये 50 मीटरचा बंधारा होतो. अशी अनेक कामे आहेत की, जेथे पहिल्या बंधाऱ्याचे पाणी सोडून, दुसऱ्या व तिसऱ्या बंधाऱ्यात येते. 125 मीटरमध्ये तीन बंधारे आहेत. याची कोण माहिती घेणार आहे व कोण चौकशी करणार आहे ?

अध्यक्ष महोदय, शासकीय मशीनरीला डिझेल दिल्याचे सांगितले जाते. डिझेलकरिता 32 लाख रूपये खर्च झाल्याचे मी जबाबदारीने सभागृहात सांगतो. या 32 लाख रकमेतून नदीतील 500 मीटर अंतरातील गाळ काढला गेला. मशीन भाडयाने लावल्या असत्या तर 1 कोटी रूपये लागले असते. डिझेल कोठे गेले, ही कामे कोण बघतो. जलयुक्त शिवार योजनेतील कामे झाली पाहिजेत या मताचा मीसुध्दा आहे. आपण योजना पुढे नेल्याबाबत तुमचे अभिनंदन आहे. आपणास माहिती आहे की, या योजनेची पहिली सुरूवात आमच्याकडून झाली. आमच्या तालुक्यातील श्री.देशमुख हे

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे .....

सचिव असताना त्यांनी ही योजना पुढे आणली. जलयुक्त ग्रामची जलयुक्त शिवार योजना झाली. याबाबत आमचे काही म्हणणे नाही पण हे करीत असताना सर्वांना विश्वासात घेण्याची भूमिका अजिबात घेतली जात नाही. याची फलनिष्पत्ती पाऊस पडल्यावर तुम्हाला नक्की कळेल. जिल्हाधिकारी यांनी रिपोर्ट दिला आहे की, 144 एमटीएफटी पाणी साठणार आहे. पाणी कशातून व कोठून साठणार आहे, याची कामे कधी झाली आहेत हे काही माहिती नाही. ही सर्व फसवी आकडेवारी आहे. मंत्री महोदय म्हणतील की मी काहीही सांगतो. पण पाऊस पडल्यानंतर सर्व वास्तव आपल्यासमोर येईल व ते भयानक असेल. मंत्री महोदयांची भूमिका व हेतू चांगला आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंपदा खात्याचे काम करण्याकरिता राज्यात विविध महामंडळे करण्यात आलेले आहेत. तसे आमच्याकडे कृष्णा खोरे महामंडळ आहे. वैधानिक विकास मंडळाची निर्मिती झाल्यानंतर पाणी देण्यासाठी निधी देण्याची आपण भूमिका घेतली आहे. मी माननीय मुख्यमंत्री यांची भूमिका ऐकली आहे. जसा विदर्भावर अन्याय होत असल्याचे म्हटले जाते तसाच आमच्या पश्चिम महाराष्ट्रातील नेहमी दुष्काळी असलेल्या तालुक्यांवरही अन्याय होत आहे. आटपाडी, सांगोला, माण खटावपर्यतच्या पट्टयावर अन्याय होतो. त्या भागातील पाणी योजना पूर्ण करण्याबाबतची भूमिका आम्ही कायम या सभागृहात मांडली आहे. मागील सरकारच्या काळातही अनेक योजनांना निधी मिळाला. आता अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांना निधी मिळाला पाहिजे अशी भूमिका घेण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, स्मार्ट सिटी, स्मार्ट गाव योजना मांडल्या जात आहेत. आता फक्त स्मार्ट मंत्री योजना करावयाची राहिली आहे. त्यांना एक ड्रेस डिझायनर दिला पाहिजे, सर्वांना जॉकेट वगैरे व्यवस्थित चालू आहे. पण यामध्ये शेतकऱ्यांचा विषय नाही.

**अध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही बाब अर्थसंकल्पात नाही. आपण अर्थसंकल्पातील बाबींवर बोलावे.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, मी बजेटवरच बोलत आहे. माझी विनंती आहे की, अंतिम टप्प्यातील योजनांना सरकारने निधी द्यावा. अनेक गोष्टी बोलण्यासारख्या आहेत पण अर्थसंकल्पात फक्त शेतकऱ्यांना भुलवायचे व झुलवायचे काम शासनाकडून झालेले आहे. फक्त खोटे आकडेवारी फुगवून सांगितली जाऊन शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळले जात आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : अध्यक्ष महोदय, मी अनेक अर्थसंकल्प बघितले आहेत. या अर्थसंकल्पावर सदस्यांनी केलेली चर्चा पाहिली तर त्यात दुष्काळ व शेतकरी हा केंद्रबिंदू आहे. सन्मानीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा यांनी दो हंसो का जोडा, सरकारची चांगली भूमिका याबाबत सांगितले. मी सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांच्या मताशी सहमत आहे की, हे सरकार चलती फिरती दुकान आहे. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी या दुष्काळाचे गांभीर्य काय आहे याचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्या काळात ज्या योजना राबविल्या होत्या त्याच योजना राबविल्या असत्या तर मोठया प्रमाणावर या सरकारला यश आले असते. सरकारला कोर्टाने आदेश द्यावा लागतो की, शासनाने विदर्भातील गावे दुष्काळामध्ये घ्यावीत. चारा छावण्या बंद का केल्या, याचा आदेश कोर्टाला द्यावा लागतो. हे सरकारचे अपयश आहे. सरकार फेल्युअर झाल्यामुळे कोर्टाला हस्तक्षेप करावा लागतो त्याचे हे चित्र आहे. अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर एक आठवडा या अर्थसंकल्पाची चर्चा होते. पण दुर्दैवाने सांगतो की ही राजकारणाची रणनिती आहे किंवा अपघात आहे. या रणनितीमध्ये सर्वसामान्य शेतकरी होरपळला गेला आहे. मिडीयामध्ये श्री.श्रीहरी अणे यांची चर्चा होते. सन्माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ यांच्या अटकेची चर्चा होते. योगायोग म्हणावा की अपघात म्हणावा हे मला माहिती नाही. पण सरकार जाणीवपूर्वक आपल्या अपयशाला बाजूला सारण्यासाठी वेगवेगळया क्लुप्त्या काढून यामागील धोरण लपविण्याचे प्रयत्न करीत आहेत, असा माझा थेट आरोप आहे. आम्ही लोकांना सांगितले आहे की, धुलीवंदन करा पण पाण्याची बचत करा. सरकार व लोकप्रतिनिधींनी आवाहन केल्यानंतर शेतकऱ्यांच्या अपेक्षा फार मोठया आहेत. प्रचंड दुष्काळ आहे. ज्या भागात पाऊस आहे तेथे सुध्दा येत्या दोन महिन्यात प्रचंड मोठया प्रमाणावर दुष्काळ निर्माण होणार आहे. आमचे सरकार असताना ताकारी, म्हैसाळ, उरमोडी योजना, लातूर, उस्मानाबाद शहराकरिता पाणीपुरवठा योजना अशा ठिकाणी जेथे पाण्याची आवश्यकता आहे तेथे सरकारने पैसे दिलेले आहेत. आमच्यावर कुरघोडी करण्याचे राजकारण करता हे आम्ही समजू शकतो. पण मला कळत नाही की, ज्या सांगली विभागातून भाजपाचे जास्त आमदार खासदार निवडून दिले आहेत, त्यांचे शिष्टमंडळ भेटल्यानंतरसुध्दा व तेथील गांभीर्य दाखविल्यावरसुध्दा हे सरकार अट्टाहास करते की, आम्ही कोणत्याही प्रकारची पाणीपट्टी दुष्काळी भागात भरणार नाही. यात सरकारचे अज्ञान दिसत आहे असे माझे स्पष्ट म्हणणे आहे.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे .....

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पात जलयुक्त शिवार योजना व अशा इतर योजनांकरिता आपण दिलेल्या 25 हजार कोटीचा सध्या काहीही फायदा होणार नाही. लोकांना सध्या पाण्याची अत्यंत गरज आहे. आमच्या सरकारच्या काळात वेळ पडली असतील तर लातूर, उस्मानाबादला रेल्वेने पाणी नेण्याची योजनाही केली होती. याचे नियोजनसुध्दा तुम्हाला करता येणार नाही. मंत्री महोदयांच्या उत्तरात दुष्काळी भागातील भविष्यकालीन योजनांऐवजी सध्याच्या तातडीच्या कोणत्या उपाययोजना करणार आहात याचे स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे.

यानंतर ओओ-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे........

"बहसें फिजुल थी ये खुला हाल देर में, अफसोस उम्र कट गई लफ्जों के फेर में." ही जर परिस्थिती होऊ द्यावयाची नसेल तर सरकारने याबाबत गांभीर्याने विचार करावा.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने पंतप्रधान ग्रामसडक योजना ही मागील केंद्र शासनाने सुरु केली होती, म्हणून त्याकरिता पैसे देणे बंद केले का ? याचे उत्तर द्यावे. या योजनेच्या अर्धवट कामांना पैसे दिले जात नाहीत यामुळे खडीकरण झालेले रस्ते अपूर्णावस्थेत पडून आहेत. त्याकरिता निधी नाही. मागील केंद्र शासनाच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना देखील निधी अभावी बंद अवस्थेत आहेत. राज्यात पिण्याच्या पाण्याच्या योजनांकरिता 2000 कोटी किंमतीवरुन 500 कोटी रुपये तरतूद करण्यात आलेली आहे. सातारा जिल्हयातून या योजनेकरिता 134 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. उर्वरित जिल्हयाबाबत मला माहिती नाही. पिण्याच्या पाण्याच्या योजना दोन वर्षांपासून बंद आहेत. नवीन शाळेला अनुदान देणे बंद केलेले आहे. अध्यक्ष महोदय आपण देखील नेतृत्व करीत आहात, आपल्याला देखील कल्पना आहे. याबाबत शासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, पिजन होलमध्ये माननीय अर्थमंत्री यांचे एक पत्र मला काल मिळाले. हे पत्र माझ्याप्रमाणे सर्वच आमदारांना भेटलेले आहे. यामध्ये दिनांक 31 मार्च पर्यंत स्थानिक विकास निधीसंदर्भातील सूचना देण्यात याव्यात, असे सांगितलेले आहे. शासनाने आमदार निधीमध्ये वाढ करुन तो कमीत कमी पाच कोटी इतका करण्यात यावा. जेणेकरुन या आमदार निधीतून जलयुक्त शिवार सारख्या योजना पूर्ण करता येतील. जलयुक्त शिवार योजनेच्या कामासंदर्भात शासनाने जिल्हाधिका-यांना विश्वासात घेतलेले आहे. त्याचप्रमाणे या योजनेच्या कामासंदर्भात आमदारांनाही विश्वासात घेण्यात यावे, अशी माझी विनंती आहे. याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये जाहीर करावे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांचा आमदार निधीसंदर्भातील मुद्दा बरोबर आहे.

.....2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, आपल्याला माझा हा मुद्दा पटलेला आहे, आपण याकरिता पाठिंबा दिलेला आहे, याबाबत मी आपले आभार मानतो. याचा पाठपुरावा करण्याकरिता आपण आपल्या अधिकारांचा वापर केला तर हे होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, माननीय राज्यपाल यांच्या भाषणामध्ये तीन मेडिकल कॉलेजेस मंजूर केलेले आहेत. सातारा मेडिकल कॉलेजही मंजूर झालेले आहे. मला खात्री आहे की, मागील वेळी माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी सातारा येथे आले होते, त्यावेळी मेडिकल कॉलेजसंदर्भात आश्वासन दिले गेले होते. आता या कॉलेजकरिता जागा मिळालेली आहे. या मेडिकल कॉलेजसंदर्भात शासनाने लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी. 7.5 हजार कोटी रुपयांच्या....(अडथळा )

श्री.विनोद तावडे ( खाली बसून ): अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघात मेडिकल कॉलेज स्थापन करण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांनी मला मेडिकल कॉलेजबाबत आश्वासन दिलेले आहे. याबाबत मी आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.बच्चु कडू : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आज रोजी मंत्रालय,मुंबई येथे शहीद दिन साजरा केला जात आहे. या निमित्ताने तेथे शहीद भगतसिंग यांचे दोन फोटो व एक शहीद राजगुरु यांचा फोटो लावण्यात आलेला आहे. शहीद सुखदेव यांचा फोटो शहीद दिनानिमित्त लावण्यात आलेला नाही. इंग्रज या तिघांना वेगळे करु शकलेले नाही आणि मंत्रालयीन अधिका-याने शहीद सुखदेव, शहीद भगतसिंग व शहीद राजगुरु यांना असे कृत्य करुन वेगळे केलेले आहे. हे निंदनीय असून संबंधित मंत्रालयीन अधिका-याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे. यामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे. एवढेच मला पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणावयाचे आहे.

यानंतर श्री.नितनवरे..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल (औरंगाबाद मध्य) : अध्यक्ष महोदय, सर्वप्रथम होळीच्या अग्निमध्ये निराशा, दारिद्रय, आळस यांचे दहन होवो आणि सर्वांच्या आयुष्यात आनंद, सुख, आरोग्य आणि शांति नांदो हीच आमची शुभेच्छा.

अध्यक्ष महोदय, होली, खुशी, उत्साह, उमंग और रंगों का त्यौहार है. वहीं मायूसी, दुख और दर्द का दूसरा नाम है महाराष्ट्र का बजट 2016-17. रंगों के इस त्यौहार में ऐसा लगता है कि इस बार का जो बजट पेश किया गया है वह कुछ बेरंगसा है. इस बजट को किसानों का बजट बताया गया है. इसके लिए 25 हजार करोड़ रुपये दिए गए है. देना भी चाहिए. क्योंकि महाराष्ट्र में अकाल है. किसान आत्महत्या कर रहे है. किसानों को जितनी मदद कर सकते है वह करनी चाहिए. लेकिन इतना पैसा हर साल देने के बावजूद भी किसान आत्महत्या करते जा रहे है, तो कहीं न कहीं इस सदन को सोचना चाहिए कि क्या वजह है कि किसानों की आत्महत्याएं रुक नहीं रही, बल्कि हर साल बढ़ती जा रही है. आज के इस दौर में जीना बहुत मुश्किल हो गया है. मरना बहुत आसान हो गया है. हम चाहते है कि किसानों की मदद करनी चाहिए, वह किसान जो जिंदगी से जुझ रहा है, जो जीने के लिए लड़ रहा है, उसको मदद की जानी चाहिए. लेकिन हो यह रहा है कि पिछले कई सालों में किसानों को हमने एक संदेश दिया है, एक ऐसा मॅसेज पहुंचाया है कि हम जीते जी तो आपके लिए कुछ नहीं कर सकते, अगर आप मर गए, अगर आप आत्महत्या कर लेते है, तो हम आपके परिवार के लिए एक पॅकेज देंगे. शायद यही एक संदेश किसानों तक पहुंचा है जिसकी वजह से वे जीना नहीं चाहते है और मरने पर मजबूर हो रहे है. बड़े दुख के साथ यह कहना पड़ रहा है कि आज किसानों की आत्महत्या किसी भी सरकार के लिए महज एक आँकड़ा बनकर रह गई है. यदि आज आप आँकड़े मंगाते है, नाम भी नहीं मंगाते होंगे कि कौनसा किसान मरा है, क्यों मरा है. आज केवल उनके आँकड़े होते है. इस सप्ताह इतने किसान मरे है. खुश हो जाते होंगे कि इस सप्ताह में 25 किसानों की जगह 22 किसान मरे है. लेकिन जो किसान मर रहा है उसके पीछे कहीं न कहीं एक दुख भरी कहानी है जिसे हम न समझ सकना चाह रहे है, न उसको ऊपर विचार करना चाह रहे है.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....5.

श्री इम्तियाज जलिल.....

अध्यक्ष महोदय, कहीं न कहीं हमारी नीतियाँ गलत हो रही है जिस पर विचार करने की जरूरत है. आपको यह तय करना होगा कि आखिर राज्य में ऐसे कितने किसान है जिनके पास एक एकड़, दो एकड़ जमीन है. लेकिन हो यह रहा है कि जब आप पॅकेज देते है, तो वह जो 50 एकड़ वाला किसान है, 100 एकड़ वाला किसान है, 200 एकड़ वाला किसान है, उसे भी उसमें शामिल कर देते है. जब कारोबार, इंडस्ट्री ठप हो जाती है तो आप उनकी मदद नहीं करते है. आप मदद कीजिए. जो गरीब किसान है, एक एकड़ वाला किसान है, मरने वाला वही किसान है, आपने उनकी मदद करनी चाहिए. 1 करोड़ 37 लाख किसान का आँकड़ा इस राज्य में बताया जाता है. महाराष्ट्र सरकार को यह समझना जरूरी है कि वह कौनसा किसान है जिसको मदद करने की जरूरत है. यदि आप उन्हें एक लाख रुपये दे रहे है तो उसके बदल उन्हें पांच लाख रुपये दीजिए. लेकिन जो बड़े किसान है उन्हें आप मदद कर रहे है जिनको मदद की जरूरत नहीं है. कड़ा फैसला है, सख्त फैसला है. लेकिन फैसला लेने की जरूरत है. फ्री लंच का माहौल निर्माण किया जा रहा है. इधर की बाजू में या उधर की बाजू में बैठे हुए हों, करोड़ों रुपये का बैंक घोटाला करते है, बैंकों के ऊपर कब्जा करते है. यही वे नेता हैं, उसके बाद सरकार के पास आते है और कहते है कि हमें एक पॅकेज दीजिए. सरकार पॅकेज देती है. सहकारी शक्कर कारखाने कौन चलाते है? यहीं वह आमदार, खासदार, नेता सहकारी शक्कर कारखाने चलाते है. बैंकों से पैसा लेते है. सहकारी शक्कर कारखाने डूब जाते है तो सरकार के पास पैसे मांगने आ जाते है.

अध्यक्ष महोदय, इस बजट में स्वास्थ्य की ओर ज्यादा ध्यान देने की आवश्यकता थी. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनाईजेशन कहता है कि जीडीपी का पांच प्रतिशत पैसा स्वास्थ्य के लिए खर्च होना चाहिए. आज हम कितना खर्च कर रहे है ? महज 1500 करोड़ रुपये स्वास्थ्य के लिए बताएं है. कम से कम 3 हजार करोड़ रुपये हेल्थ सेक्टर पर खर्च करना चाहिए था. मैं वित्त मंत्री जी को मुबारक बात देना चाहूंगा कि उन्होंने टैक्स तो हटा लिया है. आपने मेमोग्राफी के लिए टैक्स हटा लिया है. लेडिज का ब्रेस्ट कैंसर का डिटेक्शन होगा, उसके लिए आपने टैक्स हटा दिया. आपने डायलिसिस मशीन और मेडिसीन के ऊपर से टैक्स हटा दिया. डिटेक्ट तो हो जाएगा लेकिन

.....6.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल.......

सवाल यह है कि जब डिटेक्ट हो जाएगा तो इसका इलाज कैसे होगा ? आपके पास अस्पताल ही नहीं है. शिवसेना के जो पालकमंत्री श्री रामदास कदम साहब है, मैं उनको मुबारक बात देना चाहूंगा. 50 लाख रुपये का विशेष फंड उन्होंने दिया है ताकि कैंसर के पेशन्ट्स, जिन्हें दो-दो महीने के बाद का अपॉईमेंट मिल रहा है, कम से कम उनको कोई राहत मिल सके इसके लिए 50 लाख रुपये का डोनेशन दिया गया.

अध्यक्ष महोदय, राज्यपाल महोदय ने अपने अभिभाषण में यह कहा था कि "I am very happy to inform you that the first kidney operation was performed in a super speciality hospital in Nagpur." बड़े खुशी से उन्होंने यह कहा था. यह खुशी की बात नहीं है. यह गर्व की बात नहीं है. यह शर्म की बात है कि इतने सालों के बाद आज महाराष्ट्र के सरकारी अस्पतालों में इस तरह का इलाज हो रहा है. आज भी ऐसे कई सरकारी अस्पताल है जहां बायपास ऑपरेशन नहीं हो रहा है. कॉर्डीयल की कोई सुविधा नहीं है. किडनी की कोई सुविधा नहीं है. औरंगाबाद में इस तरह का माहौल है. वित्त मंत्री जी आपने 250 करोड़ रुपये अर्बन और रूरल एरिया में हॉस्पिटल डेवलप करने के लिए, नये हॉस्पिटल बनाने के लिए दिए है. कोई जरूरत नहीं है. जो एग्जिस्टिंग हॉस्पिटल्स है उन्हें ही इम्प्रू कीजिए.

अध्यक्ष महोदय, आपने 405 करोड़ रुपये मायनॉरिटी डेवलपमेंट के लिए दिए है. हमारी उम्मीद थी कि कम से कम 700 करोड़ रुपये मिलेंगे. लेकिन हम आपसे कहना चाहते है कि मायनॉरिटी डेवलपमेंट के लिए एक रुपया भी मत दीजिए. यह पैसा और कहीं पर इस्तेमाल कीजिए. आप यदि मायनॉरिटीज का डेवलपमेंट चाहते है तो एक फैसला कर लीजिए कि पूरे महाराष्ट्र में वक्फ बोर्ड की जितनी जमीन है, वह जमीन वक्फ को लौटा दीजिए. बजट में आपको एक रुपया भी देने की जरूरत नहीं है. पत्रकार होने की हैसियत से मैं आपका अभिनंदन करना चाहूंगा. आपने पत्रकार फंड को पांच करोड़ रुपये से दस करोड़ रुपये किए है. हम चाहते है कि उनके लिए भी एक घरकुल योजना बना सकते है, विशेष लोन की सुविधा दे सकते है क्या यह देखना चाहिए.

.....7.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री इम्तियाज जलिल........

अध्यक्ष महोदय, औरंगाबाद को सिटी ऑफ 52 गेट्स कहा जाता था. पर्यटन को बढ़ावा देना है, मैं मुख्यमंत्री से कहना चाहूंगा कि सिटी ऑफ 52 गेट्स औरंगाबाद को कहा जाता था. फॉरेन से जो टूरिस्ट आ रहे है. यदि वे दो दिन के लिए आते है, तीसरे दिन हम उन्हें रोक सकते है. उन गेट्स को हमने डेवलप करना चाहिए. गेट्स किसने, कब और कहां बनाया था, इसकी जानकारी देंगे तो टूरिस्ट एक दिन वहां रुक सकता है.

अध्यक्ष महोदय, आपने डेफिसिट बजट पेश किया है. आपको रेवेन्यू चाहिए. आपने विभिन्न चीजों पर टैक्सेस लगाए है. यदि आपको टैक्स लगाना है, रेवेन्यू बढ़ाना है तो शराब बनाने पर, शराब बेचने पर, शराब पीने पर भी टैक्स लगाईए. सिगारेट पर टैक्स लगाईए. 300 प्रतिशत, 400 प्रतिशत टैक्स लगाईए. इसके लिए पूरा सदन स्वागत करेगा. हम महाराष्ट्र में जहर को पनपने दे रहे है. यह नहीं होना चाहिए. आप हमारे भी मुख्यमंत्री है. क्यों हमें बार बार ऐसा लगता है कि महाराष्ट्र के अंदर केवल तीन ही शहर होते है. मुंबई, नागपुर या पुना है. औरंगाबाद भी आप ही के महाराष्ट्र में है. आपने विशेष ध्यान देने की जरुरत है. मैं कॉंग्रेस और राष्ट्रवादी कॉंग्रेस के नेताओं के भाषण सुनता हूं और वे कहते है कि देखिए किसानों की हालत कितनी खराब हो गई है ? किस तरह से आत्महत्याएं हो रही है. मैं उनसे कहना चाहता हूं कि 15 साल इन्होंने ऐसा क्या किया है जिसके कारण ये दिन देखने पड़ रहे है. "या सगळयांनी मिळून केले होते महाराष्ट्रामध्ये घाण आणि आता म्हणतो माझा भारत महान." इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

-----------

इसके बाद श्री सोनावणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संगिता ठोंबरे ( केज ) : अध्यक्ष महोदय, मी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे. माननीय अध्यक्षांनी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करीत आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या 4 वर्षापासून सततच्या दुष्काळामुळे महाराष्ट्र राज्यावर अस्मानी संकट ओढावलेले आहे. या संकटातून बाहेर निघण्यासाठी जनतेच्या सरकारने महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प हा सर्वसामान्य जनतेला, शेतकऱ्यांना नवतरुणांना, महिलांना, निराधारांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जो संकल्प केला आहे, तो खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा संकल्प न म्हणता महाराष्ट्राच्या जनतेचा संकल्प म्हणता येईल. अशा प्रकारचा अर्थसंकल्प या ठिकाणी माननीय वित्तमंत्र्यांनी मांडलेला आहे. याबद्दल मी माननीय वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी या 25 हजार कोटी रुपयांचे वर्णन असे करणार आहे की, या दुष्काळाच्या निवारणासाठी 3360 कोटी रुपये, सिंचनासाठी 7850 कोटी रुपये, मनरेगासाठी 3476 कोटी रुपये, वीज पंपासाठी 3500 कोटी रुपये, पांदन रस्त्यासाठी 100 कोटी रुपये आणि कृषी प्रक्रियेसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी एकंदरीत शेतकऱ्यांसाठी स्वाभीमानी वर्षे जाहीर केलेले आहे, ते खऱ्या अर्थाने स्वाभिमानाने जगता येईल असा अर्थसंकल्प माननीय वित्तमंत्र्यांनी सादर केलेला आहे. याबद्दल मी माननीय वित्तमंत्र्यांचे आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करते.

अध्यक्ष महोदय, मी एका महत्वाच्या मुद्याकडे माननीय वित्तमंत्र्याचे लक्ष वेधणार आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी शेती पुरक व्यवसायास चालना देण्याचे नमूद केलेले आहे. यासाठी 51 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच नाबार्डच्या सहाय्याने नवीन दुग्ध उत्पादन केंद्र उभे केले जाणार आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी एक चांगला उपक्रम हाती

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संगिता ठोंबरे.......

घेतलेला आहे. या उपक्रमातून राष्ट्रीय दुध उत्पादक कार्यक्रम म्हणजेच एन.डी.पी.मध्ये बीड जिल्ह्याचा समावेश केलेला नाही. भविष्यात त्याचा समावेश करुन घेतला तर नक्कीच मराठवाडा आणि बीड जिल्ह्यातील शेतकरी सहभाग घेऊ शकतील, असा मला या ठिकाणी विश्वास वाटत आहे.

अध्यक्ष महोदय, दुसऱ्या एका महत्वाच्या मुद्याकडे मी माननीय वित्तमंत्र्यांचे लक्ष केंद्रीत करणार आहे. शेतकऱ्यांना शेततळी योजनेंतर्गत शेतीला पाणी साठविण्यासाठी एक चांगला पर्याय उपलब्ध करुन दिलेला आहे. याबाबत मी माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे. माझ्या मतदारसंघातील दुष्काळी भागातील शेतकरी शेततळ्याचा पुरेपुर उपयोग करुन घेत आहेत. अवकाळी पावसामुळे जो थोडाफार पाऊस झालेला आहे, त्यामधून शेततळ्याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने पीक विमा योजनेसाठी 1885 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहे. तसेच राज्यातील तेलबिया कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांसाठी उत्पन्न वाढीसाठी 80 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. याचा फायदा माझ्या भागातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना नक्कीच झाल्याशिवाय राहणार नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना त्यामधून चांगली प्रेरणा मिळण्यास मदत होणार आहे, अशी मला पूर्ण खात्री आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय महिला व बालविकास मंत्री आणि इतरांनी गाव शिवार रस्त्यांसाठी तसेच जलयुक्त शिवार योजनेंतर्गत विविध कामे केलेली आहेत. माझ्या मतदारसंघातील गावकऱ्यांची या सर्व उपाययोजनांच्या माध्यमातून गावशिवार मोजणी झाली तर भविष्यकाळात ग्रामीण भागातील लोकांना त्याचा फायदा होणार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणातून जलयुक्त शिवार योजनेच्या संदर्भात भाषणे किंवा माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जलयुक्त शिवार योजनेसाठी 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्तमंत्र्यांचे अभिनंदन करीत आहे. जलयुक्त शिवार योजनेबद्दल मला

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संगिता ठोंबरे.......

एवढेच म्हणावयाचे आहे की, दुष्काळी भागात सर्वात जास्त त्या योजनेचा फायदा झालेला आहे. जलयुक्त शिवार योजना ही तळागाळापर्यंत पोहचलेली आहे. सर्व शेतकऱ्यांना जलयुक्त शिवार योजनाचा फायदा होत आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी जलयुक्त शिवार योजनेतील त्रुटीबाबत माहिती दिलेली आहे. भविष्यकाळात याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल अशी मला खात्री आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील एका महत्वाच्या मुद्याकडे मी माननीय वित्तमंत्र्यांचे लक्ष केंद्रीत करीत आहे. माझ्या मतदारसंघात चुकीच्या नियोजनामुळे मराठवाड्यातील जलसिंचन प्रकल्प अपूर्ण राहिलेले आहेत. तसेच मराठवाड्यातील हक्काचे 30 टीएमसी पाणी वाहून जात आहे. शासनाने जलसिंचन कामासाठी 7 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या माध्यमातून मराठवाड्यातील अपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या केज मतदारसंघातील मांजरा नदीवरील प्रकल्पासाठी 23 हजार क्षेत्र संपादित केलेले आहेत. परंतु, या प्रकल्पाचा फायदा माझ्या मतदारसंघातील 500 हेक्टर शेतीला झालेला आहे.

QQ-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती संगिता ठोंबरे...

या प्रकल्पातील 50 द.ल.घ. फुट इतका गाळ काढण्यासाठी 70 कोटी रुपयांची गरज असून यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. हा निधी उपलब्ध करुन दिला तर या प्रकल्पातील गाळ काढला जाईल व त्यामध्ये अतिरिक्त पाण्याची साठवणूक होऊन आमच्या भागातील आंबेजोगाई, केज धारूड तसेच लातूरसह इतर दहा-बारा गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपली आभारी आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

------------------------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सत्यजित पाटील-सरुडकर (शाहूवाडी): अध्यक्ष महाराज, यावर्षीच्या अर्थसंकल्पात मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या निधीच्या संदर्भातील परफॉर्मन्सचा या वर्षीच्या अर्थसंकल्पात उहापोह करण्यात आलेला आहे. हा अर्थसंकल्प मांडत असताना निव्वळ एका विभागासाठी तरतूद केली अशातला भाग नाही. एखाद्या विभागाला पैसे दिले जातात, परंतु ते पैसे खालच्या स्तरावर पोहोचले पाहिजेत, ते बघणे महत्वाचे आहे. कृषी विभागामध्ये गेलीकित्येक वर्षी एकात्मिक पाणलोटविकास योजना, जलयुक्तशिवार योजना असेल, यासाठी निधिची तरतूद केली जाते, परंतु हे पैसे खाली कसे वापरले जातात, हे पाहणे महत्वाचे आहे. कृषी विभाग तसेच वन विभाग असेल या विभागात ॲग्रीकल्चर इंजिनिअर हे एक केडर येथे नाही. कृषी खात्यातील प्रकल्पांचे एस्टिमेटस्, डिझॉईन तयार करताना कृषी खात्यातील अधिकाऱ्यांना यातील तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे निकृष्ठ दर्जाची कामे केली जातात. कृषी खात्यातील बंधाऱ्यांच्या कामांची गुणवत्ता राखण्यासाठी कृषी अभियांत्रिकी अशी एक नवीन केडर निर्माण केली तर अनेक चांगली विकासाची कामे होतील.

अध्यक्ष महाराज, गेल्या दोन वर्षापासून पाणी पुरवठा योजनेची संपूर्ण कामे बंद आहेत. मुख्यमंत्री पेयजल योजना अस्तित्वात असून या योजनेचे नेमके स्वरुप काय आहे, याची काहीही माहिती नाही. मागील कालावधीतील किती योजना सुरु आहेत, किती बंद आहेत, याचा आढावा घेतला पाहिजे. या योजनेची विद्युत बिले काही ग्रामपंचायती भरत नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे. ही योजना अंमलात आणत असताना त्याचे स्वरुप काय आहे, हे जाहिर केले पाहिजे. ही योजना राबविताना त्यामध्ये ज्या चुका झाल्या त्या पुन्हा होऊ नयेत, अशी उपाययोजना केली पाहिजे. यापुढील काळात पाणी पुरवठा योजना करीत असताना त्याच्या टेंडरमध्ये त्या योजनेच्या मेन्टेनन्ससंबंधीची बाब नमूद केली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामीण भागाचा बारकाईने अभ्यास केला तर या जिल्ह्यातील चार रस्ते या योजनेत बसतात. आज 80 टक्के रस्ते हे ओडीआर, व्हीआर मध्ये येतात, याकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. आमच्या ग्रामीण भागातील रस्त्यांवर यामुळे फार मोठा अन्याय होत आहे. माझ्या मतदारसंघा यावर्षीच्या बजेटमधून राज्य

डॉ.सत्यजित पाटील-सरुडकर.....

महामार्गासाठी 31 कोटी रुपये मिळालेले आहेत. माझ्या मतदारसंघात ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी केवळ दोन कोटी रुपये मिळणार आहेत. कोठे 31 कोटी रुपये आणि कोठे दोन कोटी रुपये, याचा आपण बारकाईने अभ्यास केला तर ही तफावत दूर करुन ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी निधीची तरतूद यावर्षीच्या वार्षिक योजनेच्या माध्यमातून वाढविणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महाराज, डीपीडीसीच्या माध्यमातून ऊर्जा खात्याची कामे हाती घेतली जात असतात. प्रत्येक जिल्ह्यात विद्युत कनेक्शनची मागणी खूप मोठ्या प्रमाणावर आहे, परंतु तेवढे पैसे डीपीडीसीला मिळत नाहीत. म्हणून जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून निधीची तरतूद वाढविली पाहिजे.

अध्यक्ष महाराज, कोल्हापूर जिल्ह्यातील ज्योतिबा या जागरुक देवस्थानासाठी एक वर्षापूर्वी 120 कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला होता, परंतु त्या प्रस्तावाला अंतिम मंजुरी न मिळाल्यामुळे या कामास अद्याप सुरुवात झालेली नाही. यानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील एका सोहळ्यासाठी सोहळ्याला 125 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. नरसिंगपूरसाठी 260 कोटी रुपये मंजूर झाले, याप्रमाणे ज्योतिबा देवस्थानसाठी निधीची तरतूद करावी.

अध्यक्ष महाराज, सार्वजनिक आरोग्य खात्यातील डॉक्टर्सच्या जागा रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहिरात काढली, परंतु डॉक्टर्स मिळाले नाहीत. डॉक्टरांना कमी पगार असल्यामुळे ते शसकीय सेवेत येण्यास उत्सुक नसतात आणि दुसरी बाब अशी की, डॉक्टरांची निवड झाल्यानंतर त्यांना ग्रामीण भागामध्ये जावे लागते त्यामुळे ते तेथे हजर होत नाहीत. माझ्या डोंगरी भागामध्ये डॉक्टरांची मोठी अडचण झालेली आहे. आरोग्य केंद्राची इमारती वर्षानुवर्षे वापराविना पडून आहेत. आरोग्य खात्याच्या सेवा ग्रामीण भागाला मिळत नाहीत. राजीव गांधी जीवनदायी योजना ही अतिशय चांगली योजना आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा भागातील कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील अनेक गावांमधील रुग्णांना उपचारासाठी बेळगाव येथील केलिंग हॉस्पिटलमध्ये जावे लागते. तेथे महाराष्ट्र शासनाची राजीव गांधी जीवनदायी योजना राबविली जात नाही. किमान सीमा भागातील रुग्णांसाठी राजीव गांधी जीवनादायी योजना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सत्यजित पाटील-सरुडकर...

सुरु करावी. केलिंग हॉस्पिटलचा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे, तो मार्गी लावावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महाराज, एका बाजूला शासन विद्यार्थी, शिक्षकांवर तसेच शिक्षणासाठी किती पैसे खर्च करते, परंतु दुसऱ्या बाजूला 20 पटाच्या शाळांवर बंदी घातलेली आहे. शासनाने 20 पटाच्या शाळांवर बंदी लागू केलेली आहे, त्या निर्णयाला आमची हरकत नाही, परंतु आमच्या डोंगरी भागातील वाड्या वस्त्यांमधील मुलांना यामधून वगळण्यात यावे. या मुलांना शिक्षण घेता आले पाहिजे म्हणून 20 हजेरी पटाच्या शाळांमधून हा भाग वगळण्यात यावा. या डोंगरी भागात विजेची व्यवस्था, तसेच वाहतुकीसाठी रस्ते नाहीत त्यामुळे डोंगरी भागातील 20 पटाच्या शाळा चालू ठेवाव्यात, अशी माझी मागणी आहे. अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

यानंतर RR-1 . . .

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख (मालेगाव मध्य) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 के अर्थसंकल्प पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, सम्माननीय श्री सुधीर मुनगंटीवार जी ने सन 2016-17 का बजट पेश किया तो हमें ऐसा लगा कि सही मायनों में महाराष्ट्र के हर समाज को न्याय मिलेगा. लेकिन अल्पसंख्यकों के लिए जो बजट दिया गया वह केवल 405 करोड़ रुपये का बजट दिया गया है. पिछले साल अल्पसंख्यकों के लिए जो बजट था, उसमें केवल 60 प्रतिशत बजट ही अल्पसंख्यक विभाग ने खर्च किया है. हमें ऐसा लग रहा था कि इस साल जब अल्पसंख्यक विभाग का बजट पेश किया जाएगा तो कम से कम एक हजार करोड़ रुपये की घोषणा की जाएगी. लेकिन ऐसा नहीं हुआ. सरकार ने केवल 405 करोड़ रुपये का बजट अल्पसंख्यक विभाग को दिए है. इसमें से ही मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल के लिए, छात्रवृत्ती के लिए, मूलभूत सुविधाओं के लिए, उर्दू अकादमी के लिए, अल्पसंख्यक आयोग के लिए बजट की रकम दी जाएगी. मायनॉरिटी में मुस्लिम समाज के साथ साथ अन्य समाज के लोगों भी समावेश होता है. सरकार से मेरी विनती है कि 405 करोड़ रुपये के बजट में कुछ भी विकास का काम नहीं हो सकता. हमारी मांग है कि इस बजट को बढ़ाया जाना चाहिए. महाराष्ट्र में अल्पसंख्यक विभाग ने चार जगहों पर गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेज देने के लिए पत्रव्यवहार शुरु किया है. भिवंडी, मुंब्रा और मुंबई में इसका काम होने वाला है. हमें ऐसा लगा था कि इस बजट में मायनॉरिटी पॉलिटेक्निक कॉलेज का भी ऐलान किया जाएगा, लेकिन ऐसी कोई घोषणा नहीं हुई. मेरी सरकार से विनती है कि जो पत्रव्यवहार शुरु है उसको ध्यान में रखकर अल्पसंख्यक विभाग का बजट बढ़ाना चाहिए और गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेज शुरु होने चाहिए.

अध्यक्ष महोदय, बीड़ी कामगारों के लिए जिस तरह घरकुल योजना है, इसी तरह यंत्रमाग कामगारों के लिए भी घरकुल योजना होनी चाहिए और घरकुल योजना में इनका समावेश करना चाहिए. केंद्र सरकार की विभिन्न योजनाएं है. एचएसजीपी स्कीम है. महाराष्ट्र के सबसे बड़े प्रोजेक्ट का काम मालेगाव में चल रहा है. महानगरपालिका ने ठराव भी पारित किया है कि वहां पर पांच हजार घर बचने वाले है. वह घर पावरलूम मजदूरों को मिलने चाहिए. पावरलूम मजदूरों की ओर भी सरकार ने ध्यान रखना चाहिए.

....2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख........

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र में किसान भाईयों की कई समस्याएं है. इसके लिए सरकार अलग अलग उपाययोजना सोच रही है. लेकिन सरकार ने एक साल पहले एक निर्णय लिया. सरकार ने गोवंश रक्षा बिल लाया. गोवंश के बारे में हमें बहुत आदर है. हर हिंदुस्थानियों को आदर रखना भी चाहिए. यह उनका कर्तव्य भी है. लेकिन आज हमारे किसान भाईयों के जानवरों की भी समस्या है. जिन जानवरों की उम्र हो जाती है, जानवरों को पीने के लिए पानी नहीं है, चारा नहीं है. यदि उस जानवरी को किसान बेचना चाहेगा तो वह कहां बेचेगा ? इसके लिए सरकार ने कोई योजना नहीं बनायी है. सरकार से मेरी विनती है कि गोवंश के बारे में क्या करना है, उसके बारे में आप निर्णय लीजिए, जब भी सरकार की मानसिकता बन जाएगी तब निर्णय लेना चाहिए. लेकिन जो जर्सी जानवर है, यह विदेशी जानवर है, युरोप में एक जर्सी गांव था, 16 वीं सदी में क्रॉस ब्लडिंग के जरिए उसकी पैदाईश हुई. उसके लिए यदि आप परमिशन देते है, तो मैं समझता हूं कि हमारे किसान भाईयों को उसका लाभ होगा. इस बारे में सरकार एक अच्छा निर्णय लेगी ऐसी आशा करता हूं.

अध्यक्ष महोदय, सन 2012 में शिक्षा के बारे में सरकार ने प्राईव्हेट संस्थाओं को मंजूरी दी है. कई शिक्षक नियुक्त किए गए. उनका ॲप्रूवल भी आ गया. लेकिन 2012 से लेकर आज तक महाराष्ट्र में जो टीचर और क्लर्क नियुक्त किए गए, उनके वेतन के बारे में कुछ नहीं सोचा गया है. हमारा कहना है कि उनको वेतन मिलना चाहिए.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभाग के माध्यम से बजट में यह बात सामने आयी कि सुवर्णजयंति नगरोत्थान के लिए एक हजार करोड़ रुपये महाराष्ट्र सरकार दे रही है. नासिक जिले में 20 करोड़ रुपये दिए जाएंगे. हमारी विधानसभा क्षेत्र के विकास के लिए कहां से पैसा मिलने वाला है ? किसको कितना फंड मिलने वाला है ? विकास निधी कितनी होगी ? यह रकम बढ़ानी चाहिए, ऐसी मेरी सरकार से विनती है. मेरी विधानसभा क्षेत्र में एक प्रोजेक्ट है. वहां पर कई बच्चों का एक्सीडेंट हो गया, गई बच्चे मर गए. आगरा रोड पर कई स्कूल्स है. वहां पर सुवर्णजयंती नगरोत्थान के माध्यम से, महानगरपालिका अपने हिस्से का खर्च उठाने के लिए तैयार है. सरकार के पास वह प्रस्ताव आ चुका है. सरकार ने सुवर्णजयंती नगरोत्थान के माध्यम से उस प्रस्ताव को मंजूरी देनी चाहिए. ऐसी मेरी विनती है.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख......

अध्यक्ष महोदय, वक्फ बोर्ड के बारे में यहाँ पर बात पेश की गई है. अल्पसंख्यक विभाग के मंत्री श्री एकनाथराव खडसे जी है, उन्होंने पहले ही अधिवेशन में बात की थी कि एक लाख वक्फ बोर्ड की प्रॉपर्टी इस महाराष्ट्र में है. उन्होंने यह भी कहा कि 70 हजार प्रॉपर्टी पर कब्जा है, उस जमीन पर इल्लीगल अतिक्रमण है. 70 हजार एकड़ जमीन पर यदि अतिक्रमण है, औरंगाबाद के वक्फ बोर्ड के कर्मचारियों को वेतन देने के लिए पैसा नहीं है, मस्जिद की, मदरसे की फाईल जाती है, उसको परमिशन देने के लिए कई साल लग जाते है, इसलिए इसका बजट भी बढ़ाने की आवश्यकता है.

अध्यक्ष महोदय, अल्पसंख्यक आयोग के लिए निधी बढ़ाने की आवश्यकता है. मराठी भाषा को और आगे बढ़ाने के लिए सरकार ने फंड बढ़ाकर देना चाहिए. लेकिन इस राज्य में उर्दू अकादमी का बजट आप बढ़ाते है तो मैं समझता हूं कि जो बड़े बड़े कल्चरल प्रोग्राम चलते है उसको ध्यान में रखते हुए, उर्दू भाषा को बढ़ावा देने के लिए इसका फंड बढ़ाना चाहिए ताकि महाराष्ट्र की जनता को न्याय मिल सके. सरकार सही मायनों में महाराष्ट्र के लोगों को न्याय देने की भूमिका अदा करती है तो मैं कहना चाहूंगा कि आप तो ठहरे झीलों की पानी की तरह, समुंदर होते तो बहुत दूर निकल सकते थे. सरकार को आज भी मौका है. सरकार ने सब को न्याय देना होगा. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

-------

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य सर्वश्री योगेश सागर, प्रशांत बंब, राजेंद्र पाटणी, बाळासाहेब मुरकुटे, ॲड. पराग अळवणी, सन्माननीय सदस्य सर्वश्री बाबुराव पाचर्णे, विजय काळे, राजेश काशिवार यांची नावे बोलण्याकरिता नावे दिलेल्या सन्माननीय सदस्यांच्या यादीमध्ये आहेत. सन्माननीय सदस्य श्री.हरिष पिंपळे आपले नाव बोलण्याकरिता नावे दिलेल्या सन्माननीय सदस्यांच्या यादीत नाही. तरीही मी आपल्याला बोलण्याकरिता संधी देत आहे. परंतु, आपणास बोलावयाचे असल्यास आपण प्रतोदांमार्फत नाव दिले पाहिजे होते.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हरिष पिंपळे (मुर्तीजापूर ) : अध्यक्ष महोदय, धन्यवाद. मी आपला मनापासून आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर मी माझे मत मांडण्याकरिता व सरकारचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. या देशाचा पोशिंदा, शेतकरी, बळी राजा ज्याच्यावर गेल्या 3-4 वर्षांपासून निसर्गाने अन्याय केला होता त्या शेतकऱ्याला दिलासा देणारा अर्थसंकल्प आमच्या माननीय अर्थमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार व माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला आहे. असे करुन त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम केले आहे. याकरिता मी या सरकारचे मनापासून अभिनंदन करतो, कौतुक करतो.

अध्यक्ष महोदय, हा अर्थसंकल्प मांडताना माननीय अर्थ मंत्र्यांनी जनतेच्या भावना काय आहेत हे जाणून घेण्यासाठी जनतेच्या, शेतकऱ्यांच्या, मजुरांच्या सूचना जाणून घेतल्या व त्यानंतर महाराष्ट्रातील सव्वाशे कोटी जनतेला दिशा देणारा, शेतकऱ्यांना दिलासा देणारा अर्थसंकल्प मांडला गेला, त्याकरिता मी सरकारचे मनापासून अभिनंदन करतो.

SS-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल बाबर......

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणामध्ये जलयुक्त शिवार योजनेचा उल्लेख करण्यामागे पाणी साठ्याचे विकेंद्रीकरण व्हावे, असा त्यांचा उद्देश होता. जलयुक्त शिवार योजनेमुळे पाणी साठे वाढणार आहेतच परंतु जलसाक्षरता त्यामधून मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. जलसाक्षरतेमुळे हे पाणी आमचे आहे व ते आमच्या भूमीमध्ये राहिले पाहिजे, असे गावातील लोकांना वाटू लागले आहे. पुढील काळात या योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्यात यावीत याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, शेततळ्याच्या योजनेसंदर्भात अकोला येथील काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले असले तरी आमच्या भागातील जमिनीचा मकदूर पाहिला तर 80 हजार रुपयांच्या आत शेततळे होत नाही. जरी झाले तरी आमच्या भागातील जमीन मुरमाड असल्याने त्यामध्ये प्लास्टिक पेपरचा वापर केला नाही तर पाणी शिल्लक राहणार नाही. त्यामुळे प्लास्टिक पेपरच्या खर्चासह शेततळ्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या भागात फळबागा असून त्याकरिता 2 कि.मी. दूरवरुन पाणी आणावे लागते. अशा परिस्थितीत सामुदाईक शेततळ्यासाठी परवानगी दिली तर मोठ्या प्रमाणावर जलसाठे तयार होतील. त्यासंदर्भात योग्य तो निर्णय घेण्यात येईल, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, मागील वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या अगोदर कृषी मंत्री महोदयाकडे मागणी केली होती की, फळबागांचे गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते म्हणून शेडनेटसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत विचार करण्यात यावा, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

-----------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा "सर्वसमावेशक अर्थसंकल्प", असे या अर्थसंकल्पाचे वर्णन करावे लागेल. राज्यावर 3 लाख 27 हजार कोटी रुपये कर्ज असून त्यावर वाढते व्याज देण्यात येत आहे. अशा परिस्थितीत माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प मांडला आहे. याबाबत मी अर्थ मंत्री महोदय व मुख्यमंत्री महोदयांचे कौतुक करतो. या अर्थसंकल्पामध्ये अनेक कल्याणकारी योजना मांडलेल्या असून त्यापैकी काही योजनाबाबत मी बोलणार आहे.

अध्यक्ष महोदय, पालक मंत्री पांदण रस्त्यासाठी जेसीबी मशीन खरेदी योजना ही अतिशय चांगली योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून वर्षानुवर्षे हजारो नादुरुस्त असलेले पांदण रस्ते दुरुस्त होणार आहेत. पांदण रस्ते दुरुस्तीची मागणी आजपर्यंत कोणत्याही सरकारने मान्य केली नाही. शेतकऱ्यांना वर्षातील 365 दिवस शेतीमध्ये रात्रंदिवस जावे लागते. शेतीसाठी खत, बी-बियाणे, औषधे, मजूर घेऊन जावे लागते. पावसाळ्यात बैलांना शेतीमध्ये घेऊन जाताना शेकडो बैल चिखलात पाय फसून मेल्याच्या घटना आम्ही पाहिल्या आहेत. त्यामुळे पांदण रस्त्याच्या योजनेकरिता आम्ही वित्त मंत्री महोदय श्री.सुधीर मुनगंटीवार यांचेकडे मागणी केली होती. ती त्यांनी पूर्ण केली त्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. पांदण रस्ता अतिशय महत्वाचा आहे. शेतकऱ्यांना आपण इन्फ्रास्ट्रक्चर देतो त्यामधील हा रस्ता आहे. आज शेतकऱ्यांची मुले पावसाळ्याच्या 4 महिन्यांच्या कालावधीत शेतामध्ये जाताना चिखलात पाय जाऊन पायामध्ये काटे रुततात म्हणून शेतामध्ये जात नाहीत. अशा वेळी ही मुले शहरामध्ये जाऊन 5-6 हजार रुपये दरमहा वेतनाची नोकरी करतात परंतु वडिलांसोबत शेतामध्ये जात नाही. अशा तरुणांना शेतामध्ये पाठवावयाचे असेल, शेतीतून चांगले भाजीपाला, फळ उत्पादन घ्यावयाचे असेल तर पांदण रस्ते प्रभावी करण्याची आवश्यकता आहे. पांदण रस्त्यासाठी करण्यात आलेली 100 कोटी रुपये तरतूद कमी असली तरी आपण ही योजना सुरु केली, त्याबद्दल आपले धन्यवाद ! पुढील कालावधीमध्ये पांदण रस्ते वरच्या दर्जामध्ये घेऊन त्यासाठीची तरतूद वाढविण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.समीर कुणावार......

अध्यक्ष महोदय, आपला देश कृषी प्रधान असून 60 टक्के जनता शेतकरी आहे व 10 टक्के जनता शेत मजूर आहे. आपल्या देशातील जवळपास 65 ते 70 टक्के लोक शेती उद्योगावर अवलंबून आहेत. शेत मालावर प्रक्रिया करणारे उद्योग आपल्या राज्यात येण्यासाठी 25 ते 50 लाख रुपये सबसिडी देण्यात येणार आहे, ही अतिशय चांगली बाब आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये स्मॉल स्केल इंडस्ट्री निर्माण झाल्या पाहिजेत व त्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. या उद्योगामुळे शेतकऱ्यांच्या शेती मालाला चांगला भाव मिळेल व प्रत्येक गावामध्ये यामध्यमातून रोजगार वाढेल.

अध्यक्ष महोदय, राज्यातील अनेक शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती नाही. राज्यातील शेतकरी पारंपारिक पध्दतीने शेती करतात. कोणते फर्टीलायझर वापरले पाहिजे, आपल्या शेतामध्ये किती मात्रे आहे, स्फुरक किती आहे, पालस किती आहे, कोणते औषध फवारले पाहिजे इत्यादी माहिती शेतकऱ्यांना नाही. त्यामुळे सरकारने आधुनिक तंत्रज्ञान कृषी विषयक उपक्रम, कृषी घडामोडी, नवीन संशोधन, समुपदेशन यांचे शेतकऱ्यांना एकत्रित मार्गदर्शन करण्यासाठी "पंडीत दीनदयाल उपाध्याय कृषी मार्गदर्शन योजना" सुरु केली आहे. ही अतिशय अभिनंदनीय बाब आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या चुका समजण्यास मदत होईल व त्या दुरुस्त केल्यामुळे त्यांच्या उत्पन्नामध्ये त्यांना फायदा होणार आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारने गोहत्या बंदीचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक गावातील शेतकऱ्याकडे शेकडो जनावरे असून त्यांच्या चाऱ्याचा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा वेळी ही जनावरे कोठे घेऊन जावे हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर होता. त्यामुळे सरकारने गोवंश संगोपन योजना सुरु केली आहे. ही योजना 20 ते 25 गावांसाठी आहे. यामध्ये सुधारणा करुन प्रत्येक महसूली मंडळ किंवा जिल्हा परिषद सर्कलमध्ये एक गोरक्षण बांधले पाहिजे. ज्या शेतकऱ्यांना त्यांची जनावरे पोसता येणार नाहीत, त्यांना बांधून ठेवण्यासाठी जागा नाही, पाणी नाही, अशा शेतकऱ्यांची जनावरे गोरक्षण मध्ये दिली पाहिजेत. ज्यावेळी त्या शेतकऱ्यांना त्या जनावरांची आवश्यकता असेल त्यावेळी ते त्या जनावरास घेऊन जाऊ शकतील अशी तरतूद या

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.समीर कुणावार......

योजनेत करण्यात यावी. या योजनेमुळे जनावरांचे संगोपन चांगले होईल. गोरक्षणाच्या माध्यमातून जनावरांचे मल, मुत्र उपलब्ध होईल त्यामधून शेणखत तयार करणे किंवा त्याचा वापर करुन नवीन शोध लागलेले अनेक नवीन उत्पादने तयार करुन शकतो. त्यामाध्यमातून गोरक्षण स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, प्रत्येक जिल्ह्यात कृषी महोत्सव योजना सुरु करण्यासाठी सरकारने प्रोत्साहन दिले आहे. या प्रोत्साहनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवीन शोधांची माहिती मिळणार आहे. हा उपक्रम अतिशय चांगला आहे.

अध्यक्ष महोदय, वाढती महागाई व बदलते हवामान यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे परवडत नाही. सतत नापिकी व दुष्काळामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झाला असून त्याला हायब्रीड शेती परवडत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीकडे वळविणे ही काळाची गरज आहे. शेतीचा खर्च एकरी 25 ते 30 हजार रुपये येतो. एवढा खर्च करुन पाऊस कमी पडेल की जास्त पडेल, गारपीट होईल किंवा कसे, याची शेतकऱ्याला माहिती नसते. त्याला जसे हवामानसमोर येईल त्याला सामोरे जावे लागते. अनेक वेळा त्याने शेती उत्पादनासाठी केलेला खर्च वाया जातो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या जास्त प्रमाणात होतात. याकरिता शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीकडे वळविणे आवश्यक आहे. त्यामधून कमी उत्पन्न आले तरी चालले परंतु शेती उत्पादनासाठी कमी खर्च झाला पाहिजे. सेंद्रीय शेती संदर्भात सरकारने अतिशय चांगला निर्णय घेतला आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात सिंचनाचा मोठ बॅकलॉग असून सिंचन क्षमता 10 टक्क्यांच्या आत आहे. सिंचनाच्या बाबतीत आपल्या राज्याचा क्रमांक शेवटून दुसरा किंवा तिसरा असेल, ही अत्यंत खेदाची बाब आहे. यास जबाबदार कोण आहे, हा वेगळा विषय आहे. परंतु सिंचनासाठी आपण 7,850 कोटी रुपये तरतूद केली, त्याबद्दल मी सरकारचे आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, मुद्रा बँक योजने संदर्भात प्रसार व प्रसिध्दीसाठी समिती गठीत करण्यात आली आहे. हा विषय अतिशय महत्वाचा आहे. मुद्रा बँकेमार्फत कोणाला कर्ज मिळते, किती मिळते

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.समीर कुणावार......

याची माहिती अनेक तरुणांना नाही. हजारो तरुण मुद्रा योजनेंतर्गत कर्ज घेण्यासाठी बँकेत जातात व परत येतात. यासंदर्भात जिल्हास्तरावर गठीत करण्यात आलेली समिती अतिशय प्रभावी असणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-17 चा अर्थसंकल्प अतिशय चांगला असून त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री व अर्थ मंत्री महोदयांचे आभार मानतो. या अर्थसंकल्पाकडे चांगल्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. दृष्टी चांगली असेल तरच हा अर्थसंकल्प चांगला दिसेल. या निमित्ताने मला दोन ओळी आठवल्या त्या मी आपणास सांगतो,

"नेत्र बिघडले एखाद्याचे तर शस्त्रक्रियेची सोय आहे,
दृष्टीच बिघडली एखाद्याची तर सर्व निरुपाय आहे."

अध्यक्ष महोदय, शेवटी मी एक बाब सांगू इच्छितो की, हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय चांगला आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

------------------

यानंतर UU-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. शशिकांत खेडेकर (सिंदखेड-राजा) : अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. सन्माननीय वित्तमंत्री श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी सन 2015-16 या वर्षाचा अर्थसंकल्प या ठिकाणी सादर केलेला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याबाबत आपले मत या ठिकाणी व्यक्त केले आहे. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. परंतु मी सन्माननीय वित्तमंत्र्यांना सांगेन की, या विरोधकांनी या राज्याला कर्जबाजारी करुन ठेवले होते, याचे भान सुध्दा त्यांना राहिले नाही, हे आपले दुर्दैव आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपण सर्व समावेशक असे आणि शेतकऱ्यांसाठी चांगले निर्णय घेतले आहेत, त्याबद्दल आपले मनापासून हार्दिक अभिनंदन करतो आणि या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो, समर्थन करतो. सन्माननीय वित्तमंत्री महोदय आपणास मी एकच विनंती करतो की, माँ जिजाऊ साहेबांचे जन्मस्थान सिंदखेड राजा या तिर्थक्षेत्राचा विकास व्हावा म्हणून मागच्या वर्षी माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये मंजूरी दिली होती. त्या अनुषंगाने 311 कोटी रुपयांचा विकास आराखडा शासनास सादर झालेला आहे. त्यावर कार्यवाही होऊन या अर्थसंकल्पामध्ये तरतूद होईल अशी या देशातील आणि महाराष्ट्रातील तमाम जिजाऊ भक्तांची अपेक्षा होती. परंतु ती तरतूद झाली नसल्यामुळे ती तरतूद करण्यात यावी अशी मी या प्रसंगी आपणास नम्र विनंती करतो. तसेच या वर्षी माननीय राज्यपाल महोदयांच्या झालेल्या अभिभाषणामध्ये माँ जिजाऊ साहेबांचा उल्लेख सुध्दा नाही, तो व्हायला हवा होता असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. माझ्या सिंदखेड राजा मतदार संघामध्ये नागपूर-मेहेकर-सिंदखेड राजा-औरंगाबाद हा राज्यमार्ग गेलेला आहे. या रस्त्यावर फार मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे त्यावर अपघात होतात. अनेक बळी त्या ठिकाणी गेलेले आहेत. या रस्त्याची दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी मी निधी मागितला होता. पण त्याची तरतूद झालेली नाही. केंद्रीय दळणवळण मंत्री माननीय श्री. नितीन गडकरी यांनी या जिल्ह्यातील अनेक रस्त्यांसाठी निधी दिला आहे. परंतु त्यांच्याकडून चुकून हा रस्ता राहिला असावा असे मला वाटते. त्यामुळे याबाबत आपण दुरुस्ती करावी अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय दुसरी महत्वाची बाब म्हणजे खामगाव ते जालना या रेल्वे मार्गासाठी केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे. या रेल्वे मार्गासाठी केंद्र शासनाने जवळपास 3 हजार कोटी रुपयांची

2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. शशिकांत खेडेकर...

तरतूद केली आहे. हा रेल्वे मार्ग पूर्ण होण्यासाठी महाराष्ट्र शासनावर जी जबाबदारी टाकण्यात येईल, ती त्यांनी त्वरीत पूर्ण करावी अशी मी शासनास विनंती करतो. माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, खडकपूर्णा प्रकल्पामध्ये जमिनी गेलेले जे शेतकरी न्यायालयामध्ये गेले होते, त्यांना न्याय मिळाला आहे. परंतु याच अवॉर्डमध्ये असलेले जे शेतकरी न्यायालयात गेले नाहीत, त्यांना सुध्दा त्यानुसार भूसंपादनाचा मोबदला देण्यात यावा, अशी विनंती करतो. सरते शेवटी देऊळगाव राजा आणि सिंदखेड राजा तालुक्यामध्ये अनेक शासकीय कार्यालये आहेत. यापैकी काही भाड्याने घेतलेली आहेत तर काही इमारती अतिशय जुन्या झालेल्या आहेत. त्या कधीही पडतील अशी भिती वाटते. त्यामुळे शासनाच्या वतीने यासाठी प्रशासकीय भवन उभारण्यात यावे आणि त्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी, अशी विनंती करतो आणि पुन्हा एकदा माननीय अध्यक्षांचे आभार मानून थांबतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

---------

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शिवाजीराव नाईक (शिराळा) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये सहभागी होत असताना मी पहिल्यांदा मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री यांना मनापासून धन्यवाद देतो. कारण चालू साल हे निसर्गाच्या अवकृपेमुळे राज्याच्या दृष्टीने अडचणीचे वर्ष आहे. पण अशा परिस्थितीतही शेतकरी आणि ग्रामीण भागाला केंद्रबिंदू मानून फार महत्वाचे निर्णय घेऊन राज्याला दिलासा देण्याचा प्रयत्न त्यांनी केला असल्यामुळे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. वेळेअभावी मी फक्त काही मुद्यांचा या ठिकाणी उल्लेख करतो. अर्थमंत्री महोदयांनी एका बाजूला शेतीला आणि ग्रामीण भागाला महत्व देत असताना रोजगार वाढीच्या दृष्टीनेही लक्ष घातलेले आहे. माझ्या मतदार संघामध्ये चांदोली व्याघ्र प्रकल्प म्हणजे चांदोली अभयारण्य, चांदोली जलाशय आणि फार मोठा नैसर्गिक परिसर आहे की, ज्या ठिकाणी पर्यटनाला मोठा वाव आहे. त्या ठिकाणी डोंगरी भागातील लोकांच्या हाताला काम देण्याच्या दृष्टीने आपण अधिक लक्ष दिले तर आणि तो भाग विकसित केला तर ते आमच्या सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे ठरणार आहे. चांदोलीसारख्या प्रकल्पामुळे आणि राज्यातील विविध प्रकल्पांमुळे लोकांना पाणी उपलब्ध होत आहे. परंतु यामध्ये ज्यांची घरे-दारे उध्वस्त झाली त्यांच्या पुनर्वसनाकडे मात्र अद्यापही जेवढे लक्ष दिले पाहिजे तेवढे दिले जात नाही. माझ्या मतदार संघामध्ये पाण्यात बुडलेले लोक आणि पाण्याच्या वर असलेले, अभयारण्याच्या या व्याघ्र प्रकल्पामध्ये गेलेले लोक, अशा दोन्ही लोकांचे पुनर्वसन करण्याची बाब महत्वाची आहे. त्याकडे आपण अधिक लक्ष द्यावे आणि त्या लोकांना दिलासा द्यावा, अशीही विनंती या ठिकाणी करतो. नदीकाठच्या परिसराला पाणी मिळते, पण उंचवठ्यावर डोंगरी भागामध्ये असणाऱ्यांना पाणी मिळत नाही. माझ्या मतदार संघामध्ये 40 हजार एकर जमिनीला पाणी देणारी वाकुर्डे बुद्रूक सिंचन योजना मंजूर झालेली आहे. तिचे काही कामही झालेले आहे. सुमारे 332 कोटी रुपयांच्या योजनेवर आतापर्यंत 140 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. आता आपण टप्प्याटप्प्याने दोन वर्षामध्ये 150 कोटी रुपये दिले तर पाण्यापासून वंचित असणाऱ्या त्या परिसराला आणि आणेवारीमध्ये 50 टक्केपेक्षा कमी आलेल्या 58 गावांना यातून पाणी मिळणार आहे. म्हणून त्यांचाही मी या ठिकाणी उल्लेख करीत आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी आणखी एक मुद्दा महत्वाचा आहे की, महाराष्ट्राचे सुपूत्र स्वर्गीय कै. वसंतदादा पाटील यांच्यामुळे राज्य शासनाने अतिशय महत्वपूर्ण निर्णय त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शिवाजीराव नाईक.....

कालखंडामध्ये घेतलेले आहेत. एक ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, ज्यांच्या खांद्याला गोळी लागून ती आरपार गेली होती, आणि तुरुंगाच्या भिंतीवरुन उडी मारणारा हा त्या काळचा स्वातंत्र्य सेनानी, ते चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. राजस्थानसारख्या मोठ्या असणाऱ्या राज्याचे राज्यपाल म्हणून त्यांनी महत्वाची जबाबदारी भुषविली. त्याचप्रमाणे स्वातंत्र्याच्या लढ्यानंतर सामाजिक कार्यात, सहकारामध्ये प्रचंड मोठे काम करुन साखरेची आणि दूधाची धवलक्रांती केली, अशा या थोर पुरुषाचे या वर्षीचे वर्ष जन्मशताब्दी वर्ष आहे. येत्या 13 नोव्हेंबर 2016 पासून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सुरुवात होत असून 2017 ला हे जन्मशताब्दी वर्ष संपणार आहे. महाराष्ट्रात ज्यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये क्रांती केली आणि पहिल्यांदा खासगी संस्थांना प्रोत्साहित करुन इंजिनिअरींग आणि मेडिकल या व्यवसायाचे शिक्षण देण्याचे महत्वाचे पाऊल टाकले, अशा या नेत्याचे स्मरण या सभागृहामध्ये होत असताना मी मंत्री महोदयांचे विशेष बाब म्हणून लक्ष वेधतो की, या एक वर्षाच्या कालखंडामध्ये अत्यंत चांगले आणि विविध उपक्रम शासनाने हातामध्ये घेऊन हे जन्मशताब्दी वर्ष साजरे करावे, एवढीच या ठिकाणी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**अध्यक्ष :** सन 2016-17 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपली आहे. आता यावरील शासनाचे उत्तर सोमवारी देण्यात येईल.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO.VIII OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA WATER CONSERVATION CORPORATION ACT, 2000.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे (जलसंधारण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक-8, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधियिम, 2000 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

अध्यक्ष महोदय, मी या विधेयकासंबंधी थोडक्यात माहिती सांगते. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना 22 ऑगस्ट 2000 मध्ये झाली. तेव्हा महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम 2000 अन्वये हे महामंडळ स्थापनेचा मुख्य उद्देश 250 हेक्टरपेक्षा कमी क्षमतेपर्यंत असलेले लघु पाटबंधारे सिंचन प्रकल्प, पाणलोट, सामाजिक वनिकरण अशा कामांचे प्रचलन करावे आणि जास्तीत जास्त पाण्याचे संवर्धन व्हावे असा त्याचा उद्देश होता. या अधिनियमातील कलम 25 नुसार महामंडळाच्या स्थापनेपासून पुढील 5 वर्षाच्या कालावधीत शासनाकडून 2000 कोटी रुपयांचे भांडवली अंशदान देण्यात येईल अशी तरतूद आहे. यामध्ये आता स्थापनेपासून 25 वर्षाच्या कालावधीत सुमारे 10 हजार कोटी रुपये इतके भांडवली अंशदान देण्यात येईल अशी दुरुस्ती या विधेयकामध्ये प्रस्तावित करण्यात येत आहे. महामंडळाने सन 2001 ते 2004 या कालावधीत 103 कोटी रुपये कर्जरोख्यांद्वारे उभारला आहे.

यानंतर VV-1...

श्रीमती पंकजा मुंडे.....

शासनाकडून महामंडळाला स्थापनेपासून ते सन 2014-2105 पर्यंत 1603.08 इतका निधी आहे. सन 2015-2016 साठी शासनाकडून फक्त 7 कोटी रूपयांची अंशदानाची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. मात्र कलम 25 मध्ये दुरूस्ती होईपर्यंत वितरीत करता येणार नाही. महाराष्ट्रावर प्रचंड दुष्काळाचे सावट आहे आणि जलयुक्त शिवारासारखी योजना जलसंधारणातून होत असताना महामंडळाची आज खऱ्याअर्थाने गरज आहे. सन 2000 मध्ये जी स्थापना करण्यात आली त्याची सर्वाधिक आवश्यकता ही आज आहे. महामंडळाच्या माध्यमातून नदी पुनर्जिवनाची आणि छोट्या छोट्या सिंचन प्रकल्पांचे नियोजन येणाऱ्या महामंडळाच्या कालावधीत करु शकलो तर महाराष्ट्र दुष्काळमुक्त व्हावा असा आमचा मानस आहे त्यामध्ये यश आल्याशिवाय राहणार नाही. मी सभागृहाचा फार वेळ न घेता हे मुद्दे मांडलेले आहेत. महामंडळाच्या स्थापनेपासून 25 वर्षे गृहीत धरलेले आहेत त्यातील 15 वर्षे पूर्ण झालेली आहेत. 10 वर्षाचा या महामंडळाचा आराखडा मंजूर झाल्यास तयार करुन सिंचन वाढावे आणि जास्तीत जास्त पाण्याचे संवर्धन व्हावे यासाठी काम करणार आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**अध्यक्ष** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्मानीय सदस्य श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांचा आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**अध्यक्ष** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा दुसरा प्रस्ताव सन्मानीय सदस्य श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांचा आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**अध्यक्ष** : आता सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी. सन्माननीय सदस्यांच्या भाषणानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर होईल. त्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम सन 2002 मध्ये या सभागृहाने मंजूर केला. या महामंडळाच्या कायद्यामध्ये बदल करण्यासाठी हे विधेयक मंत्री महोदयांनी आणलेले आहे. खरे म्हणजे विधेयक अगदी साधे आहे. 2 कोटी रुपयांच्या ऐवजी पाचपट म्हणजे 10 हजार कोटी आणि 5 वर्षाऐवजी 25 वर्षाकरिता आणलेले आहे. याचा उद्देश कळला नाही की, 2 हजार कोटी 5 वर्षामध्ये सरासरी 400 कोटी रुपये दरवर्षी अभिप्रेत आहेत. त्याच धर्तीवरील रेशयो 25 वर्षासाठी 10 हजार कोटी रुपयांचा ठेवण्यात आलेला आहे. 25 वर्षानंतर किंवा 10-15 वर्षानंतर रुपयाची किंमत किती असेल मग पुन्हा अमेंडमेंट करावी लागेल. आता लगेच 10 हजार कोटी रुपये द्यायची इच्छा असेल तर समजू शकतो.

अध्यक्ष महोदय, मला एक सूचना करायची आहे की, जेव्हा सदनामध्ये एखादे सुधारणा विधेयक आणले जाते त्यावेळेला सभागृहामध्ये पेरंट ॲक्ट उपलब्ध पाहिजे. कुठल्या ॲक्टवर हे अमेंडमेंट केले जाते हे माहिती नाही. म्हणून मी आता वाचनालयातून मुख्य ॲक्ट जो सन 2000 मध्ये मंजूर झाला होता त्याची प्रत आणली आहे. कुठलेही सुधारणा विधेयक सभागृहामध्ये आणले जाते त्यावेळी अमेंडमेंट ॲक्टच्या इंग्रजी व मराठी दोन्ही प्रती वाचण्याकरिता लॉबीमध्ये उपलब्ध व्हायला पाहिजेत. यामध्ये मुख्य प्रश्न असा आहे की, जलसिंचनाची जी महामंडळे आहेत त्याच धर्तीवर जलसंधारणाचे महामंडळ सन 2000 मध्ये शासनाने केले. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील मंत्रिमंडळात होते. या महामंडळांबद्दल मुलभूत विचार करण्याची गरज आहे. समस्या अशी आहे की, या महामंडळाचे अध्यक्ष हे मंत्री महोदय असतात. सन्माननीय मंत्री महोदया या महामंडळाच्या अध्यक्षा आहेत मला त्यांच्याबद्दल वैयक्तिक काही बोलायचे नाही. मला एक धोरणात्मक विषय मांडायचा आहे. जलसंधारणाची एक श्वेतपत्रिका काढण्यात आली त्यानंतर चितळे समिती आली.

अध्यक्ष महोदय, यामध्ये प्रमुख सूचना अशी आहे की, या महामंडळाचे अध्यक्ष मंत्री असू नये. याच अशा नाही तर सर्वच महामंडळाचे अध्यक्ष हे मंत्री महोदय नसावेत. ती व्यक्ती कोण हे महत्वाचे नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे एखाद्या महामंडळाचे अध्यक्ष असतील. मी एका कंपनीचा चेअरमन होतो, एमएमआरडीएचा अध्यक्ष होतो. विमानतळ विकास कंपनीचा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

चेअरमन होतो. मला वित्त मंत्री महोदयांना विनंती करायची आहे की, माझ्या वेळेस वित्त सचिवांना विनंती केली होती की, सरकारी कंपनी असली तरी कृपाकरुन मुख्यमंत्र्यांना कंपनीचा संचालक ठेवू नका. त्यावेळेला मुख्यमंत्री म्हणून मी दोन कंपन्यांचा संचालक होतो. कार्यवाही करा म्हणून कोणी आग्रह धरला नाही आणि मलाही वेळ मिळाला नाही म्हणून ते राहून गेले. पण हे केले पाहिजे. यावर गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. आज सेबीच्या किंवा कंपनी कायद्याप्रमाणे संचालकावर खूप जबाबदारी असते. एखाद्या सही वगैरे राहून गेली म्हणजे मुख्यमंत्र्याला चौकशीला तोंड द्यावे लागेल अशी परिस्थिती आहे. ही महामंडळे वेगळी आहेत. कारण ती कंपनी व विधिमंडळाच्या कायद्याप्रमाणे झालेली आहेत.

अध्यक्ष महोदय, या महामंडळांचे संचालक किंवा सुपरविजन सचिवांनी करावे अशी अपेक्षा आहे. सचिवांनी सुपरविजन करायचे आणि त्याच मंत्री महोदयांनी करावे जे त्या महामंडळाचे अध्यक्ष आहेत. यामध्ये विसंगती निर्माण झालेली आहे. केंद्र सरकारमध्ये अशाप्रकारे कुठल्याही कंपनीचा किंवा महामंडळाचा अध्यक्ष किंवा संचालकही मंत्री महोदय नाहीत. मला वैयक्तिक कोणाबद्दल बोलायचे नाही, पण यावर गंभीरपणे विचार होण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय मंत्री महोदया चांगल्या आहेत, निश्चितपणे त्या चांगल्याप्रकारे काम करतील यात शंका नाही. पण याबाबत धोरणात्मक विचार केला पाहिजे की, राज्याच्या हिताकरिता अशाप्रकारचे व्यवस्थापन ठेवायचे काय? वीज मंडळामध्ये मंत्री चेअरमन नसतात तर मग सिंचन महामंडळ, जलसंधारण महामंडळामध्ये मंत्री, राज्यमंत्री चेअरमन असणे योग्य आहे काय? आज कोण मंत्री असेल, कोण चेअरमन असेल हा विषय नाही. राज्याच्या जलसंधारणाकरिता पैसे मिळावेत, जलसंधारणाची कामे लवकर व्हावीत. जलयुक्त शिवाराची कामे सहज करता येतील हा उद्देश चांगला आहे. पण याबाबत मुलभूत विचार करणे आवश्यक आहे आणि याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये याचा विचार करण्यात यावा. याबाबत चितळे समितीमध्ये शिफारस केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरे मला विचारायचे आहे की, या कार्पोरेशनचे ऑडिट कधी झालेले आहे. सीएजीचे ऑडिट होऊन सभागृहामध्ये आलेले आहे काय? याबाबत कधी चर्चा झालेली आहे काय? पब्लिक अकाऊंटस कमिटीमध्ये अहवालावर चर्चा झालेली आहे काय? या मोठमोठ्या

......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

कंपन्यांना 10 हजार कोटी रुपयांचे भागभांडवल देण्याची तरतूद करीत आहोत. ही सर्व महामंडळे कोण बघणार याचाही विचार होण्याची गरज आहे. 1-2 वर्षामध्ये एकदम 10 हजार कोटी रुपये द्यायचे असतील तर ज्याअर्थी 25 वर्षे कालावधी दिलेला आहे, म्हणजे पुन्हा तेच प्रमाण राहिल. दरवर्षी बजेटमधून सरासरी 400 कोटी रुपये देऊ अशी अपेक्षा असेल तर मग 25 वर्षे का, 50 वर्षे का नाही, 10 वर्षे का नाही, 15 वर्षे का नाही? 25 वर्षे कोठून आली. कारण 10 हजार कोटी रुपये बजेटमध्ये म्हटले होते. सरकारने 50 वर्षे ठेवावे, माझे काही म्हणणे नाही. पण याबाबतची पार्श्वभूमी काय आहे हे कळायला पाहिजे. मी जे प्रश्न उपस्थित केले त्याबाबत सभागृहाने गंभीरपणे विचार केला पाहिजे की, महामंडळे करताना मंत्री किंवा राज्यमंत्री यांनी कार्पोरेशन आणि कंपन्यांचे चेअरमन राहता कामा नये. कंपन्यांचा तर संचालक म्हणून तर बिलकूल राहू नये असे माझे स्पष्ट मत आहे. तसेच या महामंडळाचे कधी ऑडिट होते काय, याबाबत सभागृहामध्ये चर्चा होते काय, कामकाज होते किंवा नाही, या महामंडळांनी विकास किती केला आहे या सर्वांचा विचार व्हायला पाहिजे. सिंचन महामंडळांचे ऑडिट झाले नाही त्यामुळे काय झाले हे सर्वांना माहिती आहे. वीज महामंडळाची सुध्दा विशेष चर्चा होत नाही. या कंपन्या करताना यामध्ये सर्वच पब्लिक ऑफिशिअल्स किंवा मंत्री किंवा सरकारी कर्मचारी संचालक आहेत. कायद्यामध्ये तरतूदी करुन दोन बाहेरचे एक्सपर्ट संचालक नेमले तर चांगले काम होण्यास मदत होईल. या माझ्या सूचना आहेत याचे उत्तर मंत्री महोदय देतील अशी मला अपेक्षा आहे. धन्यवाद.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदय, अर्थमंत्री महोदयांनी आज अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उत्तर द्यावे अशी अपेक्षा होती. पण त्यांनी उत्तर देण्यासाठी अजून चार दिवस घेतले, त्याला माझी काही हरकत नाही. हे जे विधेयक आलेले आहे. जलसंधारणाचे काम राज्यात सर्वात महत्वाचे आहे यात काही दुमत नाही.

WW-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील ...........

मला आठवते सन 2000 च्या दरम्यान आपण महामंडळ तयार केले. डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे त्यावेळी जलसंधारण विभाग होता. त्यावेळी 2000 कोटी रुपये या महामंडळाला देऊ अशी घोषणा केल्याचे मला स्मरण आहे. त्यानंतरच्या काळात घोषणेप्रमाणे झाले नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय श्री.सुधाकरराव नाईक ज्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी त्यांनी विशेषतः जलसंधारण या विषयाचा उहापोह केला. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार राज्यमंत्री होते. ते ज्या जिल्हयात जातील त्या जिल्हयात जलसंधारणाच्या कामासाठी पैसे जाहीर करायचे. त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांमुळे फार मोठी जलसंधारण चळवळ चालू आहे असे वातावरण निर्माण झाले होते. नंतरच्या काळात कृष्णा खोरे महामंडळ सुरु केले. त्यानंतर इरिगेशनचा विषय प्राधान्याने हाताळला. जलसंधारण हा विषय थोडासा मागे पडला हे कबूल करावे लागेल. आता पुन्हा मागिल चार वर्षात लोक म्हणायला लागले की, जलसंधारणाला जास्त महत्व दिले पाहिजे. इरिगेशनला कितीही पैसा खर्च केला तरी शेवटच्या माणसापर्यंत आणि जास्त लोकसंख्येपर्यंत पोहचणे हे जलसंधारणमधून शक्य आहे. जलसंधारणाला वेगळे महत्व निर्माण झाले आहे. नव्या सरकारने फार मोठया प्रमाणावर लक्ष केंद्रीत करायचे ठरविले आहे. इरिगेशन हा विषय वेगळा आहे आणि जलसंधारण हा विषय वेगळा आहे. इरिगेशन हे लोकांच्यापर्यंत पोहचायला वेळ लागतो कारण एका टोकाहून दुस-या टोकापर्यंत पाणी नेण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रात हातात घेतलेले जे प्रकल्प आहेत. ते एवढे मोठे आहेत की, एकंदर व्याप्ती 472 प्रोजेक्ट इरिगेशनची आहे. ज्याचा परिणाम सदृश्य असा लोकांना दिसेल असा परिणाम व्हायला काळ लागणार आहे. यामध्ये दुमत नाही. ज्या प्रोजेक्टवर 75 टक्के खर्च झाला आहे ते प्रोजेक्ट आधी पूर्ण करायचे आणि नंतर 50 टक्क्याचा प्रोजेक्ट पूर्ण करायचा हे माननीय राज्यपाल गेली 4 वर्षापासून सांगत आहेत. त्यामुळे राज्य सरकारला तशा प्रकारे काम करणे भाग आहे. म्हणून काही प्रकल्प हळूहळू पूर्ण होण्याची चित्रे तयार होतील. याबाबत माझ्या मनात शंका नाही. तरी देखील महाराष्ट्रात असा काही भाग राहणार आहे की, ज्याला जलसंधारणाची गरज आहे. जलसंधारचा हा विषय हा महाराष्ट्राच्या अधिक जिव्हाळयाचा आणि हिताचा आहे. ज्या ठिकाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

......2/-

श्री.जयंत पाटील ...........

जलसिंचनाचे पाणी पोहचत नाही, लांब आहे, त्यामध्ये अंतर आहे. त्या ठिकाणी या जलसंधारणाला महत्व आहे. आजही सर्व दुष्काळी भागामध्ये सिमेंटचे बंधारे बांधणे, पाणी अडविणे याला फार महत्व आहे.

अध्यक्ष महोदय, शिरपुरला माननीय श्री.अमरिश पटेल साहेबांनी चांगले काम केले. शिरपुर पॅटर्न महाराष्ट्रात निर्माण झाला. ओढे खोल करणे, नाले खोल करणे आणि तिच माती पुढे सरकवून पाणी अडविणे. सन्माननीय सदस्य श्री.अनिल बाबर यांच्या खानापूर तालुक्यात फार मोठया प्रमाणात जलसंधारणाची कामे चार-चार, आठ-आठ किलो मीटर लोकांनी लोक सहभागाने केलेली आहेत. त्याचा फायदा आता संकटात व्हायला लागलेला आहे. माझी सूचना एवढीच आहे की, जलसंधारणामध्ये एक दोष कायम स्वरुपाचा आपल्या सर्वांना लक्षात आलेला आहे. त्यावर तज्ञांनी माथा ते पायथा ही संकल्पना जन्माला घातली. ही संकल्पना ज्यावेळी जन्माला घातली त्यावेळी आपल्या लक्षात आले की, जलसंधारणाचे काम करणा-या सर्व इंजिनिअर्स बरोबर बसा, महाराष्ट्रात अशा ब-याच एरियामध्ये वॉटरशेड डिल करण्यासाठी फार मोठया प्रमाणात यापूर्वी काम केलेले आहे. माथा ते पायथा ही कल्पना त्या वॉटरशेडमध्ये वापरण्याचे काम करुन ब-याच वाटॅरशेड टॅकल केलेल्या आहेत. तरी देखील महाराष्ट्रात कदाचित काही हजार वॉटरशेड शिल्लक आहेत. ज्यामध्ये माथा टू पायथा काम पूर्ण झालेले नाही. मला यासाठी भिती वाटते की, एकदा महामंडळ सरकारच्या बाहेर गेले की, मंत्रालयात त्याबाबत काहीच माहिती येणार नाही. मंत्रालयातील क्लार्कला, डेस्क ऑफीसरला, डेप्युटी सेक्रेटरीला आणि सक्रेटरीला याची फारशी माहिती होत नाही. कृष्णा महामंडळात काय झाले ? हे मंत्रालयात कळत नाही किंवा विदर्भ विकास मंडळात इरिगेशनमध्ये काय होते ते इथे सर्व सांगण्याची मर्यादा नाही. कारण त्यांना पुढे अधिकार दिलेले असतात. म्हणून मला अशी भिती आहे की, या महामंडळाच्या नंतर राज्याच्या मंत्रीमहोदयांकडून किंवा राज्याच्या मंत्रालयामध्ये बल्क सँक्शन होऊन, तुम्हाला 500 कोटी रुपये दिले, 700 कोटी रुपये दिले तर त्या महामंडळामध्ये पुन्हा नव्या स्टो-या तयार होऊ नयेत. म्हणून महामंडळाचे काम पारदर्शी चांगले करण्यासाठी एक अशी रचना असली पाहिजे की, महाराष्ट्राच्या जलसंधारण

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील ...........

विभागाचे सचिव त्या महामंडळावर मेम्बर म्हणून आहेत, संचालक म्हणून असले तरी महामंडळाचे काम डे टू डे वर्कींग आणि कोणत्या वॉटरशेड टॅकल करायचे निर्णय स्थानिक दृष्टया होत असतात. विशेषत: दुष्काळी भागात या महामंडळाचे काम होणार आहे.

अध्यक्ष महाराज, आपण महामंडळाला मोठा निधी देण्याचे सूतोवाच केलेले आहे. या बिलाचे आज जरी उत्तर नसले तरी याठिकाणी राज्याचे अर्थमंत्री बसलेले आहेत. म्हणजे त्यांचीही या विषयात किती रुची आहे. हेही ते इथे बसून सांगता आहेत, माननीय श्रीमती पंकजा ताईंच्या विभागांना त्यांच्याकडून नक्कीच जास्त निधी मिळेल अशी अपेक्षा या ठिकाणी करतो. पुढच्या बजेटमध्ये नाही. आता हे बिल या अटीवर मान्य करतो की, आपण सोमवारच्या उत्तराच्या भाषणात आपण जे मुद्दे महत्वाचे आहेत त्यामध्ये आम्ही जे जे वाढवायला सांगितले आहे, त्यात ॲडीशनल सूचना करतो की, माननीय श्रीमती पंकजाताईच्या विभागासाठी या आर्थिक वर्षात या महामंडळाला आपल्याकडून 1000 कोटी रुपये देण्याची घोषणा सोमवारी अर्थसंकल्पावरील उत्तराच्या भाषणात करावी. अगोदरचे रिॲप्रोप्रियेशनचे बिल आणि हे बिल अशा दोन बिलांना अध्यक्ष महोदयांनी आग्रहाने सांगितले. मी नानांना बोलू शकलो नाही. आज आपण सुदैवाने उपस्थित आहात ताईंच्या उत्तराच्या भाषणाच्या आधी दिलदारपणाने उभे राहून सांगा की, या महामंडळाला 1000 कोटी रुपये या आर्थिक वर्षात देण्याची घोषणा करतो.

माननीय श्री.दिवाकर रावते साहेब तुमचा मराठवाडयाचा संपर्क मोठा आहे. मराठवाडयामध्ये जलसंधारणाचे काम किती होणार आहे हे तुम्हाला माहीत आहे. हीच वेळ आपण एकटे आहात, गर्दी नाही. तुम्ही त्यांच्या बाजूला बसलेले आहात. तुमच्या प्रेशरला बळी पडून जलसंधारण विभागाचे माननीय राज्यमंत्री श्री.शिवतारे साहेब मागच्या बाकावर बसलेले आहेत. तुम्ही पुढच्या बाकावर बसा. आम्ही सर्व विचार करीत होतो, आता एकटे अर्थमंत्री सापडलेले आहेत. त्यांनी उभे राहून ही घोषणा करावी. मग हे बिल मान्य करावे अशी माझी विनंती आहे.

............



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेश पाटील ( चाळीसगांव ) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. दोन ते तीन सूचना आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना करु इच्छितो. जलसंधारण महामंडळाच्या दृष्टीकोनातून आमच्यासारख्या सर्वसामान्य शेतक-यांना न्याय देण्याच्या दृष्टीने खूप अपेक्षेने पाहतो आहोत. कारण जलसंपदाच्या माध्यमातून 400, 500 कोटी रुपयांचे आकडे ऐकून आमचा शेतकरी त्याच्यावर विश्वास ठेवायला तयार नाही. मला आनंद वाटतो की, माझ्या तालुक्यातील गेल्या चाळीस वर्षापासून नदी पुनरुर्जीवनाच्या माध्यमातून ज्या प्रमाणे मागणी होती. त्या प्रमाणात न्याय मिळत नव्हता. मला गेल्या आठवडयामध्ये नदी पुनरुर्जीवनाच्या अंतर्गत आपल्या महामंडळाकडून सिमेंट नाला बांध मंजूर झाला आणि शेतक-यांना ख-या अर्थाने मनापासून आनंद झाला.

XX-1...........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेष पाटील .....

अध्यक्ष महोदय, मागील सरकारवर मला आरोप करावयाचे नाहीत पण वस्तुस्थिती अशी आहे की, शेवटच्या वर्षात याकरिता असलेल्या बजेटपेक्षा 4-5 पट जास्त कामांची भूमिपुजने करण्यात आली. शेतकऱ्यांच्या भावनेशी खेळण्याचा प्रकार झाला असे मला वाटते. म्हणून केवळ राजकारण नव्हे तर कालबध्द आराखडा तयार करुन महामंडळाच्या निधीचे योग्य नियोजन केले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आमच्या जळगाव जिल्हयातील चाळीसगाव तालुक्यात डोंगरी भागात तितूर नदी आहे. मागील 60 वर्षात या नदीवर कोणतेही नियोजन केले गेले नाही. बंधारे बांधून पाणी अडविले गेले नाही. औरंगाबादचे डॉ.आनंद आसरकर, साताऱ्याचे डॉ.पोळ यांनी सामाजिक क्षेत्रात चांगले काम केले आहे, नदी पुनर्जीवनाचे आदर्श प्रकल्प त्यांनी तयार केलेले आहेत. केवळ निधी आला म्हणून सिमेंट नाला बांध करायचे, ते कॉपी पेस्ट करायचे, मंजूरी घ्यायची हे योग्य नाही. चांगली योजना राबविली गेली तर अपेक्षीत यश त्यातून मिळू शकेल. त्यामुळे या क्षेत्रातील चांगल्या व्यक्तींचे अनुभव व अभ्यासाचा उपयोग शासनाने करुन घ्यावा. जेणे करुन ही योजना यशस्वी होईल.

अध्यक्ष महोदय, लहान लहान नद्या काही शहरातून वाहतात. औरंगाबाद, चाळीसगाव, जळगाव इत्यादी शहरातून वाहणाऱ्या नद्यांचे पुनर्जीवन केले पाहिजे. हा ग्रामीण नसून शहराचा पार्ट आहे असे सांगितले जाते. यामध्ये धोरण बदलले तर न्याय मिळेल व या पाण्याचा जलसंधारणाकरिता चांगला वापर करता येईल. आपले जलसंधारणाकरिता 25 वर्षासाठी 10 हजार कोटीचे नियोजित बजेट आहे. आपल्या नंतर स्थापन झालेल्या तेलंगणा राज्याने याकरिता 28 हजार कोटीची तरतूद केली आहे. जलसंपदा विभागाच्या प्रकल्पाचे आकडे मोठे असले तरी जलसंधारण विभागाकडून आम्हाला खूप अपेक्षा आहेत कारण हे प्रकल्पाची वेगाने अंमलबजावणी होऊन त्याचे ताबडतोब रिझल्ट मिळू शकतात. जलसंपदा विभागाकरिता निधीची आवश्यकता आहेच, पण जलसंधारणासाठी आपण अजून निधी वाढवून दिला तर नदी पुनर्जीवनाच्या माध्यमातून लहान लहान प्रकल्प उभे राहू शकतील असे मी आज सभागृहात उपस्थित माननीय जलसंधारण मंत्री व माननीय अर्थमंत्री यांना सांगू इच्छितो. यातून शेतकऱ्याला न्याय मिळेल व दुष्काळी

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.उन्मेष पाटील .....

परिस्थितीत चांगला पर्याय उभा राहू शकेल. मागील काळात जलसंधारण खात्यात पाणी अडवा व पैसे जिरवा असे प्रकार झालेले आहेत. अनेक एनजीओकडून वॉटरशेडच्या माध्यमातून चुकीच्या पध्दतीने काम झालेले आहे. मागील चुकीचा व निगेटीव्ह ॲप्रोच ठेऊ नये असे मला वाटते. आता या उपलब्ध निधीतून कालबध्द कार्यक्रम आखून त्याला मंजूरी दिली तर त्या योजनेमध्ये चुकीचा हस्तक्षेप होणार नाही असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....3

डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) : अध्यक्ष महोदय, जलसंधारण विधेयकाला पाठींबा देताना मी काही महत्वाच्या सूचना मांडू इच्छितो. हे महामडळ 250 हेक्टरपेक्षा कमी असलेल्या सिंचन प्रकल्पाकरिता आहे. परंतु जलसंधारण ही गरज आहे. इस्त्रायलमध्ये 1998 ते 2002 मध्ये दुष्काळ पडला होता. इस्त्रायलमध्ये जेथे कमी पाऊस पडतो त्यामुळे तेथे जलसंधारणावर जोर दिला गेला होता. म्हणून आपल्या या जलसंधारण महांमंडळाची व्याप्ती वाढविली पाहिजे. 250 हेक्टरपेक्षा कमी क्षमतेचे तलाव बांधण्यासोबतच प्रत्येक गावामध्ये, शिवारामध्ये किती पाणी आपण मुरवितो, त्याप्रमाणे संपूर्ण योजना तयार करण्याचे काम या महामंडळाकडून झाले पाहिजे. ग्रामीण व शहरी भागात पाण्याचा वापर कमी करण्यासाठी या महामंडळाचे लक्ष असले पाहिजे. जलसंधारण महामंडळाला निधी देताना या महामंडळाची सर्वंकष व्याप्ती वाढवून जलसंधारण कसे वाढविता येईल व पाणी कसे वाचविता येईल याचा विचार करावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय सावकारे (भुसावळ) : अध्यक्ष महोदय, या जलसंधारण विधेयकाला पाठींबा देण्याकरिता मी उभा आहे. मी सांगू इच्छितो की, जलसंधारणाच्या जुन्या मंजूर झालेल्या कामांना निधी दिला जात नाही. एका बाजूला आपण नवीन कामे करीत आहोत. पण जुनी कामे थोडयाशा रिपेअरमुळेही पूर्ण होऊ शकतात व तेथे पाणी साठू शकते परंतु रिपेअर्सकरिता निधी दिला जात नाही. एवढा मोठा पैसा त्यामुळे वाया जातो. बरेच ठिकाणी 10 हजार रुपये ते 1 ते 2 लाख रुपयांअभावी तेथे पाणी साठू शकत नाही. म्हणून आपण रिपेअर्सकरिता निधी दिला पाहीजे. मोठमोठी धरणे बांधण्याऐवजी जलसंधारणाद्वारे लहान धरणे बांधून पाणी अडविण्याचा उपक्रम आपण हाती घेतला आहे, पण त्याद्वारे बंधाऱ्यांची थोडीसी उंची वाढविली तर पाणी मोठया प्रमाणात साठू शकते. किती क्षमतेचे काम जलसंधारण कडे द्यावे हे ठरलेले व अवलंबून असते. परंतु या जलसंधारणाची कपॅसिटी वाढवून घेतली पाहिजे. म्हणजे बऱ्याच बंधाऱ्यांची उंची वाढून तेथे चांगल्या प्रमाणात पाणी साठू शकते अशी मी सूचना करु इच्छितो. धन्यवाद.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल कूल (दौंड) : अध्यक्ष महोदय, या जलसंधारण विधेयकाला पाठींबा देण्याकरिता मी उभा आहे. जलसंधारणाचे काम राज्यामध्ये अतिशय चांगल्या प्रकारे करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या कामाकरिता चांगला निधीही उपलब्ध झालेला आहे परंतु मी काही महत्वाच्या सूचना करु इच्छितो. जलसंधारणाचे काम भविष्यात महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा कायापालट करु शकते पण काम सक्षमपणे झाले तर ते शक्य आहे. सकाळी देखील सभागृहात चर्चा झाली की, यामध्ये वेगवेगळया यंत्रणा काम करीत आहेत. एकाच कामाच्या ठिकाणी लघु पाटबंधारे, छोटे सिंचन तलाव व कृषी विभागाने एस्टीमेट केले तरी ती वेगवेगळी येतात. त्यामुळे या महामंडळाकरिता एक तांत्रिकदृष्टया स्वतंत्र सक्षम विभाग निर्माण करावा. तांत्रिकदृष्टया सिमेंट बंधारे बांधावयाचे असतील तर त्याचे डिझाइन व नियोजन राज्यस्तरावर करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक ठिकाणी वेगळेपणा ठेवणे योग्य नाही याचे महामंडळाने नियोजन करावे. मापदंडाच्या बाबतीत ग्रामीण भागात ज्याचा अभ्यास आहे त्याने बारकाईने पाहिले तर लक्षात येते की, कामाची किंमत ही मापदंडामध्ये बसणारी असावी. परंतु यामध्ये उलटे केले जाते. कामाची किंमत जेवढी होते त्याप्रमाणे पाणीसाठा दाखविला जातो. प्रत्यक्षात तो नसतो. त्यामुळे या आकडेवारीमध्ये बारकाईने पुन्हा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. असे घडत गेले तर आपण मोठमोठे आकडे सांगत जाऊ. परंतु तेवढा पाणीसाठा तेथे होणार नाही. याकरिता महामंडळाने भविष्यात लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी महत्वाचा मुद्दा मांडला आहे की, या योजनेत आपण पाणलोट निश्चित केलेले आहेत पण त्यामध्ये माथा ते पायथा असे काम व्हायला पाहिजे पण तसे काम होत नाही. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मध्येच काम होते. एकीकडे राज्य शासनाकडून काम होते. बऱ्याच ठिकाणी कंत्राटदारच ठरवतात की काम कोठे करायचे. मला पुणे जिल्हयामध्ये असे बरेच अनुभव आलेले आहेत. म्हणून सूचना कराव्या लागतात की, आपण ग्रामीण भागातील लोकांसाठी काम करीत असून लोकांच्या मागणीप्रमाणे व पाणलोटाप्रमाणे काम करावे. याबाबत महामंडळाने भविष्यात काळजी घेण्याची आवश्यकता आहे. अन्यथा ही योजना कागदावर कितीही चांगली असली व आपण कितीही निधी दिला तरी आपणास यामध्ये अपेक्षीत यश येणार नाही. मी माननीय जलसंधारण मंत्री यांना चर्चेच्या वेळी काही सूचना केल्या होत्या. माननीय मुख्यमंत्री यांना भेटून यामध्ये काही बदल करण्याची विनंतीसुध्दा केलेली आहे. भविष्यात महामंडळाकडून हे सर्व बदल घडतील अशी अपेक्षा व्यक्त करतो व हे महामंडळ इतर महामंडळाप्रमाणे न राहाता महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेकरिता जलसंधारणाचे चांगले काम करेल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

-----

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.वैभव नाईक (कुडाळ) : अध्यक्ष महोदय, अध्यक्ष महोदय, या जलसंधारण विधेयकाला पाठींबा देण्याकरिता मी उभा आहे. खरे तर कोकणात मागील 15-20 वर्षात सिंचनाचा एकही प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे जलसंधारण महामंडळाकडून उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पावर आमची मोठी आशा आहे. मागील 15-20 वर्षात सिंचन व जलसंधारणाच्या प्रकल्प मंजूर झालेल्या प्रकल्पापैकी एकही प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे जुने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी या महामंडळाने निधी देण्याचा प्रयत्न करावा. नवीन हाती घेणार असलेले प्रकल्प एकाच वेळी सुरु होऊन एकाच वेळी पूर्ण झाले पाहिजेत तरच त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल.

यानंतर YY -1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.वैभव नाईक.....

त्यामुळे यावेळी मी एक महत्त्वाची सूचना माननीय मंत्री महोदयांना करणार आहे. शासनाने जुन्या प्रकल्पांना पूर्ण करण्याकरिता योग्य प्रमाणात निधी देणे आवश्यक आहे. हे करीत असताना नवीन प्रकल्प जर ताबडतोब पाणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक असतील तर त्यांनाही योग्य प्रमाणात निधी देणे अत्यावश्यक आहे. नवीन प्रकल्प एकाच वेळी सुरु व एकाच वेळी पूर्ण झाले तरच त्याचा फायदा शेतक-यांना होईल. या नवीन प्रकल्पांना देखील या संदर्भातील योजनांना घ्यावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.शशिकांत खेडेकर ( सिंदखेडराजा ): अध्यक्ष महोदय विधेयक क्रमांक 08 वर माझे विचार व्यक्त करण्याकरिता व सदरहू विधेयकाला पाठिंबा देण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंधारण महामंडळाच्या माध्यमातून राज्यभरामध्ये अतिशय चांगले काम होत आहे. माननीय अर्थमंत्री महोदयांनी या महामंडळाच्या उपक्रमांकरिता जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मी त्यांना विनंती करीत आहे. या महामंडळाच्या आधारे कमी वेळामध्ये चांगले जलसंधारणाचे काम महाराष्ट्रात होऊ शकणार आहे. हे करीत असताना नवीन बंधारे होणार आहे. परंतु ज्या जुन्या बंधा-यांना थोडासा निधी उपलब्ध झाल्यानंतर जर त्याचा उपयोग होणार असेल, तर शासनाने तो निधी द्यावा. या योजनांचे अंदाजपत्रक तयार करीत असताना त्याकरिता कृषी विभागाचे वेगळे, जिल्हापरिषद यंत्रणेमार्फत वेगळे, लोकल सेक्टरमार्फत वेगळे अंदाजपत्रक तयार केले जाते. अशा परिस्थितीत बांधण्यात येणारा बंधारा जास्तीत जास्त टिकून त्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त सिंचन कसे होईल, याची महामंडळाने काळजी घ्यावी. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( कराड-उत्तर ) : अध्यक्ष महोदय, विधेयक क्रमांक 08 वर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2000 मध्ये जलसंधारण महामंडळासंदर्भातील कायदा पारित करण्यात आला होता. या महामंडळावर मंत्री, राज्यमंत्री, कृषीमंत्री, पाटबंधारे मंत्री असे सदस्य नेमण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कलम 4 च्या पोट कलम थ मध्ये एक विशेष तज्ज्ञाची नेमणूक करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. पाटबंधारे क्षेत्राची विशेष माहिती व प्रत्यक्ष अनुभव असलेला राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला अधिकारी सदस्य म्हणून नेमण्याची तरतूद या कलमान्वये विधेयकामध्ये करण्यात आली होती. याबाबत माझी सूचना अशी आहे की, यामध्ये पाटबंधारे म्हणण्यापेक्षा जलसंधारण असे म्हटले तर ते जास्त संयुक्तिक होईल. जलसंधारण क्षेत्राची विशेष माहिती व प्रत्यक्ष अनुभव असलेला अधिकारी असा यामध्ये बदल करणे अपेक्षित आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** सन्माननीय मंत्री महोदया मलाही याबाबत एक-दोन सूचना करावयाच्या आहेत. या महामंडळाच्या योजना व उपक्रमांच्या अंतर्गत सिमेंट बंधारे बांधण्यात येणार आहेत, त्यामध्ये नाल्यांचे खोलीकरण अनिवार्य केले पाहिजे, अशी मला सूचना करावयाची आहे. तसेच, विहिरींचे पुनर्भरण करण्यात आले तर योजनेचा अधिकाधिक व प्रभावी लाभ शेतक-यांना होईल. या दोन सूचना मला या निमित्ताने मांडावयाच्या होत्या.

------

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे ( ग्रामविकास व जलसंधारण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, विधेयक क्रमांक 08 वर सभागृहामध्ये जी चर्चा झाली, त्या चर्चेला उत्तर देण्याकरिता मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, विधेयक क्रमांक 08 वर बोलत असतांना अनेक सन्माननीय सदस्य व स्वत: माननीय अध्यक्ष यांनी अतिशय चांगल्या व मौलिक सूचना केलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सन 2000 मध्ये या महामंडळाची निर्मिती झाली होती. सन 2000 नंतर पाच वर्षांमध्ये या महामंडळाकरिता 2000 कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आतापर्यंत पंधरा वर्षाच्या काळामध्ये या 2000 कोटी रुपयांपैकी या महामंडळाला केवळ 1439 कोटी रुपये इतका निधी प्राप्त झालेला आहे. हा निधी पूर्ण करण्यात आला नाही, म्हणून दुष्काळी परिस्थिती ओढविलेली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. या महामंडळांतर्गत मंजूर असलेल्या योजना व त्यावर आतापर्यंत झालेला खर्च जर आपण पाहिला तर आपल्या लक्षात येईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, तत्कालीन मुख्यमंत्री स्व.सुधाकरराव नाईक यांनी जलसंधारणासंबंधीची चळवळ सुरु केली होती. प्रत्येक ठिकाणी जाऊन त्यांनी जलसंधारणाबाबत प्रोत्साहन दिले होते. त्यानंतर शासनाचा कल जलसंपदेकडे गेलेला आहे. तेव्हाच्या काळाची ती गरज होती. 1995 पासून जलसंपदेचा सुरु झालेला कल सन 2015 पर्यंत कायम राहिला. त्या जलसंपदेच्या कलानंतर राज्याच्या आर्थिक पाहणीमध्ये यासंबंधीचा अहवाल मिळालेला आहे. या माध्यमातून राज्यामध्ये केवळ 0.1 टक्के सिंचन झालेले आहे. सन 2000 मध्ये महामंडळ सुरु केले त्यावेळी त्या माध्यमातून अपेक्षित सिंचन क्षेत्र 6,17,000 हेक्टर इतके होते. यानंतर पंधरा वर्षाच्या काळामध्ये केवळ 1,61,000 हेक्टर सिंचन करता आलेले आहे. त्यापैकी गेल्या दीड वर्षाच्या काळामध्ये 1,3,000 हेक्टर सिंचन झालेले आहे. शासनाला अजूनही 4,56,000 हेक्टर सिंचनाचे उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे. याकरिता या महामंडळाची आवश्यकता आहे. केवळ धरण बांधून शेतक-यांच्या शेतात पाणी जात नाही तर त्याकरिता जलसंधारणाची आवश्यकता आहे, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून डिसेंट्रलाईज्ड वॉटर बॉडीज तयार केल्या जातात. यासंदर्भात सन्माननीय अध्यक्ष यांनीही नाला खोलीकरण व विहिरी पुनर्भरणासंदर्भात सूचना केलेल्या आहेत.

श्रीमती पंकजा मुंडे

माजी मुख्यमंत्री सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले की, महामंडळावर एक जलसंधारण क्षेत्राची माहिती असलेला तज्ज्ञ व्यक्ती नेमण्यात यावा. यावर चांगले काम करण्याचा चंग शासनाच्या खात्याने दुष्काळमुक्त महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत बांधलेला आहे. पावसाने धोका दिला नसता तर या वर्षी आपण दुष्काळावर नव्हे तर इतर विषयांवर चर्चा करु शकलो असतो.

अध्यक्ष महोदय, या महामंडळाच्या कार्यकाळाचा विस्तार स्थापनेपासून सन 2025 पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. सन 2000 मध्ये या महामंडळाची स्थापना झालेली आहे. आता सन 2016 हे वर्ष सुरु आहे. येथून पुढे म्हणे सन 2025 पर्यंत हे महामंडळ काम करु शकेल, अशी या कायद्यामध्ये तरतूद केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, महामंडळाला जो वाढीव कार्यकाळ मिळालेला आहे, त्यामध्ये 10,000 कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत. त्यामध्ये ऑन ॲन ॲव्हरेज आतापर्यंत 840 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. 10,000 पैकी याकरिता ऑन ॲन एव्हरेज निधी दर वर्षी खर्च करावा लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होते, त्यावेळी मी पहिल्यांदा या सभागृहात निवडून आले होते. मला सभागृहामध्ये काम करण्याचा केवळ एक वर्षाचा अनुभव होता. त्यावेळी सहयाद्रीवर माननीय तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी दुष्काळासंदर्भात बैठक घेतली होती. जलसंधारण व पाण्याच्या टंचाईविषयी या दुष्काळासंबंधीच्या सहयाद्रीमधील बैठकीमध्ये चर्चा झाली. यासंदर्भात प्रत्येक आमदार महोदय म्हणत होते की, आम्हाला बोअरवेल पाहिजे. आम्हाला 200-800 फूट खोल बोअरवेल पाहिजे. आम्हाला टँकर पाहिजे. मला असे म्हणावयाचे होते की, या बोअरवेल व टँकरमध्ये भरण्याकरिता पाणी तर मिळाले पाहिजे ना ? बोअर वेल जर अशा प्रकारे 200 ते 800 फूट खोल खणत गेले तर पाणी नाही लाव्हा मिळणार आहे. याकरिता मी एक उदाहरण देत आहे की, एका ग्लासामध्ये कोल्ड ड्रिंक असेल आणि त्यामध्ये एक माणूस स्ट्रॉ ने ते पित असेल तर तो ते एकटा दहा मिनिटे पिऊ शकेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे........

परंतु दहा माणसे त्यामध्ये स्ट्रॉ घालून ते कोल्ड-ड्रिंक पित असतील तर ते एका क्षणात संपेल. अशीच परिस्थिती भू-गर्भातील पाण्याच्या पातळीची झालेली आहे. भू-गर्भातील पाण्याच्या साठ्याचे इतक्या वाईट पध्दतीने एक्स्प्लॉयटेशन झालेले आहे, त्यावर पूर्वीच्या काळामध्ये कोणतेही निर्बंध घालण्यात आलेले नाहीत. केवळ पाणी अडवून चालणार नाही तर पाण्याचा एक - एक थेंब जमिनीमध्ये मुरला पाहिजे, याचे सुक्ष्म नियोजन व अभ्यास करण्यात येत आहे. हाच आमचा याबाबतचा निकष आहे.

अध्यक्ष महोदय, नदी पुनरूज्जीवित करण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सूचना दिलेल्या आहेत. कोणताही कार्यक्रम हा आभाळातून कोसळलेला नसतो. तो कार्यक्रम राज्यामध्ये यापूर्वी कधीच झाला नाही, असे शासनाचे म्हणणे नाही. जलयुक्त शिवार ही संकल्पना आम्ही आधीच राबविली होती, ती आता या शासनाने कंटिन्यू केली, असेही सन्माननीय सदस्य श्री.जयकुमार गोरे यांनी सांगितलेले आहे. सातारा जिल्हयामध्ये देशमुख साहेबांनी प्रायोगिक तत्त्वावर राबविली होती. माझ्या तालुक्यामध्येही मी असाच पॅटर्न वैजनाथ पॅटर्न एनजीओ व स्वतःच्या खिशातील पैसे काढून राबविला होता. या अंतर्गत मी 22 ओढे स्व-खर्चाने व एनजीओ यांच्या खर्चाने खोदून त्यावर बंधारे बांधले होते. हे सर्व मी सन 2011 मध्ये केले होते. सन 2011 मध्ये आम्ही सत्तेत नव्हतो.

झेडझेड-1/--

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे......

तेव्हा मी सत्तेत नव्हते. तेव्हापासून जलसंधारण खाते हे माझे पॅशन आहे. पाण्याचा थेंब जमिनीत मुरविणे आणि त्यातून पर ड्रॉप मोर ही कन्सेप्ट घेऊन जाणे असे माझे मिशन आहे. माझे पॅशन आणि मिशन हे दोन्ही एकच आहे. म्हणून या विभागाच्या माध्यमातून जास्तीत जास्त कामे झाली पाहिजेत, अशी माझी इच्छा आहे. हे पॅशन मी अंगावर घेतलेले आहे.

अध्यक्ष महोदय, आज महाराष्ट्रात जलयुक्त शिवार योजनेची चर्चा सुरु आहे. कोणत्या तरी एका बंधाऱ्याला छिद्र पडलेले असेल किंवा कोणत्या तरी एका बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असेल तर तो भाग वेगळा आहे. प्रशासनातील मुख्य प्रशासक जेव्हा एखादी गोष्ट जिद्दीने करतो, त्यावेळी ती गोष्ट कनिष्ठ पातळीपर्यंत पर्क्युलेट होते. पण मुख्य प्रशासक बदलल्यानंतर कनिष्ठ पातळीवरील यंत्रणेची कार्यपध्दती बदलण्यासाठी वेळ लागतो.

अध्यक्ष महोदय, माझ्याकडे रोजगार हमी योजनेचा विभाग आहे. हे वंचिताचे डिपार्टमेंट आहे. माझ्याकडे ग्रामविकास विभाग आहे. हे वंचिताचे डिपार्टमेंट आहे. मला केंद्र शासनाकडून 15 हजार कोटी रुपये मिळणार आहेत. पण ते डायरेक्ट ग्रामपंचायतींना मिळणार आहेत. आज मी दररोज सरपंचानी 10 लाख किंवा 12 लाख रुपयांचा भ्रष्टाचार, अपहार केला म्हणून हिअरींग घेत आहेत. अशा वेळी 15 हजार कोटी रुपये कशा प्रकारे खर्च होणार आहेत, याबद्दल माझ्या मनात चिंता निर्माण झालेली आहे. यासाठी नियोजन करण्याची गरज आहे. माझ्याकडे जलसंधारण खाते आहे. या खात्यासंदर्भात खूप वेळा चर्चा केलेली आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या संदर्भात कोणताही पक्षीय भेदभाव न करता स्वागत करण्याची गरज आहे. आपण सर्वजण सभागृहात काम करीत असतो. आज जलसंधारणाचा उद्देश आपल्याला साध्य करता आला नाही तर आपल्याला भविष्यातील पिढी माफ करु शकणार नाही. माझी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, गेल्या काही वर्षातील मी केलेली भाषणे तपासली तर मी फक्त पाण्यावर बोलल्याचे लक्षात येणार आहे. हे माझे पॅशन आहे.

अध्यक्ष महोदय, जलसंधारणामधील अध्यक्ष बदलण्याची सूचना केलेली आहे. याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री महोदय घेतील.सदर निर्णय माझ्या अख्यत्यारित येत नाही. जलसंधारण

.......2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे......

महामंडळातील अध्यक्ष हे पूर्वी देखील मंत्रीच होते. मग आता जलसंधारण महामंडळातील अध्यक्ष बदला म्हणून का बोलले जाते ? मी गेल्या दीड वर्षापासून जलयुक्त शिवार योजना अतिशय पारदर्शीपणे राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा वेळी मला अध्यक्षपदी न ठेवता दुसऱ्या कोणाला तरी अध्यक्ष करा असे म्हटल्यामुळे माझ्यात नैराश्याची भावना पसरलेली आहे. अध्यक्ष कोणीही असावा तो माझ्यासारखा पॅशनने काम करणारा असावा, एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. ज्या व्यक्तीला पाण्याविषयी प्रेम आहे, असा अध्यक्ष आपल्याला शोधावा लागणार आहे. मी या ठिकाणी नम्रपूर्व सांगू इच्छिते की, पॅशनेटली काम करुन अतिशय निस्पृहपणे मी प्रत्येक पाण्याच्या थेंबासाठी प्रयत्न केलेला आहे. यासंदर्भात माझी इस्त्राईल कौन्सलर जनरलसमवेत मिटींग झालेली आहे. तसेच मला देशातील विविध पातळीवर तसेच सिंगापूर येथे वॉटर सेमिनरसाठी आमंत्रित केलेले आहे. एखादे काम माझ्या माध्यमातून बाहेर जाते किंवा कसे याबाबत मला कल्पना नाही. पण हे काम योग्य ठिकाणी पोहचत आहे एवढे मला या ठिकाणी आवर्जून सांगावयाचे आहे. अशा प्रकारचे काम करणे हे माझे पॅशन आहे. जगाच्या पाठीवर अशा प्रकारचे काम करणारी मी एकटीच पॅशनेट असू नये. अशा प्रकारचे काम करणारे दुसरे देखील असायला हवे.

अध्यक्ष महोदय, माझ्या विभागाला आतापर्यंत 1939 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. सद्य:स्थितीत 2 हजार कोटी रुपयांचा आकडा आम्ही गाठू शकलो नाही. मी यामधील योजनांचा अभ्यास केलेला आहे, काही योजना आम्ही रद्द ही केलेल्या आहेत. कोकणात प्रचंड योजना घेण्यात आलेल्या आहेत. कोकणातील जमिनीचा स्टाटा हा या कामासाठी अयोग्य आहे. त्या ठिकाणी पाणी साठवू शकत नाही.

**अध्यक्ष** : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, यामध्ये दायीत्व निर्माण झालेले आहे. यामधील कामे स्टाटाला अयोग्य होती. अशा ठिकाणी जलसंधारणाची कामे करणे हे उपयोगाचे ठरणार नव्हते. यासंदर्भातील जिओग्राफिकल स्टडी केल्यानंतर ती कामे अयोग्य राहतील असे निश्चित केले होते.

........3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे......

आज सर्वात जास्त दुष्काळ कोणत्या भागात आहे, सर्वात जास्त कमी आणेवारी कोणत्या भागात आहे, सर्वात जास्त टँकरची आवश्यकता कोणत्या भागात जास्त आहे, सर्वात कमी पाणी कोणत्या भागात आहे, या सर्व गोष्टींचा इत्थंभूत अभ्यास करुन विभागाने काही निकष निश्चित केले आहेत. मी सभागृहात आज उपस्थित करण्यात आलेल्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझ्या विभागाचा निधी खर्च करणे असे ध्येय नसून, योजना यशस्वीपणे राबविणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. गेल्या अनेक वर्षापासून वेगवेगळ्या विभागाच्या माध्यमातून हजारो, लाखो आणि अब्जावधी रुपयांचा निधी खर्च केला जात आहे. या माध्यमातून काय साध्य झाले ? विभागाकडे 2900 कोटी रुपयांचे दायीत्व आहे. जर मी योजनांचा अभ्यास करुन ते रद्द केले नसते तर माझ्या विभागाला 4400 कोटी रुपये द्यावे लागले असते. याचा अर्थ या महामंडळाला मी जर अजून 100 वर्षे मुदतवाढ दिली असती तर अशा वेळी मला फक्त जुन्या योजनांची बिले देण्याचीच काम करावी लागली असती. मला या विषयी कोणताही आक्षेप नाही. पण यामधील मंजुरी कशा पध्दतीने मिळालेल्या आहेत, हे जेव्हा माझ्या लक्षात आले होते. त्यावेळी अरे सर्वात जास्त तर मराठवाड्यात टँकरची संख्या आहे, सर्वात जास्त पाण्याची टंचाई अमरावती जिल्ह्यामध्ये आहे, काही भागांमध्ये योजनांसाठी दिलेला निधी अल्पसा आहे, विशिष्ट जिल्ह्यांमध्ये आणि विशिष्ट भागांमध्ये निधी दिलेला आहे. म्हणून मी माझ्या प्रत्येक योजनांमध्ये ह्युमन इंडेक्स लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी माझ्या योजनेशी आणि माझ्या विभागाशी प्रतारणा करु शकणार नाही. मग यामधील कोणतीही योजना असू द्या, अशा योजनांसाठी विभागाने निकष निश्चित केलेले आहेत. त्यामुळे सर्वसाधारणपणे ही एक आपली गरज आहे. हे बिल अतिशय महत्वाचे आहे. दुष्काळ मुक्त महाराष्ट्राकडे वाटचाल करण्यासाठी हे बिल अतिशय महत्वाचे आहे. या महामंडळामध्ये अध्यक्ष हा कोणी असो, त्याचा जीव पाण्यासाठी तुटणारा असावा, त्याने प्रत्येक पाण्याच्या थेंबासाठी काम करावे, असा अध्यक्ष महामंडळाला दिला तर माझ्या हाताला ताकद मिळणार आहे. हा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांचा आहे. सन 2025 पर्यंत महामंडळाला मुदतवाढ देण्याचा आणि भविष्यात महामंडळाला 10 हजार कोटी रुपये हे सन 2025 पर्यंत उपलब्ध करुन देण्यासाठी हे बिल अतिशय महत्वाचे आहे. हे बिल सभागृहाने मंजुर करावे अशी मी विनंती करीत आहे.

.....4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : बाबांनी पूर्वीच्या अनुभवातून सांगितले आहे. त्यांचे देखील बरोबर आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्रीमती पंकजाताईंनी फार कन्व्हेसिंग भाषण केलेले आहे. याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. माननीय मंत्री श्रीमती पंकजाताईंनी निधी पेक्षा काम महत्वाचे असते असे सांगितलेले आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या क्षेत्रात माझा अनुभव फार दांडगा आहे. माननीय वित्तमंत्र्यांकडू निधी काढण्यासाठी हेच फ्लोअर अतिशय महत्वाचे असते. माननीय मंत्री श्रीमती पंकजाताईंनी केलेल्या आग्रहास्तव माननीय वित्तमंत्री 100 ते 200 कोटी रुपये देतील यात कोणतीही शंका नाही. माननीय वित्तमंत्री यांचे सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील उत्तराचे भाषण सोमवार, दिनांक 28 मार्च, 2016 रोजी होणार असून, त्यांच्याकडून आपल्या विभागासाठी 1 हजार कोटी रुपये मंजूर करुन घेण्याची आवश्यकता आहे. गरज पडल्यास मंत्री महोदयांनी माझी बाजू घेण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणातून पॅशनेट हा शब्द सतरा ते अठरा वेळा वापलेला आहे. याबद्दल आमची कोणतीही अडचण नाही. सभागृहात माननीय परिवहन मंत्री श्री. दिवाकर रावते उपस्थित असताना माननीय मंत्री श्रीमती पंकजाताईंनी पॅशनेट शब्द सतरा ते अठरा वेळा वापलेला आहे. पॅशनेटचा मराठी पर्यायी शब्द काय आहे या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी दिल्यानंतर आम्ही विधेयकाला संमती देणार आहोत.

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महोदय, मी जगातील कोणताही प्रश्न विचारल्यास त्याचे उत्तर देऊ शकेल. परंतु, पॅशनेटचा मराठी शब्द काय आहे ते मला पटकन आठवत नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे वित्तमंत्री होते. वित्तमंत्र्याकडून निधी मिळविणे किती अवघड असते याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. मी निधी मिळावा असे म्हणाले नाही. निधी किती खर्च झाला असा प्रश्न सन्माननीय सदस्यांकडून केला जातो. पण निधी कोठे जास्त प्रमाणात खर्च केला जातो यावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. त्यामुळे माननीय वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आश्वासन दिलेले आहे. दुष्काळ मुक्त महाराष्ट्राचे श्रेय माझ्यापेक्षा जास्त माननीय वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनाच मिळणार आहे. कारण ते माझ्यापेक्षा वरिष्ठ आहेत. माननीय वित्तमंत्र्यांनी लागेल तेवढा निधी दिला जाईल एवढेच आश्वासन मला द्यावे आणि विधेयक संमत करुन घेण्यासाठी मदत करावी, अशी मी विनंती करीत आहे.

.......5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते खंड 1 (दोन्ही सम्मिलित) अनुसूची, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

AAA-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 8 संमत करावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष :** सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 8 संमत झाले आहे.

---------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 28 मार्च, 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता पुनः भरेल.

( सभागृहाची बैठक 6 वाजून 11 मिनिटांनी सोमवार, दिनांक 28 मार्च, 2016 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION